# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १०-०४-१९९७ ते ०३-१०-१९९७**

## रजिष्टर क्र. ०६

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १०-४-१९९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दि.१०-४-९७ रोजी मा.सभापती श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने दुपारी ३.०० वाजता झाली.सभेला अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.**

१) श्री.सुभाष टाकळकर
२) श्री.त्रिंबक तुपे
३) श्री.अभिमन्यु भालेराव
४) श्री.कचरु नवपुते
५) श्री.विकास जैन
६) श्री.भगवान घडामोडे
७) श्री.रशिदखाँन (मामू)
८) श्री.स.अ.रऊफ म.अ.माबुद
९) श्री.स.अली मिरा सलामी
१०) श्री.जोशी संजय रामदास
११) श्री.गौतम लिंबाजी लांडगे
१२) सौ.यशोदा धनंजय वाडेकर
१३) श्री.विधाते प्रभाकर तुकाराम
१४) श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
१५) श्री.जयवंत केशवराव ओक

**विषय क्र.१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २१ (१) व (५) अन्वये सभापती पदाची निवड करणे.

**संवाद :**

**सचिव** :स्थायी समिती सभापती पदाकरीता खालील प्रमाणे स.सभासदांनी नामनिर्देश फॉर्म भरलेले आहेत.

१) श्री.कचरु चंद्रभान नवपुते
२) श्री.विकास रतनलाल जैन
३) श्री.प्रभाकर सिताराम विधाते

नामनिर्देशन फॉर्म परत घेणे करीता ००.३० मिनिटाचा वेळ देण्यात यावा अशी विनंती केली.सभापती नामनिर्देशन फॉर्म परत घेण्यासाठी ००.३० मिनिटाचा वेळ देण्यांत येतो.(वेळ अंदाजे ३.१० वाजता)

(याच वेळेस विरोधी पक्षाचे सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.सभागृह सोडून जातात.सभात्याग केलेले सर्व विरोधी पक्षाचे सर्व सभासद ००.०५ मिनिटात पुन्हा सभागृहात प्रवेश करतात.वेळ अंदाजे ०३.१५ वाजता)

**सचिव :** दोन सभासदांनी उमेदवारी मागे घेतलेली आहे.

१) श्री.कचरु चंद्रभान नवपुते

२) श्री.विकास रतनलाल जैन

आता फक्त एकच उमेदवार स्थायी समिती सभापती पदाकरीता बाकी आहे.

**सभापती** : श्री.प्रभाकर सिताराम विधाते यांचे एकच नामनिर्देशन पत्र बाकी असल्याने मा.सभापती पदाकरीता श्री.प्रभाकर विधाते यांची बिन विरोध निवड झाल्याचे घोषित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

स.श्री.प्रभाकर विधाते यांची स्थायी समितीचे सभापती म्हणून निवड झाल्याचे घोषित केल्यानंतर मावळते सभापती यांनी नवनिर्वाचित सभापती यांचेकडे कार्यभार हस्तांतरीत केला.

श्री.प्रभाकर विधाते यांची सभापती पदी नियुक्ती झाल्याचे घोषित झाल्यावर स.सभासदांची समायोचित भाषणे झाली.नुतन सभापतींनी सर्वांचे आभार मानले.

"जन गण मन" या राष्ट्र गीताने सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
मा.नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २९-४-९७ रोजी दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली.सभेच्या अध्यक्षस्थानी सभापती श्री.प्रभाकर विधाते हे होते.सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.गिरजाराम हाळानोर
२) श्री.सुभाष टाकळकर
३) श्री.त्रिंबक तुपे
४) श्री.कचरु नवपुते
५) श्री.अभिमन्यु भालेराव
६) श्री.विकास जैन
७) श्री.भगवान घडामोडे
८) श्री.रशिदखाँन (मामू)
९) श्री.स.अ.रऊफ म.अ.माबुद
१०) श्री.स.अली मिरा सलामी
११) श्री.जोशी संजय रामदास
१२) श्री.गौतम लिंबाजी लांडगे
१३) सौ.यशोदा धनंजय वाडेकर
१४) श्री.गांगवे बन्सी
१५) श्री. जयवंत ओक

**संवाद :**

**श्री.मिरा सलामी** : सभागृहास व मनपा प्रवेशद्वारास नावे देण्याबाबतचा प्रस्ताव बऱ्याच महिन्यापुर्वी पारित झालेला आहे,नावे आतापावेतो का देण्यांत आली नाहीत? याची माहिती देण्यात यावी.

**श्री.बंडू ओक :** श्री.मिरा सलामी यांनी विनंती केल्यानुसार नावे देण्यांत यावी.

**मा.सभापती :** मा.आयुक्तांनी याची नोंद घ्यावी व आगामी बैठकीस माहिती दयावी.

**श्री.रशिदखाँन (मामू)** : यासाठी शहरातील जेष्ठ नागरीक श्री.गोविंदभाई श्रॉफ यांना बोलाविण्यात यावे.

**श्री.बंडू ओक :** शहरातील जेष्ठ नागरीक,माजी नगराध्यक्ष यांना या कार्यक्रमासाठी बोलाविण्यात यावे.तसेच प्रमुख पाहुणे व अध्यक्ष म्हणून मा.खासदार व मंत्री महोदय यांनाही बोलावण्यात यावे.

**श्री.गिरजाराम हाळानोर** : मागील एक-दोन स्थायी समिती बैठकामधून शहरातील वाढत्या डांसाच्या उपद्रवाबाबत चर्चा झाली होती की,डास निर्मुलनासाठी शहरात "डास निर्मुलन पंधरवाडा"राबविण्यात यावा.प्रशासनाने याबाबत काय कार्यवाही केली,याची माहिती देण्यांत यावी.लवकरच पावसाळयास सुरुवात होत आहे.यासाठी शहरातील मोठे नालेही साफ करुन घेण्यांत यावे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** : एप्रिल महिन्यात मनपातर्फे डास निर्मुलन पंधरवाडा राबविण्यात आला होता. घरोघर जाऊन नोव्हानची फवारणी करण्यात आली. डासांची

उत्पत्ती होऊ नये यासाठी "स्वच्छ औरंगाबाद" ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी आवश्यक ते कर्मचारीही देण्यात येणार आहेत.

**श्री.बंडू ओक** : या मोहिमेसाठी आवश्यकतेनुसार जादा कर्मचारी तातडीने देण्यांत यावे.आतापर्यंत प्रशासनाने काय केले?

**श्री.कचरु नवपुते** : सुरत पॅटर्नची अंमलबजावणी करण्यात यावी या मोहिमेत व्यवस्थित काम झाले तर सर्वत्र स्वच्छता निर्माण होईल. माझ्या वार्डात मी विधी सल्लागार यांच्या समवेत पाहणी केली आहे या मोहीमेसाठी तात्पुरत्या स्वरुपात जादा मजुरांची आवश्यकता आहे.

**श्री.रशिदखाँन (मामू)** : शहरातील बरेचसे नागरीक नाल्यांमध्ये कचरा टाकतात.त्यामुळे या नाल्यामध्ये मोठया प्रमाणावर घाण साचलेली आहे.यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.जे नाल्यामध्ये कचरा टाकतात त्यांच्यावर केसेस करावयास हव्यात.

**श्री.मिरा सलामी :** मनपा शहरात रसवंत्या टाकण्यासाठी परवानगी देते.रसवंती चालक तेथील कचरा रस्त्यावर फेकतात यासाठी त्यांना नोटीसा देण्यांत याव्यात.अन्यथा त्याची परवानगी रद्द करण्यांत यावी.

**स.सभापती** : रसवंती चालकांनी रस्त्यावर कचरा टाकू नये यासाठी त्यांना नोटीसा देण्यांत याव्यात.

**श्री.अ.रऊफ** : बिल्डींग सेक्शनतर्फे मागील दोन महिन्यात दोन लाखाची एम ॲण्ड आरची कामे निघाली होती. यात कोणकोणती कामे करण्यांत आली याची माहिती देण्यात यावी.

**श्री.घडामोडे :** शहरात स्वच्छ औरंगाबाद माहीम राबविण्यात येत आहे. यात ओपन स्पेसचीही साफसफाई करण्यात यावी.

**मा.उप-आयुक्त** : सध्या सुरत हे शहर स्वच्छतेच्या बाबतीत खुप प्रसिध्द झाले आहे. या संदर्भाने सुरत महानगरपालिकेने एक सेमीनार आयोजित केलेला होता. या सेमीनारसाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मा.महापौर, मी स्वत: व आरोग्य वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.या सेमीनारच्या वेळी सुरत शहराची पाहणी करण्यात आली असता,असे दिसून आले की,सुरत शहरात नागरीक, व्यापारी कोणीही रस्त्यावर,नाल्यामध्ये कचरा टाकत नाहीत. सुरत शहरात प्लेगची साथ आल्यानंतर ही स्वच्छता मोहीम हाती घेतली होती. या शहरात चार हजार कॉटन इंडस्ट्रीज असून हिऱ्यास पैलू पाडण्याचे कारखाने, डाईन इंडस्ट्रीज मोठया प्रमाणावर आहेत.मनपामध्ये उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांकडूनच सुरत मनपा प्रशासनाने आठ-दहा महिन्यात शहरातील साफसफाई करवून घेतली. झोपडपट्टयामधूनही साफसफाई चांगल्या प्रकरे झालेली आहे. घराघरातून कचरा कुंडया नगरसेवक स्वेच्छा निधीतून देण्यात आलेल्या आहेत. झोपडपट्टयांमधील नागरीकांसाठी सुलभ शौचालय बांधण्यात आलेले आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांची साफसफाई खाजगी कंत्राटदारांमार्फत केली जाते.एकदा साफसफाई काम पुर्ण झाल्यानंतर जे नागरीक रस्त्यावर कचरा टाकतात त्यांच्याकडून अधिभार वसुल केला जातो.हे अधिकारी सर्व क्षेत्रिय अधिकारी,कर्मचारी यांना देण्यांत आलेले आहेत.हातगाडीवाले,पानपट्टीवाले हेही साफसफाईस चांगली मदत करतात. ते रस्त्यावर कचरा टाकत नाहीत.या सेमीनारवरती आधारीत एक पुस्तकही काढण्यात आलेली होती व ती सर्व स.सदस्यांना वितरीत करण्यात

आलेली होती. सुरत महानगरपालिकेच्या धर्तीवरती औरंगाबाद महानगरपालिकेने "स्वच्छ औरंगाबाद" ही योजना राबविण्याचे ठरविले.या संदर्भाने प्रस्ताव तयार करण्यात आला असून ती सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात येत आहे.ही मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यासाठी मनपातील वर्ग-१ दर्जाचे अधिकारीयांना झोनल कमिशनर म्हणून प्रत्येक विभागात नेमण्यात आलेले असून त्यांना सहाय्य करण्यासाठी अतिरिक्त विभागीय अधिकारी व तांत्रिक अधिकारी म्हणून वर्ग-२ चे अधिकारी नेमण्यात आलेले आहेत.या अधिकाऱ्यांची सकाळच्या वेळेस कार्यालयीन काम करावयाचे आहे.तक्रारी पाहून त्यावर उपाययोजना करतील.आणि दुपारच्या वेळेस कार्यालयीन काम करावयाचे आहे.विभागीय कार्यालयास प्राप्त होणाऱ्या तक्रारी तातडीने दूर करण्यासाठी अशा अधिकाऱ्यांना आर्थिक अधिकार प्रदान करण्यात येणार आहेत.त्याचबरोबर त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरती योग्य प्रकारे नियंत्रण ठेवण्यासाठी झोनल कमिशनर्सना प्रशासकीय स्वरुपाचे अधिकारही देण्यांत येणार आहेत. मनपाने साफसफाई करुन घेतल्यानंतर जे नागरिक रस्त्यावर कचरा टाकतील त्यांच्याविरुध्द प्रशासकीय अधिभार वसुलीची कार्यवाही करण्यात येणार आहे.शहरातील झोपडपट्टया व काही गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी सुलभ शौचालय योजना राबविण्यात येणार आहे.

या मोहीमेअंतर्गत शहरातील विविध भागात पडलेली माती,बिल्डींग मटेरीयल मनपा उचलून घेणार आहे.तर शहरातील काही प्रमुख रस्त्याचे साफसफाईसाठी खाजगीकरण करण्यात येणार आहे. रात्रीच्यावेळी या रस्त्याची साफसफाई केली जाईल. शहरातील इतर भागाची साफसफाई दोन शिफ्टमध्ये करण्यात येणार आहे.या संदर्भाने काम संघटना प्रतिनिधीशी चर्चा झाली असून त्यांनी शहरातील साफसफाई दोन शिफ्टमधून करण्यास अनुमती दर्शविली आहे.आवश्यकते प्रमाणे सफाई कर्मचाऱ्यांमध्ये वाढ करण्यांत येईल.वाढीव कर्मचारी घेतांना न्यायालयात सादर केलेल्या ज्येष्ठता यादीनुसारच कर्मचारी घेतले जातील ही मोहीम जनमाणसांपर्यंत चांगल्या रीतीने पोहचून त्यास उत्तम प्रतिसाद मिळावा यासाठी सर्वतोपरी जाहिरात करण्यात येईल.१ मे.रोजी महाराष्ट्र दिनी बसस्टँडसमोर मुख्य कार्यक्रम घेण्यात येणार आहे.याचबरोबर सर्व विभागीय कार्यालयांना वार्डा-वार्डातून १ मे रोजी कार्यक्रम घेण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.या मोहीमेच्या यशस्वीतेसाठी शालेय विद्यार्थी,स्वयंसेवी संस्था यांचेही सहकार्य घेण्यात येणार आहे.औरंगाबाद हे एक पर्यटन स्थळ आहे.या मोहीमेच्या यशस्वीतेसाठी सर्व स.सदस्यांचे सहकार्य अपेक्षित आहे.

**श्री.अ.रशिदखॉंन (मामू) :** यासाठी आवश्यक तो प्रस्ताव आजच्याच बैठकीत ऐनवेळी प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**श्री.संजय जोशी** : ही एक चांगली योजना आहे. औरंगाबाद हे एक पर्यटन स्थळ आहे.येथे वर्षभर देशविदेशातून नागरीक येत असतात. या मोहीमेस सर्वांनी सहकार्य करावे.

**श्री.रशिदखॉंन (मामू)** : लवकरच पावसाळा सुरु होत आहे. शहरातील सर्व प्रमुख नाल्यांची साफसफाई पावसाळयापुर्वी करुन घेण्यात यावी.

**मा.सभापती** : पावसाळयापुर्वी सर्व नाल्यांची साफसफाई करुन घेण्यांत यावी.

**श्री.विकास जैन :** स्वच्छ औरंगाबाद मोहीमेअंतर्गत खुले प्लॉटही साफ करणार काय? ते त्यांनीच साफ करुन घ्यावेत.संबंधितांना नोटीसा देण्यात याव्यात.

**मा.सभापती :** प्रायव्हेट प्लॉटवरतीही कचरा,माती उचलून घेण्यात यावी.बरेचसे नागरीक प्लॉटवर खोदून माती,मुरुम नेतात.यावरही नियंत्रणही ठेवण्यांत यावे.

**श्री.रशिदखॉंन (मामू) :** जकातीच्या करंट आकाऊंट संदर्भाने माहिती देण्यात यावी.

**श्री.संजय जोशी :** औरंगाबाद मनपा हद्दीतील औद्योगिक वसाहतीत काही तरुण उद्योजक कारखाने चालवतात. ते माल कारखान्यात आणून त्यावर प्रक्रिया करतात व परत शहराबाहेर पाठवतात.परंतु यामुळे आयातीतील मालावर फरक पडत नाही.अशा उद्योजकांना आर फॉर्म सवलत देण्यात यावी व केवळ प्रक्रीयेसाठी आयात होणाऱ्या मालावर जकात आकारण्यात येऊ नये.जर प्रक्रीया झाल्यानंतर माल परत जात नसेल तर त्यावर जकात आकारण्यात यावा.मनपा हद्दीत येणाऱ्या मालावरील ८०% जकात नाक्यावरच भरुन घेतली जाते व २०% जकात मध्यवर्ती गोदामावर वसुल केली जाते. ती पध्दत बरोबर नाही.पूर्ण जकात संबंधीत जकात नाक्यावर भरुन घेण्यांत यावा.

**मा.सभापती :** हा विषय सर्वसाधारण सभेचा असल्याने येथे त्यावर चर्चा करण्यांत येऊ नये.

**उप-आयुक्त :** जकात नियमात तरतुद आहे की, शहरात आलेला माल तसाच परत जात असेल तर त्यावर जकात आकारु नये.प्रकीयेच्या खर्चावर जकात आकारायची असे उद्योजक संघटनेचे म्हणणे आहे.

**श्री.रशिदखान (मामू) :** यामुळे मनपाचे मोठया प्रमाणावर नुकसान होईल.अशा प्रकारचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुर झाला तरी त्यास शासनाची मंजुरी लागेल.

**श्री.घडामोडे :** अपना बाजार शॉपिंग सेंटरच्या दुकानास ६०,०००/- टॅक्स लावण्यात आला होता.नंतर तो रु.१०,०००/- करण्यात आला. टॅक्स एवढया मोठया प्रमाणात कमी कसा झाला याची माहिती देण्यात यावी.

**स.सभापती :** आगामी बैठकीत माहिती देण्यांत यावी.

**श्री.जयवंत ओक :** नाथ जोशी समाजाची समर्थनगर भागात स्मशानभूमी आहे.या स्मशानभूमीत जाण्यास रस्ता नाही.प्रशासन या बाबींकडे लक्ष देत नाही रस्ता अद्यापपर्यंत का दिला गेला नाही. याची माहिती दयावी.

**शहर अभियंता** : रस्ता करुन देण्याबाबत सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

**श्री.संजय जोशी :** शहरात रस्त्यावर जी उघडी मटनाची दुकाने आहेत ती बंद करण्यांत यावीत.

**श्री.रशिदखॉंन (मामू) :** यासाठी एरीयावाईज स्लॉटर हाऊस बनवावे लागतील.

**उप-आयुक्त** : मागील काही दिवसात वाहतुकदारांचा संप होता या संप कालावधीत वाहतूक बंद असल्याने साधारणतः ८५ लाख रु.जकात कर उत्पन्न कमी प्राप्त झालेले आहे.सध्या जकात उत्पन्न प्रतिदिन रु.१० लाख सरासरी एवढे आहे.

**श्री.जयवंत ओक** : मलेरीया फवारनीची मोहीम वार्डवाईज करण्यात यावी.

**श्री.गौतम लांडगे** : चिकलठाण्यात शॉपिंग सेंटर मनपातर्फे बांधण्यात येत आहे ते जवळजवळ १० फुट रस्त्यावर येत आहे. त्यामुळे इतर व्यापारीही रस्त्यावर येतील व रस्ता अरुंद होईल.

**शहर अभियंता** : या ठिकाणी आवश्यक तो रस्ता आहे रस्त्यावर शॉपिंग सेंटर येत नाही.

**विषय क्र.२/१ :**

मालमत्ता अधिकारी कडून मा.आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की,चिकलठाणा येथील विभागीय कार्यलयाच्या शेजारील जुनी इमारत तोडून (पोस्ट ऑफीस इमारत) त्या जागेवर आर सी सी दुकान बांधून त्या भाडे तत्वावर देणे करीता मा.सर्वसाधारण सभेत प्रति दुकानाचे अनामत रु.२०,०००/- दि. १६-३-९६ रोजी ठराव पारीत झालेला आहे.

परंतु सदरील दुकानाचे भाडे निश्चित करण्यासाठी गृहीत करण्यांत आलेल्या समितीसमोर ठेवण्यात आले असता खालील प्रमाणे भाडे निश्चित करण्यांत आले आहे.

अ) अनामत रक्कम रु.४०००/- प्र.चौ.मी.दि.१६-२-९६ च्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिल्याप्रमाणे.

ब) भाडे :- सिध्द शिघ्र गणकानुसार दर ५,८६५/- प्र.चौ.मी.मधुन रु.४०००/- अनामत रक्कम रु.वजा जाता उर्वरीत रक्कमेच्या ८% दराने भाडे आकारणी करण्यासाठी ५,८६५-४०००=<u>१८६५</u>

१२

x८%. १२.४३ रु.प्रति चौ.मी.प्रतिमहा ५८६५-४०००=<u>१८६५x८%</u> = १२.४३ रु.प्रति

१२

चौ.मी.प्रतिमाह रु.१५/- प्र.चौ.मी.प्रतिमहा प्रमाणे भाडे एकूण सहा दुकान अनामत रक्कम २०,००० (अक्षरी वीस हजार फक्त) पेक्षा अधिक देईल.त्याला दुकान लिलाव पध्दतीने देणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील विभागीय कार्यालया शेजारील जुनी इमारत तोडून त्या जागेवर बांधण्यात आलेल्या दुकाने भाडयाने देण्याकरीता प्रतिमहा प्रति चौ.मी.रु.१५/- प्रमाणे भाडे व अनामत रक्कम रु.२०,०००/- पेक्षा अधिक देईल त्यास दुकान लिलाव बोली पध्दतीने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३/२ :**

उप-आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालय येथील सर्पालया करीता सन ९७-९८ या वर्षाकरीता सर्प व सरपटणारे प्राणी यांची खाद्य व पालनपोषणाकरीता वार्षिक ठेका मासिक पध्दतीने देण्याबद्दलचे वर्तमानपत्राद्वारे निविदा मागविण्यात आले असता खालील प्रमाणे दोन निविदांची विक्री झाली असून पैकी दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | |
|---|---|
| १) श्री.कौतिक बुधाजी पाडसे<br>रा.लासुर स्टेशन,औरंगाबाद. | रु.११५/- प्रतिमहा प्रतिसर्प<br>(खादयासह) |
| २) श्री.बबनराव उजीवाल<br>रा.पद्मपुरा,औरंगाबाद. | रु.११०/- प्रतिमहा प्रतिसर्प<br>(खादयासह.) |

वरीलप्रमाणे दोन निविदापैकी सर्वात कमी दर श्री.बबनराव उजीवाल,औरंगाबाद यांचे प्रतिमहा प्रतिवर्ष (खादयासह) रु.११०/- मनपाच्या अटी व शर्ती यांचे आधिन राहून प्रस्ताव विचारार्थ सादर.

तसेच सन १९९७-९८ या कालावधीत अंतिम निविदा मंजुर होईपर्यंत सन ९६-९७ च्या मंजुर निविदा दराप्रमाणे मान्यता व्हावी.

**संवाद :**

**श्री.संजय जोशी** : प्राणी संग्रहालयातील व सर्प व इतर प्राण्यांसाठी खादय व पालनपोषणाकरीता वार्षीक ठेका देण्या संबंधाने प्रस्ताव आहे.तथापी मध्यंतरीच्या काळात प्राणी संग्रहालयातील काही साप मरण पावले ते कशामुळे सध्या जिवंत साप किती आहे.इ.माहिती देण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी विचारलेली माहिती पशुधन विकास अधिकारी यांनी पूढील बैठकीत सविस्तरपणे सादर करावी.प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या प्राणी संग्रहालय येथे सर्पालयाकरीता सन ९७-९८ या वर्षाकरीता सर्प व सरपटणारे प्राणी यांची खादय व पालनपोषण करीता वार्षीक ठेका मासिक पध्दतीने देण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया कमी व प्रतिमहा प्रति सर्प (खादयासह) रु.११०/- या दराची श्री.बबनराव उजीवाल रा.पद्मपुरा,औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सन ९७-९८ करीता अंतिम निविदा मंजुर होईपर्यंत सन ९६-९७ च्या मंजुर निविदा दरास मान्यता देण्यांत येते.या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४/३ :**

चिश्तीया कॉलनी एन-६ येथे १९९७ च्या उन्हाळयातील पाणी पुरवठा टंचाई दुर करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या विहिरींवर पंप बसवून व लाईन टाकून पाणी पुरवठा करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.२,१५,४७४/- चे परिसर अभियांत्रिकी यांच्या सन ९५-९६ व ९६-९७ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.या कामावर होणारा खर्च भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षकाखाली सन १९९७-९८ च्या अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीमधून करण्यांत येणार आहे.

तरी चिश्तिया कॉलनी एन-६ येथे पाणी पुरवठा करण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.३,१५,४७४/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिश्तिया कॉलनी एन-६ येथे १९९७ च्या उन्हाळयातील पाणी पुरवठा टंचाई दूर करण्याकरीता अस्तित्वात असलेल्या विहिरींवर पंप बसवून लाईन टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रु.३,१५,४७४/- च्या अंदरजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.चिकलठाणा (कामगार कॉलनी) येथे नविन गटार बांधणे व अस्तित्वात असलेल्या गटारी दुरुस्ती करणे कामाकरीता रक्कम रु.४,९८,९८०/-चे अंदाजपत्रक सा.बा.विभाग,औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ नुसार तयार करण्यांत आली असून मा.आयुक्त यांनी दिनांक ६-१-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.तसेच स्थायी समिती ठराव क्र.५८६/३ दि.२९-१-९६ द्वारे मान्यता मिळाली नंतर

वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना मनपा/लेखा/नि/१४/९७ दि. १७-२-९७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि.२५-२-९७ अन्वये एकूण (९) नऊ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि.१४-३-९७ रोजी उपस्थित ठेकेदारासमोर उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री.हुसेन अली | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | ३३.८२% | कमी |
| २) श्री.सुहास देशपांडे | --//-- | ३१.६५% | --//-- |
| ३) श्री.सरवदे एस.पी. | --//-- | २७.००% | --//-- |
| ४) श्री.उपेंद्र काळेले | --//-- | २६.८८% | --//-- |
| ५) श्री.सिराजोद्दीन सिद्दीकी | --//-- | २६.०१२% | --//-- |
| ६) श्री. आतिफ असोशिएट | --//-- | २२.२७% | --//-- |
| ७) श्री.कुलवंतसिंग | --//-- | १९.८% | --//-- |
| ८) श्री.आर.पी.घुगे | --//-- | १७.७७% | --//-- |
| ९) श्री.स.रफिकोद्दीन | --//-- | १४.१२% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.८२% कमी दराची निविदा श्री.हुसेन अली यांची आहे.

सदरील निविदेस दिलेले दर ठेकेदारास कसे परवडणार याबाबत दरपृथ्थकरण सह चर्चेसाठी मा.आयुक्त यांचे समक्ष बोलाविण्यात आले असता ठेकेदारांनी दिलेले स्पेशिफिकेशन प्रमाणे काम करुन देणे बाबत हमी दिली.

करीता श्री.हुसेन अली यांनी दिलेले दर ३३.८२% कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा या दराने करुन घेणे बद्दल विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा (कामगार कॉलनी) येथे नविन गटारी बांधणे व अस्तित्वात असलेल्या गटारी दुरुस्त करणेच्या कामाकरीता प्राप्त निविदा पैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ३३.८२% कमी दराची श्री.हुसेन अली यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.कांचनवाडी स्लम (अ,ब) भागात डांबरी रस्ते तयार करणे रक्कम रु.३,३४,०००/- चे अंदाजपत्रक सा.बा.विभाग,औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ नुसार तयार करण्यात आले असून मा.आयुक्त यांनी दि.२२-१०-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली असून दि.८-११-९६ च्या स्थायी समिती विषय क्र.      अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/१३३/९६ दि.१८-१२-९६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम ता.२६-१२-९६ पर्यंत एकूण (३) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी फक्त ३ (तीन) मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या निविदा दि.१५-१-९७ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.मॅस्कट कन्स्ट्रक्शन | ४.९५% | जास्त |
| २) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ८.५% | --//-- |
| ३) मे.डी.अजितसिंग | ९.९% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त दराची निविदा मे.मस्कट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.परंतु सदरील दिलेले दर मा.आयुक्तांनी अमान्य केल्यामुळे ठेकेदारास बोलाविण्यात आले असून चर्चेत ठरल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने सदर काम करण्याची ठेकेदारांनी मान्य केले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कांचनवाडी स्लम (अ,ब) भागात डांबरी रस्ते तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.मस्काट कन्स्ट्रक्शन यांचेशी करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. भिमपुरा भागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयात संरक्षित भिंत बांधणे या कामाकरीता रक्कम रु.४,६२,१००/- चे अंदाजपत्रक सा.बा.विभाग,औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ नुसार तयार करण्यात आलेले असून मा.आयुक्तांनी दि.२४-२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/११/९७ दि.१७-३-९७ अन्वये मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि.पर्यंत एकूण १३ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम दि.२७-३-९७ पर्यंत फक्त (६) सहा मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २९-३-९७ रोजी उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.एस.एच.असोशिएट | २९.९९% | कमी |
| २) श्री.बदर बीन सालाम | २८.९९% | --//-- |
| ३) श्री.मनजितसिंग | २६.३९% | --//-- |
| ४) विपुल कन्स्ट्रक्शन | २२.२०% | --//-- |
| ५) श्री.सुहास आर.देशपांडे | २१.६३% | --//-- |
| ६) श्री.एस.एम.मंडोरे | १५.८६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची असलेली निविदा श्री.एस.एच.असोशिएट यांची निविदा मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमपुरा भागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा २९.९९% कमी दराची मे.एस.एच.असोशीएट यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.पडेगाव स्लम येथे सर्वशौचालयाची दुरुस्ती करणे व फरशी बसविणे बाबत कामाकरीता सा.बा.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या

दरसुचीनुसार रक्कम रु.३,६८,१३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम "अठरा खेडी विकास योजना"या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.३०-१०-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली तसेच दि.१८-१२-९६ अन्वये विषय क्र.६ अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.बी.आर.आनंद | ३३.९९% | कमी |
| २) डी.के.कन्स्ट्रक्शन | ३३.२७% | --//-- |
| ३) अन्सारी कन्स्ट्रक्शन | ३१.१०% | --//-- |
| ४) श्री.डी.सी.पंजाबी | २७.३% | --//-- |
| ५) श्री.निसार अहमद | २७% | --//-- |
| ६) श्री.आर.बी.साळवे | २६.८६% | --//-- |
| ७) श्री.खुर्शीद हसन | २४.९९% | --//-- |
| ८) श्री.एस.एच.असोशिएटस | १% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.९९% कमी दराची श्री.बी.आर.आनंद यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगाव येथे सार्व.शौचालय दुरुस्त करणे व फरशी बसविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ३३.९९% कमी दराची श्री.बी.आर.आनंद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.किराडपुरा स्लम येथील नाल्यात पूर नियंत्रण संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाकरीता सा.बा.खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुचीनुसार रु.१९,२३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम "विशेष शासकीय अनुदान" या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.२१-१२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.प्रस्तावित कामासाठी फेरनिविदा मागविल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) अन्सारी कन्स्ट्रक्शन | ५.९७% | जास्त |
| २) एलोरा कन्स्ट्रक्शन | १०% | --//-- |

परंतु हे दर कार्यालयास जास्त वाटल्याने ठेकेदारास वाटाघाटीसाठी मा.आयुक्तांच्या दालनात बोलावले असता ठेकेदार श्री.अन्सारी कन्स्ट्रक्शन यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास लेखी संमती दिलेली आहे.करीता अंदाजपत्रकीय दराची असलेली श्री.अन्सारी कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा स्लम येथील नाल्यास पूर नियंत्रण भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराची श्री.अन्सारी कन्स्ट्रक्शन यांची अ.प.दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,कांचनवाडी स्लम (अ) मध्ये अर्धगोलाकार गटार बांधणे करणे करीता रक्कम रु.४,४०,०००/- चे अंदाजपत्रक सा.बा.विभाग,औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ नुसार तयार करण्यात आले असून मा.आयुक्त दि.२६-७-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली तसेच दि.९-८-९६ च्या स्थायी समिती विषय क्र.६ अन्वये मान्यता मिळाली असून सदरील कामाकरीता वृत्तपत्रात प्रसिध्दी कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/९७/९६ दि.२७-८-९६ अन्वये मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३० कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व फक्त १० मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या होत्या.त्यात तुलनात्मकदृष्टया म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.६५% कमी दराची निविदा मे.जयश्री कन्स्ट्रक्शन यांची होती म्हणून दि.९-११-९६ च्या स्थायी समिती विषय क्र.३९१/१९ फेरनिविदा मागविणे बद्दल ठरविण्यात आले.

सदर प्रस्तावात ठरल्याप्रमाणे दुसऱ्यांदा कार्यालयाची निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/८/९७ दि.२९-१-९७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्री दि.६-२-९७ पर्यंत एकूण १४ कोऱ्या निविदा विकल्या व फक्त (८) मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदारासमक्ष दि.२०-२-९७ रोजी उघडण्यांत आल्या ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.औरंगाबाद कन्स्ट्रक्शन | २९.७१% | कमी |
| २) श्री.शेख शरीफ | २८.८६% | --//-- |
| ३) ट्री स्टार कन्स्ट्रक्शन | २८.००% | --//-- |
| ४) श्री.सुहास देशपांडे | २५.६५% | --//-- |
| ५) श्री.निसार अहमद | २४.९६% | --//-- |
| ६) श्री.डी.सी.पंजाबी | २३.३% | --//-- |
| ७) श्री.ए.एम.फारुकी | २१.२१% | --//-- |
| ८) श्री.जी.आर.पंडीत | १४.१४% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.७१% कमी दराची निविदा मे. औरंगाबाद कन्स्ट्रक्शन यांची आहे.मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कांचनवाडी स्लम (अ) मध्ये अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा २९.७१% कमी दराची मे.औरंगाबाद कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,राजननगर (शहानुरवाडी) येथे आयुर्वेदिक दवाखाना बांधणेच्या कामासाठी मा.सर्वसाधारण सभा दि.१९-१२-९६ ठराव क्र.१७५/१३ रक्कम रु.६६५,४४०/-चे अंदाजपत्रक सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना मनपा/लेखा/नि/८/ दि.२९-१-९७ अन्वये मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ७-८ निविदा उघडण्यांत आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.एस.एच असोशिएटस | ६.२१% | कमी |
| २) खर्डीकर कन्स्ट्रक्शन | ६.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.२१% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा असून त्यास मा.आयुक्तांची दि.२४-३-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ६.२१% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राजननगर शहरनुरवाडी येथे आयुर्वेदिक दवाखाना बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ६.२१% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विकासनगर येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या सां.बा.खात्याच्या दरसुची अन्वये रक्कम रु.१,६०,०००/- चे तयार करण्यांत त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर कामाचे खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे आरक्षण या तरतुदीमधुन करण्यांत येणार आहे.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विकासनगर येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा परिसरातील स.न.७ सी.टी.एस.न.१५२१६ मधील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित तार कुंपन करणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या सा.बा.खात्याच्या दरसुची अन्वये रक्कम रु.१,६३,२००/- चे तयार करण्यात आले.त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामाचा खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे आरक्षण या तरतुदीमधून करण्यात येणार आहे. करीता अ.प.रक्कम रु.१,६३,२००/- च्या मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा परिसरातील स.न.७ सी.टी.एस.नं.१५२९६ मधील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित तार कुंपन करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,६३,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.सहकार नगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर सांस्कृतिक सभागृह बांधणेचे अ.प.रक्कम रु.५,००,०००/- चे सा.बा.खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये तयार करण्यात आले त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.सदर कामाचे निविदा मागविण्यांस शहरातील दै.वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले.विक्रीच्या तारखेपर्यंत (९) निविदा विकल्या गेले व फक्त तीन स्विकारण्याच्या तारखेला सिलबंद पाकीटात प्राप्त झाल्या त्यात दिलेले दराचे तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) नंदकुमार घोडेले | ७.९९% | कमी |
| २) मे.एस.एच.असोशिएट | ७.२१% | --//-- |
| ३) श्री.एस.एम.मंडोरे | ३% | --//-- |

सदरील निविदात सर्वात कमी श्री.नंदकुमार घोडेले यांचे ७.९९% अं.प.दरापेक्षा कमी दराचे आहे.सदर खर्च स्थानिक विकास कार्यक्रम सन ९६-९७ आमदार निधी अंतर्गत करावयाचा आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सहकार नगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर सांस्कृतिक सभागृह बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ७.९९% कमी दराची श्री.नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,बेगमपुरा स्मशानभुमीमध्ये आदर्श स्मशानभूमी अंतर्गत जुने बर्निगरोड दुरुस्ती जुनी आर.सी.सी.बर्निग रोड तोडून नविन बांधणे,दक्षिणेकडील बाजूने जोडणारा फरशी पुल बांधणे,खडी रस्ता तयार करणे,संरक्षित भिंतीची दुरुस्ती,नाल्याच्या बाजूने भिंतीची उंची वाढविणे, गेट बसविणे,नामफलक (कमान लावणे),सपाटीकरण करणे,भरती करणे,मुख्य रस्त्यापासून स्मशानभूमी पर्यंत डांबरीकरण करणे,कडप्पा बेचेस,शहाबादी फरशी बसविणे,चौकीदारासाठी खोली बांधणे,पाण्याची टाकी,स्वच्छतागृह बांधणे,दशक्रियासाठी शेड बांधणे,बोअरवेलवर इलेक्ट्रीकल्स मोटार बसविणे,अंतर्गत पाईप लाईन टाकणे इ.कामाचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सा.बा.खात्याच्या दर सुची अन्वये रक्कम रु.९,३८,५००/- चे तयार करण्यात आले त्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी झालेली आहे,सदर कामाचे अं.प.मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर करण्यात आले होते.परंतु आचार संहितेमुळे सभा होऊ शकली नाही.दि.८-३-९७ रोजी आयोजित केली होती त्यास मंजुरी घेण्यापुर्वी मा.आयुक्त साहेबांनी अल्प मुदतीचे

निविदा प्रसिध्द करण्याची परवानगी घेण्यात आली त्या अनुषंगाने बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आली.विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे एकूण निविदा (१३) तेरा विकण्यात आले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सिलबंद पाकीटात एकूण तीन (३) निविदा प्राप्त झाल्या.त्यात दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) शेख मसुद | ३% | अं.प.दरापेक्षा जास्त दराचे दर |
| २) एस.एच.असोशिएटस | ५% | ---//-- |
| ३) खर्डीकर कन्स्ट्रक्शन | ६% | --//-- |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री.शेख मसुद गुत्तेदार यांचे अ.प.दरापेक्षा ३% जास्त दराचे दर होते.कामाच्या दराच्या वाटाघाटीसाठी मा.आयुक्तांकडे चर्चा झाली.चर्चेअंती अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्यास मान्यता दिली त्यास गुत्तेदार यांनी मान्य केले आहे.

सदर कामाचे खर्च स्मशानभूमी तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.करीता श्री.शेख मसुद यांचे अंदाजपत्रकीय दर व अंदाजपत्रकीय रक्कमेत कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपुरा स्मशानभूमी मध्ये आदर्श स्मशानभूमी अंतर्गत जुने बर्निग रोड दुरुस्ती, जुनी आर.सी.सी.बर्निग रोड तोडून नविन बांधणे,फरशी पुल बांधणे,खडी रस्ता,भिंतीची उंची वाढविणे,गेट व नामफलक,डांबरीकरण,कडप्पा बेंचेस इ.कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे गुत्तेदारांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार श्री.शेख मसुद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,जिन्सी येथे मनपाच्या खुल्या जागेवर व्यायाम शाळा इमारत बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सा.बां.खात्याच्या दर सुची अन्वये रक्कम रु.५,००,०००/- चे तयार करण्यात आले त्या मा.आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे. त्या अनुषंगाने सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्या करीता शहरातील दै.वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आले. त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण (१०) दहा विकले गेले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सील बंद पाकीटाने एकूण (३) तीन निविदा प्राप्त झाली.त्यात दिलेले दराचे तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) एस.अे.नवाब | ४.२२% | अं.प.दरापेक्षा ज्‍ाास्त दराचे दर |
| २) विपुल कन्स्ट्रक्शन | ६% | --//-- |
| ३) सी.डी.लव्हेकर | ७% | --//-- |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री.एस.अे.नवाब गुत्तेदार यांचे ४.२२% अ.प.दरापेक्षा जास्त दराचे दर आहे. सदरील मंजुरीस्तव मा.आयुक्त यांनी दराच्या वाटाघाईसाठी संबंधितांस बोलावावे त्यावर दराची वाटाघाटी चर्चा घडवुन आली त्यावर अंती संबंधीत गुत्तेदार यांनी अ.प.दरात काम करण्याचे मान्य केले त्यावर मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

सदर कामाचा खर्च स्थानिक विकास कार्यक्रम सन ९६-९७ आमदार निधी अंतर्गत करावयाचे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिन्सी येथे मनपाच्या खुल्या जागेवर व्यायाम शाळा/इमारत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे गुत्तेदरांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदर काम अंदाजपत्रकीय दराने श्री.एस.ए.नवाब यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.चिकलठाणा विभागीय अधिकारी कार्यालय झोन नं.५ च्या समोरील जुने सार्वजनिक शौचालय तोडून त्या ठिकाणी वाचनालय बांधणेच्या कामासाठी स्थायी समिति ठराव क्र.५५५/२६ दि. ७-१-९७ अन्वये रक्कम रु.५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र./मनपा/लेखा/नि/१४/९७ दि.१७-२-९७ अन्वये बी-१ नमुन्यात मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (८) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.१४-३-९७ ला उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.खर्डीकर कन्स्ट्रक्शन | ७% | कमी दराने |
| २) श्री.एस.एम.नवाब | ७.३५% | --//-- |
| ३) श्री.आर.पी.घुगे | ४.५०% | --//-- |
| ४) मे.एस.एच.असोशिएटस | ८.९९% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा असून त्यास मा.आयुक्तांनी दि.२७-३-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.९९% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील विभागीय अधिकारी कार्यालय झोन क्र.५ च्या समोरील जुने सार्वजनिक शौचालय तोडून त्या ठिकाणी वाचनालय बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ८.९९% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.पन्नालालनगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर सांस्कृतिक सभागृह बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सा.बा.खात्याचे दरसुची अन्वये रक्कम रु.५,००,०००/- चे तयार करण्यात आले त्यास मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त झालेली आहे.त्या अनुषंगाने बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आले या द्वारे अंतिम विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण (११) अकरा विक्री झाले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सील बंद पाकीटाने एकूण (४) प्राप्त झाली त्यात दिलेले दराचे तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) नंदकुमार घोडेले | ८.९९% | अ.प.दरापेक्षा कमी दराचे दर |
| २) एस.एच.असोशिएटस | ७.२१% | --//-- |
| ३) प्रशांत शर्मा | ५.३३% | --//-- |
| ४) एस.एम.मंडोरे | ३% | --//-- |

सदरील निविदा पत्रात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री.नंदकुमार घोडेले गुत्तेदार यांचे अ.प.दरापेक्षा ८.९९% कमी दराचे दर आहे.

सदर कामाचे खर्च स्थानिक विकास कार्यक्रम सन ९६-९७ आमदार निधी अंतर्गत करावयाची करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.पन्नालालनगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर सांस्कृतिक सभागृह बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ८.९९% कमी दराची श्री.नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.ज्योतीनगर येथे बॅडमिंटन हॉल बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सा.बा.खात्याच्या दर सुची अन्वये रक्कम रु.५,००,०००/-चे तयार करण्यांत आले त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहेत.या अनुषंगाने बी-१ नमुन्यात निविदापत्रके मागविण्याकरीता शहरातील दै.वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले याद्वारे विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण तेरा (१३) विकले गेले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सिलबंद पाकीटाने एकूण (४) चार निविदा प्राप्त झाली. त्यात दिलेले दराचे तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) एम.एम.पठाण | ८.००१% | अ.प.दरापेक्षा कमी दराचे |
| २) विपुल कन्स्ट्रक्शन | ८% | ---//-- |
| ३) एस.ए.नवाब | ४.१६% | --//-- |
| ४) एस.एम.मंडोरे | २.१०% | --//-- |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री.एस.एम.पठाण गुत्तेदार यांचे अ.प.दरापेक्षा ८.००१% कमी दराचे दर आहे.

सदर कामाचे खर्च स्थानिक विकास कार्यक्रम सन ९६-९७ च्या आमदार निधी अंतर्गत करावयाचे करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.ज्योतीनगर येथे बॅडमिंटन हॉल बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ८.००१% कमी दराची श्री.एस.एम.पठाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रसताव सादर करीत आहेत की,भाग्यनगर, श्रीराम कॉलनी व उदय नगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्ण डांबरीकरण करणे या कामाचे सन ९५-९६ चे सा.बा.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु.५,३२,३००/- चे अंदाजपत्रक तयार

करण्यात आल असून त्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च "स्पील ओव्हर" ९६-९७ रस्ते दुरुस्ती पुर्णडांबरीकरण मधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेस चार निविदापत्रके विक्री झाल्या त्यापेकी निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली असून त्याची तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.मास्कोट | १७.९% | कमी दराने |
| २) श्री.डि.अजितसिंग | १७.३% | --//-- |
| ३) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अंदाजजपत्रकीय दराने | |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९% कमी दराने मे.मास्कोट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,३२,३०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे.मस्कोट कन्स्ट्रक्शन यांच्या कडुन १७.९% कमी दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भाग्यनगर,श्रीराम कॉलनी व उदयनगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्णडांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा १७.९% कमी दराची मे.मास्कोट कन्स्ट्रक्शन यांची निविद स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,नविन संजयनगर वॉर्ड क्र.३१ येथील नविन इमारत मनपा आरोग्य केंद्राचे विद्युतीकरणे करणे करीता रक्कम रु.१,५२,०००/- चे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या जिल्हादरसुची नुसार तयार करण्यांत आले असून सदर काम व्यापारी संकुल व उर्वरित इमारती या लेखा शिर्षाखाली सन ९६-९७ च्या तरतुदीतून प्रस्तावित आहे.व्यापारी संकुल उर्वरित इमारती याशिर्षकाखाली सन ९६-९७ च्या तरतुदीतुन प्रस्तावित आहे.

व्यापारी संकुल उर्वरित इमारती याशिर्षाखाली सन ९६-९७ करीता २६० लक्षची तरतुद करण्यात आलेली असून त्यापैकी आतापर्यत खर्च वजा जाता रुपये ३७=०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे.या लेखा शिर्षाखाली आतापर्यंत रु.१०६=०० लक्ष प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

तरी मनपाच्या आरोग्य केंद्राच्या नविन इमारतीच्या विद्युतीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रकीय रु.१,५२,०००/- प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३१ येथील मनपा आरोग्य केंद्राच्या नविन इमारतीचे विद्युतीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,५२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२/२१ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत सुरत महापालिकेच्या धर्तीवरती औरंगाबाद ही मोहीम राबविण्याचा मनपा प्रशासनाचा मानस आहे.ही मोहीम राबविण्यासाठी १९९७-९८ च्या अर्थसंकल्पात आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतुदही करण्यात आलेली आहे.ही योजना परिणामकारकरित्या राबविण्यासाठी मनपातील काही वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांना विशेष अधिकार देणे काही संवर्गातील पदे ताप्तुरत्या स्वरुपात भरणे यासाठी स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे.

तद्अनुषंगाने खालीलप्रमाणे स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

१) विभागीय कार्यालयातील साफसफाईच्या प्रशिक्षणासाठी अधिकारी नेमणे :-
मनपा हद्दीतील साफसफाई व इतर कामांबरोबरच कर वसुलीची कामे विभागीय कार्यालयामार्फत पार पाडली जातात.साफसफाईच्या कामावर योग्य नियंत्रण ठेवणे यासाठी मनपाचे वर्ग-१ अधिकाऱ्यास झोनल कमिशनर हे पदनाम देऊन त्यांना त्यांचे दैनंदिन कामाशिवाय साफसफाईचे पर्यवेक्षकाचे काम सर्व प्रकारच्या तक्रारी निवारणाचे अधिकार व ही कामे पार पाडण्यासाठी आयुक्तांचे काही प्रशासकीय व आर्थिक अधिकार झोनल कमिशनरना प्रदान करण्यात आलेले आहेत.

२) साफसफाईच्या कामाच्या परिक्षणासाठी अतिरिक्त विभागीय अधिकारी नेमणे :-
शहरातील साफसफाईच्या कामावर मोठया प्रमाणावर पर्यवेक्षणाची गरज आहे पाहण्यासाठी मनपातील वर्ग-२ दर्जाच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामाबरोबरच पर्यवेक्षणाच्या जवाबदाऱ्या देऊन त्यांना "अतिरिक्त विभागीय अधिकारी" पद्नाम देण्यास मंजुरी देण्यांत यावी.

३) पाणी पुरवठा जलनि:सारण रस्ते दुरुस्ती अतिक्रमण आदि कामांच्या पर्यवेक्षकासाठी अधिकारी नेमणे.
मनपा हद्दीतील पाणी पुरवठा व जलनि:सारणाची कामे सध्या कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांच्या मार्फत एकत्रितरित्या केली जातात.परिणामी अशा प्रकारच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी नागरिकांना मुख्यालयात यावे लागते.विभागीया कार्यालयातुन उपरोक्त कामे पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार दिलेले नसल्याने तक्रारी निवारणार्थ कराव्या लागणाऱ्या सर्व कामाचे आदेश मुख्यालयातून वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून प्राप्त घ्यावे लागतात.यासाठी प्रत्येक विभागीय कार्यालयातून उप अभियंता नेमूण त्यांना तक्रारी निवारणार्थ विशिष्ट रक्कमेपर्यंतचे खर्चाचे अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यांत यावी.जेणे करुन असे अधिकारी जनतेकडून आलेल्या सामान्य स्वरुपाच्या तक्रारीवरती वेळीच उपाययोजना करु शकतील.

४) वरिष्ठ लिपिक श्रेणीतील कर्मचाऱ्यांना पर्यवेक्षणाचे कामे देणे :-
औरंगाबाद शहरातील साफसफाईच्या कामावर १८ स्वच्छता निरिक्षकामार्फत पर्यवेक्षण केले जाते.साफसफाई कामाचे पर्यवेक्षण कनिष्ठ स्तरावर करणे अत्यंत आवश्यक आहे.तसे पर्यवेक्षणासाठी पर्यवेक्षणही चांगल्या प्रकारे होऊन मजुरांवर वचक राहणे यासाठी स्वच्छता निरिक्षकांच्या बरोबरीने वरिष्ठ लिपीक श्रेणीतील कर्मचाऱ्यांनाही पर्यवेक्षणाचे काम देण्यांस मंजुरी देण्यात यावी हे काम त्यांनी आपली दैनंदिन कामे साभांळून करावयाची असल्याने मनपावर कोणत्याही स्वरुपाचा आर्थिक भार पडणार नाही.

५) कर्मचाऱ्यांच्या साफसफाईच्या वेळा बदलणे :-

सध्या शहरातील साफसफाईचे काम सकाळी ५.३० ते दुपारी १.३० या वेळात करण्यात येते. साधारणतः सकाळी ८.३० वाजेनंतर रस्त्यावर वाहतुक मोठया प्रमाणावर सुरु होते. त्यामुळे साफसफाईच्या कामात अडथळे निर्माण होतात. तसेच सफाई कर्मचारी सतत आठ तास काम करु शकत नाही हा सर्वसाधारण अनुभव आहे.सुरत महानगरपालिकेने साफसफाईच्या वेळा बदलुन हे काम दोन शिफ्टमध्ये सुरु केलेले आहे.यामुळे साफसफाईचे काम सतत चालू राहते परिणामी शहरात कोठेही घाण कचरा वाहून राहत नाही.या साठी सध्याच्या साफसफाईच्या वेळा बदलणे बाबत कामगार संघटना प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली असुन त्यांनी शहरातील साफसफाई दोन शिफ्टमध्ये करण्यास मंजुरी दिलेली आहे.यानुसार

सकाळी ५.०० ते १.०० पहिली शिफ्ट व

दुपारी १२.३० ते   .०० दुसरी शिफ्ट

याकालावधीत मनपातील कायमस्वरुपी व दैनिक वेतनावर कामगारांकडून काम करवुन घेण्यांत येईल.याचबरोबर रात्री ९.०० ते पहाटे ३.०० वाजेपर्यंत काही प्रमुख रस्ते खाजगी कंत्राटदरामार्फत साफ करवुन घेण्यात येतील.

६) शहरातील प्रमुख रस्ते साफसफाईसाठी कंत्राटदारास देणे:-

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीचा व स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सध्या विचार करता संपुर्ण स्वच्छतेचे काम उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून परिणामकारकरित्या करुन घेणे शक्य होणार नाही.यासाठी शहरातील काही प्रमुख रस्त्याच्या साफसफाईचे काम निविदा काढुन खाजगी कंत्राटदारांमार्फत केल्यास अशा रस्त्यांच्या साफसफाईचा कर्मचाऱ्यांवरील ताण कमी होऊन ते कर्मचारी शहरातील इतर भागाच्या साफसफाईसाठी उपलब्ध होऊ शकतील.सुरत महापालिकेने काही महत्वाच्या रस्त्यांच्या साफसफाईचे काम खाजगी कंत्राटदारांना दिलेले आहे.या रस्त्यांची साफसफाई रात्री १०.०० ते पहाटे ३.०० या कालावधीत केली जाते.यामुळे साफसफाईस रहदारीचाही त्रास होत नाही.औरंगाबाद शहरातील खालील प्रमुख रस्त्यांच्या साफसफाईचे काम खाजगी कंत्राटदाराकडे देण्यांस मंजुरी देण्यांत यावी.यासाठी अटी व शर्ती स्वतंत्ररित्या बसविण्यात येतील खालील प्रमुख रस्त्यांच्या साफसफाईचे काम खाजगी कंत्राटदाराकडे देण्यांस मंजुरी देण्यात यावी प्रमुख रस्त्यांच्या साफसफाईचे काम खाजगी कंत्राटदारांकडे देण्यास मंजुरी देण्यात यावी.

१) रेल्वेस्टेशन ते मजनु हिल रस्ता
२) रेल्वेस्टेशन ते सिटी चौक रस्ता
३) बाबा पेट्रोलपंप ते विमानतळ मुख्य रस्ता
४) जालना रोड ते गजानन महाराज मंदिर रस्ता
५) विमानतळ ते सुभेदारी रस्ता
६) गांधी पुतळा ते मिल कॉर्नर
७) रोशनगेट ते सिडको हद्द,चेलीपुरा-सिडको
८) चम्पा मश्जिद रोड,रोशनगेट,बायजीपुरा
९) विद्यापीठ रस्ता टाऊन हॉल चौक,बीवी का मकबरा,लिटल फ्लॉवर
१०) सावरकर चौक ते गजानन महाराज मंदिर रस्ता
११) आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक गजानन महाराज मंदिरापर्यंत
१२) शहानुरमियाँ दर्गा रिंग रोड

७) शहरातील कचरा,बिल्डिंग मटेरियल उचलणे :-

शहरातील विविध रस्त्यावर खुल्या जागावर मोठया प्रमाणावर बिल्डींग मटेरीयल कचरा पडलेला आहे.अशा प्रकारे टाकण्यांत आलेला कचरा बिल्डींग मटेरीयल एकदा

महानगरपालिकेतर्फे उचलून घेण्यात यावा हे काम मोठया प्रमाणावर हाती घ्यावे लागणार असल्याने मनपाच्या उपलबध मनुष्य बळावर व उपलब्ध साधनसामुग्रीच्या आधारे पुर्ण करता येणार नाही.तेव्हा खाजगी कंत्राटदारामार्फत प्रति टनाचे दर निश्चित करुन अशा स्वरुपाचा कचरा बिल्डींग मटेरीयल उचलुन घेण्यास मंजुरी देण्यात यावी.यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात येतील व सहा महिन्यासाठी मोहीम राबविण्यात येईल.ही मोहीम संपल्या नंतर कोणी सार्वजनिक ठिकाणी,खुल्या जागावर कचरा बिल्डींग मटेरीयल टाकल्यास अशा नागरिकांविरुध्द प्रशासकीय अधिकार वसुलीची कार्यवाही करण्यांत येईल.

८) विविध अधिकाऱ्यांना आर्थिक अधिकार प्रदान करणे :-

"स्वच्छ औरंगाबाद" ही मोहीम राबवत असतांना दैनंदिन स्वरुपात प्राप्त होणाऱ्या तक्रारी तातडीने निकाली काढल्या जाव्यात यासाठी तक्रारीचे स्वरुप व त्याचा कालावधी निश्चित करण्यात येईल.किरकोळ स्वरुपाची कामे वेळीच निकाली निघावीत यासाठी अधिकारांचे विकेंद्रीकरण होणे जरुरीचे आहे.यासाठी विविध अधिकाऱ्यांना खालील प्रमाणे आर्थिक अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यात यावी.

झोनल कमिशनर - पगार व पट्टयाचे वाटप करणे,जलवाहिन्या /जलनिःसारण वाहिन्यांची आवश्यक ती तातडीची दुरुस्तीसाठी रु. २५,०००/- खर्चाचे अधिकार दैनिक वेतन कामगारांना नेमणूकीचे आदेश देणे आदि अधिकार झोनल कमिशनरांना देण्यात यावी.

झोनल ऑफीसर - विभागीय कार्यालयातून अत्यावश्यक कामे पार पाडण्यासाठी आकस्मिक खर्च रु.५०००/- पर्यंत करण्याचे अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यांत यावी.

उप अभियंता आकस्मिक स्वरुपाच्या कामांवर रू.५०००/- पावेतोचा खर्च करण्याचे अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यांत यावी.

९) वैद्यकिय अधिकाऱ्यांना आरोग्य तपासणीची कामे देणे :-

औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर १४ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत या वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत आरोग्य विषयक कामाचा आढावा,मलेरिया तपासणी,डास निर्मुलन मोहीम,लसीकरण,आरोग्य केंद्र चालविणे,जन्म-मृत्यू नोंदणी करणे,साथीच्या रोगांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व त्यास आळा घालणे आदी योजना राबविल्या जातील.आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या मलेरिया सुपरवायझर,एमपीडब्ल्यु,मलेरिया मजुर आदि कर्मचाऱ्यांकडून या योजना राबवून घेतल्या जातील.

१०) सॅनिटरी सब इन्स्पेक्टरची पदे निर्माण करणे :-

औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर सध्या जेष्ठ स्वच्छता निरिक्षक व स्वच्छता निरिक्षकांची १८ पदे अस्तित्वात आहेत. शहरातील स्वच्छतेच्या कामावर या स्वच्छता निरिक्षकांमार्फत नियंत्रण ठेवले जाते. सुरत महानगरपालिकेत स्वच्छता मोहीम राबविण्यासाठी प्रत्येक स्वच्छता निरिक्षकाच्या हाताखाली दोन सॅनिटरी सब इन्स्पेक्टर, उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. साफसफाईच्या कामावर कनिष्ठ स्तरावर नियंत्रण ठेवणे जास्त जरुरीचे आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर सॅनिटरी सव इन्स्पेक्टरची पदे अस्तित्वात नाहीत. स्वच्छता मोहीम परिणामकारकरित्या राबविण्यासाठी साधारणतः २१ सॅनिटरी इन्स्पेक्टरची पदे वेतनश्रेणी रु. १२००-१८०० ते मध्ये निर्माण करण्यांस मंजुरी देण्यात यावी. या पदांना शासन मान्यता मिळेपर्यंत एकत्रित वेतनावर हे पदे तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्यांसाठी भरण्यास मंजुरी देण्यांत यावी. महानगरपालिका सेवा भरती नियमांमध्ये सॅनिटरी इन्स्पेक्टर पदाचा अंतर्भाव नसल्याने

सेवा भरती नियमात या पदांचा उपरोक्त वेतनश्रेणीसह अंतर्भाव करण्यात यावा.व या पदाची शैक्षणिक पात्रता स्वच्छता निरिक्षक पदाच्या पात्रतेबरोबरच ठेवण्यात यावी. तद्‌अनुषंगाने मनपा कर्मचारी सेवा भरती नियामात दुरुस्ती करण्यासही मंजुरी देण्यांत यावी.

११) स्वच्छतामोहीमेसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे :-

कंटेनर्स खरेदी करणे -औरंगाबाद शहरात कचरा साठविण्यासाठी विविध ठिकाणी कचऱ्या कुंडया ठेवण्यात आलेल्या आहेत. या कुंडयांना झाकण नसल्याने वाऱ्यामुळे कचरा रस्त्यावर येऊन पडतो, तसेच कुंडया साफसफाईसाठी वेळही लागतो. सुरत महानगरपालिकेने कचरा गोळा करण्यासाठी विशिष्ट पध्दतीच्या कंटेनर्सचा वापर केलेला आहे. कचरा कंटेनर्स मध्ये गोळा झाल्यानंतर तो विशिष्ट प्रकारच्या ट्रकद्वारा उचलून घेण्यात येतो. त्यामुळे वेळेची बचत होते औरंगाबाद शहरासाठी साधारणत: २०० कटेनर्स व विशिष्ट पध्दतीने १०ट्रॅक्स खरेदी करण्यास मंजुरी देण्यात यावी.

डस्टबीन खरेदी करणे :-

सुरत महानगरपालिकेने नागरिकांना घरातील कचरा साठविण्यासाठी पत्र्याच्या डब्याचे डस्टबिन पुरविलेले आहेत. यासाठी सुरत मनपाने स्वत: खर्च न करता स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन असे डस्टबिन खरेदी करुन त्या त्या प्रभागातील नागरीकांना पुरविले आहेत. नागरीक अशा प्रकारच्या डस्टबिन मध्ये कचरा गोळा करुन ते वार्डातील कंटेनर्समध्ये टाकतात यामुळे रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी घाण होत नाही. सुरत मनपाच्या धर्तीवरच औरंगाबाद महापालिका स. नगरसेवक/नगरसेविकांना त्यांच्या स्वेच्छा निधीतून मागणीप्रमाणे प्रभागातील नागरिकांना डस्टबिन पुरवावेत.

कचरा उचलण्यासाठी हातगाडया खरेदी करणे - झोपडपट्टी भागातील अरुंद रस्त्यांचा विचार करता प्रत्येक झोपडपट्टयासाठी दोन हातगाडया व प्रत्येक दोन मजुराप्रमाणे हातगाडी घ्यावी लागणार आहे. साधारणत: ५०० हातगाडया खरेदी कराव्या लागणार आहे. सर्वसाधारण सभेने ५०० हातगाडया खरेदीस मंजुरी दिल्यानंतर निविदा मागवुन त्या खरेदी करण्यात येतील.

घोषीत अघोषित झोपडपट्टयांमध्ये टोपल्या पुरविणे :-

सुरत महापालिकेने झोपडपटयांमध्ये कचरा गोळा करण्यासाठी संबंधित झोपडीधारकास वेताच्या टोपल्या पुरविलेल्या आहेत.त्याच धर्तीवर झोपडपट्टी भागातील स्वच्छता राखण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक झोपडीधारकांस अशा प्रकारच्या वेताच्या टोपल्या पुरविण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी दयावी.निविदा मागवुन अशा प्रकारच्या टोपल्या खरेदी करण्यां करण्यांत येतील.

१२) सुलभ शौचालय योजना राबविणे :-

औरंगाबाद महापालिका हद्दीत अनेक घोषित /अघोषित झोपडपटटया आहेत.या झोपडपट्टयांमधून या शौचालयाची व्यवस्था नसल्याने तेथील नागरिक सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर शौचास बसुन घाण करतात.अशा झोपडपट्टया बाजाराच्या ठिकाणी बस स्थानक रेल्वेस्टेशन अशा भागात सुलभ शौचालय योजना राबविणे आवश्यक आहे.यासाठी सुलभ इंटरनॅशनल कंपनीची मदत घेण्यात येईल.

ही योजना राबविण्यासाठी महापालिकेत केवळ बांधकामाचा खर्च येईल.सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर शहराचा परत सर्वे करुन स्थळे निश्चित करण्यात येतील.स्वच्छता मोहिमेची परिणामकारकता लक्षात घेता शहरात विविध ठिकाणी सुलभ शौचालय बांधण्यास परवानगी देण्यांत यावी.

१३) तातडीच्या कामासाठी युनिट रेट मंजुर करणे :-

महानगरपालिका दैनंदिन स्वरुपात पाणी पुरवठा,जलनिःसारण रस्त्यावर मुरुम टाकणे,पॅचवर्क करणे,तुटलेले रस्ते दुभाजक दुरुस्त करणे,विद्युत उपकरणाची देखभाल अशा प्रकारच्या तक्रारी मोठया प्रमाणावर येतात या तक्रारींवर वेळीच उपाययोजना करण्यासाठी वार्षिक तत्वावर निविदा मागवुन त्यांचे दर निश्चित केल्यास मंजुरी दरप्रमाणे व त्या एजन्सीकडून तातडीने कामे करवुन घेता येतात.अशा कामांची यादी स्वतंत्ररित्या बनविण्यांत येईल.उपरोक्त स्वरुपाची कामे वार्षिक तत्वावर निविदा व त्यांचे युनिट रेट निश्चित करुन पार पाडण्यांस मंजुरी देण्यांत यावी.

१४) बेशिस्त कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे अधिकार :-

महापालिकेतर्फे विशेष साफसफाई मोहीम राबवत असतांना प्रशासकीय कार्यात सुसुत्रता रहावी यासाठी बेशिस्त कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करणे,दंडाची कार्यवाही करणे निलंबित करणे,विभागीय चौकशी करणे आदि प्रकारचे अधिकार झोनल कमिशनर यांना देण्यास मंजुरी देण्यांत यावी.तसेच जे कर्मचारी उत्कृष्टपणे कर्तव्य बजावत असतील त्यांना रोख पारितोषिके देण्याची शिफारस करण्याचे अधिकारही झोनल कमिशनर यांना देण्यास मंजुरी देण्यांत यावी.

१५) सार्वजनिक ठिकाणी घाण करणे / कचरा टाकणे बाबत प्रशासकीय अधिभार वसुल करणे :-

महानगरपालिकेतर्फे देनंदिन स्वरुपात शहरातील साफसफाई केली जाते.तथापी साफसफाईच्या वेळा संपल्या नंतर सार्वजनिक ठिकाणी खुल्या जागांवर उघडया गटारीतून कचरा,घाण टाकली जाते.तसेच जागोजागी विविध स्वरुपाचे पोस्टर्स लावले जातात.यामुळे शहरातून स्वच्छता दिसुन येत नाही.सुरत महानगरपालिकेने अशा नागरिका विरुध्द दंडात्मक उपाय योजना अवलंबिला आहे.याच धर्तीवर औरंगाबाद शहरातील साफसफाई व सार्वजनिक जागा चांगल्या रहाव्यात या दृष्टीकोनातून शहर स्वच्छतेची मोहीम राबविल्यानंतर अशा सार्वजनिक ठिकाणी घाण करणाऱ्या विरुध्द प्रशासकीय अधिभार वसुलीची उपाययोजना करणे जरुरीचे आहे.अशी प्रशासकीय अधिभार वसुलीची उपाययोजना करण्यापुर्वी सतत दोन महिने विविध प्रसिध्दी माध्यमाद्वारे नागरिकांना आव्हान करण्यात येतील.त्याबरोबर साफसफाई व स्वच्छतेबाबत सर्वतोपरी साधणे पुरविण्यात येतील व यानंतर जे नागरिक या नियमांचा भंग करतील अशा नागरिका विरुध्द कार्यवाही करण्यात येईल.प्रशासकीय अधिभारातील तरतुदी खालील प्रमाणे

१) सार्वजनिक ठिकाणी कचराकुंडी शिवाय इतरत्र कचरा टाकणे /घाण करणे रु.५०/-

२) उघडयावर शौचास बसणे रु.५०/-

३) भाजी विक्रेत्यांनी रस्त्यावर कचरा टाकणे/ घाण करणे. रु.५०/-

४) हातगाडीवाले,पानपट्टीवाले,लॉटरीवाले यांनी रस्त्यावर कचरा टाकल्यास,घाण केल्यास. रु.१००/-

५) ज्या नागरिकांच्या घरासमोर कचरा आढळुन येईल ते नागरिक रु.१००/-

६) गल्लीत मोकळया जागेत कचरा कोणी टाकला हे स्पष्ट होत नसेल तर सामुदायिक दंड आकारणी. रु.१००/-

७) हॉटेल मालक/चालक,दुकानदार,उद्योगधंदेवाल्यांनी रस्त्यावर कचरा टकल्यास रु.१०००/-

८) गॅरेज मालकांनी रस्त्यावर घाण केल्यास
रु.१०००/

९) रसवंती चालक/ज्युस सेंटर चालकांनी रस्त्यावर कचरा टाकल्यास
रु.१०००/-

९) मोठे उद्योगधंदे करणारे,पंचतारांकीत हॉटेल चालकांनी रस्त्यावर कचरा टाकल्यास
रु.५०००/-

११) एकदा दंड भरल्यास परत ती बाब आढळल्यास दुप्पट आकारणी

उपरोक्त प्रमाणे प्रशासकीय खर्च वसुल करण्याचे अधिकार झोनल कमिशनर,वरिष्ठ,कनिष्ठ स्वच्छता निरिक्षक,वैद्यकीय अधिकारी,उपअभियंता व इतर पर्यवेक्षकीय अधिकारी यांना देण्यात येतील,यासाठी प्रशासकीय अधिभार वसुलीची सर्वसामान्य पावती पुस्तके पर्यवेक्षकीय अधिकारी/कर्मचारी यांना देण्यांत येतील व ते अशा व्यक्तींविरुध्द परिस्थिती अनुरुप निर्णय घेऊन दंडाची आकारणी करतील जे नागरिक अशा प्रकारचे प्रशासकीय अधिभार देण्यास अडथळे निर्माण करतील त्यांच्या विरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात येतील.यासाठी पोलीस विभागाचीही मदत घेण्यात येईल.प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार "स्वच्छ औरंगाबाद" ही मोहीम राबविण्याकरीता खालील बाबींना सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) विभागीय कार्यालयातील साफसफाईच्या प्रशिक्षणासाठी अधिकारी नेमणे :-
२) साफसफाईच्या कामाच्या परिक्षणासाठी अतिरिक्त विभागीय अधिकारी नेमणे :-
३) पाणी पुरवठा जलनि:सारण रस्ते दुरुस्ती,अतिक्रमण आदि कामांच्या पर्यवेक्षणासाठी अधिकारी नेमणे :-
४) वरिष्ठ लिपिक श्रेणीतील कर्मचाऱ्यांना पर्यवेक्षणाचे कामे देणे :-
५) कर्मचाऱ्यांच्या साफसफाईच्या वेळा बदलणे :-
६) शहरातील प्रमुख रस्ते साफसफाईसाठी कंत्राटदारास देणे:-
७) शहरातील कचरा,बिल्डिंग मटेरियल उचलणे :-
८) विविध अधिकाऱ्यांना आर्थिक अधिकार प्रदान करणे :-
९) वैद्यकिय अधिकाऱ्यांना आरोग्य तपासणीची कामे देणे :-
१०) सॅनिटरी सब इन्स्पेक्टरची पदे निर्माण करणे :-
११) स्वच्छता मोहीमेसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे :-
१२) सुलभ शौचालय राबविणे :-
१३) तातडीच्या कामासाठी युनिट रेट मंजुर करणे :-
१४) बेशिस्त कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे अधिकार :-
१५) सार्वजनिक ठिकाणी घाण करणे / कचरा टाकणे बाबत प्रशासकीय अधिभार वसुल करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३/२२ :**

सन १९९७ च्या उन्हाळयात तातडीच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत कुपनलीका (बोअरींग) घेऊन त्यावर युनिसेफ मान्यता प्राप्त कंपनीचे इंडीया (टेलिस्कोपीक) हातपंपाचा पुरवठा करुन उभारणी करण्याच्या कामासाठी रु.७,९४,४३२/-च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेत मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात निविदा पत्रके विक्री झाल्या असून निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पांच निविदापत्रके प्राप्त झाली आहे.

तुलनात्मकदृष्टया तक्ता खालील प्रमाणे आहे.

| एजन्सी | बोअरींग करुन हातपंप बसविणे | |
|---|---|---|
| | ६" बोअर | ४ १/२" बोअर |
| १) मे.मंदान इनवेल सर्व्हिसेस, औरंगाबाद. | २२०३७/- | २१३३५/- |
| २) मे.गिरीष बोअरवेल,औरंगाबाद. | २३००/- | ----- |
| ३) मे.बानगंगा बोअरवेल,नाशिक | २१९३०/- | २१२१०/- |
| ४) मे.अनुराग बोअरवेल्स,औरंगाबाद. | २२९२५/- | २१६३५/- |
| ५) मे.बाफना ॲण्ड ब्रदर्स,औरंगाबाद | ३५३००/- | ३४१००/- |

तुलनात्मकदृष्टया मे.बानगंगा बोअरवेल्स,नाशिक यांचे दरानुसार बोअरींग करुन हातपंप बसविण्याच्या कामासाठी येणारा एकूण खर्च सर्वात कमी असल्यामुळे सदर एजन्सीज कडून काम करवुन घेण्याचे मान्यतेस्वत सादर.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर** : शहरात वेगवेगळया ठिकाणी कुपनलिका घेण्याचा प्रस्ताव आहे.या कुपनलिका कुठे कुठे घेणार आहेत याची माहिती देण्यांत यावी.

**कार्यकारी अभियंता (पापू)** : शहरात एकूण ३३ ठिकाणी कुपनलीका घेण्यात येणार आहेत काय? पुर्वीच्या बोअर चालू आहे की बंद अवस्थेत आहेत.तसेच शहरातील विहिरींचा उपयोग पाण्यासाठी करावा.

**श्री.भगवान घडामोडे** : या संबंधाने पत्र देण्यात आले होते.तथापी त्याची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही.

**श्री.जयवंत ओक** : नगरसेवकांच्या मागणीप्रमाणे कुपनलीका घेण्यात येत आहेत काय? पुर्वीच्या बोअर चालू आहेत की बंद अवस्थेत आहेत तसेच शहरातील विहिरींचा उपयोग पाहण्यासाठी करावा.

**श्री.भगवान घडामोडे** : या संबंधाने पत्र देण्यात आले होते.तथापी त्याची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही.

**श्री.जयवंत ओक** : प्रस्तावित ३३ कुपनलीकांची प्रत्यक्षात पाहणी करण्यात यावी.

**मा.सभापती :** प्रस्तावित कुपनलिकांची पहाणी स.सदस्य सर्वश्री संजय जोशी,बंडू ओक,स.अली मिरा सलामी,कचरु नवपुते आणि म.अ.रऊफ यांनी लगेचच पहाणी करावी तसेच सदरचे काम एका एजन्सीला न देता दोन एजन्सीला देण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९७ च्या उन्हाळयात तातडीच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत कुपनलिका (बोअरींग) घेऊन त्यावर युनिसेफ मान्यता प्राप्त कंपनीचे इंडीया

मार्क-२ (टेलिस्कोपीक) हातपंपाचा पुरवठा करुन उभारणीच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.बानगंगा बोअरवेल्स,नाशिक यांचे ६" बोअरसाठी रु.२१,९३०/- व ४ १/२" बोअरसाठी रक्कम रु. २१,२१०/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.तसेच सध्या उन्हाळयाचे दिवस असून सदरील बोअरींगचे काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करण्याचे दृष्टीने वरील मंजुर दरामध्ये काम करण्यात तयार असलेले मे.अनुराग बोअरवेल्स,औरंगाबाद यांचे कडूनही सदरील काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४/२३ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिकेतील टंकलेखन यंत्रे तसेच डुप्लीकेटर यंत्रे दुरुस्ती व सर्व्हिसिंग साठी वर्तमानपत्रात निविदा सुचना सुप्रसिध्द करण्यात येवून निविदा दर पत्रके मागविण्यांत आली,प्राप्त एक निविदा दरपत्रक धारकास दि.२३-४-९७ रोजी मा.आयुक्तांनी त्यांचे दालनात दरात वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले झालेल्या वाटाघाटीत अंतिम झालेले दर खालील प्रमाणे १) मे.गजानन टाईपरायटर्स सर्व्हिसेस - मराठी /इंग्रजी टंकलेखन यंत्र सर्व्हिसिंग रु.३०/- प्रति यंत्र डुप्लीकेटर यंत्र सर्व्हिसिंग रु.४५/- प्रति नग यंत्राची दुरुस्तीसाठी लागणारे स्पेअर पार्ट खुल्या दराची वेगळी यादी संबंधिताने जोडली आहे.आवश्यकतेनुसार सदरील पार्टस बदलण्यात येते.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिकेतील टंकलेखन यंत्रे दुरुस्ती व सर्व्हिसिंगचे कामासाठी प्राप्त झालेले एकमेव निविदापत्रक धारक मे.गजानन टाईपरायटर्स सर्व्हिसेस यांचे दरपत्रक (वाटाघाटी अंती) मराठी/इंग्रजी टंकलेखन यंत्र सर्व्हिसिंग रु.३०/- प्रति यंत्र, डुप्लीकटर यंत्र सर्व्हिसिंग रु.४५/- प्रति नग या दराचे तसेच दुरुस्तीसाठी लागणारे स्पेअरपार्टस सोबतचे यादी नुसार आवश्यकतेनुसार बदलण्यात यावे.संबंधिताचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५/२४ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयात लागणारे स्वच्छता साहित्य खरेदीस्तव दर निश्चित करणेसाठी खुल्या वर्तमानपत्रातुन निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या,प्राप्त निविदा धारकांना दि.२३-४-९७ रोजी मा.आयुक्तांनी त्यंचे दालनात दरात वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले,झालेल्या वाटाघाटी नुसार प्राप्त दरात वाटाघाटी नंतरचे कमी दराचे ॲटम क्र.खालील प्रमाणे त्यांचे नाव समोर दर्शविण्यात आलेले आहेत.तसेच त्यांचे आयटम क्रमांक दर्शविण्यात आलेले आहे.

१) मे.इन्शा ट्रेडींग कंपनी     आयटम क्र.१ ते १२,१४ते१७,२०,२१,२४ ते ३५.

२) मे.न्यु भारत स्टोअर्स     आयटम क्र. १३,१८,१९,२२ व २३.

सदरील आयटमचे नमुने अवलोकनास्तव भंडार विभागात उपलब्ध आहेत.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका कार्यालयास लागणारे स्वच्छता साहित्य खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापत्रके धारकांना वाटाघाटीसाठी बोलावले असता वाटाघाटी नुसार नंतरचे कमी दराचे ॲटम क्र.खालील प्रमाणे त्यांचे नावा समोर दर्शविण्यात आलेले आहे.

१) मे.इन्शा ट्रेडींग कंपनी आयटम क्र.१ ते १२,१४ते१७,२०,२१,२४ ते ३५.

२) मे.न्यु भारत स्टोअर्स आयटम क्र. १३,१८,१९,२२ व २३.

वरील दरपत्रक धारकांचे दरपत्रकात नमुद केलेले आयटम नुसार स्वच्छता साहित्य संबंधितांकडून खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६/२५ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारे किटकनाशके खरेदीस्तव वर्तमानपत्रातून निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा दरपत्रके मागविण्यात आली.प्राप्त निविदा एकूण तीन निविदाधारकास मा.आयुक्तांनी दि.२३-४-९७ रोजी मा.आयुक्त दालनात दरात वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आली.प्राप्त दर खालीलप्रमाणे.

१) काळे फिनेल (आरडब्ल्युसी ५) - मे.इन्शा ट्रेडींग कं.दर रु.१७.९० प्रति लिटर प्रमाणे.

२) बीएचसी - १०% (५० किलो बॅग) मे.सत्या इंटरप्रायझेस दर रु.३६० प्रतिबॅग प्रमाणे.

३) नोव्हॉन सिवाका - मे.रोषण सेल्स कार्पोरेशन दर रू.४२१ प्रति लिटर.

वाटाघाटीमध्ये संबंधित निविदा धारकांनी बाजारातील दर वाढल्याने दरात कमी करणेस नकार दिलेले प्राप्त तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर दर्शविलेले आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका कार्यालयास लागणारे किटकनाशके खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या एकूण तीन निविदाधारकांना सोबत आलेल्या वाटाघाटीनुसार प्राप्त दर खालीलप्रमाणे.

४) काळे फिनेल (आरडब्ल्युसी ५) - मे.इन्शा ट्रेडींग कं.दर रु.१७.९० प्रति लिटर प्रमाणे.

५) बीएचसी - १०% (५० किलो बॅग) मे.सत्या इंटरप्रायझेस दर रु.३६० प्रतिबॅग प्रमाणे.

६) नोव्हॉन सिवाका - मे.रोषण सेल्स कार्पोरेशन दर रू.४२१ प्रति लिटर समोर दर्शविल्या दरा नुसार खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७/२६ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारे छपाई साहित्यासाठी वर्तमानपत्रातुन जाहिरात देवून निविदा पत्रके मागविण्यांत आली एकूण सहा दरपत्रके कार्यालयास प्राप्त झाली.

मा.आयुक्तांचे आदेशानुसार सदरील निविदा धारकांस दरास वाटाघाटीसाठी दि. २३-४-९७ रोजी मा.आयुक्तांचे दालनात बोलाविण्यात आले,संबंधित निविदा धारकांनी भरलेल्या दरात कमी करणेस नकार देवून लेखी पत्र दिलेले आहे.करीत प्राप्त दरांचा

तुलनात्मक तक्ता नुसार सर्वात कमी दराचे आयटम क्र.खालीलप्रमाणे संबंधित निविदाधारकांचे नावासमोर दर्शविण्यात आलेले आहे.

१) मे.श्री.गणेश मुद्रणालय - आयटम क्र.१(५),(६)१,(७),१(१२ ते १७),६(१) १३ (ए,बी,एम,क्यु,एस,डब्ल्यु,वाय),१४ (आय,जे,के,क्यु,आर,टी),१७ (अ),२१,२३,१४ इत्यादी.

२) लिबर्टीप्रिंटर्स
आयटमक्र.१(३,९),२(१ते४),३(३व४),५(२व३),६(४),८(१ते४),१९(ब,ड,इ,क,ह)१२(अ,ब,क,ड, फ,ग,ह,य,ज,ल,म)१३(एफ,जी,एच,आय,जे,एन,ओ,पी,क्यु,आर,डब्ल्युवएक्स), १४(ए,बी,सी,डी,अ,एफ,एच),१५(अ व ब),१६ (१ ते ३),१७ (ब,क,ड,इ),१८,२०,३१,ब इत्यादी.

३) मे.रविराज प्रिंटर्स स्टेशनर्स ॲण्ड एक्ससाईज बुक मॅन्यु लि.
आयटम क्र.- १(१०), ३(१ व २), ४(१ ते ४), ५(१ व ४), ६(२ व ३), ७(१व २), ९(१ ते ४), १०(अ,ब,क,ड,इ,फ), ११(अ,क,ग), १२(इ), १३(टी,यु,व्ही व बाय), १४(एम,एन,पी,एस,यु,व्ही,डब्ल्यु,एक्स), १६(४) १९,२२,२६,२७,२८,३०,३१ (अ,ब,क) इत्यादी.

४) मे.एलोरा प्रिंटर्स - निरंक

५) मे.सिमा प्रिंटर्स - आयटम क्र. १(२), १४(वाय,झेड,झेड १ व झेड २), २९,३१(ड,इ,फ) इत्यादी.
वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर असलेले आयटम्सचे क्रमांक त्या निविदाधारकांसमोर दर्शविण्यात आलेले आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.(कागदाचे नमुने अवलोकनास्तव भांडार विभागात उपलब्ध आहेत.)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका कार्यालयास लागणारे छपाई साहित्य खालील दर्शविलेल्या निविदापत्रक धारकांकडून त्यांचे नावासमोर दर्शविलेले आयटमनुसार खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

६) श्री.गणेश मुद्रणालय
७) मे.लिबर्टी प्रिंटर्स
८) मे.सुरज प्रिंटर्स
९) मे.रविराज प्रिंटर्स स्टेशनर्स ॲण्ड एक्ससाईज बुक मॅन्यु कं. लि.
१०) मे.सिमा प्रिंटर्स

वरीलप्रमाणे निविदाधारकांचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर असल्यामुळे त्यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८/२७ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारी स्टेशनरी (लिखाण साहित्य) दर निश्चितीसाठी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या.प्राप्त एकूण ६ निविदा धारकांना मा.आयुक्तांचे दालनात दि.२३-४-९७ रोजी दरात वाटाघाटीसाठी बोलाविण्यात येवून मा.आयुक्तांनी केलेले कमी दराचे आयटम्स क्रमांक खालीलप्रमाणे संबंधित निविदाधारका समोर दर्शविण्यात आलेले आहेत.

१) मे.सल्वा इंटरप्रायझेस - आयटम
क्र.१,२,९,१३,१६,१९,२२,२५,२८,३१,३४,३७,४०,५१,५४,५७,

६०,६२,८५,९२,९५,१००,१०३,१०५,१०६ तसेच काम्प्युटर स्टेशनरी मध्ये आयटम क्र.४,१०,१३ व १६ तसेच ड्राईंग साहित्यात आयटम क्रमांक ३,४(३),७(१),८,९,१०,११ इत्यादी.

२)मे.विजयजनरलस्टोअर्सआयटमक्र.५,६,८,११,१२,१४,१७,२०,२३,२६,२९,३२,३५,३८,४४,४९, ५२,५८,६१,६२,७२,७५,७७,८६,९३,९६,१०१,१०४,१०७,व ११० कॉम्प्युटर स्टेशनरी मध्ये आयटम क्र.१,५,११ व १४ तर ड्राईंग साहित्यात १, ४(१), ५,७,९२ इत्यादी.

३)मे.मुरलीस्टेशनर्स- आयटम क्रमांक ३,४,७,१०,१३,१५,१८,२१,२४,२७,३०,३३,३९,४६,४७,५०,५३, ५६,५९,६५,६७,६९,७३,७४,७९,८३,८८,९०,९१,९४,९७,१०२,१०९ काम्प्युटर स्टेशनरीमध्ये आयटम क्र.२,३,६,८,९,१२,१५ ड्राईंग साहित्य आयटम क्र.२, ४(२), ६,७, (३) इत्यादी.

४) मे.प्रियंका पेपर मार्ट - आयटम क्र.४१ ते ४५,४८,६४,७०,७१,७५,७८,८०,८१,८२,९९.

५) मे.न्यु.भारत स्टोअर्स - आयटम क्र.३६,६३,६८,७६,८४,८७,८९ व ११२ कॉम्प्युटर स्टेशनरी आयटम क्र.७.

६) मे.पेपर फिल्ड - आयटम क्र.४६,६६,९८,१०८,१११ इत्यादी.

लिखाण साहित्याचे प्राप्त नमुने अवलोकनास्तव भांडार विभागात उपलब्ध आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका कार्यालयास लागणारी स्टेशनरी (लिखाण साहित्य) खालील दर्शविलेल्या निविदापत्रक धारकांकडून त्यांचे नावासमोर दर्शविलेले आयटम क्रमांकानुसार खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) मे.सल्वा इंटरप्रायझेस
२) मे.विजय जनरल स्टोअर्स
३) मे.मुरली स्टेशनर्स
४) मे.प्रियंका पेपर मार्ट
५) मे.न्यु.भारत स्टोअर्स
६) मे.पेपर फिल्ड

वरीप्रमाणे निविदा धारकांचे लिखाण साहित्य,ड्राईंग साहित्य तसेच कॉम्प्युटर स्टेशनरीचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असल्यामुळे त्यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,श्रेयनगर मधील सुप्रतम सोसायटी व शुभम सोसायटी मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी कामाचे सन ९५-९६ च्या डी.एस.आर.दराने रक्कम रू.४,०७,८८९/- चे अंदाजपत्रकास स्वीन ओव्हर सन ९६-९७ मधून प्रस्तावित सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा पत्रके विक्री झाली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत तिन्ही निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

१) मे.मॉस्काट कन्स्ट्रक्शन ४.९५% जास्त दराने

२) मे.आदिनाथकन्स्ट्रक्शन ८.५% जास्त दराने
३) मे.डी.अजितसिंग ९.९% जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया कमी व अ.प.दरापेक्षा ४.९५% जास्त दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.परंतु सदर दर जास्त वाटत असल्यामुळे सदर ठेकेदारास दराच्या वाटाघाटीसाठी बोलाविले असता वाटाघाटीअंती अ.प.दराने काम करण्यास ठेकेदाराने संमती दर्शविली आहे.

तरी सदर काम मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे कडून अ.प.दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, श्रेयनगर मधील सुप्रतम सोसायटी व शुभम सोसायटी मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने वाटाघाटी अंती गुत्तेदार मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करुन सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,चिकलठाणा एमआयडीसी येथील टॉमको कंपनी ते आर.एल.स्टील कंपनी या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता सन ९६-९७ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.८,३२,९००/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजुरी मिळालेली असून सदर खर्च भांडवली रस्ते,डांबरीकरण स्पील ओव्हर सन ९६-९७ च्या तरतुदी तून प्रस्तावित आहे.

सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे.

१) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन २४.९९% कमी
२) मे.पाटील कन्स्ट्रक्शन २३.८८% --//--
३) मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन २०.८६% --//--
४) श्री.के.बी.पाथ्रीकर २०.२१% --//--
५) मे.जय अर्थ मुव्हर्स १६.७७% --//--

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९९% कमी दराची मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा एमआयडीसी येथील टॉमको कंपनी ते आर.एल.स्टील कंपनी या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९९% कमी दराचे गुत्तेदार मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१/३० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शहानुरमियाँ दर्गा ते बीड डायव्हर्शन ८० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता सन ९५-९६ च्या सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.११,०८,३४२/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची

मंजुरी मिळाली असून सदर खर्च भांडवली रस्ते डांबरीकरण स्पील ओव्हर सन ९६-९७ मधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २१.८६% | कमी |
| २) श्री.के.बी.पाथ्रीकर | १९.०९% | --//-- |
| ३) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १६.९९% | --//-- |
| ४) मे.पाटील कन्स्ट्रक्शन | ८.८८% | --//-- |
| ५) मे.जय अर्थ मुव्हर्स | ३.७७% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरमियाँ दर्गा ते बीड डायव्हर्शन या ८० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२/३१ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करीत आहे की,सौ.रेखा प्रदीप अग्रवाल यांनी अर्ज दिला की,त्यांना मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचे पत्र रु.९६/पुरवठा/झुभायो/९६-९७ दि.१२-८-९६ अन्वये मकबरा रोड,मकाई गेट लगत झुनका भाकर केंद्रासाठी मंजुरी दिली आहे.तथापी संबंधितास १५x८ या आकाराची झुनका भाकर केंद्रासाठी खाली चतु:सिमेत जागा विनामुल्य करुन देता येवू शकेल.

पुर्वेस : मोकळी जागा
पश्चिमेस : मकाई गेट
दक्षिणेस : वैद्यकीय महाविदयालयाची संरक्षित भिंत
उत्तरेस : रस्ता

वरील चतु:सिमेत दर्शविलेल्या प्रमाणे झुणका भाकर केंद्रासाठी खालील अटी शर्तीनुसार देता येऊ शकेल.

१) झुनका भाकर केंद्रामुळे रस्ता वरील अडथळा व अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२) झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास मनपाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.
३) ज्या वेळेस मनपास या जागेची आवश्यकता भासेल किंवा उपरोक्त दोन मुद्दयामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपा कडून झुणका भाकर केंद्र हलवावे लागल्यास मनपा केव्हाही जागा रिकामी करुन देणे बंधनकारक राहील.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सौ.रेखा प्रदीप अग्रवाल यांनी अर्ज दिला की,त्यांना मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचे पत्र रु.९६/पुरवठा/झुभायो/९६-९७ दि.१२-८-९६ अन्वये मकबरा रोड,मकाई गेट लगत झुनका भाकर केंद्रासाठी मंजुरी दिली आहे.तथापी संबंधितास १५x८ या आकाराची झुनका भाकर केंद्रासाठी खाली चतु:सिमेत जागा विनामुल्य करुन देता येवू शकेल.

पुर्वेस : मोकळी जागा

पश्चिमेस : मकाई गेट

दक्षिणेस : वैद्यकीय महाविदयालयाची संरक्षित भिंत

उत्तरेस : रस्ता

वरील चतु:सिमेत दर्शविलेल्या प्रमाणे झुणका भाकर केंद्रासाठी खालील अटी शर्तीनुसार देता येऊ शकेल.

१) झुनका भाकर केंद्रामुळे रस्ता वरील अडथळा व अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२) झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास मनपाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

ज्या वेळेस मनपास या जागेची आवश्यकता भासेल किंवा उपरोक्त दोन मुद्दयामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपा कडून झुणका भाकर केंद्र हलवावे लागल्यास मनपा केव्हाही जागा रिकामी करुन देणे बंधनकारक राहील.

वरील अटी व शर्तीनुसार सौ. रेखा प्रदिप अग्रवाल यांन मकबरा रोड,मकाई गेट लगत झुणका भाकर केंद्रासाठी जागा देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षा करीता विद्युत विभागाकरीता टयुब,स्टार्टर,चोक इत्यादी विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९६-९७ च्या दरसुची नुसार रु. ४,११,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता "विद्युत साहित्य खरेदी" या शिर्षकाखाली उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी रक्कम रु.४,११,०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षा करीता विद्युत विभागाकरीता टयुब,स्टार्टर,चोक इत्यादी विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,११,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च सन ९७-९८ च्या "विद्युत साहित्य खरेदी" या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.विद्युत विभागात सध्या साहित्याची तातडीने आवश्यकता असल्यामुळे व कंपनी मागील वर्षीच्या दरामध्ये देण्यास तयार असल्यामुळे त्वरीत कंपनी कडून साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता विद्युत विभागा करीता १५० वॅट,२५० वॅट सोडीयम बल्ब इग्नेटर व इतर विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु.४,७५,७५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता "विद्युत साहित्य खरेदी" या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी रक्कम रु.४,७५,७५०=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता विद्युत विभागाकरीता १५० वॅट,२५० पॅट सोडीयम बल्ब इग्नटर व इतर विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु.४,७५,७५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च सन ९७-९८ च्या "विद्युत साहित्य" या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.सध्या विद्युत साहित्य या विभागात शिल्लक नसल्याने मागील वर्षीच्या मंजुर दराप्रमाणे कंपनी कडुन सरळ साहित्य खरेदी करण्यात यावे.या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता विद्युत विभागाकरीता ४० वॅट टयुब,चोक,१५० व २५० वॅट सोडीयम चोक खरेदी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९६-९७ चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता "विद्युत साहित्य खरेदी" या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यांत येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९७-९८ या आर्थीक वर्षाकरीता विद्युत विभागाकरीता ४० वॅट टयुब,चोक,१५० व २५० वॅट सोडीयम चोक खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,८१,८००/- चे अंदाजपत्रक तसेच सदर खर्च सन ९७-९८ च्या "विद्युत साहित्य खरेदी" या शिर्षकातील तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.सदर साहित्य त्वरीत आवश्यक असलेमुळे मागील वर्षीच्या मंजुर दरामध्ये सरळ कंपनी कडून साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्याते तसेच या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३६/३५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता शहरातील विद्युत पोलवर स्ट्रिट लाईट लावण्याकरीता ब्रॅकेट व क्लॅप खरेदी करण्यासाठी सन १९९६-९७ च्या दर सुची नुसार रक्कम रु.४,२५०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात

आले आहे.सदरील खर्च सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता "विद्युत साहित्य खरेदी" या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी रक्कम रु.४,२५०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार सन १९९७-९८ या आर्थिक वर्षा करीता शहरातील विद्युत पोलवर स्ट्रिट लाईट लावण्या करीता ब्रॅकेट व क्लॅप खरेदी करण्यासाठी सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु.४,२५०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता "विद्युत साहित्य खरेदी" या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७/३६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपाच्या नाक्यासाठी (एकूण सात) फायबरचे कॅबिन तयार करुन बसविण्यासाठी रक्कम रु.३,९३,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.५-४-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर सायबर कॅबिनचे नाके तयार करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रु.३,९३,५००/- मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : सर्व जकात नाक्यांना एक सारखा रंग देण्यात यावा.
मा.सभापती : वरील प्रमाणे मान्यता देवून प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध नाक्यासाठी (एकूण सात) फायबर कॅबिन तयार करुन बसविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,९३,५००/- चे अंदाजपत्रक तसेच सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्र गीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | सभापती |
| महानगरपालिका,औरंगाबाद | स्थायी समिती |
| | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**मा.सभापती स्थायी समिती श्री.प्रभाकर विधाते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या दि.१६-५-९७ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सभेची इतिवृत्त "वंदेमात्‌रम" या गीताने सुरु झाले. सभा अंदाजे ३=५० वा सुरु झाली. सभेस रजिस्टर प्रमाणे स.स.व अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) श्री.सुभाष टाकळकर | स.सभासद |
| २) श्री.त्रिंबक तुपे | --//-- |
| ३) श्री.कचरु नवपुते | --//-- |
| ४) श्री.अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ५) श्री.विकास जैन | --//-- |
| ६) श्री.भगवान घडामोडे | --//-- |
| ७) श्री.रशिदखाँन (मामू) | --//-- |
| ८) श्री.स.अली मिरा सलामी | --//-- |
| ९) श्री.जोशी संजय रामदास | --//-- |
| १०) श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| ११) सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १२) श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| १३) श्री.जयवंत केशवराव ओक | --//-- |

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते** : मागील बैठकीचे इतिवृत्त या सोबत जोडण्यात आलेले नाही तर बैठक कशी घेणार याची माहिती दयावी.

**श्री.गांगवे :** स.स.श्री. रऊफ यांच्या मातोश्री पै. यांचे नुकतेच दु:खद निधन झाले.त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री.घडामोडे :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :** ठिक आहे.(यावेळी सभागृहात ००.०२ मिनिटे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**श्री.कचरु नवपुते** :मागील बैठकीचे इतिवृत्त शिवाय या बैठकीत काय चर्चा करावी व इतिवृत्त कायम कसे होणार इतिवृत्त न देण्याचे कारण काय? मागील वेळेसच इतिवृत्त लिहिण्यासाठी लघू टंकलेखकाची मिटींग विभागामध्ये कर्मचाऱ्यांची नेमणू देण्यात येणार होती.त्या बाबत काय झाले?

**मा.सचिव :** मागील बैठकीचे इतिवृत्त न देण्याबाबतचे कारण म्हणजे मागील वेळेस श्री.ढेकळे व बाहेती या दोघांनी मिळून इतिवृत्त घेतलेले होते.त्यांनी सदरचे इतिवृत्त लिहून ताबडतोब द्यावयास पाहिजे होते.विचारणा केली असता स्वच्छ औरंगाबाद मोहीमेचे काम असल्याने इतिवृत्त झाले नसल्याचे सांगितले व पुढील बैठकीपर्यंत देण्याचे सांगितले.आजची बैठक मागील बैठकीचे इतिवृत्त पुढील बैठकीचे वेळी सोबत देण्यात येईल.

**श्री.कचरु नवपुते** : नविन लघुटंकलेखकांची मिटींग विभागासाठी घेण्यात येणार होते त्या बाबत काय झाले. का कडुनचे कामे करवुन घेत होते.

**उपआयुक्त-१ :** मिटींग विभागाकडे इतिवृत्त घेण्यासाठी लघुटंकलेखक नाही. आजपर्यंत उपआयुक्त १ व २ यांचे लघुटंकलेखकाकडुन कामे करवुन घेत होतो. मिटींग विभागासाठी इतिवृत्त लिहिण्याकरीता नविन लघुटंकलेखकाची नियुक्ती लवकरच करण्यात येणार आहे.

**श्री.कचरु नवपुते :** मागील वेळेसच्या बैठकीचे वेळी दोन-तीन बैठकीचे इतिवृत्त एकत्रित देत होते व आता एकाच बैठकीचे इतिवृत्त सोबत देण्यास विलंब का लागतो जर इतिवृत्त आजच्या बेठकीसाठी नसल्याने बेठक स्थगीत ठेवावी कारण इतिवृत्त कायम केल्याशिवाय बैठक होणे शक्य नाही.

**श्री.मिरा सलामी :** इतिवृत्त सोबत जोडलेले नसल्याने बैठक २-३ दिवस पुढे ढकलावी.स्थायी समिती व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त लिहिण्यासाठी गेल्या १ १/२ ते दोन वर्षापासून अडचणी येत आहेत.याची नोंद घ्यावी.

**मा.सभापती :** कामाच्या व्यापामुळे इतिवृत्त लिहिण्यास वेळ मिळाला नाही तरी पुढील बैठकीच्या वेळी इतिवृत्त सोबत जोडण्यात येईल.

**श्री.मिरा सलामी :** मागील वेळेसच्या सर्वसाधारण सभेमध्ये मुख्य कार्यालयासाठी जनरेटर असणे बाबतचा प्रस्ताव मंजुर झालेला होता.त्या बाबत काय कार्यवाही झ ाली.

**अति.शहर अभियंता** : आजच्या बैठकीत जनरेटर घेणेबाबतचा प्रस्ताव आहे.

**श्री.मिरा सलामी :**सभेमध्ये असा प्रस्ताव मंजुर झालेला आहे की,मनपाच्या मुख्य प्रवेश द्वारास कै.द्वारकादास पटेल व स्थायी समिती सभागृहास पै.मलिक अंबर चे नाव देण्यांत यावे.त्याबाबत कार्यवाही झाली.

**अ.श.अभियंता :**याबाबत दोन्ही नावांचे बोर्ड तयार करण्यासाठी टाकण्यात आलेले आहे.

**श्री.घडामोडे :** आजचे इतिवृत्त चांगल्या प्रकारे टाईप केलेले दिसत नाही याचे कारण काय?

**मा.सभापती** : सायक्लोस्टाईल मशिनवर जर चांगल्या प्रती निघत नसल्यास नविन मशिन खरेदी करावी.

**श्री.कचरु नवपुते** : मागील सभेत असा प्रस्ताव मंजुर झालेला होता की,शहरामध्ये एस.टी.महामंडळ एमएसईबी व व मनपाच्या सहकार्याने डबल डेकर बस सुरु होणार होती,त्या बाबत काय झाले.

**अ.श.अभियंता** : सदरचे काम एस.टी.महामंडळाचे आहे.त्यांनी कार्यवाही करावी.

**श्री.कचरु नवपुते** : मागे एस.टी.महामंडळ एमएसईबी व मनपा यांची संयुक्त बैठक ठरलेली होती व येणाऱ्या रस्त्यावरती अडथळे बाबत संयुक्त कार्यवाही करण्यात येईल असे सामुदायिकरित्या ठरलेले होते परंतु अद्यापही काम प्रलंबीत आहे.

**मा.सभापती** : एस.टी.महामंडळाकडे पत्राद्वारे संपर्क साधुन योग्य ती कार्यवाही करावी व पुढील बैठकीत तपशील दयावा.

**श्री.जयवंत ओक** : सुरत पॅटर्न धरतीवर "स्वच्छ औरंगाबाद" मोहिमे अंतर्गत वार्डातील स.स.च्या स्वेच्छा निधीतून कुंडया देणार आहात काय? याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** सुरत पॅटर्न धरतीवर "स्वच्छ औरंगाबाद" मोहिमे अंतर्गत मा.महापौर श्री.रशिदमामू यांनी त्यांच्या स्वेच्छा निधीतुन त्यांच्या वॉर्डातील रस्त्यावरही केरकचरा टाकण्यासाठी दिलेल्या होत्या.

**श्री.जयवंत ओक** : मला अशी माहिती मिळालेली आहे की,प्रशासनाने काही स.स.सोबत एकत्रीत वाटाघाटी करून कचरा कुंडया बाबत निर्णय घेतलेला आहे.जर सुदर औरंगाबाद व स्वच्छ औरंगाबाद करण्यांच्या दृष्टीने पाऊले टाकावयाची

असल्यास प्रशासनाने सर्वांना सहकार्याने वागवावे व भांडार विभागातील खरेदी संदर्भात प्रशासनाने एकत्रीत चर्चाकरुनच कचरा कुंडया इतर वस्तु खरेदी करण्याबाबत मंजुरी घ्यावी.

**श्री.कचरु नवपुते** : आपण शहरातील स्वच्छतेबाबत सुरत पॅटर्न योजना राबवित आहोत परंतु शहरात तसे वातावरण निर्मीती अद्यापही झालेली नाही व स्वच्छतेबाबत पाहिजे तशी तयारी प्रशासनाने केलेली दिसुन येत नाही.कारण आपल्या कडे झोन निहाय जे स्वच्छतेच्या कामासाठी मंजुर पाहिजे तेवढया प्रमाणात नाहीत.औषधी फवारणीसाठी उपलब्ध नाहीत.या सर्व बाबी माझ्या वार्डातील झोनमध्ये मला पहावायास मिळातात म्हणूनच मी आज हे स्पष्ट सांगत आहे.याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** झोन-५ मध्ये स्वच्छतेच्या बाबतीत वेळोवेळी भेटी दिलेल्या आहेत.स्वच्छते बाबत ज्या ठिकाणी मजुर कमी आहेत त्या झोनमध्ये मजुर वाढवुन दयावे व स्वच्छतेच्या दृष्टीने प्रयत्न करावे.

**श्री.कचरु नवपुते** : जादा मजुर अद्यापही मिळालेले नाहीत जोपर्यंत मजुरांचा अभाव राहील तोपर्यंत स्वच्छता पाहिजे तशी शहरात दिसणार नाही.

**श्री.जयवंत ओक** : अधिकारी वर्गांना साईट चार चाकी गाडया आहेत त्या शिवाय ८२ स.स.यांनी आपआपल्या वार्डातील स्वच्छतेकडे प्रशासनास सहाकार्य करावे व गल्लीतील केर कचरा पुर्णतः निपटून काढला जाईल अशी व्यवस्था करावी.

**मा.आयुक्त** : आता बऱ्याचशा स.स.ना "स्वच्छ औरंगाबाद" बाबत उप आयुक्त सुचना केल्या स.स.च्या स्वेच्छा निधीतून छोटया छोटया कचरा कुंडया देणार आहोत.त्या कुंडया आप आपल्या वॉर्डातील स.स.च्या स्वेच्छा निधीतून देणार आहोत.याची एकत्रितपणे सर्वांनी ठरविणे आवश्यक आहे.दि. २८-५-९७ ला महापौर सभा घेणार आहेत.त्यावेळेस या बाबत निर्णय घेण्यात येईल.त्याच प्रमाणे स.स.च्या स्वेच्छा निधीतून जी आर्थिक मदत देण्यांत येते त्याची लिमिट रु.२५/- हजार ठेवावे काय याचाही निर्णय घेणे आवश्यक आहे."स्वच्छ औरंगाबाद" मोहीम राबवित असतांना प्रशासनाला अनेक प्रश्न उद्‌भवतील परंतु प्रशासनाने ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नेमणूका केलेल्या आहेत ते जबाबदारीने पार पाडतील यात शंकाच नाही. झोनल मधील मजुरही सध्या चांगले काम करीता आहेत त्या बाबत संबंधीत वार्डातील स.स.यांचेही सहकार्य मिळत आहे. रस्त्यावरील केरकचरा हा कुंडीत टाकला गेला पाहीजे यासाठी वॉर्डातील स.स.नी सांगणे आवश्यक आहे. वार्डनिहाय कर्मचारी अहोरात्र स्वच्छतेचे प्रयत्न करातील रस्त्यांवरी कुंडया किती घ्यावयाच्या त्या ठरवाव्या त्याची ं अंलबजावणी निर्णयानंतर करण्यात येईल. कचऱ्या कुंडया नेमक्या कोणत्या घ्यावयाच्या पक्षी चित्र असलेल्या किंवा फायबरच्या किंवा कोणत्या त्याचा विचार चालू आाहे.परंतु काही हलक्या कुंडया रस्त्यावर ठेवलेल्या असल्यास त्या कुणीही उचलून घेऊन जावू नये याची दक्षता घेणे आवश्क आहे.प्रत्येक झोन वाईज हातगाडया घ्यावयाचे आहे.ते कशा प्रकारचे असावयास पाहिजेत त्याची नमुना पहाणी मा.खा.महोदयासांबत केलेला आहे. स.स.कचरु नवपुते यांना सुरत पॅटर्न विषयी चर्चा केल्याप्रमाणे सध्या औरंगाबाद शहरात "सुरत पॅटर्न" मोहीम सुरु होऊन १०-१२ दिवस झालेले आहेत. सदरची मोहीम पुर्णपणे

यशस्वी होण्यासाठी दिड ते दोन वर्षाचा अवधी लागणार आहे.याची नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या सहभागाने होणार आहे.परवा मो.नारळीबाग येथे मा.खासदार यांचे समवेत तेथील नागरीकांनी त्या वॉर्डात स्वेच्छेने उस्फूर्तेने स्वच्छतेसाठी भाग घेवून कार्यक्रमाची सुरुवात केली.तशाच प्रकारचे कार्य सर्व स्थरातून मिळणे आवश्यक आहे.नागरिकांना व जनजागृती बाबत वेगवेगळे पोस्टर्स बॅनर्स व छोटे-छोटे स्टीकर्स प्रशासनातर्फे लावण्यात येणार आहे. १५ ऑगस्ट पर्यंत आपण स्वच्छतेबाबत शहरात वातावरण निर्मिती करणार आहोत.नंतर मात्र दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे.यात कोणत्याही प्रकारची तडजोड करणारा नाही स्वच्दतेबाबत प्रत्येक झोन वाईज ३० मजुर मा.महापौर यांना सांगुन वाढवुन दिलेले आहेत. आमच्या दैनंदिन पाहणी द्वारे झोन-३ व झोन-२ येथील स्वच्छतेची प्रगती दिसून येत आहे व असेच सर्वांचे सहकार्य मिळाल्यास हुबेहुब प्रगती होत राहील व "स्वच्छ औरंगाबाद" आपणास दिसून येत राहील.

**श्री.कचरु नवपुते** : माझ्या वार्डात मजूर कमी आहेत.त्यामुळे स्वच्छता पुर्णपणे काहीही दिसून येत नाही.

**मा.आयुक्त** : सुरत पॅटर्न राबविणे म्हणजे गाडया घेणे.मजूर जादा लावणे असे नसुन आहे.तेवढयातच खर्च करुन दाखविणे होय.यासाठी प्रशासनाने विभागीय आयुक्त यांना संपूर्ण अधिकार दिलेले आहेत.विभाग आयुक्तांनी यांना रु. २५/- हजार वॉडॉतील कामासाठी खर्च करण्याचे अधिकार दिलेले आहेत.यासाठी सर्व लोकप्रतिनिधी यांचे सहकार्य मिळणे आवश्यक आहे.

**श्री.जयवंत ओक** : प्रत्येक कॉलनीमध्ये डस्टबिन (केलाविल) देण्याची व्यवस्था राहील तीच व्यवस्था अपार्टमेंट सारख्या ठिकाणीही ठेवावी व ज्या स.स.ना त्यांच्या स्वेच्छा निधीतून घेवून द्यावयाचे आहेत. त्यांना परवानगी दयावी.

**मा.आयुक्त** : ठिक आहे.

**अभिमन्यु भालेराव** : सर्वात प्रथम स्लम भागापासून स्वच्छता मोहीम सुरु करावी कारण झोपडप्ट्टी भागात जास्त प्रमाणात दुर्गंधी असते व त्याबाबतचा निपटारा करणे आवश्यक आहे.यासाठी सर्व नागरिक व लोकप्रतिनिधीही सहकार्य करतील.

**श्री.गौतम लांडगे** : मा.पालकमंत्री यांनी मुंबईला बैठक बोलावली होती व औरंगाबाद मनपाच्यासेवेत रोजंदारीवरील कर्मचारी यांना सेवेत सामावून घेणे बाबत आश्वासन दिलेले होते.त्यांचे काय झाले?

**मा.आयुक्त** : सध्या दैनिक वेतनावर कर्मचारी काम करीता आहेत.

**श्री.गौतम लांडगे** : तत्कालीन आयुक्त श्री.भोगे साहेब यांच्या कारकीर्दीने एका मजुराने किती काम करावे, किती रनिंग मिटर काम दररोज करावे याचा आलेख तयार करुन कामे घेत होते व त्यानुसार शहरातील साफसफाई व्यवस्थित होत होती व आताही तेच कर्मचारी असुनही कामास पाहिजे तेवढी गती दिसून येत नाही हे शक्य आहे काय?

**मा.उप-आयुक्त-१** : दैनंदिन कामामध्ये मजूर वाढविणे आवश्यक आहे.नागरिकांनीही सुध्दा केरकचरा नालीमध्ये किंवा रस्त्यावर टाकू नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**श्री.अभिमन्यु भालेराव** : तत्कालीन आयुक्त भोगे साहेब असतांना साफसफाई मजुर व्यवस्थित काम करत होते.परंतु मजुर आजही वाढवुन मजुरांच्या कामाकडे

सारखे निरिक्षण करणे आवश्यक झाले आहे.कारण मजुर वाढवूनही काही फायदा नाही.मजुराकडून काम करवून घेणे महत्वाचे आहे.अधिकारी वर्गांना जवाबदार धरुन निलंबीत करण्यापेक्षा मजुरांनाच शिक्षा झाली पाहिजे म्हणून मजुर व्यवस्थित काम करतील.

**श्री.मिरा सलामी** : प्लेगेमुळे सुरत शहराच्या स्वच्छतेला प्राधान्य मिळाले परंतु औरंगाबाद मध्ये ही योजना राबविणेसाठी लोकप्रतिनिधी यांचे सहकार्य आवश्यक आहे.शिवाय शहरातील डांबरीकरणाचे रोड रस्त्यांचे फेस टु फेस करणे आवश्यक आहे.त्यामुळे अतिक्रमणही होणार नाही व स्वच्छता दिसून येईल.व त्याप्रमाणे कचराकुंडया खरेदी करीत असतांनास स.स.ना विचारात घ्यावे.

**मा.सभापती :** स.स.च्या सुचनेनुसार शहरातील डांबरीकरण हे रस्त्याच्या फेस टु फेस करणे बाबत अति शहर अभियंता यांनी कार्यवाही करावी.

**श्री.जोशी :** मागील बैठकीच्या वेळेला जटींग मशिन बाबतचा प्रश्न विचारलेला होता.त्या मशिनचे आऊट पुट काय याची माहिती दयावी.

उप अभियंता मेकॅ (माहिती वाचून दाखविली.)

**श्री.जोशी** : मशीन वर्षातून किती दिवस चालली तसेच मशिनचे गॅरंटीची माहिती सांगितलेली नाही.या मशीनसाठी १ ले ४ वर्षी सर्व्हिसिंग फ्रि असते.१ ल्या वर्षात रु.१७०००/- खर्च का केला याची माहिती दयावी.

**उप अ.मेकॅ :** ३०० ठिकाणी मशीन चाललेली आहे.या मशीनचा पाईपचा खर्च झाल्यामुळे सदरील खर्च पुणे येथे नेऊनच करावा लागतो.

**श्री.जोशी :** या माहितीने माझे समाधान झालेले नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांने पुढील बैठकीत सविस्तर माहिती दयावी.

**श्री.घडामोडे :** बोरींगच्या कामाबाबत माहिती मागील बैठकीत विचारणा केली होती त्याचे काय झाले?

**कार्यकारी अभियंता (पापू)** : स.स.गांगवे,घडामोडे व सौ.शिंदे यांचे वॉर्डात पाहणी केलेली होती त्या ठिकाणी मोजमाप स.स.चे समोर केलेली नव्हती तेव्हा ८ दिवसात स.स.यांचे समवेत मोजमाप घेण्यात येईल.

**मा.सभापती :** ठिक आहे.

**श्री.विकास जैन** : या महिन्यात जकात उत्पन्नात घट आलेली आहे याचे कारण काय?

**जकात अधिक्षक** : शुक्रवारला औद्योगिक परिसर बंद असतो तर शनिवारला शहरातील मार्केट बंद असतात.या व्यतिरिक्त काही वेळेस सणानिमित्तही बऱ्याच मालांची वाहतुक होत नसते.

**श्री.विकास जैन** : दोन वर्षापुर्वी जवळपास २ ते २ १/२ लाखाचा तोटा मनपाचा केलेला होता तो कोणता कर्मचारी आहे याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दयावी.

**श्री.विकास जैन :** साजेद नावाच्या कर्मचाऱ्यांची या बाबत फक्त चौकशी केली त्या बाबत पोलीस कार्यवाही का केली नाही.

**श्री.जोशी,श्री.घडामोडे** : न्यायाधीश या कर्मचाऱ्याने केवळ २२ हजाराचा भ्रष्टाचार केला म्हणून त्यास टरमिनेट केले व पोलीस काय्रवाही केली व या साजेद नावाच्या कर्मचाऱ्याने २ ते २ १/२ लाखाचा भ्रष्टाचार केला तर त्याच्यावर प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही ही बाब प्रशासनाची योग्य नाही.तेव्हा श्री.साजेद यांच्यावर प्रशासनाने पोलीस केस सुध्दा केली नाही याचे कारण काय?

**मा.आयुक्त :** याबाबत मला काहीही माहिती नाही.मी माहिती घेऊन पुढील बैठकीत देईन.

**श्री.मिरा सलामी** : एका ट्रान्सपोर्टवर ३०० कुलर गाडीमध्ये व कागदोपत्री असतांनाही जकात विभागाने फक्त ३० कुलर असल्याचे दाखवून जकात पावती फाडली.तेव्हा या बाबत १० पट फाईन केलेली नाही.याची माहिती दयावी.

**जकात अधिक्षक** : मी १.१० लाखाचे फाईन केलेले आहे.

**श्री.मिरा सलामी** : माझी अशी सुचना आहे की,या बाबत त्याच वेळेस जकात विभागाने का कार्यवाही केलेली नाही.

**श्री.विकास जैन** : पुढील बैठकीत माहिती दयावी.

**मा.सभापती** : ठिक आहे.

**श्री.घडामोडे** : अपना बाजार येथील दुकानांचे आकारणीचे संपूर्ण आकारणी एकत्रीत केले याचे कारण काय?

**श्री.जोशी :** याबाबत सहा.संचालक नगररचना यांनी काय कार्यवाही केली याची माहिती दयावी.

**सहा.स.न.र.** : यामध्ये ६० हजाराचे करमुल्यांकन ७/- हजार केलेले आहे. अशी चुक दिसून येते नंतर ते दिड हजारावर दिसून आले.

**श्री.जोशी :** या बाबतची संचिका झोन ४" ला आहे.वास्तविकता कर आकारणीचे का मुख्य कार्यालयात होत असते व रजिस्टरही याच ठिकाणी असते मात्र झोन ४ ला ६० हजारांचे मुल्यांकन ७/- हजार व नंतर दिड हजार कसे झाले याची माहिती दयावी.

**कर मुल्य.अ.:** जुन ९५ मध्ये मी या पदाचा पदभार स्विकारला त्या वेळेस कर लागलेला या ठिकाणी ११० दुकाने होती त्यांना नोटीस देऊन तीन लोकांनी टॅक्स लावलेला नाही.तर ११० पैकी ६ दुकानांनी आक्षेप घेतलेले आहे.उप आयुक्त-१ यांचे कडे हिअरिंग घेऊन (६) सहा दुकानदारांचे रिकामी करण्यांत आले आणि कर जशाच तसा आहे.त्यांचे ऑफीडेव्हीड हिअरिंगचे वेळेस घेण्यांत आलेले आहेत.

**मा.सभापती** : पुन्हा दोन्हीही रजिस्टर मागवुन घेऊन पाहणी करावी व पुढील बैठकीत माहिती दयावी.

**श्री.जोशी :** जात पडताळणी समितीने एका कर्मचाऱ्यास अवैध ठरविले व त्यानुसार त्यांना नोकरीतुन बडतर्फ करण्यात आले आहे.त्याव्यतिरिक्त मनपाचे अधिकारी /कर्मचारी यांचे गेल्या ३ वर्षापासून जात पडताळणी अर्ज संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेले आहेत.परंतु अद्यापही कार्यवाही झालेली नाही.याबाबत जात पडताळणी अहवालावरुन संबंधितावर फौजदारी दावा दाखल करावा.

**मा.आयुक्त** : कर्मचाऱ्यांचे जात पडताळणी बाबत येथील वरिष्ठ लिपीक श्री.बेग यांनी अनु.जमातीचे असल्याचे खोटे प्रमाणपत्र कोर्टाने दाखवुन दिल्याने त्यांना कार्यालयातुन तडकाफडकी बडतर्फ करण्यात आलेले आहे.तसे घटनेमध्ये नमुद केल्याप्रमाणे अशा प्रकारची जातीचे खोटे प्रमाणपत्र दाखल करुन नौकरी मिळविणे हे कायदयान्वये गुन्हा आहे व तशी नियमात तरतुद आहे.

**श्री.घडामोडे** : अशा प्रकरणांवर संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत विधी सल्लागार यांनी माहिती दयावी.

**श्री.सुभाष टाकळकर** : श्री.कलिम अख्तर,उपअभियंता पापु-२ सिडको यांचा अतिरिक्त भार कर आकारणीला दिलेला आहे.त्यामुळे सिडको पाणी पुरवठयावर परिणाम

होत आहे.तेव्हा कलीम अख्तर यांना उन्हाळयापर्यंत सिडको पापू-२ येथेच कायम करून त्यांच्यावरील अतिरिक्त भार काढून घ्यावा जेणे करुन सुरळीत कारभार चालेल.

**श्री.गौतम लांडगे** : सिडको पापू-२ येथे पूर्णपणे जवाबदारीने काम करणारे अधिकारी असणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :** ठिक आहे.त्या ठिकाणी दुसरा एखादा अधिकारी नेमण्यात येईल.त्याची नियुक्ती करण्यांत आली होती ते श्री.पी.जी.पवार मनक्याच्या दुखापतीने रजेवर असल्याचे कळते.तेव्हा त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यांत येईल.

**श्री.मिरा सलामी** : जात पडताळणीसाठी ३-३ वर्षाचा कालावधी लागतो यात कारणीभूत प्रशासन आहे.अतिशहर अभियंता यांचे प्रकरण कोर्टात चालु आहे.आणि जोपर्यंत सिडको हस्तांतरण होत नाही तोपर्यंत त्यांना या पदावर बढती देवू नये असे असतांनाही त्यांना बढती देण्यांत येवून कार्यभार सोपविला व जात पडताळीचे प्रकरण ३-३ वर्षापासून प्रलंबित का आहेत याची प्रशासनाने शहानिशा करावी.

**श्री.घडामोडे** : मागील बैठकीत मी माहिती विचारणा केली होती की गणेश स्टोन इंडस्ट्रीज ला रेसिडेंशन झोंन साठी आपण परवानगी दिलेली आहे का, याबाबत त्यांनी कोर्टातून स्टे सुध्दा आणलेला आहे. याचे कारण काय प्रशासन योग्य ती कार्यवाही करीत नाही.

**श्री.जोशी :** वाळूजचे स्टोन क्रेशर बंद करावे अशी सतत मी मागणी करीत आहे परंतु अद्यापही कार्यवाही होत नाही.एखादया वार्डातील पिठाच्या गिरणी साठी नागरिकांनी मागणी केली तर त्यांना परवानगी तात्काळ मिळत नाही पंरतु अशा प्रकारचे लोकांचे क्रेशर साठी प्रशासन मात्र परवानगी देते तेव्हा या बाबत प्रशासनाने शहानिशा करुन सदरील स्टोन क्रेशरची परवानगी रद्द करावी.

**मा.सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**स.स.न.र. :** संपुर्णपणे माहिती संचिकेत पाहुन पुढील बैठकीत माहिती देणे.

**श्री.जोशी :** एका गॅस एजन्सीला खालच्या तळात किंवा वरच्या मजल्यावरील इमारतीस गॅस सिलेंडरसाठी परवानगी दिलेली आहे.याची माहिती घेऊन कार्यावाही करणेबाबत इमारत निरिक्षक यांना सुचना करुनही अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

**प्रशासकीय अधिकारी** : याबाबत पाहुन पुढील बैठकीत माहिती देण्यांत येईल.

**मा.सभापती** : स.स.नी विचारलेली सुचनांचे प्रशासनाने कार्यवाही करुन माहिती दयावी.

**श्री.जयवंत ओक** : शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे होतात.त्यावेळेस संबंधित इमारत निरिक्षक यांनी वेळीच खबरदारी घेऊन कार्यवाही करावी व त्यांचेवरती फौजदारी दावा करावा.

**मा.सभापती** : ठिक आहे.आता विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**विषय क्र.३८/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.चौरसनगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार कराणे कामाकरीता रु. ३,७२,३००/- चे अंदाजपत्रक सा.बा.विभाग,औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ अ नुसार तयार करण्यात आली असून मा.आयुक्त यांनी दिनांक २-११-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. दि.२१-११-९६ रोजी झालेली स्थायी

समितीच्या विषय क्र.५३१/१४ दि.२९-११-९६ ला मंजुरी मिळाली नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/४१९७/दि.१-१-९७ निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १७-१-९७ पर्यंत एकूण ४ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी फक्त दोन (२) मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या निविदा दि.३१-१-९७ रोजी उपस्थित गुत्तेदरासमक्ष उघडण्यांत आल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री.डी.अजितसिंग | अ.प.दरापेक्षा | ४.९% | जास्त |
| २) आदिनाथ कन्स्ट्रक्शन | --//-- | १०.१% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९% जास्त दराची निविदा श्री.डी.अजितसिंग यांची आहे. परंतु सदर दिलेले दर मा.आयुक्त यांना अमान्य असल्यामुळे संबंधित गुत्तेदारास वाटाघाटीसाठी कार्यालयात बोलविण्यात आले व चर्चेत ठरल्याप्रमाणे ४.९% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने मान्य केली आहे.

करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

**श्री.घडामोडे,श्री.जोशी :** विषय क्र.१ चौरसनगर स्लम भागात यापुर्वीच डांबरीकरण झालेले असतांनाही पुन्हा सदरील प्रस्ताव का आला याची माहिती द्यावी.

**उप अ.स्लम :** सदरील काम संबंधित गुत्तेदाराने स्वतःच्या रिस्क वरती केलेले आहे.याबाबत मला काहीही कल्पना नाही.

**श्री.जोशी :** सदरच्या भागातील मी स्वतः नगरसेवक असुन या भागात डांबरीकरण केल्याचे भासवून संबंधित गुत्तेदार पैसे उचलण्याच्या तयारीत आहे.याबाबत संबंधित गुत्तेदाराने जर स्वतःच्या रिस्क वर अशा प्रकारचे काम करीत आहे ही बाब प्रशासनाच्या नजरेत कशी आली नाही. सदरील गुत्तेदारास कोणत्याही प्रकारे झालेला खर्च प्रशासनाने देवू नये व एकदा डांबरीकरण केल्याचे दाखवून अंदाजपत्रक तयार करुन प्रस्ताव प्रशासनाने दाखल करणे याचा मी निषेध करतो.

**श्री.मिरा सलामी :** माझ्या वार्डातील पैठणगेट / दलालवाडी येथील डांबरीकरणाचा प्रस्ताव मंजूर होऊनही अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

**श्री.घडामोडे :** चौरसनगर भागातील डांबरीकरणाच्या या प्रस्तावातील गुत्तेदारास खर्चाचा पैसा प्रशासनाने देऊ नये.

**मा.सभापती :** सदरील भागास काम पुर्वीच झाले आहे तर प्रस्ताव पुन्हा का ठेवण्यांत आला.

**उप अ.स्लम :** सदरील भागात डांबरी करण होऊन ८ दिवस झालेले आहेत.

**श्री.जोशी :** त्या ठिकाणी बांधकाम होऊन बराच कालावधी झालेला आहे व प्रस्ताव मात्र आता येत आहे.याचे कारण काय?

**उप अ.स्लम :** संबंधित गुत्तेदाराने असे केलेले असल्यास त्यास गुन्हा म्हणून त्याच्या खर्चाचे देयकातुन पैसे कमी करुन दयावे.

**श्री.विकास जैन :** याबाबत संपूर्ण माहिती घेऊन पुढील बैठकीत दयावी व तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**श्री.मिरा सलामी :** संबंधित गुत्तेदाराने असे केलेले असल्यास त्यास गुन्हा म्हणून त्याच्या खर्चाच्या देयकातून पैसे कमी करुन दयावे.

**श्री.घडामोडे,श्री.जोशी :** संबंधित अधिकारी म्हणतात मी गुत्तेदाराला सुचना दिलेल्या नाहीत.मात्र डांबरीकरण झाले मग कामाची सुचना नसतांनाही डांबरीकरण का करण्यांत आले.तेव्हा गुत्तेदारास कोणत्याही अंदाजपत्रकातील पेसे देवू नयेत.

**उप अ.स्लम** : आपण कोणत्याही प्रकारची संबंधित गुत्तेदारास सुचना केलेल्या नाहीत तेथील कामाच्या ठिकाणी आमचा कनिष्ठ अभियंता सुध्दा उपस्थित नव्हता.

**श्री.जोशी,श्री.घडामोडे** : मग टेंडर न मागविता सदरील काम संबंधित गुत्तेदाराने का केले.काम आवड निर्माण झाली त्या कामाच्या वेळी सदरील ठिकाणी कनिष्ठ अभियंता सुध्दा उपस्थित नसतांनाही व कामाचे मोजमापही काढलेले नसतांना हे काम कसे करुन घेतले ही एक शोकांतिका आहे.प्रशासन स्वच्छ औरंगाबाद करीता कचरा कुंडया स.स.च्या स्वेच्छा निधीतून घेतात ही बाब योग्य वाटत नाही.

**श्री.जयवंत ओक** : स.स.नी कोणत्याही कामाबाबत मा.आयुक्त यांचेकडे पत्राने विचारणा करावी.

**मा.आयुक्त** : विषय क्र.१ बाबत स.स.नी जी चर्चा केलेली आहे.ती बाब अत्यंत दुर्दैवी आहे. याबाबत प्रशासनामार्फत कडक कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** सदरील विषय स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत येतो.

**विषय क्र.३९/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,लोटा कारंजा येथील अस्तित्वात असलेल्या सर सैय्यद हॉल हा पुर्णतः जमीनदोस्त करुन त्या ठिकाणी तळ मजला व त्यावर पहिला मजला बांधणे ज्यामध्ये फंक्शन हॉल व शाळेसाठी वापर करण्यासाठी सर्वसाधारण सभा दि.१०-३-९७ अन्वये सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. २५,५२,०००/- ला व सदरील का अंदाजपत्रकीय दराने श्री.शेख उमर मुळ गुत्तेदारास याचे कडून करवून घेण्यासाठी सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे.व संबंधितास सुधारीत कार्यादेश देण्यात आलेला आहे. परंतु सदरील इमारत मनपाची मालमत्ता असल्याने इमारत पाडून सदरील साहित्य स्थळावर जमा करुन त्याचे मुल्यांकन करुन जाहीर लिलावाद्वारे विकण्यासाठी स्थायी समितीची मान्यता दयावी या अटीवर मा.आयुक्तांनी दि. ५-५-९७ ला मान्यता दिलेली आहे.त्यानुसार इमारत तोडण्याचे काम मुळ एजन्सीकडून सुरु करण्यांत आले असून स्थळावर साहित्य जमा करण्यात येत आहे.व सदरील साहित्याचे मुल्यांकन रक्कम रु. १५,३००/- वेस्ट मटेरियल व उपयुक्त मटेरियल ट्रान्सपोर्टेशन सहित (व्यर्थ मटेरियलची विल्हेवाट संबधित बोलीधारकास करावी लागेल.) श्री.एन.आर.वर्मा वास्तुशास्त्रज्ञ यांचे कडून करुन घेण्यात आलेले आहे सबब सदर जुनी इमारत तोडून साहित्याची लिलावाद्वारे विक्री करण्याचे मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.जोशी** : लोटा कारंजा येथील सर सैय्यद हॉल जमिनदोस्त करुन तेथील मटेरियची किंमत वर्माकंपनीकडून मोजमाप करुन का काढली व त्याची किंमत फक्त रु.१५,३००/- का काढण्यात आली याची माहिती दयावी.

**मा.सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अ.इमारत** : बऱ्याचशा वास्तुशास्त्रांपैकी श्री.वर्मा यांचेकडे ते काम दिलेले होते.कारण सदरील कामाचे अंदाजपत्रकापेक्षा वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडे हे काम सोपविलेले होते.त्यांना तेथील मटेरियलचे मोजमाप करुन त्याची किंमत रु. १५,३००/- काढलेली आहे व त्याचा लिलाव पध्दतीने मटेरियल देणार आहोत.

**श्री.जोशी** : वास्तुशास्त्रज्ञ श्री.वर्मा यांच्याकडे मनपाने करार केलेला आहे काय याची माहिती दयावी.

**उ.अ.इमारती** : मनपातर्फे मटेरियल किंमत काढण्याचे काम दिलेले नाही फक्त मनपातर्फे त्याचे मुल्यांकन ठरविणे आवश्यक आहे.याबाबत उपअभियंता व शहर अभियंता यांनी तसे प्रमाणित केलेले आहे.

**श्री.जोशी :** मटेरियलचे मुल्यांकन काढण्यासाठी आपल्या मनपाकडे अभियंता नाहीत काय?

**श्री मिरा सलामी** : तेथील काम तात्काळ करुन घ्यावयाचे आहे तेव्हा तेथील मटेरियलचे मुल्यांकन काम स्थगित ठेवावे.

**श्री.गौतम लांडगे** : संबंधित वास्तु शास्त्रज्ञाने जी मटेरियलची किंमत दाखविलेली आहे त्याबाबत पुन्हा तपासणी करुन ठरवावी.

**उप अ.इमारत** : एम.आर.वर्मा यांन जे मुल्यांकन काढून दिलेले आहे ते १ १/२ टक्क्यांनी काम केलेले आहे.आपल्याकडे कर्मचारी वर्ग अपुरा आहे.त्यांनी काढलेल्या किंमतीची तपासणी आम्ही केलेली आहे.

**श्री.जोशी :** तेथील बांधकामाची संपुर्णपणे मटेरियल (साहित्याची ) यादी सभागृहात दयावी.

**मा.सभापती :** याबाबत अति.शहर अभियंता यांनी पहाणी करून व त्यांचे मुल्यांकन बाबत संपुण्र माहिती पुढील बैठकीत दयावी.

**ठराव :**

पुढील बैठकीपर्यंत प्रस्ताव स्थगित.

**विषय क्र.४०/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.गणेश कॉलनी येथे मनपा प्राथमिक शाळे समोरील जागेची लेव्हलींग व पिगींग करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ५४९/२० दि. ७-१-९७ अन्वये ४,०२,३५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली असुन सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र./मनपा/लेखा/नि/१८/९७ दि. १३-३-९७ अन्वये "बी-१" नमुन्यात निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१९) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि.२६-३-९७ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.ए.सिद्दीकी | १०% | जास्त दराने |
| २) श्री.एस.एच.असोशिएटस | ३% | कमी दराने |
| ३) श्री.बदर बीन सलाम | ०.०२% | --//-- |
| ४) श्री.एस.एम.मंडोरे | ५% | --//-- |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा असून त्यास मा.आयुक्तांनी दि.३१-३-९७ ला मान्यता

दिली आहे.सबब सदर कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निवदा मंजुरीचा प्रस्ताव विचारर्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गणेश कॉलनी येथे मनपा प्राथमिक शाळेसमोरील जागेची लेव्हलींग व पिगींग करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ३% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गुलमंडी रोडवर भोलेश्वर मंदिरा जवळ दुकान केंद्र बांधणेच्या कामासाठी प्रशासकीय ठराव क्र.६२५ दि.२६-१०-९४ अन्वये रक्कम रु.१८,७१,४५०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.तसेच सदरील काम हाती घेण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र.७०१ दि.३-१२-९४ अन्वये श्री.एस.पी.सोधी यांचे ९.२% जास्त दराचे दरास मान्यता प्राप्त झालेली आहे.तसेच संबधितास दि.२९-२-९४ अन्वये कार्यादेशही देण्यात आला होता व संबंधिताने जवळ जवळ ३३% काम पूर्ण केले.कामाचे दर ९४-९५ चे असल्यामुळे आता पुढील काम करण्यास तयार नाही.सदर कामावर ६,७०,०००/- खर्च झाला असून मक्तेदराचे काम आहे त्या स्थितीत देयक देऊन अंतिम करणे व उर्वरित कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन फेरनिविदा मागविणेसाठी मा.आयुक्तांनी आदेशित केल्यानुसार सदर कामाचे मुळ अंदाजपत्रक.

| | |
|---|---|
| मुळ अंदाजपत्रक | १८,७९,४५०/- |
| कामावर झालेला खर्च | ६,७०,०००/- |

उर्वरित रक्कम रु.१२,०९,४५०/- व उर्वरित कामाचे नविन दरसुची ९६-९७ नुसार लागणारी बाकी रक्कम रु.२,४२,५५०/- असे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.१४,५२,०००/- चे होत असुन वाढीव रक्कमेस स्थायी समिती मान्यता घ्यावी या अटीवर दि.३०-४-९७ अन्वये मा.आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे.

सबब सदर कामाचे झालेले काम आहे त्या स्थितीत बी-१ निविदाच्या अटी व नियमानुसार अंतिम करणे व उर्वरीत कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.१४,५२,०००/- (वाढीव रक्कम रु.२,४२,५५०/-) सह मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च सन ९७-९८ या वर्षी व्यापारी संकुल व इतर या लेखा शिर्षकातून व दुकानाची जमा होणारी अनामत रक्कमेतुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलमंडी रोडवर भोलेश्वर

**विषय क्र.४२/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मुख्य जलनिःसारण वाहिन्याचे उर्वरित काम करणे व उप जलनिःसारण वाहिन्या मुख्य जलनिःसारण वाहीन्यास जोडणे बाबत अंदाज पत्रक रु. १४,२५,०००/- यास विषय क्र. १४८/५ दि. २०-११-९६ द्वारे मान्यता मिळाल्यानंतर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण नऊ निविदा विक्री झाल्या होत्या.त्यापैकी चार निविदा प्राप्त झाल्या असून खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

१) राणा कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ८ % जास्त

२) खर्डीकर कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दराने
३) नंदकुमार घोडेले अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७ % जास्त
४) कुलवंतसिंग अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त

वरील दर पाहता तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराची खर्डीकर कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुख्य जलनिःसारण वाहिन्याचे उर्वरीत काम करणे उप जलनिःसारण वाहिन्या मुख्य जलवाहिन्यास जोडणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दराची मे.खर्डीकर कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी येथील सर्व्हे नं.३७ मधील मंजुर रेखांकनामध्ये १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी रक्कम रु. ३,२२,८६०/- एवढयाचे तयार करण्सात येवून त्यास स्थायी समिती ठराव क्र. ५९५/६ दि. २९-१-९७ अन्वये मान्यता देण्यात आली.

कार्यालयाचा निविदा सुचना क्र. १४/९६-९७ जी की,दै.वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण अकरा (११) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण सहा (६) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) एस.एच.असोशिएटस | ७% | जास्त |
| २) सलिम पटेल | १३.३५% | कमी |
| ३) सुरेश साध्वाणी | १६% | --//-- |
| ४) व्ही.आर.महाजन | १९.१% | --//-- |
| ५) साई कन्स्ट्रक्शन | ८.८८% | --//-- |
| ६) धनेश ए.दौलतानी | २१.५५% | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री.धनेश ए.दौलतानी यांचा आहे म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५५% कमी असा दर आहे.

तरी श्री.धनेश ए.दौलतानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५५% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी येथील सं.न.३७ मधील मंजुर रेखांकनामध्ये १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अ.प. दरापेक्षा २१.५५% कमी दराची श्री.धनेश ए.दौलतानी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र.१,२,३ अंतर्गत रोडचे पॅचवर्क करणे या कामासाठी पॅचवर्क मटेरीयलचा पुरवठा करणे या कामासाठी ातयार

करण्यात आलेल्या रक्कम रु.४,९४,६२०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.५५२/२३ दि.७-१-९७ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीचया अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन (३) निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाले.प्राप्त निविदापत्रके दि.२०-२-९७ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १७.८८% | जास्त दराने |
| २) मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २१% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८८% जास्त दराने मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर आहेत.

सदरील दर जास्त वाटत असल्यामुळे त्यांना वाटाघाटीस बोलावले असता त्यांना सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करणे बाबत आपली संमती दर्शविली आहे.तरी सदरील काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभाग क्र.१,२,३ अंतर्गत रोडचे पॅचवर्क करण्याच्या कामाकरीता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेस्तव प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराने निविदा धारक मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे सदर काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## -:पुरवणी विषय :-

**विषय क्र.४५/८ :**

सिडको एन-१ भागात पी.व्ही.सी.पाईप लाईन बदलुन नविन जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. २१,८६,७६७/- ला सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. १४९/६ दि. १९-१२-९६ अन्वये मंजुरी मिळाली आहे.त्या अनुषंगाने वर्तमानपत्रातुन निविदा मागविल्याअसता विक्रीच्या अतिम तारखेपर्यंत एकूण ११ निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ (तीन) निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) एस.ए.असोशिएटस | ६% | जास्त दराने |
| २) श्री.बी.ए.काल्डा | ५% | --//-- |
| ३) श्री.नंदकुमार घोडेले | ४.११% | --//-- |

उपरोक्त प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.११% जास्त दराने श्री.नंदकुमार घोडेले यांची आहे.सदर कामाचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले होते.चालु वर्षाच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार सदर कामाचे अंदाजपत्रक रु. २६,०९,६१७/- होते म्हणजे चालु वर्षाच्या दरसुचीनुसार १६.९१% कमी दर येतात.

तरी श्री.नंदकुमार घोडेले यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ४.११% जास्त दराने स्विकृतीस्तव प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-१ भागात पी.व्ही.सी.पाईपलाईन बदलुन नविन जलनि:सारण वाहिनी टाकणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ४.११% जास्त दराची श्री. नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.घाटी,जयभिमनगर स्लम येथे गुलाबवाडी परिसरात आदर्श झोपडपट्टी योजने अंतर्गत प्रत्येक घराकरीता कमी खर्चाचे स्वतंत्र शौचालय बांधणे बाबत कामाकरीता सा.बा.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ८,५४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम "आदर्श झ ोपडपट्टी" या शिर्षकातून करण्यात येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१९-२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण पांच निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदार व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले.

| | | |
|---|---|---|
| १) एलोरा कन्स्ट्रक्शन | १४% | जास्त |
| २) सिद्दीकी एस.झेड. | १७.५०% | जास्त |
| ३) अंसरी कन्स्ट्रक्शन | २०% | --//-- |
| ४) ए.एम.फारुकी | २५% | --//-- |
| ५) महंमद सलीम | २७ % | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४% जास्त दराची निविदा श्री.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची आहे. परंतु हे दर कार्यालयास जास्त वाटल्याने दराची वाटाघाटी करीता ठेकेदारास बोलावले असता मा.आयुक्त यांच्या दालनात ठेकेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराने करण्यास लेखी संमती दिली आहे.करीता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराची असलेली श्री.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे मो.घाटी, जयभिमनगर स्लम येथे गुलाबवाडी परिसरात आदर्श झोपडपट्टी योजने अंतर्गत प्रत्येक घराकरीता कमी खर्चाचे स्वतंत्र शौचालय बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ७% जास्त दराची मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४७/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,किराडपुरा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.५,३६,८६६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च रस्ते दुरुस्ती पुर्नडांबरीकरण सन ९६-९७ स्थित ओव्हर मधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.डी.अजितसिंग ४.५% जास्त दराने
२) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन ५.००% --//--

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त दराने श्री.डी.अजितसिंग यांची निविदा आहे. परंतु सदर दर जास्त वाटत असल्यामुळे सदर ठेकेदारास वाटाघाटीस बोलावले असता वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराने निविदा मंजुर झाली आहे.त्यास संबंधित ठेकेदराने संमती दर्शविली आहे.

तरी सदरील काम श्री.डी.अजितसिंग यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, खोकडपुरा भागातील रस्त्यांचे डांबरीकरणे करणेच्या कामाकरीता प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे दरपत्रकधारक डी.अजितसिंग यांच्याशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे सदर काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८/११ :**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या अस्थापनेवर विभागीय अधिकारी (७) पदे सहाय्यक आयुक्त (२) पदे लेखाधिकारी (२ पदे) मालमत्ता अधिकारी,प्रशासकीय अधिकारी, पशुधनविकास अधिकारी,उद्यान अधिक्षक,जकात अधिक्षक ही एकूण १६ पदे २००० ते ३५०० या वेतनश्रेणीत असून महापालिकेच्या अस्थापनेपासून या पदाच्या वेतनश्रेणी कोठल्याही प्रकारची वाढ करण्यांत आलेली नाही. तसेच स्वीय सहाय्यक हे पद २३७५-३५०० या वेतनश्रेणीत असुन या पदास पदोन्नती चैनल नाही.महापालिकेमध्ये या पदाचे समतुल्य वेतनश्रेणीत उप अभियंता व वैद्यकीय अधिकारी यांना २२०० ते ४००० वेतनश्रेणी देण्याचे ठराव यापुर्वीच मंजुर करण्यांत आलेले आहे. महानगरपालिकेचा वाढता व्याप व वाढते कार्यक्षेत्र लक्षात घेता प्रस्तावित पदाच्या कामाच्या जबाबदाऱ्या मोठया प्रमाणात वाढलेल्या आहे ते शासनाने जवाबदाऱ्या वाढ व कामाचे स्वरुप लक्षात घेवून तहसिलदार,उपअभियंता,वैद्यकीय अधिकारी यांना वाढीमुळे महानगरपाकलकेवर वार्षीक रु. ४० हजाराचा आर्थिक बोजा पडेल. त्यामुळे वाढीव वेतनश्रेणी रु. २२०० ते ३७०० लागु करण्यास हरकत नसावी.

महानगरपालिकेमध्ये लेखाधिकारी संवर्गात पदे असून लेखा विभागास त्या संवर्गातून विभाग प्रमुख नाहीत. लेखाधिकारी यांना संपुर्ण अंदाजपत्रक तयार करणे व त्यानुसार लेखी ठेवून त्याची अंमलबजवणी करण्याचे महत्वाचे काम करावे लागते.महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेमध्ये लेखा विभागाकरीता मुख्य लेखा अधिकारी पदनामाचे विभाग प्रमुख आहेत.त्या धर्तीवर महानगरपालिकेमध्ये दोन लेखाधिकारी पदांपैकी एका पदाची श्रेणीवाढ रु. २२०० ते ४००० वरुन मुख्य लेखाधिकारी पदनाम देणे योग्य.त्यामुळे महानगरपालिकेवर कोठल्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही.करीता प्रस्तावित नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (२) व ५१ (४) अन्वये विचारार्थ व मान्यतेस्तव प्रस्ताव सादर

**संवाद :**

**मीरा सलामी** : उद्यान अधिक्षक व पशुधन विकास अधिकारी यांना कोणत्या प्रकारचे पदोन्नतीचे चॅनेल नाही त्यांची वेतनश्रेणी वाढवुन दुरुस्ती करावी.

**सहा.आयुक्त-१** : वेतनश्रेणी रु.२२०० ४००० मध्ये १ पद व वेतनश्रेणी रु. २२०० ते ३७०० मध्ये १६ पदे येतात.

**मा.आयुक्त :** प्रशासनामार्फत सदरील प्रस्ताव मंजुरीस्तव पाठविण्यात येईल.

**श्री.विकास जैन** : प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.सभापती :** प्रस्ताव स्विकृतीसह मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दशविल्याप्रमाणे, मनपाच्या अस्थापनेवर (१) विभागीय अधिकारी (७पदे),(२) सहा-आयुक्त (२ पदे),(३) लेखाधिकारी (२पदे),(४) मालमत्ता अधिकारी,प्रशासकीय अधिकारी,पशुधन विकास अधिकारी,उद्यान अधिक्षक,जकात अधिक्षक ही एकूण (१६) पदे मनपाच्या अस्थापनेपासून वेतनश्रेणी २०००-३५०० या वेतनश्रेणी आहेत.शिवाय स्विय सहा.हे पद २३७५-३५०० या वेतनश्रेणीत असून यांना पदोन्नतीचे चॅनेल नाही मनपाचा वाढता व्याप व कार्यक्षेत्र लक्षात घेता कामाचे स्वरुप लक्षात घेऊन सदरील पदाची वेतन श्रेणी रु.२२०० ते ३७०० ला करण्यास व महानगरपालिकेमध्ये लेक्षा विभागाकरीता मुख्य लेखा अधिकारी स्विकृतीसह पदापैकी एका पदाची श्रेणीवाढ रु. २२०० ते ४००० करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९/१२ :**

अति.शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की,बीड जकात नाका व अजिंठा जकात नाका येथे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९६-९७ चे सा.बा.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु. १५१५३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्या मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१५१५३०/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीड जकात नाका व अजिंठा जकात नाका येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,५१,५३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समतानगर येथील पोलीस वर्कशॉप ते मुक्ती सोपान समर्थनगर पर्यंत ९०० मी.मी.व्यासाचे समतानगर मधुन वाहणाऱ्या नाल्याचा प्रवाह बदलणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रु.६,०२,५००/- यास सर्व साधारण सभेमध्ये विषय क्र.१५२/२ दि.२०-११-९६ द्वारे मान्यता मिळाली होती व त्या नंतर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण नऊ निविदा विक्री झाल्या होत्या.त्यापैकी पाच निविदा प्राप्त झाल्या असुन खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

१) श्री.कुलवंतसिंग - अ.प.दरापेक्षा ११.४५% जास्त

| | | | |
|---|---|---|---|
| २) श्री.नंदकुमार घोडेले | - --//-- | ९.५५% | --//-- |
| ३) श्री.औरंगाबाद कन्स्ट्रक्शन | - --//-- | १०% | --//-- |
| ४) श्री.सलीम पटेल | - --//-- | ८.१०% | --//-- |
| ५) श्री.एस.एच.असोशिएटस | - --//-- | ८.९९% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.१०% जास्त दराची श्री.सलीम पटेल यांची निविदा आहे. परंतु जास्त दर असल्यामुळे दराच्या वाटाघाटीस्तव बोलावले असता अंदाजपत्रकाच्या दराने संबंधिताने काम करण्याची तयार दर्शविली आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.समता नगर येथील पोलीस वर्क्स शॉप ते मुक्ती सोपान समर्थनगर पर्यंत ९०० मी.मी.व्यासाचे समतानगर मधुन वाहणाऱ्या नाल्याचा प्रवाह बदलण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा ८.१०% जास्त दराऐवजी वाटाघाटी अंती ठरल्यानुसार अंदाजपत्रकीय दराची श्री.सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,झोन क्र.२ मधील दलालवाडी बारुदगरनाला व इतर नाल्याची पावसाळयापुर्वी नाला सफाई करणे आवश्यक आहे.कारण नाल्यावर इमारती बांधल्या असून त्याच्याखाली अडथळा निर्माण होऊन पावसाचे पाणी आडले जाते व त्यामुळे नागरिकांच्या घरांना ( जी नाल्याच्या काठावर आहे) धोका निर्माण होतो.या दृष्टीने उपाय योजना म्हणून नाल्यातील गाळ काढणे यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १,२९,४०५/- चे दर पत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. २ मधील दलालवाडी,बारुदगरनाला व इतर नाल्याची पावसाळयापुर्वी नाला सफाई करणेच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून नाल्यातील गाळ काढण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,२९,४०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२/१५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र.३ अंतर्गत मो.मोतीवालानगर ते चुना भट्टी लाकडी पुलापर्यंत नाला साफ करणे व गाळ काढणे करीता अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,६४,२००/- चे तयार करण्यांत आले असून सदरील काम लेखाशिर्षक गाजर गवत निर्मुलन व नाला सफाई या मधुन प्रस्तावित केले आहे.

सदरील अंदाजपत्रक रक्कम रु. १,६४,२००/- ला मा.आयुक्तांनी दि. १५-५-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. ३ अंतर्गत मोतीवालानगर ते चुना पट्टी लाकडीपुला पर्यंत नाला साफ करणे व गाळ काढणे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,६४,२००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च लेखाशिर्षा गाजर गवत निर्मुलन व नाला सफाई यामधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,पद्मपुरा येथे ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.जलनि:सारण वाहीनी टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.४,९७,०००/- यास स्थायी समिती मध्ये विषय क्र.६८६/१४ दि. ४-३-९७ द्वारे मान्यता मिळाल्यावर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण तेरा निविदा विक्री झाल्या होत्या त्यापैकी तीन निविदा प्राप्त झाल्या असुन खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री.राणा कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा | १% | जास्त |
| २) श्री.एस.जी.पठाण | --//-- | ६% | --//-- |
| ३) श्री.औरंगाबाद कन्स्ट्रक्शन | --//-- | ५% | --//-- |

वरील दर पाहता तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचया दरापेक्षा १% जास्त दराची निविदा राणा कन्स्ट्रक्शन यांची आहे.मा.आयुक्त यांनी संबंधित काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मान्यता दिली असून राणा कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकाचे संबंधित काम करण्यास लेखी संमती दिली आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पद्मपुरा येथे ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.जलनि:सारण वाहीनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी ठरल्यानुसार सदर काम मे.राणा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये अेक जनरेटर सेट (३० केव्हीट) (५० केव्हिट) बसविणेसाठी कोटेशन मागविणेसाठी संबंधित प्रसिध्द कंपनीस व अधिकृत विक्रेत्यास पत्र देवून दर पत्रके मागविण्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानुसार पत्र देवून दर पत्रके मागविण्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानुसार दरपत्रके मागविण्यात आली असता खालील एजन्सीचे दरपत्रके प्राप्त झालीत.

| | | |
|---|---|---|
| १) मे.भारत इंजिनिअरिंग | ३० केविट | ५० केविट |
| | ३९,९०००/- | ५२,००००/- |
| २) मे.शांतीदेव इंटरप्रायजेस | ३९,३०००/- | ५१,६०००/- |
| ३) मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | ३८,३०००/- | ५०,६०००/- |

वरील प्राप्त तुलनात्मक तक्त्यानुसार मे.आदित्य इलेक्ट्रीकल यांचे दर सर्वात कमीचे असुन त्यांचे कडून ३० केविट चा जनरेटर सेट रु. ३८,३०००/- दराने बसविण्यासाठी मा.आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

तरी मे.आदित्या इलेक्ट्रीकल्स हयांचे कडुन ३० केविट वा जनरेटर सेट रु.३,८३,०००/- एव्हढे किंमतीत बसविण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये ३० केव्हीटचा जनरेटर सेट बसविण्याकरीता प्राप्त झालेल्या दरपत्रकापैंकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच रक्कम रु. ३,८३,०००/- च्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,आर.टी.ओ.ऑफीसच्या पाठीमागील बाजूस रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावण्याचे अंदाजपत्र रु.३,६०,०००/- चे ९६-९७ च्या दरसुची नुसार तयार केले आहे.तरी अंदाजपत्रकीय प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आर.टी.ओ.ऑफीसच्या पाठीमागील बाजुस रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६/१९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,वेदांत नगर येथील मुख्यरस्ता आयटी आय ते एम.आय.डी.सी.या रोडवर सोडीयम व्हेपर लावण्याचे अंदाजपत्रक सा.बा.विभागाच्या ९६-९७ च्या दरसुची नुसार रु.४,६०,०००/- चे तयार केले आहे.तरी अंदाजपत्रकीय प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर येथील मुख्य रस्ता आय.टी.आय.ते एम.आय.डी.सी.रोडवर सोडीयम व्हेपर लावण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
मा.नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ६-६-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. दि. ६-६-९७ (शुक्रवार) रोजी दुपारी ३.०० स्थायी समिती सभेची सुरुवात मा.श्री.प्रभाकर विधाते,सभापती स्थायी समिती यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गीताने झाली.निम्ननिर्दिष्ट सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) श्री.गिरजाराम हाळनोर | सदस्य |
| २) श्री.सुभाष टाकळकर | --//-- |
| ३) श्री.कचरु नवपुते | --//-- |
| ४) श्री.विकास जैन | --//-- |
| ५) श्री.भगवान घडामोडे | --//-- |
| ६) श्री.रशिदखाँन (मामू) | --//-- |
| ७) श्री.स.अ.रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| ८) श्री.स.अली मिरा सलामी | --//-- |
| ९) श्री.जोशी संजय रामदास | --//-- |
| १०)श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| ११) सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १२) श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| १३) श्री.जयवंत केशवराव ओक | --//-- |

**संवाद :**

**श्री.जयवंत ओक:** शहरात स्मशानभूमी चांगल्या व स्वच्छ जागेवर असावी व जेणकरुन नागरीकांना त्रास होणार नाही ही जी समस्या आहे ती तशीच आहे यासाठी काही तरतुद करु शकतो का नाही.

**मा.सभापती** : याबाबत अधिकाऱ्यांनी माहिती दयावी.

**शहर अभियंता** : पुढच्या बैठकीत माहिती सादर करण्यात येईल.

**श्री.जयवंत ओक** : शहराच्या पाणी पुरवठा हा कधी-कधी कमी प्रमाणात होतो तर कधी कधी पाणी येत नाही. माझ्याच वार्डात नाही तर आणखी बऱ्याचशा वार्डात पाणी पुरवठा या दोन तीन दिवसांत सुरळीत नाही. औरंगपुरा खडकेश्वर या ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत झाली नाही. याकडे आपले पाणी विभागाचे अधिकाऱ्यांनी लक्ष दयावे.

**मा.सभापती** : याबाबतीत पाणी पुरवठा विभागाचे दक्षता घ्यावी.

**कार्यकारी अभियंता (पापू)** : मागील सहा दिवसांपासून लाईनचे काम चालू होते त्यामुळे काही भागात पाणी पुरवठा सुरळीत झालेला नाही.लाईन मधील काम पूर्ण झाल्यावर पाणी पुरवठा सुरळीत होईल.

**श्री.जयवंत ओक :** माझे असे मत आहे की, पाणी पुरवठा विभागातील पाणी सोडणारे कर्मचारी कमी आहेत व काही वेळा कमी दाबाने पाणी येते. आपण नागरीकांकडून पाणी पट्टी वेळेवर घेतो. त्यांनी वेळेवर न भरल्यास आपण नोटीस देतो नागरिकांची गैरसोय होणार नाही. याकडे पाणी पुरवठा विभागाचे अधिकाऱ्यांनी लक्ष दयावे.काही काही ठिकाणी २४ तास पाणी दिसून येते व काही ठिकाणी अजिबात नाही,असे का?

**मा.सभापती :** या शहरातील जवळपास ७ ते ८ हजार नळ कनेक्शन खाली दाबामध्ये येतात.त्यामुळे शहरात पाणी पुरवठा वेळेवर होण्यास मदत होत नाही.

**श्री.स.अली मिरा सलामी :** शहरात पाणी पुरवठा कमी दाबाने होतो आहे पाणी नाही म्हणून नागरीक पाणीपट्टी भरण्याची तयारी ठेवत नाहीत.तर शहरात पाणी पुरवठा घेण्यासाठी शहरात विहिरी आहेत त्या साफ कराव्यात.त्यातील पाणी खराब आहे.त्यात पावडर टाकून नागरीकांनी पाणी उपयोगात आणता येईल अशी व्यवस्था करावी.

**मा.सभापती :** पाणी कशामुळे खराब आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी** : शहरात पाण्याची व ड्रेनेजची लाईन एकत्र वाहते.त्यामुळे हे वाहणारे पाण्यामुळे पिण्याचे पाणी खराब होते.

**कार्यकारी अभियंता :** बऱ्याचशा भागातील विहिरीत मनपातर्फे साफ करुन औषधे व पावडर टाकून नागरिकांना पाणी उपयोगात आणता येईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे.त्याही पलिकडे आणखी काही विहीरी असल्यास तशा सुचना कराव्या.

**मा.सभापती :** शहरात पाणी पुरवठा चांगल्या प्रकारे घेण्यासाठी त्यांनी पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता यांचेशी संपर्क साधावा.ज्या भागात पाणी पुरवठा व्यवस्थीत नाही त्याबाबत संबंधित अधिकारी तात्काळ कार्यवाही करतील.

**श्री.जयवंत ओक** : शहरातील पाण्याची पूर्ण लाईन चालू झाली पाहिजे .अंबा,अप्सरा टॉकीज जवळील पाणी पुर्णपणे बंद आहे.याकडे कार्यकारी अभियंता यांनी लक्ष दिले पाहिजे.

**मा.सभापती** : याबाबत पाणी पुरवठा विभागाचे अधिकाऱ्यांनी सर्व माहिती पुढच्या बैठकीत ठेवावी.

**सौ.यशोदा वाडेकर** : माझ्याही वार्डात उन्हाळयात पाणी आले नाही.वार्डातील नागरिकांना खुप त्रास होत आहे मागील बैठकीपासून मी सतत सुचना करीत आहे.तेव्हा योग्य ती कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती** : तात्काळ कार्यवाही व्हावी.

**कार्यकारी अभियंता (पापू) :** शहरात पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी मला सुचना आहेत पाणी पुरवठयामध्ये ५०० कर्मचारी काम करतात.मा.आयुक्त साहेब आल्यानंतर ४० कर्मचारी नेकणूक करण्यांत येईल.

**मा.उप आयुक्त** : शहरात पाणी पुरवठयाबाबत लवकर कार्यवाही होत आहे.नागरिकांच्या समस्या सुटण्यास लवकरच मदत होईल.

**श्री.स.अली मिरा सलामी** : उपोषणास बसलेल्या दैनिक वेतन कर्मचाऱ्यांची मागणीवर प्रशासनाने विचार करावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : शहरात स्वच्छता मोहीम फार मोठया प्रमाणोत हाती घेतलेली आहे.आपण १५ ऑगस्ट पासून दंडात्मक कार्यवाही सुरु करणार आहोत.त्यासाठी प्रत्येक ठिकाणी कचरा कुंडी ठेवणेसाठी आपण काही कार्यवाही केली आहे काय? खुलासा व्हावा.

**मा.उप आयुक्त** : शहरात एकत्रित प्रत्येक ठिकाणी कचरा टाकण्यासाठी कचरा कुंडयांची गरज आहे.त्यासाठी १५ दिवसांपुर्वी टेन्डर मागविले होते.त्यावर पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे आपण परत टेन्डर मागवित आहोत.साधारण २००० कचरा कुंडया खरेदी करण्याचा मानस आहे.

**मा.सभापती :** सन्माननीय नगरसेवकांनी आपआपल्या वार्डातून योग्य त्या ठिकाणी रिकाम्या जागा कुंडया ठेवण्याकरीता दाखविण्यास मदत करावी.

**श्री.विकास जैन** :माझ्या वार्डात ज्या कचरा कुंडया अस्तित्वात आहेत त्या वेळेवर साफ होत नाहीत.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : प्रशासनामार्फत कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र चालु आहे.त्यात बऱ्याच कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला दिसून येत आहे.कर्मचारी,बदलीचे ठिकाण,पात्रता इत्यादी तपासून बदली करण्यांत यावी.

**श्री.अ.रशिदखान (मामू)** : प्रशासनाच्या कामात आमची स. नगरसेवकांची कुणाचीही मध्यस्थी करण्याची इच्छा नाही.परंतु प्रशासनानेच योग्य पाऊल उचलावे.

**श्री.स.अली मिरा सलामी** : मा.सभापती साहेब सध्या सूरत पॅटर्न स्वच्छता मोहिम चालू आहे.माझ्या वॉर्डात डांबरीकरणाचा प्रश्न कधी सुटणार?स्वच्छता मोहिमे अंतर्गत माझ्या वार्डात स्वच्छता चांगली होत नाही.

**मा.उप आयुक्त** : मा.आयुक्त साहेब रजेवर असल्यामुळे काही समस्या सोडविण्यात अडचण निर्माण झाली.मला अधिकार प्राप्त झाल्यानंतर बऱ्याचशा संचिका हातावेगळया केल्या आहेत.आता लवकरच नविन कामाला सुरुवात होईल.

**श्री.स.अली मिरा सलामी** : विद्युत विभागाच्या संचिका पडून आहेत. त्याचे काय झाले?

**मा.आयुक्त :** संचिका तपासणी चालू आहे.

**श्री.गौतम लांडगे :** मा.माजी आयुक्त श्री.भोगे साहेब यांनी माझ्या वार्डाच्या कामासाठी स्वेच्छा निधी मंजुर केला होता ती संचिका तशीच पडून आहे का?

**श्री.संजय जोशी** : मा.सभागृह नेता श्री.सुदाम सोनवणे यांनी नाक्यावर भ्रष्टाचाराबाबत प्रश्न विचारला होता त्याचे काय झाले?

**मा.उप आयुक्त** : स.सभागृह नेता श्री.सुदाम सोनवणे यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांना पाठविली आहेत. या भ्रष्टाचाराबाबत कर्मचारी श्री.संजय न्यायाधीश व साजेद यांच्यावर आरोप पत्र दाखल केलेले आहेत.पोलीस केस करण्याचा प्रशासनाचा विचार आहे.

**श्री.संजय जोशी** : चेक नं.३९६९ फिनेक्स कं.बॉंबे या चेकद्वारे १९७५ साली रु. १,९६,३२२/- दर्शविला आहे.परंतु सदरील रक्कम रु. कॅश घेऊन चेक फक्त नावाला जमा केला.प्रत्यक्षात कॅश जमा नाही केली.हा काय घोटाळा आहे सभागृहापुढे सविस्तर मांडावा.

**मा.सभापती :** हे प्रकरण गंभीर स्वरुपाचे आहे.प्रशासनाने पुढच्या मीटींगमध्ये सविस्तर मांडावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : प्रशासनामुळे १६ अधिकाऱ्यांना बदल्या करु नयेत असे अर्ज दिले आहेत.हे बरे आहे काय?

**श्री.संजय जोशी** : आणखी आपल्याकडे कोणी कोणी अर्ज दिला आहे?

**मा.उप आयुक्त** : प्राप्त झालेले सर्व अर्ज मा.आयुक्ताकडे विचारार्थ पाठविण्यात येतील.निर्णय शेवटी मा.आयुक्तांचा राहील.

**श्री.संजय जोशी** :अग्निशमन दलाच्या गाडीमध्ये फर्स्ट एड बॉक्स असावेत एखादया ठिकाणी धोका होण्याचा संभव असतो.त्या वेळी ते उपयोगी पडू शकतात.अग्निशमन दलास प्रत्येक ठिकाणी पाणी भरण्याची व्यवस्था नाही.त्या ठिकाणी डायरेक्ट पाईप फिटींग करुन दयावे,म्हणजे आगीचया ठिकाणी जलद पोहोचणे सोयीस्कर होईल.

**मा.सभापती :** अग्निशमन अधिकाऱ्यांना ज्या वस्तुंची कमी आहे त्याबाबत मा.आयुक्तांकडे मागणी करुन प्रशासनामार्फत प्रस्ताव स्थायी समितीस सादर करावा.

**अग्निशमन अधिकारी** : या विभागात कर्मचारी वर्ग कमी आहे.त्याबाबत पाठपुरावा करणे चालु आहे.

**मा.सभापती** : ठिक आहे.विषय क्र. एक वर चर्चा करावी.

**विषय क्र.५७/१:**

दिनांक २९-४-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.गिरिजाराम हाळनोर** : कारखान्यातील अमोनिया वायुमुळे शेजारील वस्तीस धोका निर्माण होतो असे कारखाने वस्तीपासुन दूर बसवावे.

**मा.सभापती :** आरोग्य अधिकारी रजेवर आहेत.हे प्रकरण मागच्या महिन्यात निकामी काढणार होते.

**श्री.विकास जैन** : विद्युत अभियंता यांना ऑफिशियल कामासाठी गाडी देण्यांत यावी.एखादे वेळेस कधी कधी रिक्षात जाऊन अधिकाऱ्याला ऑफीसची कामे करावी लागतात.

**मा.उप आयुक्त** : आपण जिप दिलेल्या आहेत तर काही विभागास गाडया देता येत नाहीत.

**श्री.जयवंत ओक** : त्यांना गाडी न देता गाडी घेण्यासाठी कर्ज मंजुर करुन दयावे

**मा.सभापती** : ठिक आहे.

**श्री.गौतम लांडगे** : त्याचप्रमाणे लेखाधिकारी-२ यांनाही जकात बाबत तपासणी कमी वेळोवेळी कार्यालयाबाहेर जावे लागते. तेव्हा त्यांना सुध्दा एक मारुती कार कर्जाद्वारे देण्याबाबत मंजुरी दयावी.

**मा.सभापती :** मनपातील उप अभियंता (विद्युत) श्री.परमेश्वर बनसोडे व लेखाधिकारी-२ श्री.संजय पवार यांना कार्यालयातर्फे एक-एक मारुती कार लोनद्वारे मंजूर करावे.

**ठराव :**

१) चर्चेअंती असे ठरले की, विद्युत उप अभियंता श्री.परमेश्वर बनसोडे लेखाधिकारी-२ श्री.संजय पवार यांना कार्यालयीन कामासाठी एक एक मारुती कार कार्यालयातर्फे "रु. २० लाख कर्मचाऱ्यांच्या वाहन खरेदी" तील तरतुदीमधून खरेदी करुन देण्यासाठी कर्ज मंजूर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्यांचे नावे लोन मंजुर करुन सदरची रक्कम पगारातून नियमाप्रमाणे कपात करावी.

२) दि.१६-५-९७ च्या बैठकीतील विषय क्र. १ मध्ये चौरसनगर स्लम भागातील डांबरी रस्ते तयार करण्याच्या कामास स्थगिती देण्यात आली होती.सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. हे काम श्री.डी.अजितसिंग यांचे कडून अ.प. दराने करुन घेण्यांत यावे.

३) या व इतर दुरुस्तीसह दि. २९-४-९७ च्या बैठकीचे इवितवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**मा.उप आयुक्त** : सहाय्यक स्वच्छता निरिक्षकांची पदे मंजूर नाहीत तरी आपण तात्पुरती पदे भरण्याचा प्रस्ताव मंजुर केल्यास सेवानियोजन कार्यालयाकडून स्वच्छता निरिक्षक

**श्री.स.अली मिरा सलामी** : जिल्हा परिषद नियुक्त कर्मचारी एम.पी.डब्ल्यू हे काम करतात.आपण नविन पद निर्माण कसे काय करता? आपल्याकडे आरोग्य विभागात जे एम.पी.डब्ल्यु आहेत.त्यांचेकडून काम करुन घ्यावे.

**श्री.कचरु नवपुते** : शासनाची नोकर भरतीसाठी मंजूरी नाही.तरी आपण कॉल लेटर का पाठवले?

**उप आयुक्त-१** : २१ सहा.स्वच्छता निरिक्षकांच्या जागा आपण सभागृहाचे मंजुरीने भरणार होतो.

**श्री.अ.रशिदखान (मामू)** :शासनाचे पत्र दाखवा.

**मा.सभापती :** शासनाची मंजुरी घेतल्यानंतर जागा भरण्यात याव्यात.

**विषय क्र.५८/२:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बारी कॉलनी येथे १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलनि:सारण वाहीनी टाकवयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,२६,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यात येणार आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारी कॉलनी येथे १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,२६,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भांडवली कामाची तरतुद मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५९/३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चाणक्यपुरी शहानुरमियाँ दर्गा येथे ४० फुट विकास रस्त्याचे खडीकरण करणे व हयुम पाईप कल्व्हर्ट बांधणेच्या कामाकरीता सन ९६-९७ चे सा.बा.खात्याचे दरसुचीनुसार रक्कम रु. २,७७,९०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.सदर खर्च "भांडवली रस्ते" खडी सन १९९७-९८ साठी असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रु. २,७७,९०३/- च्या अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चाणक्यपुरी शहनुरमियाँ दर्गा येथे येथे ४० फुट विकास रस्त्याचे खडीकरण करणे व हयुम पाईप कल्व्हर्ट बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,७७,९०३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भांडवली रस्ते" सन ९७-९८ च्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०/४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथे मत्स्यालय इमारती करीता संरक्षणासाठी चेन लिंक व टिकीट घर बांधणे साठी सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. १,४२,३८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी दि. ९-४-९७ रोजी मान्यता दिली आहे. करीता सदर कामाचे रु. १,४२,३८०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथे मत्स्यालय इमारती करीता संरक्षणासाठी चेन लिंक व टिकीट घर बांधणे साठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,४२,३८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६१/५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,दिल्ली गेट येथील मनपा निवासस्थान परिसरात वर्ग-१ अधिकारी यांनी निवासस्थान बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ५९९/२० दि. २९-१-९७ अन्वये रक्कम रु. ४,९०,०००/- अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/१७/९७ दि. ४-३-९७ अन्वये बी-१ निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंतच्या एकूण दहा निविदा विक्री झाल्या व निविदा विक्रीच्या तारखेपर्यंतच्या एकूण दहा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्याचा तपशील खालीलप्रताणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.काझी नुर मोहियोद्दीन | ८% | जास्त |
| २) श्री.एस.ए.नवाज | ६% | जास्त |
| ३) श्री.एम.एम.फारुकी | ५% | जास्त |
| ४) श्री.कुलवंतसिंग | ७% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जात दराची श्री.फारुकी यांची निविदा असल्याने संबंधितास वाटाघाटीसाठी मा.आयुक्तांचे आदेशाप्रमाणे आयुक्तांचे दालनात बोलाविण्यात आले.दि. ९-५-९७ ला झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम अ.प. दरापेक्षा ५% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यास मक्तेदाराने लेखी सम्मती दर्शविली आहे.करीता रक्कम रु. ४,९०,०००/- अ.प. दराची श्री.फारुकी यांची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिल्ली गेट येथील मनपा निवासस्थान परिसरात वर्ग-१ अधिकारी यांनी निवासस्थान बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.ए.म.फारुकी यांचेशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्यानुसार सदर काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६२/६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, जालनारोड अग्निशमन दल परिसरात उप आयुक्त-१ यांचेसाठी मनपा निवासस्थान बांधणेच्या कामाकरीता स्थायी समिती ठराव क्र. ४९३/२३ दि. २९-११-९६ अन्वये रक्कम रु. ४,८९,८६०/- चे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे.सदर काम हाती घेण्याकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/११/९७ दि. ११-२-९७ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ७ निविदा विक्री झाल्या.निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या.त्या दि.२०-२-९७ ला उघडण्यात आल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.जी.आर.घोडेले | ७% | जास्त |
| २) श्री.एस.ए.असोशिएटस | ७.२१% | जास्त |
| ३) मे.एलोरा कन्स्ट्रक्शन | ७.७८६% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प. दरापेक्षा ७% जास्त दराची श्री.जी.आर.घोडेले यांची निविदा आहे.जास्त दर असल्यामुळे संबंधितास मा.आयुक्तांचे दालनात वाटाघाटीकरीता दि. ९-५-९७ रोजी बोलावून दराबाबत वाटाघाटी केल्या असता सदर काम ७% जास्त दराऐवजी अ.प. दराऐवजी अ.प. दराने करण्यास मक्तेदराने संमती दिली आहे.करीता श्री.घोडेले यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालनारोड अग्निशमन दल परिसरात उप आयुक्त-१ यांचेसाठी मनपा निवासस्थान बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.जी.आर.घोडेले यांचेशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे सदर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६३/७:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,सन ९७-९८ या आर्थिक वर्षासाठी दर महिन्यास लागणारे ड्रेनेज बांबू खरेदीस्तव व त्याचे दर निश्चितीस्तव वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यांत आल्या एकूण दोन निविदा प्राप्त इझाल्या.प्राप्त तुलनात्मकदृष्टया कमी दराच्या निविदा धारकास मा.आयुक्तांनी प्रत्यक्ष बोलावून दराबाबत वाटाघाटी केल्या.वाटाघाटीनुसार अंतिम दर खालील प्रमाणे.

१) ड्रेनेज बांबू - मे.ऑनेस्ट इंटरप्रायझेस - प्राप्त दर रु. ३.९५ प्रति रनिंग मीटर.

वाटाघाटीनुसार अंतिम दर रु.३.९० प्रति रनिंग मीटर

वरील दर रु. ३.९० प्रति रनिग मीटर नुसार एका वर्षासाठी अंदाजे ३६००० रनिंग मीटर बांबू खरेदीस रु. १,४०,४००/- खर्च येईल.प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन ९७-९८ या आर्थिक वर्षासाठी दर महिन्यास लागणारे ड्रेनेज बांबू खरेदी करण्याकरीता निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार रु. ३.९० प्रति रनिंगमीटर दराने मे. ऑनेल्ट इंटरप्रायझेस यांचेकडून खरेदी करण्यास व रक्कम रु. १,४०,४००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६४/८:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,सन ९७-९८ या वर्षासाठी ए.एफ.स्पेशल (डियोडरन्ट स्पे कॉन्सट्रेट) दुर्गंधी नाशक व जंतुनाशक खरेदी करणेस्तव वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येऊन निविदा मागविण्यात आल्या.एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या पैकी मे. आखिल केमिकल यांनी अनामत रक्कम व इतर कागदपत्रके सादर न केल्याने त्यांची निविदा विचारात घेतली नाही.तसेच मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे मते सदरील साहित्य हे जंतुनाशक असलेने त्यास "इंनसेक्टीसाईड्स" च्या परवान्याची गरज नाही.करीता प्राप्त दरात तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असलेल्या निविदाधारकांस दरात वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले.

वाटघाटीपुर्वी दिलेले दर रु. १४०/- प्रति किलो

वाटाघाटीअंती दिलेले दर रु. १२८/- --//--

करीता एकूण १००० किलो ए.एफ.एम.स्पेशल साठी वरील दरानुसार रक्कम रु. १,२८,०००/- खर्च येईल करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९७-९८ या वर्षासाठी ए.एफ.एम.स्पेशल (डियोडरन्ट स्पे कॉन्सट्रेट) दुर्गंधी नाशक खरेदी करण्याकरीता वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.सुहरीद केमिकल्स,मुंबई.यांचेकडून रु. १२८/- प्रति किलो दराने एकूण १००० किलो ए.एफ.एम.खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.१,२८,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६६/१०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.गितानगर नहर अंबरी टाकीसमोर मनपा प्रा.शाळेकरीता नविन खोल्या बांधणेच्या कामासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२/१० दि. २०-७-९६ अन्वये रक्कम रु.५,९७,२१०/- चे अंदाजपत्रकास तसेच स्थायी समिती ठराव क्र.१० दिनांक २९-११-९६ अन्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.०९% कमी दराची श्री.नवाब यांचे निविदेस सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे.दिनांक ६-१-९७ अन्वये कार्यादेशही देण्यांत आला असून मुळ काम जवळ जवळ संपत आलेले असून सदर शाळेत ते विद्यार्थी शिक्षण घेतात ते पाण्याच्या टाकीकडे जावू नये म्हणून कार्यकारी अभियंता पा.पु. यांनी संरक्षणाचे दृष्टीने सदर शाळेस कुंपन भिंत बांधणे बाबत पत्राने कळविले त्यानुसार सदर कुंपन भिंत व इतर अतिरिक्त बाबी ज्या मुळ अंदाजपत्रकामध्ये नाहीत त्यांच्या कामात समावेश केल्यामुळे एकूण वाढीव रक्कम रु.१,९८,२१०/- ची वाढ होत आहे.सुधारीत रक्कम रु. ७,९५,२२०/- ला तसेच वाढीव काम मुळ गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचेकडून मंजुर निविदा दरा (अ.प.दरापेक्षा ४.०९% कमी दराने ) प्रमाणे करुन घेण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च विकास इमारती शाळा,दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.(तसेच वाढीव कामाची मुदत दि. ३०-६-९७ पर्यंत विचारार्थ).

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गितानगर नहर अंबरी टाकी समोर मनपा शाळेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचा मुळ कामात वाढ झाल्याने सुधारीत अ.प. रक्कम रु.७,९५,२२०/- (वाढीव रु.१,९८,२१०/- च्या अंदाजपत्रकास व सादर काम मुळ गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब

यांचेकडून अ.प.दरापेक्षा ४.०९% या मंजुरी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६७/११:**

अति.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहेत की,शहानुरवाडी येथे स.न.१३ मध्ये हयुम पाइ्रप कलव्हर्ट बांधणेच्या कामाचे सन ९६-९७ चे सा.बा. खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु. २,७५,५९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते (खडीकरण) सन ९७-९८ च्या तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,७५,५९०/- चे अंदाजपत्रक मंजरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी स.नं.१३ मध्ये हयुम पाईप कल्हर्ट बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,७५,५९०/- च्या अंदाजपत्रकास तसेच भांडवली रस्ते (खडीकरण) या शिर्षकातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६८/१२:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,सन ९७-९८ या शैक्षणिक वर्षात मनपाच्या शाळेतील १००% विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके खरेदी करुन पुरविण्यांत येणार आहेत.त्यासाठी रु. ४,८३,७३८/- अक्षरी रु.चार लाख त्र्याऐंशी हजार सातशे अडोतीस/- फक्त खर्च येणार आहे.

शासनाकडून इयत्ता १ ली ते २ री च्या विद्यार्थ्यांसाठी रु.५६,०००/- अक्षरी रु.छप्पन्न हजार फक्त अनुदान मंजुर करण्यांत आले आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक परिषद (डी पी ई पी) तर्फे इयत्ता १ली ते ५वी पर्यंतच्या मराठी/उर्दू माध्यमाच्या मुलींना क्रमिक पुस्तके पुरविणार आहेत.

महानगरपालिका तर्फे इयत्ता ३री ते ५वी चे विद्यार्थी (मुले) आणि इयत्ता ६वी आणि ७वी चे विद्यार्थी / विद्यार्थीनी यांना क्रमिक पुस्तके खरेदी करुन दयावयाची असल्याने शिक्षण विभागाच्या क्रमिक पुस्तके व विज्ञान साहित्य या शिर्षका मधील असलेल्या रु. ५,०००००/- लाख तरतुदीमधून शिर्षकामधील असलेल्या रु.४,८३,७३८/- ची क्रमिक पुस्तके महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,औरंगाबाद यांचे कडून रोख स्वरुपात खरेदी करावयाचे आहेत.तरी प्रस्ताव मान्यतेस्तव व स्वाक्षरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वर्ष १९९७-९८ या शैक्षणिक वर्षासाठी मनपाचया शाळेतील १००% विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके प्रदान करण्यासाठी इयत्ता ३री ते ५वी वर्गाचया मुलांसाठी व ६वी आणि ७वी च्या मुलांमुलीसाठी क्रमिक पुस्तके खरेदी करण्याकरीता "क्रमिक पुस्तके व विज्ञान साहित्य"या तरतुदी मधून रु. ४,८३,७३८/- रुपयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६९/१३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,विभाग क्र.(६) मधील सर्व प्रकारच्या मनपा इमारतीची (परिसरासहित) वार्षीक पध्दतीने दुरुस्त्या करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. २७३/५२दि. २१-९-९६ अन्वये रक्कम रु. ५.०० लाखाचे अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाली असून ठराव क्र. ५७५/६ दिनांक ७-१-९७ अन्वये श्री. सय्यद अथर अली यांचे ०.०१% कमी दराचे निविदा मान्यता प्राप्त झालेली असून दि. ८-१-९७ अन्वये संबंधितास कार्यादेशही देण्यांत आला असून विभाग क्र. ६ मधील मनपा इमारतीची दुरुस्तीचे काम हाती घेण्यांत आले असून रक्कम रु. ५,३६,०००/- चे दुरुस्तीचे कामे करुन घेण्यांत आलेली आहे व मा.महापौर यांनी मा.महापौर बंगल्यामधील सर्व साहित्याचे रंगकाम पुन्हा करणे,काही खोल्याचे शेड (रंग) बदलणे,सुरक्षा कॅबीनची दुरुस्ती,शौचालयाची दुरुस्ती,टॉयलेटकडे जाण्यासाठी पाथचे काही फर्निचरची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याबद्दल सुचविले आहे व सदर कामास रक्कम रु.१.०० लाख लक्ष खर्च लागणार आहे म्हणून सुधारीत अंदाजपत्र तयार करण्यांत आले असून सुधारीत अंदाजपत्रकाची एकूण रक्कम ररु. ६,३६,०००/- होत आहे.काम तातडीने करुन घेण्याच्या सुचना असल्यामुळे मुळ मंजुर एजन्सी कडून निविदेतील (पूर्वीच्या) मंजुर दराने वाढीव रक्कम रु.१.०० लाखाचे काम करवून घेणेच्या मान्यतेस्तव तसेच वाढीव लागणारी रक्कम रु. १.०० लक्ष पुर्वी झालेल्या खर्च रक्कम रु. ५,३६,०००/- मिळून सुधारीत अंदाजपत्रक ६,३६,०००/- विचारार्थ सादर (वाढीव कामाची मुदत १५ दिवस विचारार्थ.)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापौर बंगल्यामधील सर्व खोल्यांचे रंगकाम पुन्हा करणे.काही खोल्यांचे शेड (रंग) बदलणे,सुरक्षा केबीनची दुरुस्ती,शौचालयाची दुरुस्ती,टॉयलेटकडे जाण्यासाठी पाथवे,काही फर्निचरची दुरुस्ती करणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या वाढीव रक्कम रु. १.०० लक्ष च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मुळ गुत्तेदार श्री.सय्यद अथर अली यांचेकडून पूर्वीचे मंजुरी दर ०.०१% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७०/१४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की.मो.किराडपूरा वार्ड क्र.२६ येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा.बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ४,५३,८३१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम "डांबरी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.४-१-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.तसेच अंदाजपत्रकास दि. २९-१-९७ रोजी विषय क्र.३ नुसार मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा प्राप्त झाली व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले.

१) आदिनाथ कन्स्ट्रक्शन ६.९९% जास्त

पंरतु हे दर कार्यालयास जास्त वाटल्याने ठेकेदारास दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता मा.आुयक्त यांचे आदेशाप्रमाणे सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास लेखी दिलेली आहें.तरी अंदाजपत्रकीय दराने आलेले श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.किराडपुरा येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती सदर काम श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७१/१५:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,औरंगाबाद महानगरपालिकेने दि. १मे १९९७ पासुन "सुरत पॅटर्न" (स्वच्छ औरंगाबाद मोहीम हाती घेतलेली आहे.सदरील मोहीमेसाठी स्वच्छता साहित्य खरेदी करणे,जनजागृतीसाठी पोस्टर्स/बॅनर्स इ. छपाई करणे तसेच रोजंदारीवर लेबल लावणे,ट्रक /ट्रॅक्टर भाडयाने घेणे इ. सर्व बाबींसाठी खर्च येणार असुन अंदाजपत्रकात सदरील बाबतीत तरतुद करण्यांत आलेली नाही.त्यामुळे लेखाशिर्षाखाली अंदाजपत्रकीय तरतुद करावी लागणार आहे.मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १०१ अनुसार सरकारी कर्ज परतफेड या लेखाशिर्षा अंतर्गत २.५० कोटीची आर्थिक तरतुद करण्यात आलेली असून "सुरत पॅटर्न स्वच्छता मोहीम" हे नविन शिर्ष उघडून त्या शिर्षाखाली २.५० कोटीतून तात्पुरत्या स्वरुपात रु. २५.०० लाखाची तरतुद वळती करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे "सुरत पॅटर्न" स्वच्छ औरंगाबाद मोहीमेसाठी स्वच्छ साहित्य खरेदी करणे जनजागृतीसाठी पोस्टर्स/बॅनर्स स्टीकर्स इ. छपाई करणे,तसेच रोजंदारीवर लेबल लावणे ट्रक/टॅक्टर भाडयाने घणे इ. कामाकरीता "सुरत पॅटर्न स्वच्छता मोहीम" हे नविन शिर्षक उघडून त्या शिर्षाखाली २.५० कोटीतून तात्पुरत्या स्वरुपात रु. २५.०० लाखाची तरतूद वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७२/१६:**

औरंगाबाद शहरातील प्रमुख नाल्यांपैकी मो.बारुदगरनाला येथील श्री.सुराणा यांना दिलेल्या जमिनीस लागून उत्तरेस असलेल्या नाला जमिनीचे क्षेत्रांपैकी सुमारे २५०.०० चौ.मी.क्षेत्र दिर्घ मुदती करीता भाडेपट्टयावर मिळावे म्हणून एवरेस्ट एज्युकेशन सोसायटी यांनी मागणी केलेली आहे.

औरंगाबाद महापालिकेने शहरातील काही नाला जमिनी यापुर्वी काही व्यक्तींनी व सामाजिक संस्थाना बँकांना दिलेल्या आहेत.

महिलांना व बेरोजगार युवकांना प्रशिक्षण देण्याचा संस्थेचा प्रमुख उद्देश पाहता संस्थेस पाहता मागणी केल्याप्रमाणे सदरील नाला जमिन महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटीस शर्तीस पात्र राहुन रु. ५५०/- प्रति चौरस मीटर प्रतिवर्ष या प्रमाणे भाडे आकारून दिर्घमुदतीकरीता भाडे पट्टयावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्व सादर.

प्रस्ताव मंजुरीनंतर जागा प्रदान करावयाचे कार्यवाहीस शासनाची मंजुरी घेण्यासाठी प्रकरण शासनास सादर करण्यात येईल.तसेच प्रत्यक्ष जागा हस्तांतरापुर्वी जागेवर सिमांकन करुन उपलब्धतेनुसार नाला जमिनीचे क्षेत्र संबंधित संस्थेस हस्तांतरीत करण्यांची कार्यवाही करण्यांत येईल.

**संवाद :**

**श्री.संजय जोशी** : सदरचा प्रस्ताव कोणामार्फत आला याची प्रशासनाने माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांची माहिती दयावी.

**सहा.संचालक नगररचना** : सदरील प्रस्ताव मनपातर्फे आलेला नसून या प्रस्तावा संदर्भात शहरातील काही नाला जमिन असतील तर त्याबाबत प्रशासकीय धोरण ठरविणे आवश्यक आहे.त्याशिवाय काहीही करता येणे शक्य नाही.बऱ्याचशा नाला जमिनी बाबत विविध सामाजिक संस्थांना व बँकांना दिलेल्या आहेत.त्यासुध्दा प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुनच दिल्या जातात. सदरील प्रस्ताव या विभागामार्फत आलेला नसून प्रस्ताव मंजुर केल्यास शासनाकडे पाठविण्यात येईल.

**श्री.हाळनोर गिरजाराम** : सदरील प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठवावा व शासनाच्या मंजुरीनुसारच पुढील कार्यवाही करावी.

**श्री.संजय जोशी** : सदरचा आलेला प्रस्ताव योग्य नसून या प्रस्तावातील प्रस्ताव मंजुरीस्तव प्रदान करावयाची कार्यवाहीस शासनाची मंजुरी घेण्यासाठी प्रकरण शासनास सादर करण्यात येईल.

तसेच प्रत्यक्ष जागा हस्तांतरापुर्वी जागेवर सिमांकन करुन उपस्थतेनुसार नाला जमिनीचे क्षेत्र संबंधित संस्थेस हस्तांतरीत करण्यांत येईल हे वाक्य प्रस्तावापासून वगळण्यात यावे.

**मा.सभापती :** ठिक आहे.सदरचे वाक्य वगळून प्रस्ताव मंजूर करुन शासनाकडे पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील मो.बारुदगरनाला येथील श्री.सुराणा यांना दिलेला जमिनीस लागून उत्तरेस असलेला नाला जमिनीचे क्षेत्रापैकी सुमारे २५०.०० चौ.कि.क्षेत्र दिर्घमुदती करीता भाडेपट्टयांवर मिळावे.सदरील संस्थेचा प्रमुख उद्देश महिलांना व बेरोजगारांना प्रशिक्षण देण्याचा असून मनपाच्या अटी व शर्तीस पात्र राहुन रु.५५०/- प्रति चौरस मिटर प्रतिवर्ष प्रमाणे भाडे आकारुन दिर्घमुदतीकरीता भाडे पट्टयावर देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.सदरील प्रस्ताव मंजुरीनंतर शासनाकडे पाठविण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७३/१७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शहरात विविध ठिकाणी वार्डात नविन पोल रोवलेले असुन,त्यावर स्ट्रीट लाईट फिक्चर ४x४० वॅट लावणेसाठी सा.बा.चे सन ९६-९७ चे दरसुचीनुसार रु.---------- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले सदर खर्चास विदयुत साहित्य खरेदी या शिर्षातून मा.आयुक्त व स्थायी समितीने प्रमाणे मंजुरी दिली असून त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहे.

| | |
|---|---|
| १) मे.पगरीया इंटरप्रायझेस | प्रतिनग रु. ८९१/- |
| २) मे.सत्य इलेक्ट्रीकल्स | --//-- रु. ९२५/- |
| ३) मे.मोनार्च इंटरप्रायझेस | --//-- रु. ९३०/- |
| ४) मे.शांतीदेव इंटरप्रायझेस | --//-- रु. ९३५/- |

वरील प्राप्त दरामध्ये मे.पगारीया इंटरप्रायझेस यांचे दर सर्वात कमी म्हणजेच प्रतिनग रु.८९१/- प्रमाणे आहेत.सदर एजन्सीला दर कमी करण्यास विचारणा केल्यानुसार त्यांनी पत्र देवून सदरील प्रतिनग रु. ८७८/- फिक्चर पुरवठा करण्याचे लेखी कळविले आहे.

तरी मे.पगारीया यांचे तर्फे ५०० नग फिक्चर प्रतिनग रु. ७८७/- प्रमाणे एकूण रु.४,३९,०००/- एवढया रक्कमेस अंदाजपत्रक खर्च मंजुरीसह मे.पगरीया यांचे कडून स्ट्रीट लाईट ४X४० वॅट फिक्चर ५०० नग खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध ठिकाणी नविन पोलवर स्ट्रीट लाईटवर फिक्चर ४X४० वॅट लावणेकरीता प्राप्त झालेल्या निविदांपेकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच प्रतिनग रु.८७८ ची मे.पगारीया इंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस व मे.पगारीया यांचेतर्फे ५०० नग फिक्चर्स रु. ८७८/- या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७४/१८:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,औरंगाबाद महानगरपालिकेने दि. १ मे १९९७ पासून "सुरत पॅटर्न स्वच्छ औरंगाबाद मोहीम" हाती घेण्यात आली असून सदरील काम दोन पाळीत करण्यात येत आहे.या अभियानांसाठी विभागीय कार्यालयांची लोखंडी हातगाडी बाबत मागणी असलेने वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यांत येवून नमुन्यासह निविदा मागविण्यात आल्या असून एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त झालेल्या तीन निवदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर मे.इन्शा ट्रेडींग कंपनी यांचे रु. २४५०/- प्रति नग प्रमाणे आहे.मा.खासदार,मा.आयुक्त,मा.सभापती,मा.आरोग्य अधिकारी,मे.अति.शहर अभियंता तसेच मा.उप आयुक्त-१ यांनी प्राप्त हातगाडयांचे निरिक्षण केले असता मे. वर्षा मेटल वर्क्स यांनी दिलेला नमुना काही किरकोळ बदलेसह पसंत केला असून त्याचे दर रक्कम रु.२९६०/- प्रति नग प्रमाणे आहेत.

संबंधितास दर वाटाघाटीसाठी बोलाविले असता रु.२८००/- प्रति नग प्रमाणे देणेस तयार असल्याचे लेखी पत्र संबंधिताने दिले आहे.परंतू डि.एस.आर.दराचे पृथ्थकरण केले असता रु.२७००/- प्रति नग प्रमाणे सदरील गाडी खरेदी करण्यांस हरकत नसावी.

एकूण २१० गाडयांची मागणी आहे.वरील दर रु.२७०० प्रमाणे एकूण रु. ५,६७,०००/- खर्च येईल.सदरील खर्च "सुरत पॅटर्न स्वच्छ औरंगाबाद मोहीम"अंतर्गत ठेवणेस येणाऱ्या अंदाजपत्रकीय तरतुदीमधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,"सुरत पॅटर्न स्वच्छ औरंगाबाद मोहीम" अंतर्गत .मा.खासदार,मा.आयुक्त,मा.सभापती,मा.आरोग्य अधिकारी,मे.अति.शहर अभियंता तसेच मा.उप आयुक्त-१ यांनी प्राप्त हातगाडयांचे नमुना किरकोळ फेरबदलासह पसंत केलेल्या नमुन्याप्रमाणे एकूण २१० हातगाडया प्रतिनग २७००/- या दराने मे.वर्षा मेटल वर्क्स यांचेकडून खरेदी करण्यांस व एकूण रक्कम रु. ५,६७,०००/- खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्र गीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
मा.नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८-६-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत. बुधवार दिनांक १८-६९७ रोजी मा.सभापती श्री.प्रभाकर विधाते यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस "मलिक अंबर सभागृहात" दुपारी ३.०० वा.सुरवात झाली.या सभेस खालील स.सदस्यांसह अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.गिरजाराम हाळनोर | सदस्य |
| २) | श्री.सुभाष टाकळकर | --//-- |
| ३) | श्री.कचरु नवपुते | --//-- |
| ४) | श्री.अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ५) | श्री.रशिदखाँन (मामू) | --//-- |
| ६) | श्री.स.अली मिरा सलामी | --//-- |
| ७) | श्री.जोशी संजय | --//-- |
| ८) | श्री.स.अ.रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| ९) | श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १०) | सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ११) | श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| १२) | श्री.जयवंत केशवराव ओक | --//-- |

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते** : महानगरपालिकेतर्फे नेहरु रोजगार योजनेचे फॉर्म सुशिक्षित बेरोजगारांना वाटप केले होते.तेव्हा मनपाकडे नेहरु रोजगार योजने अंतर्गतची सबसिडी का आली नाही.याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्रकल्प अधिकारी** : यासाठी केंद्र शासनाकडून नेहरु रोजगार योजनेअंतर्गत अनुदान वेळोवेळी प्राप्त होतात.त्या अनुदानातील पैसे मनपाने ठरविलेल्या शेडयुल्ड व राष्ट्रीयकृत बँकेत जमा केले जातात व त्यातुन वार्डनिहाय पैसे संबंधित बँक रोजगारांना कर्ज वाटप केले जाते.यापुढील अनुदानाचा हप्ता शासनाकडून प्राप्त व्हावयाचा असुन प्राप्त झाल्यास संबंधित बँकांना कळविण्यात येईल.

**श्री.कचरु नवपुते** : तीन महिने गेले तरी त्याचे काही उत्तर नाही.बँकेत फाईल गेली आहे.यामुळे बेकार युवकांची परिस्थिती वाईट झाली आहे.

**मा.सभापती :** या बाबतीत प्रकल्प संचालक यांनी लवकर माहिती द्यावी व वेळ का लागला आहे.याचा खुलासा करावा.

**प्रकल्प अधिकारी** : शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यावर लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.कचरु नवपुते,श्री.गौतम लांडगे** : कमीत कमी या कामासाठी किती कालावधी लागेल याची कालमर्यादा सांगा.

**मा.सभापती :** प्रकल्प संचालक यांनी निश्चित एक तारीख द्यावी व शासनाकडे याबाबत पत्रव्यवहार करावा.

**प्रकल्प अधिकारी** : शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यास लगेच त्याची कार्यवाही होईल.या प्रश्नाबाबतची फाईल मुंबईला पाठवून लवकरच माहिती मागविण्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करणेत येत आहे.

**श्री.अभिमन्यु भालेराव :** मसनतपुर वार्ड क्र.१२ येथे डांबरीकरण का झाले नाही त्याचे इस्टीमेंट तयार आहेत.परंतु त्याठिकाणी खांडकी बसविली आहे.ते काम का थांबविण्यात आले.नागरिक मला त्रास देतात,पैसे खाल्ल्याचे आरोप करतात.याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** याबाबतीत काही वस्त्यामुळे अडचण निर्माण होते.जरी काही काम अपुरे असले तरी काही वस्त्याच्या अडचणी लक्षात घेऊन ते काम करावे लागेल.

**मा.सभापती :** शहर अभियंता यांनी स.सदस्यांचे म्हणणे ऐकूण घ्यावे व तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री.अभिमन्यु भालेराव** : खांडकी बद्दल मी तुम्हाला बोललो आहेच.या वार्डात अनेक रोड आहेत.परंतु डांबरीकरण नाही.याबद्दल आपल्याला काय अडचण आहे.

**श्री.कचरु नवपुते** : स.नगरसेवक बोलत आहेत.तेथे काही लोकवस्ती आहे का? अंदाजपत्रक तयार केलेली आहेत का? अंदाजपत्रक तयार नसले तर काम होणार कसे?

**श्री.अभिमन्यु भालेराव** : जे अतिक्रमण तोडता येत नाही तो भाग बाजूला घ्या.परंतू ज्या ठिकाणी काम करता येणे सोईस्कर आहे असे काम लवकरात लवकर हाती घ्यावे.

**श्री.कचरु नवपुते** : या प्रश्नाबाबत विचार पडतो तो असा कि,स.नगरसेवक यांना वार्डात डांबरीकरण करावयाचे की, अतिक्रमण बाबत प्रश्न सोडवायचा आहे.

**मा.आयुक्त** : स.नगरसेवकांच्या सुचनेनुसार जे काम अपुरे आहेत ते लवकर करुन घेण्यात येईल.

**मा.सभापती :** डांबरीकरणाचा प्रस्ताव आला तर लवकरच काम करण्यात येईल व अंदाजपत्रक तयार नसल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.अभिमन्यू भालेराव :** माझा दुसरा प्रश्न असा की,मसनतपुरचा जो नाला आहे.तो एम.आय.डी.सी.चे दुषित पाणी वाहुन येते.त्यामुळे दुषित वातावरण तयार होते.तो नाला बंद करुन चिकलठाणा दिशेने वळविल्यास नागरिकांना त्रास होणार नाही व वातावरणही दुषित होणार नाही.

**शहर अभियंता** : मसनतपुर येथील नाला बंद करावयास अडचण निर्माण होते.कारण जो नाला आहे.तो त्या परिस्थितीत ठेवून दुसऱ्या बाजूला नाला करावा लागेल.

**मा.सभापती** : अगोदर संबंधित नाल्याची पाहणी करावी व नंतरच कार्यवाही करावी.

**श्री.संजय जोशी :** मा.सभापती गेल्या एक वर्षापासून धोबी घाट शहानुरवाडीत बांधलेला आहे.आपण तो सुरु केला नाही व उपलब्ध करुन दिला नाही.आपले ३.५० लाख रुपये खर्च केलेले आहेत.यासाठी आपण काही उपाययोजना करु शकतो की नाही,किंवा सुरु केले नाही याचे कारण काय?

**शहर अभियंता :** तेथे आपले बांधकाम सुरु झालेले होते.तेथील अंदाजपत्रक तयार आहे.परंतु नगरसेवकांचे म्हणणे होते.तेथे फेन्सींग करुन नका.तेथे पाण्याची पाईपलाईन नाही.त्याबाबत कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर फेन्सींग करण्यात येईल.

**श्री.संजय जोशी** : फेन्सींग हा मुद्दा दुय्यम आहे.परंतु एक वर्षापासून धोबी घाट झाले.आम्हाला पाणी मिळत नाही.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता पा.पु.यांनी पाण्याची व्यवस्था त्वरीत करावी.त्याठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात

**कार्यकारी अभियंता** : त्याठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**श्री.जयवंत ओक :** सध्या पावसाळा सुरु झाला आहे.सुरत पॅटर्न अंतर्गत महानगरपालिका साफसफाईच्या कामात प्रगती पथावर आहे.परंतु ज्या ठिकाणी सफाईची कामे अर्धवट झाली आहेत.ती कामे महिन्याभरात पूर्ण करावी असे माझे मत आहे.

**मा.सभापती :** या बाबतीत आपण बरीचशी साफसफाईची कामे हाती घेतली आहेत.ती लवकरच होतील.

**श्री.जयवंत ओक** : साफसफाईची जी कामे अर्धवट आहेत ती पूर्ण करावी.बांधकाम विभागात काम येत असेल तर त्या संदर्भात बांधकाम विभागाने नाली बांधून द्याव्या.म्हणजेच नाल्याजवळील जी वस्ती आहे त्यांना पावसाळयात पडणाऱ्या पावसामुळे पुराचा अगर काही जी जिवित हानी होईल ती होणार नाही.याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी व नाला ट्रेचिंगची कामे तातडीने करावीत.

**मा.सभापती:** ठिक आहे.

**श्री.कचरू नवपुते** : माझ्या वार्डामध्ये मा.आयुक्त साहेबांनी सुध्दा पाहणी केली होती की,बौध्दवाडा व इतर काही भागात ज्या भागांचे संपुर्ण पाणी एक होते व साचून राहते.त्या ठिकाणी ताबडतोब व्यवस्था करावी.ज्यामुळे नागरिकांची तक्रार आपल्याकडे येणार नाही याची कार्यवाही करावी.तसेच आपल्या शहरामध्ये ज्या इमारत मोडकळीस आल्या आहेत व जुन्या आहेत त्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.)** : नगरसेवकांच्या मागणीनुसार यावषी्र पाच ठिकाणचे अंदाजपत्रक मंजुर झाले.याबाबत लवकरच काम सुरु करण्यात येणार आहे व सदरील कामे तातडीने करुन घेण्यात येणार आहेत.

**श्री.जयवंत ओक** :मी जे बोलत आहे त्यावरच हा प्रश्न आहे की,जे अर्धवट कामे आहेत ते आपण तात्काळ पूर्ण करावी अशी माझी विनंती आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी** : स.सदस्य श्री.जयवंत ओक जे बोलले त्यास अनुसरुन दलालवाडी येथुन नाला तुडुंब भरल्यास घरात पाणी येते.पैठणगेट सादीया टॉकिज जवळ जी नाली आहे.ती नाली बंद केली.त्यामुळे पाणी वाहुन जाण्यास मार्ग नाही व त्याठिकाणी बिल्डींग बांधण्याची परवानगी आपण दिली.त्याठिकाणी अशी परिस्थिती निर्माण झाली की,या बिल्डींगमुळे अरुंद रस्ते होत चालले आहेत.काही शॉपिंग सेंटरची दुकाने आहेत.त्या दुकानांमध्ये पाणी साचुन राहते.काही काही वेळा त्या ठिकाणी २५ मिनिटे पाण्यामुळे आपणांस जाता येत नाही.रस्त्यावरुन रिक्षा पण जाऊ शकत नाही.आपण याबाबत कार्यवाही करावी व पाणी साचलेले असते.त्याबाबत पाहणी करून ताबडतोब कार्यवाही करावी.

**श्री.जयवंत ओक** : माझ्या वार्डामध्ये या ठिकाणी "खडकेश्वर" येथे माजी गृहमंत्री श्री.शंकरराव चव्हाण यांचा बंगला आहे.याठिकाणी जास्त पाऊस झाली की,पाणी रोडवरुन वाहते व साचते.तसेच समोरील डॉ.आंबेडकर यांच्या पुतळयाजवळ पाणी साचुन राहते.यासाठी अंडरग्राऊंड पाणी वाहुन जाण्यासाठी प्रशासनाने व्यवस्था करावी व अशा प्रकारचे शहरात १०-१२ वार्डातील प्रश्न आहेत ते तातडीने करावीत.

**मा.सभापती :** याबाबतीत लवकर अंडरग्राऊंड (गटारे) नाल्याकरीता ताबडतोब अंदाजपत्रक तयार करुन तात्काळ कामे करण्यात यावीत.

**श्री.जयवंत ओक** : पैठणगेट तसेच मा.खासदार साहेब यांच्या बंगल्याजवळही तीच परिस्थिती आहे.ही अशा प्रकारची कामे का लवकर होऊ शकत नाहीत काय?

**मा.सभापती :** सदरील कामे तातडीने हाती घ्यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : दशमेशनगरमध्ये पानसे हॉस्पीटलपासुन प्रतापनगरपर्यंत नाल्याचे बांधकाम चालु आहे.त्याच्या वरच्या बाजूला उत्तरेकडून झांबड इस्टेट कडून जो नाला येतो तो दशमेशनगर जवळ आल्यानंतर पुर्वेपासून १५ ते २० फुट अंतर आहे.त्या ठिकाणी एका व्यक्तीला बांधकाम परवानगी दिली आहे. तेव्हा सदरचा नाला त्या इसमाच्या जागेतून जातो काय? याचा खुलासा व्हावा कारण उद्या जर पाऊस जोरात आला तर पाणी संबंधित नाल्यातून वाहुन जाणार नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**सहा.संचालक नगर रचना** : या संदर्भात आम्ही नाल्याची डिझाईन करुन घेऊ नंतर हे काम केले जाईल.काही काही ठिकाणी नाल्याची रुंदी मुळातच कमी जास्त प्रमाणात आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : मला असे म्हणवयाचे आहे की,मा.आयुक्तांनी त्याची पाहणी करावी.म्हणजे प्रशासनाला त्या बाबतीत समस्या दिसून येईल.

**श्री.संजय जोशी** : "खिवंसरा पार्क" याबाबत मा.आयुक्तांसोबत पाहणी करावयास गेलो होतो.तसे त्या ठिकाणी सुविधा का झाल्या नाहीत.तेथील भागातील नाला व काही सुविधा बाबत आपण काय व्यवस्था करणार आहोत.६ महिन्यापुर्वी मा.आयुक्त यांचे सोबत गेलो होतो.त्यानुसार कार्यवाही करण्याचे सुचित केले होते.अद्यापही प्रलंबित आहेत.

**मा.सभापती :** ज्या ज्या नाल्याची स्थिती योग्य नाही.त्याची पाहणी करुन योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** सिटीसर्व्हे कार्यालयातंर्गत मनपाच्या जागेवर नंबरीन टाकणेसाठी सन १९९६-९७ च्या बजेटमध्ये पन्नास लाखाची आपण जी तरतुद केली होती.त्यानुसार कार्यवाही व्हावी.ज्यामुळे तेथील नागरिकांना पी.आर.कार्ड नसल्यामुळे त्यांना त्रास होत आहे.याबाबत प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली यांची माहिती द्यावी.

**सहा.संचालक नगर रचना** : याबाबत मालमत्ता अधिकारी यांच्याकडे जी फाईल आहे ती फाईल माझ्याकडे नाही.सदरची संचिका पाहिल्या नंतर कार्यवाही करता येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : याबाबतीत सर्व्हेची फाईल कोणाकडे आहे.याची माहिती द्यावी.याबाबत सिटी सर्व्हे कार्यालयाकडे पत्रव्यवहार करून सविस्तर माहिती घ्यावी व मा.आयुक्त यांना कल्पना द्यावी.

**मा.सभापती** : याबाबत पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**सहा.संचालक नगररचना** : शासनाकडे याच संदर्भात आम्ही एक कोटी रुपये मागितले आहेत,त्यानंतर कार्यवाही करण्यांत येईल.

**सौ.यशोदा वाडेकर** : दि.१६-५-९५ ला संजयनगर मध्ये खांडकी बसविण्याचे प९१ दिले आहे.त्याचे काम पुर्ण झाले नाही.माझ्या जवळील वार्डातील कामे लवकरात लवकर होतात.परंतु माझ्या वार्डातील कामे लेखी पत्र देऊनही पूर्ण होत नाही.याचे करण काय?

**श्री.संजय जोशी, श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.गौतम लांडगे** : श्रीमती वाडेकर यांच्या म्हणण्याचा उद्‌देश असा की, आपणांकडे नगरसेवक यांची अनेक पत्रे येतात.त्याचे कामाबाबत अंदाजपत्रक लवकर तयार होते. त्यामुळे त्याचे काम लवकर होणे साहजिक आहे.मा.आयुक्तांनी श्रीमती वाडेकर यांनी त्यांच्या वार्डाबद्दल एक पत्र दिले त्याचे बाबतीत काही निष्पन्न झाले नाही. त्याचे पत्राचे बाबतीत प्रशासन गंभीरता घेत नाही याचे कारण काय? पत्र देऊनही कामाचे अंदाजपत्रक तयार होत नाही.

**मा.आयुक्त :** आपलया महानगरपालिकेतील अनेक नगरसेवक कामे पूर्ण होण्यासाठी मागणी करतात.उदा.ग्रंथालयासाठी,दिवे बसविणे,रोडची काही कामे खांडकी बसविण्यासाठी इ.परंतु या सर्व कामासाठी त्याचे अंदाजपत्रक तयार होते.त्याचे बजेट असेल तर त्यांची कामे आम्ही लवकर करतो.मागील वर्षी ७४ कोटींची कामे केली ज्यात अे-१ चा समावेश आहे.आता स्पिल ओव्हरची ५२ कोटीची कामे शिल्लक आहे.स्वेच्छा निधीमधील असंख्य कामे आम्ही केली आहेत.सगळयांचीच कामे करावयाची असतात.परंतु ती विचार करूनच करावी लागतात.प्रत्येकाची अपेक्षा असते.असंख्य कामे आहेत आणि स्वेच्छा निधी बद्दल आपण किती पैसे ठेवावयाचे,प्रशिक्षणाकरीता किती पैसे ठेवावयाचे यावर्षी आपण असे ठरविले की,आटलेटरी आणि स्टॅटयुटरी जे कामे आहेत ते करणेच आवश्यक आहेत ते पूर्ण करण्यात येतील.असंख्य कामे पेडींग आहेत त्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.यासाठी आम्हाला डायरेक्टीव्हज द्या आम्ही ते करु.परंतु सर्व साधारणपणे सर्व स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीची कामे व्यवस्थित होत आहेत.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी पत्र दिल्यानंतर साधारणतः एका महिन्याच्या आंत संबंधितांना कामाचे उत्तरे देणे आवश्यक आहे.

**श्री.गौतम लांडगे** : मा.आयुक्त साहेब कोणत्याही कामाला ठराविक वेळ पाहिजे.स.सदस्यांनी पत्र दिल्यानंतर त्याबाबत कामाचे अंदाजपत्रक किंवा सदस्यांना कामाविषयी कल्पना देणे आवश्यक आहे.ते दिसून येत नाही.आम्हाला जी कामे आवश्यक करावयाची आहेत ती कामे प्रशासन वेळ न लावता करीत असतात.

**श्री.गौतम लांडगे** : शहर अभियंता यांच्या विभागात कर्मचारी वर्ग कमी दिसतात असे मला वाटते.ज्यामुळे नागरिकांचे प्रश्न सुटत नाहीत,उलट स्लम भागात प्रश्न सारखे वाटतात.परिणामी कामे अर्धवट राहतात.

**मा.आयुक्त** : तुमचे म्हणणे चुकीचे आहे.विभागात कर्मचारी वर्ग पुरेसा आहे.परंतु प्रत्येक नगरसेवक म्हणतात माझे आधी करा किंवा माझे काम अगोदर व्हावयास पाहिजे असे वाटते परंतु सर्वांची काम आम्ही प्राधान्याने करतो.

**मा.सभापती** : माझे जे मत आहे.ते असे,ज्या कामामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होईल काम आपण लवकरच सुरु करावे.

**श्री.जयवंत ओक** : मा.आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे आम्हाला ते मान्य आहेत.तीन वार्डामध्ये कोणते काम करणे अत्यंत जरुरी आहेत.ते तात्काळ करावे.श्री.भालेराव यांच्या वार्डामध्ये कोणते काम आवश्यक आहेत.ते करावे काही नगरसेवकांना नागरिकही अर्ज देतात. त्यांच्या मागण्यानुसार प्रशासन दुर्लक्ष करु नये.परंतु काही कामांना प्रशासनाने प्राधान्य दयावयास पाहिजे व पावसाळयात जी कामे अधुरी आहेत.ती पूर्ण करणे आवश्यक आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी** : कोणते किती करावयाचे व कोणत्या पध्दतीने करावयाचे ते प्रशासनाने लवकरच आजमावे व स.नगरसेविका यांचे म्हणणे पण तेच आहे की,दोन वर्षापासून त्यांच्या वार्डात कामे झाली नाहीत.त्याचे आम्हाला उत्तर द्या.स्वेच्छा निधीच्या कामास कितपत वेळ होईल. व कधी पर्यंत कामे पुर्ण होतील याची प्रशासनाने माहिती द्यावी. त्यांच्या वार्डातील दोन वर्षापासुनचे काम का होत नाही याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी खुलासा करतील.

**उप-अभियंता (बांध-१)** :त्यांच्या कामाचे स्वरुप हे वेगळया प्रकारचे आहे.दोन्ही घरांच्या बॅकसाईडमध्ये ही कामे आहेत.त्यामुळे त्या ठिकाणी अडचण निर्माण होते.त्यामुळे ते काम होत नाही.

**सौ.यशोदा वाडेकर** : संबंधित अधिकारी यापूर्वी म्हणत होते की,आपल्याकडे बजेटच नाही.आणि आता अशा प्रकारची माहिती संबंधित अधिकारी देतात हे योग्य नाही.

**मा.सभापती :** स.सदस्या सौ.वाडेकर यांचे बाबतीत जो प्रश्न आहे.त्याबाबतची पाहणी करून योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

**उप-अभियंता (बांध-१)** : ठिक आहे.

**श्री.संजय जोशी** : सेवायोजन कार्यालयासमोर रस्त्यात न आलेले अतिक्रमण झुणका भाकर केंद्र तोडलेले आहे.त्याच बाजूला एक पाव वडयाची टपरी आहे.ती अतिक्रमणामध्ये येत नाही असे इन्स्पेक्टरचे सांगितले व ते तोडलेले नाही.त्याच्यावर काही कार्यवाही झाली नाही.८ दिवसांत त्यांनी एकही टपरी उचललेली नाही.तेथे लागुनच हेडगेवार रुग्णालय असून ते अत्यंत चांगले रुग्णालय आहे.त्याला लागुनच झुनका भाकर केंद्राचे दुकान आहे.ते मात्र त्यांनी तोडले आहे.म्हणजे एकाचे उठवायचे व दुसऱ्याचे टपऱ्या हटवायच्या नाहीत इतर टपऱ्या का हटविल्या नाही याची माहिती प्रशासनाने द्यावी व संबंधित इमारत निरिक्षक श्री.पवार यांचेवर कार्यवाही करावी.

**प्रशासकीय अधिकारी** : तेथील पाच-सहा टपऱ्या काढलेल्या आहेत.सेवायोजन ऑफीसकडील भागात ज्या टपऱ्या आहेत तो भाग श्री. पवार,इमारत निरिक्षक यांचेकडे येतो व बाकीचा भाग श्री.अभंग कडे येतो.याबाबत मी पाहुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल व ज्यांच्याकडे नियमाप्रमाणे परवानगी आहे त्याची पाहणी करण्यात येईल व ज्यांच्या कडे नाही त्याबाबत कार्यवाही करणे येईल.

**मा.सभापती :** नव्याने ज्या टपऱ्या उभारण्यात आल्या असतील तर त्या जरुर काढुन टाका व विना परवानगी असल्यास त्या प्रशासनाने हटवाव्यात.

**श्री.संजय जोशी** : दोन्हीही टपऱ्या जवळ जवळ आहेत.काही काढल्या काही काढल्या नाहीत.त्या का काढल्या नाहीत.झुणका भाकर केंद्र हे शासनाचे धोरण असूनही त्यांना आपण काढता म्हणजे आपण महाराष्ट्र शासनाचा अपमान करीत आहोत.यामध्ये संबंधित इमारत निरिक्षकास जबाबदार धरुन कार्यवाही करावी.

**श्री.स.अली मिरा सलामी** : या महाराष्ट्र शासनाचा जो उपक्रम आहे तो म्हणजे झुणका भाकर केंद्र या शहरात झुणका भाकर केंद्राला आपण परवानगी देतो.झुणका भाकरी बरोबर या केंद्रात दुसरेही इतर अनेक विनापरवानगी व्यवसाय त्या

केंद्र चालकाने सुरु केले आहेत ते लवकरात लवकर बंद करावेत.फक्त झुणका भाकर केंद्रच चालवावे इतर उद्योग करु नयेत.

**मा.सभापती :** झुणका भाकर केंद्राला रितसर परवानगी दिली आहे काय? याची शहानिशा करावी व या प्रश्नावर आता बोलण्याची गरज नाही.कारण या झुणका भाकर केंद्राचा प्रश्न आपल्या सर्वसाधारण सभेत झालेला आहे.साईड व्यवसाय तीन-चार चालु आहेत ते आपण लवकरच मनपातर्फे थांबवू.

**श्री.संजय जोशी :** झुणका भाकर केंद्रात दुसरे अवैध विनापरवानगी व्यवसाय चालू आहेत.हा प्रश्न जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अंतर्गत येतो.आपण फक्त टपरी परवानगी दयावी.एवढेच महानगरपालिकेचे काम आहे.

**श्री.कचरु नवपुते** : प्रत्येक वार्डामध्ये वॉटर,ड्रेनेज पाहिजे.स्वच्छता पाहिजे.इतर काही सुविधा पाहिजे असे प्रत्येक स.सदस्य ओरड करतात.तर त्याकरीता जे काही बजेट आहे आणि ते किती प्रमाणात खर्च झाले व किती शिल्लक आहे.तसेच त्याची मालमत्ता कराची वसुली बाबत चौकशी करण्यासाठी आपण समिती तयार केली होती.याबाबत या समितीने आतापर्यंत काय कार्यवाही केली संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मा.सभापती :** तुम्ही आज पत्र द्या त्याचा खुलासा आठ दिवसांत करण्यात येईल.ऐनवेळेवर अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित करु नये.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : आपण जी समिती नेमली आहे.त्या समितीने मालमत्ता कराच्या व पाणीपट्टी वसूलीची कर आकारणी विभागाची जी प्रकरणे पेडींग आहेत त्यावर तात्काळ निर्णय लावणेसाठी समिती नेमलेली होती व त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.समितीचे कामकाज सुरु झाले काय? याची माहिती दयावी.

**श्री.कचरु नवपुते** : स.नगरसेवकांच्या समोर ठराव करावयाचा आणि त्याची अंमलबजावणी करावयाची नाही.त्याचा व कामाचा भाग दाखवावयास पाहिजे.माझ्या या वार्डामध्ये महानगरपालिकेला औद्योगिक क्षेत्रामुळे करोडो रुपयाचे उत्पन्न आहे.करीता मी आयुक्तांना विनंती करतो की,आपण याबाबतीत संपूर्णपणे मालमत्ता वसुलीसाठीचे प्रशासनाने कसोशिने प्रयत्न करावेत ज्यामुळे मनपाचे आर्थिक बाजू बळकट होण्यास मदत होईल.यासाठी याची माहिती मा.आयुक्त यांनी द्यावी.

**मा.आयुक्त :** यांची १२ हजार प्रकरणे आहेत.त्याची माहिती आम्ही देतो.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : ज्योतीनगर भागामध्ये नविन लाईन त्याठिकाणी पाण्याच्या पाईपला वॉल टाकावयाचा आहे.त्या भागात उताराकडे पाणी निघुन जाते. आजपर्यंत त्यावर काहीच कार्यवाही झालेली नाही.त्या पाण्याच्या पाईपवर एक वॉल टाकल्यास पाण्याचा प्रश्न सुटेल.याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे व तात्काळ कार्यवाही करावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.) :** ठिक आहे.त्याठिकाणी वॉल बसविला जाईल.

**सौ.यशोदा वाडेकर** : माझ्या वार्डातील मकबुल मिस्तरी यांचे अतिक्रमण १९८५ साली करण्यात आले आहे.याबद्दल चौकशी करण्यासाठी मी उप आयुक्त-१ यांना अनेक वेळा भेटले तरी त्याची कार्यवाही का करण्यात आली नाही.

**उप आयुक्त-१** : १९८५ ला जे हे अतिक्रमण झाले त्यावेळी मी मनपात या पदावर नव्हतो.१९८५ म्हणजे त्या गोष्टीला आता १२ ते १३ वर्षे झाली.त्यासाठी वेळ काढून त्याबाबतीत कार्यवाही होईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.गौतम लांडगे, श्री.संजय जोशी,श्री.म.अ.रऊफ** : मागील बैठकीत इतिवृत्तात मी जे बोललो ते आलेले नाही व माझ्या नावावर दुसरेच वाक्य आलेले आहे.मी सुचना केली होती की,आकृतीबंध आराखडयात याशिवाय अधिकाऱ्यांचे वेतनश्रेणीत वाढ करण्यात आलेली आहे.तीत खालील अधिकाऱ्यांचं पदनामानुसार वेतनश्रेणी द्यावी.ज्यामध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी,कामगार अधिकारी,उच्चश्रेणी लघुलेखक-दोन पदे यांना रु. २२०० ते ३७०० ही वेतनश्रेणी मागील ठरावाप्रमाणे द्यावी.मागील बैठकीत १६ अधिकाऱ्यांचा प्रस्ताव आलेला होता.त्याचे काही नियम व निकष आहेत किंवा नाही.

**मा.सभापती :** पुढील बैठकीत प्रशासनाने प्रस्ताव ठेवावा व १६ अधिकाऱ्यांचे वेतनश्रेणीचा प्रस्ताव मंजूर होऊन त्याच दिवशी कायम करण्यात आलेला आहे.त्यानुसार संबंधित बाबतीत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**उप आयुक्त-१** : ठिक आहे.

**विषय क्र.७५/१:**

दिनांक १६-५-९७ व ६-६-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव :**

दिनांक १६-५-९७ व ६-६-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७६/२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.शताब्दीनगर येथील समाज मंदिरासाठी जोडून एक खोली व स्वच्छतागृह बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु. १,६१,१८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.सदरचा खर्च ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षामधून प्रस्तावित आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , मो.शताब्दीनगर येथील समाज मंदिरासाठी जोडून एक खोली व स्वच्छतागृह बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,६१,१८०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना"या लेखाशिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७७/३:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,गांधीनगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रु. ६,६१,३००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदर कामाचा खर्च भांडवली कामाचे तरतुद मधुन करण्यांत येणार आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,गांधीनगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,६१,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भांडवली कामाची तरतुद" मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७८/४:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वारे टी हाऊस रेल्वे स्टेशन ते जहागिरदार कॉलनी येथे ३०० मी.मी.व्यासाची मुख्य जलनि:सारण वाहीनी टाकणेकरीता रक्कम रु.४,३०,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ६८७/१५ दि. ४-३-९७ अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकुण बारा निविदा विक्री झाल्या. पैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.कुलवंतसिंग | ०.३०% | कमी |
| २) श्री.शेख मसूद | ५% | जास्त |
| ३) श्री.मनजितसिंग | ५% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३०% कमी दराची श्री.कुलवंतसिंग यांची निविदा आहे.करीता निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वारे टी हाऊस रेल्वे स्टेशन ते जहागिरदार कॉलनी येथे ३०० मी.मी.व्यासाची मुख्य जलि:सारण वाहीनी टाकणेकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी  अं.प.दरापेक्षा ०.३०% कमी दराची श्री.कुलवंतसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७९/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,स्टेट बँक ऑफ हैद्राबाद (शहानुरवाडी) अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता सन ९५-९६ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर. दराने रक्कम रु. ५,७५,५५०/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च "रस्ते दुरुस्ती पुर्नडांबरीकरण" स्पील ओव्हर सन १९९६-९७ मधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात निविदा विक्री झाल्या असून स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.मास्कॉट कन्स्ट्रक्शन | २१.८६% | कमी |
| २) श्री.के.बी.पाथ्रीकर | १९.७०% | कमी |
| ३) मे.पाटील कन्स्ट्रक्शन | ५.८८% | कमी |
| ४) मे.जय अर्थमुव्हर्स | ५.७७% | कमी |
| ५) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ५.९९% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २१.८६% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.करीता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद (शहानुरवाडी) अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २१.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८०/६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा राममंदिर ते सिडको हद्दीपर्यंतच्या रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१२,३५,६२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६५/३ दिनांक १९-२-९७ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत तीनही निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.प्राप्त निविदापत्रके दि. ५-४-९७ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. | १७.८६% | कमी |
| २) श्री.डी.अजितसिंग | १५.५०% | कमी |
| ३) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १२.९९% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १७.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा राममंदिर ते सिडको हद्दीपर्यंतच्या रोडचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १७.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.८१/७:**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्ताच्या मंजुरीने प्रस्ताव सादर केला की,रेल्वेस्टेशन परिसरातील साधना लॉजमागील प्रस्तावित दुकान केंद्रातील दुकाने बांधुन त्या भाडेतत्वावर देणेकरीता सर्व साधारण सभेने ठराव क्र.१६३/३ दि. १६-३-९६ अन्वये दुकानाचे अनामत रक्क रु.४,०००/- प्रति चौ.मी.प्रमाणे देण्यांत यावी. याबाबत ठराव पारीत झाला आहे.

परंतु सदरील दुकानाचे भाडे निश्चित करणेसाठी करण्यांत आलेल्या समितीसमोर ठेवण्यात आले असता खालील प्रमाणे भाडे निश्चित करण्यांत आले.

अ) अनामत रक्क्म दि. १६-३-९६ च्या सर्वसाधारण सभेने मंजुर केल्याप्रमाणे रुपये ४,०००/- प्रति चौ.मी.अनामत रक्कम घेण्यात यावी.

ब) या भागतील दुकानाचा सिध्द शीर्घ गणकानुसार दर रु. १३.२९५/- विचारात घेता त्यामधुनच अनामत रक्कम रु. ४,०००/- वजा केल्या उर्वरित रक्कमेचे ८% या दराने भाडे आकारणी करण्यांत यावी.

त्यानुसार १३,२२५-४०००= <u>९२२५x८</u> =६१.५०
१२

६० रु.प्रति चौ.मी.प्रतिमहा प्रमाणे भाडे निश्चित करुन किमान अनामत रक्कम रु. ४,०००/- ठेवून त्या आधारे दुकानाकरीता जास्तीत जास्त (ऑफर) मागणीने देण्यांचे ठरले. यामध्ये रस्त्याचे मागील बाजुस असल्यास दुकानाकरीता भाडे रु. ५०/- प्रति चौ.मी.प्रतिमहा घेण्यात यावे.

तरी समोरील दुकानाचे भाडे रु.६०/- प्रति चौ.मी.प्रतिमहा व मागील बाजुच्या दुकानाकरीता रु. ५०/- प्रति चौ.मी.प्रतिमहा प्रमाणे व त्यापेक्षा अधिक देईल. त्याला दुकान लिलाव बोली पध्दतीने देणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन परिसरातील साधना लॉज मागील प्रस्तावित दुकान केंद्रातील दुकानाचे भाडे खालील दराने आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

समोरील दुकानाचे भाडे रु.६०/- प्रति चौ.मी.प्रतिमहा.

मागील बाजुचे दुकानाकरीता रु.५०/-प्रति चौ.मी.प्रतिमहा.

व त्यापेक्षा अधिक देईल तयास लिलाव पध्दतीने दुकाने भाडयाने देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८२/८:**

मा.आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सौ.रंजनी मथुरादास वैष्णव यांनी अर्ज दिला आहे की, माझ्या मालकी हक्काची संजयनगर गल्ली नं.१ मधील विहिर महानगरपालिकेने ताब्यात घेऊन त्यावर स्मशानभूमीत पाणी पुरवठा करणेसाठी विद्युत पंप बसवावेत व सदरील विहिरीच्या मोबदल्यात वार्षिक भाडे रु.३०००/- प्रमाणे २५ वर्षाच्या लिजवर करुन घ्यावी. तसेच त्यांनी अर्जासोबत खालील प्रमाणे अटी शर्ती दिलेल्या आहेत.

१) सदरील विहिरीचे पाणी महानगरपालिका १ एप्रिल ९६ पासुन वापरत आहे.
२) महानगरपालिकेने स्वखर्चाने मोटर बसवून कनेक्शन घ्यावे व त्याचे येणारे देयक (बील) महानगरपालिकेने भरावे.
३) महानगरपालिकेने विहिर वार्षिक ३०००/- हया दराने भाडे दयावे व २५ वर्षे लिजची रक्कम एकूण रु. ७५,०००/-ॲडव्हॉन्स दयावेत अशी मागणी केलेली आहे.
४) सदरील भाडेपट्टयाच्या कराराची मुदत संपल्यानंतर मनपास विहिरीच्या पाणी घेण्याचे आपोआप संपुष्टात येईल. त्यानंतर त्यांचे कोणतेही हक्क राहणार नाही.
५) विहिर मालकास सदरील कराराची मुदत संपल्यानंतर महानगरपालिका बरोबर नविन करार करण्याचे किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार राहील.
६) करारासाठी येणारा संपूर्ण खर्च महानगरपालिकेने करावा.त्यास विहिर मालक जबाबदार रहाणार नाही.

सहाय्यक संचालक नगररचना विभागाने हया विहिरीकरीता संबंधितांना रु. २०,०००/- देऊन २५ वर्षाच्या लिजवर घेण्यात यावे असे सुचविले आहे.

सदरील विहिर लिजवर घ्यावयाची या बाबत कार्यालयीन अटी-शर्ती खालील प्रमाणे राहतील.

१) विहिर महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्यानंतर कुणासही दुसऱ्यास हस्तांरीत करता येणार नाही.

२) इलेक्ट्रीक मोटार महानगरपालिका बसवुन घेईल.त्याबाबत येणारे विद्युत देयक महानगरपालिकातर्फे भरणा करण्यांत येईल.
३) विहिरींच्या पाण्याचा वापर हा स्मशानभूमीवरील विद्युत दाहिनी तेथील भाडे व इतर कामासाठी वापर करता येईल व या बाबत विहिर मालकाची कोणतीही तक्रार केली जाणार नाही.
४) आखीव पत्रिकेवर महानगरपालिकाची विहिर असे नांव लावून दयावे लागेल.या भूखंडाची स्वतंत्र मिळकत पत्रिका देणे बंधनकारक राहील.या भूखंडात विहिर असल्याने ती महानगरपालिकेच्या ताब्यात राहील. विहिरीच्या (        ) वरील बांधकाम काढून घेणे आवश्यक राहील.
५) विहिरींच्या आजूबाजूला कोणत्याही कारणासाठी जागेचा वापर करता येणार नाही. त्या भूखंडाचे क्षेत्र (२०X१५=३०० चौ.फुट) ६.०X४.५ मी.२७ चौ.मी. एवढे असून ३.० मी. व्यासाची विहिर व त्याजवळील जागेचा वापर विहिर मालकास करता येणार नाही व मालकी बाबत महानगरपालिका वापरासाठी बोर्ड असा लावण्यात येईल.
६) सदरील विहिरी बाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी विहिर मालक निवारण करील.
७) भाडेपट्टयाचा लागणारा खर्च दोघांनी विभागून घ्यावा अन्यथा रु.५०/-स्टॅम्प पेपरवर करार करावा.

वरील प्रस्तावातील अर्जदार यांनी त्यांचे अटी-शर्तीसह महानगरपालिकेने सदरील विहिरीं बाबत सहाय्यक संचालक नगर रचना यांनी दर्शविलेल्या अटीसह प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते** : विहिरी बाबतचा जो प्रश्न आह.त्याबद्दल आपण रुपये ७५,०००/- एकदम देण्याचे करावे.

**श्री.संजय जोशी** : विहिरी बाबतचा जो प्रश्न आहे रंपये ७५,०००/- देण्यापेक्षा त्या ठिकाणी आपण विहिर खोदवू शकतो.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : एजन्सीला देण्यापेक्षा महानगरपालिकेने स्वतःच योग्य ती कार्यवाही करावी व प्रस्ताव स्थगित ठेवावा व नामंजुर करावा.

**सभापती :** हा प्रस्ताव सर्वानुमते नामंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो.असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८३/९:**

महानगरपालिकेच्या विविध वाहनांसाठी लागणाऱ्या विविध आकाराच्या बॅटरी खरेदी करण्यासाठी सन १९९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता वार्षिक करार करण्यासाठी वर्तमानपत्रातून विविध सुचना देऊन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ निविदापत्रके विक्री झाली व त्यापैकी दोन निविदापत्रके वसुल झाली.मे. ओमेगा इंजिनियरींग सर्व्हीस,औरंगाबाद यांनी ॲमको ॲटरीसाठी दर भरले असून बॅटरीची वॉरंटी एक वर्ष दिली आहे. मे.व्हेस्पा ॲक्युम्यलेटर ॲक्ससेरील ॲण्ड केमिकल्स यांनी सुरज मेक या बॅटरीसाठी उत्पादक असून त्याचे दर कमी आहेत व त्यांना या बॅटरीसाठी दिड वर्षाची वॉरंटी दिली आहे.त्यांना मा.आयुक्तांनी दराच्या वाटाघाटीत बोलावले असता त्यांनी त्याचे दर आणखी १०% कमी केले आहेत.कमी केलेल्या दराप्रमाणे विविध बॅटऱ्याचे दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बॅटरीचा प्रकार (फूलली चार्जर्ड) | किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | ६ व्होल्ट ४ ॲम्पीयर | ४७३.५० |
| २ | १२ व्होल्ट १४ ॲम्पीयर | ७८३.०० |
| ३ | १२ व्होल्ट ११ प्लेट | ३००६.०० |
| ४ | १२ व्होल्ट १३ प्लेट | ३४३८.०० |
| ५ | १२ व्होल्ट १५ प्लेट | ३६४५.०० |
| ६ | १२ व्होल्ट १७ प्लेट | ४५९९.०० |
| ७ | १२ व्होल्ट १९ प्लेट | ५०३१.०० |
| ८ | १२ व्होल्ट २१ प्लेट | ५६३३.०० |
| ९ | १२ व्होल्ट २५ प्लेट | ६१४७.०० |

सदरील कंपनीचे सर्व बॅटऱ्यासाठी एकूण १८ महिन्याची गॅरंटी दिली आहे.वर्षभरात अंदाजे २ लाख रुपये किंमतीची बॅटरीज खरेदी अपेक्षित आहे.तरी सदरील कंपनीशी वार्षिक करार करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध वाहनासाठी लागणाऱ्या विविध आकारांच्या बॅटरीज खरेदी करण्यासाठी ९७-९८ या आथिक वर्षाकरीता अ.क्र.१ ते ९ करीता त्यांचे समोर दर्शविलेल्या दराने बॅटरीज खरेदीस्तव मे.व्हेस्पा ॲक्युम्युलेटर ॲकसेसरील ॲण्ड केमिकल्स यांचेशी करार करण्यांस व त्यांचे कडुन बॅटरीज खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८४/१०:**

महानगरपालिकेच्या विविध वाहनांच्या टायर रिट्रेडींगच्या कामाकरीता सन १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी करार करण्यासाठी वर्तमानपत्रात निविदा सुचना देऊन निविदापत्रके मागविण्यात आली.एकूण तीन निविदापत्रके विक्री झाली व वसुल झाली. मे.मारुती टायर्स,ओरंगाबाद हे एलजी कंपनीच्या रबर बेल्टचे अधिकृत असुन त्याचे दर आलेले आहेत. मामा.आयुक्तांनी सदरील एजन्सीस दि.१६-५-९७ रोजी वाटाघाटीस बोलावले असता त्यांनी त्यांचे दर आणखी १०% नी कमी केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | टायर साईज | टायर रिट्रेडींग किंमत | कट रिपेअर चार्ज | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १" | २" | ३" | ४" |
| १ | ५.९०X१५ | ६३०/- | ११२ | २०२ | २९२ | ३६० |
| २ | ५६०X१३/१५५० एसआर-१३ | ६३०/- | | | | |
| ३ | ५६५X१२ | ५८५/- | | | | |
| ४ | १७५७०५ एसआर-१३ | ७६५/- | | | | |
| ५ | ४५०X१२ | ५८५/- | | | | |
| ६ | ६००X१६ | ७८७.५० | | | | |
| ७ | १९५ एस आर-१३ | ९००/- | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | एफ-७८x१५ | ९९०/- | |
| ९ | ७.५०x१६ | १०८०/- | |
| १० | ९.००x२० | ९३५/- | |
| ११ | १०० व्हा x२० | २०७०/- | |
| १२ | ६.००x१६टाटा एफ | ७४२/- | |
| १३ | १२x४ x २८ | २९७०/- | |
| १४ | ७.००x१५ | ९००/- | |

सन १९९७-९८ या आर्थिक वर्षात अंदाजे ३ लाख रुपयाचे टायर रिट्रेडींगचे काम गृहीत धरण्यात आले आहे.तरी मे.मारुती टायर्स,औरंगाबाद यांचे दर वार्षिक करारासाठी मंजुर करण्याचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या विविध वाहनांच्या टायर रिट्रेडींगच्या कामाकरीता सन १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी मे.मारुती टायर्स,औरंगाबाद यांचेशी करार करण्यास व त्यांचेकडून रिट्रेडींगचे काम प्रस्तावित अॅटम क्र. १ ते १४ समोर दर्शविलेल्या दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८५/११:**

महानगरपालिकेच्या विविध वाहनाच्या अॅटो इलेक्ट्रीकल्सच्या कामासाठी लागणारे जॉबवर्क,स्पेअरपार्टस,व लिसपार्टस करीता वर्तमानपत्रातून निविदा सुचना देवून निविदा पत्रके मागविण्यात आली असता एकूण ३ निविदा पत्रके विक्री झाली व ३ निविदा पत्रके वसुल झाली. सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.विकास ट्रेडर्स,औरंगाबाद यांचे असून त्यांना मा.आयुक्त यांनी दि. १६-५-९७ रोजी वाटाघाटीस बोलाविले असता त्यांनी वाटाघाटीत नंतर खालील दरांना जॉबवर्क करण्यास व स्पेअरपार्टस पुरवठा करण्यास मान्यता दिली आहे.

१) जॉबवर्क अंदाजपत्रकापेक्षा १५% कमी दराने
२) स्पेअर पार्टस मॅक्झीमम रिटेल प्राईजलिस्ट पेक्षा २.१% कमी दराने
३) लिस पार्टस अंदाजपत्रकापेक्षा ५% कमी दराने

सन १९९७-९८ या आर्थिक वर्षात सर्व वाहनाचे अॅटो इलेक्ट्रीकन्सचे काम अंदाजे रुपये ५ लाखा पर्यंत अपेक्षीत आहे.मे.विकास ट्रेडर्स,औरंगाबाद यांनी वाटाघाटीनंतर कमी केलेल्या दरानुसार सन १९९७-९८ या व आर्थिक वर्षाकरीता वार्षिक करार करण्यांच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध वाहनाच्या अॅटो इलेक्ट्रीकल्सच्या कामासाठी लागणारे जॉबवर्क,स्पेअरपार्टस,व लिसपार्टस अनुक्रमे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी मॅक्झीमम रिटेल प्राईज लिस्टपेक्षा २.१% कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने मे.विकास ट्रेडर्स यांचेकडून करुन घेण्यास व सन

९७-९८ या आर्थिक वर्षासाठी करार करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६/१२:**

औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीसाठी मंजुर झालेल्या विकास योजनेत मो.कांचनवाडी येथील गट नंबर ४० मध्ये विविध विकास योजना रस्त्यामध्ये, चेअरमन,संताजी गृह निर्माण संस्था त्यांनी सुमारे ११२७१ चौ.मी.जमीन बांधीत होते.सदर जमीन मालकांना या गट नं.४० मधील त्यांचे मालकीच्या दाखल केलेल्या प्रकरणामध्ये सदरील रेखांकनामार्फत रस्त्यासह विकास योजना रस्ते ६० मी,१८मी.१५ मी.व १२ मीटर व खुली जागा नोंदणीकृत दस्तऐवज क्रमांक १७५४/९४ दि. १४-१०-९४ अन्वये महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेले आहेत.त्यांचे सदरील रेखांकनास आदेश जा.क्र.मनपा/नरवि/३१०२ दि. १८-१०-९४ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यामधील बाब क्रमांक १५ नुसार जमीन विकास शुल्काची आकारणी करण्यांत आल्याचे तसेच त्यापैकी भागशः रक्कमेचा भरणा केल्याचे दिसून येते.त्यामधील तरतुदी नुसार संबंधितांनी १८% व्याज दि. ३१-३-९५ नंतरच्या रकमेचा भरणा करतांना भरावयाचे आहे.हयाबाबत अर्जदारांनी शासनाकडे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४७ चे दुरुस्ती अधिनियम १९२२ चे कलम १२४ जी नुसार अपिल दाखल केले होते.ते त्यांनी मागे घेतलेले होते.

अर्जदाराने त्यानंतर केलेल्या विनंतीचा विचार करुन जागेचे मुल्यांकन १९९४ चे सिध्दशिर्ष गणकाचे दरानुसार रुपये ४,०१,१५०/- निश्चित केलेले आहे. पैकी जमीन विकास शुल्कापोटी रक्कम रु. २,८४,३१२/- वळती करणे योग्य व उर्वरित रक्कम रु. १,१७,८३८/- अर्जदारास देणे योग्य.जमिनीचे मुल्यांकन जमीन मालकांना मान्य केलेले आहे.मोबदला रक्कमेच्या मान्यतेस्तव व प्रस्तावित विनियोगास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीसाठी मंजुर झालेल्या विकास योजनेत मो.कांचनवाडी येथील गट नंबर ४० मध्ये विविध विकास योजना रस्त्यामध्ये, चेअरमन,संताजी गृह निर्माण संस्था त्यांनी सुमारे ११२७१ चौ.मी.जमीन बांधीत होत असून जमिनीचा रक्कम रु. ४,०१,१५०/- पैकी जमीन विकास शुल्कापोटी रक्कम रु.२,८४,३१२/- वळती करुन उर्वरित रक्कम रु.१,१७,८३८/- संबंधित जमीन मालकास देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७/१३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.मुकुंदवाडी (शिवाजी कॉलनी) लायन्सक्लब येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे करीता अंदाजपत्रक रु. १३,८२,६००/- सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांची दरसुची १९९५-९६ नुसार तयार करण्यांत आली असून मा.आयुक्तांनी दि. ४-१-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली व सदर अंदाजपत्रकाची मान्यता सर्वसाधारण सभेचा ठराव क्र........ दि........ अन्वये मिळाला असुन रितसर वृत्तपत्रात प्रगट निविदा सुचना क्र.मनपा लेखा/नि/३२/९७ दि. ३-५-९७ द्वारे प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेस फक्त पाच मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या.

त्या निविदा दि.२८-५-९७ रोजी उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर पुढील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री.के.बी.पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा | १९.२१% | कमी |
| २) श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प. दरापेक्षा | १६.८०% | कमी |
| ३) डी.अजितसिंग | अं.प.दरापेक्षा | १५.५% | कमी |
| ४) रे कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा | ९% | कमी |
| ५) मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा | १.८६% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२१% कमी दराची श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा आहे.करीता निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.सदर काम १८ खेडी विकास योजना अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकुंदवाडी (शिवाजी कॉलनी) लायन्स क्लब येथील डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १९.२१% कमी दराची श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८८/१४:**

एन-९ सेक्टर यशवंत को.ऑप.हाऊसिंग सोसायटी येथे नगरसेवक स्वेच्छा निधीतुन जलनिःसारण वाहिनी टाकण्याचे कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. १,४४,९८३/- चे तयार करण्यांत आले असून परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे.सदर कामावर होणारा खर्च श्री.सुदाम सोनवणे स. नगरसेवक यांच्या स्वेच्छा निधीतुन केला जाणार आहे.

तरी एन-९/बी यशवंत को-ऑ.हाऊसिंग सोसायटी येथे जलनिःसारण वाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,४४,९८३/- चे मंजुरीबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-९/बी सेक्टर येथील यशवंत को-ऑप.हाऊसिंग सोसायटी येथे मा.सभागृह नेता श्री. सुदाम सोनवणे यांच्या स्वेच्छा निधीतुन जलनिःसारण वाहिनी टाकण्याचे कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,४४,९८३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.काम उपलब्ध गुत्तेदारामार्फत करुन घ्यावे.

**विषय क्र.८९/१५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणी संग्रहालय येथील पिवळय वाघाच्या पिंजऱ्याचे क्षेत्रफळ वाढ करणे.मागील शिल्लक भिंत बांधणे,पिंजऱ्या समोर खदक तयार करणे इत्यादी कामासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २१६/९ दि. १०-३-९७ अन्वये रक्कम रु. ७,९२,७१०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा /लेखा/नि/३२/९० दि. ३-५-९७ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (१५) कोऱ्या निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या

अंतिम तारखेपर्यंत अंतिम तारखेपर्यंत एकूण (५) निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दि. २८.५.९७ ला उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सय्यद शुजात अली हाशमी | ४.५% | कमी दराने |
| २) श्री. सलीम पटेल | १४.२९% | कमी दराने |
| ३) श्री.आर.बी.चव्हाण | २७.००% | कमी दराने |
| ४) श्री.राणा कन्स्ट्रक्शन | २३.६०% | कमी दराने |
| ५) श्री.एस.के.नाहोलाकर | ६.५% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.००% कमी दराची श्री.आर.बी.चव्हाण यांची निविदा असुन दि. १०-६-९७ रोजी त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी दराची श्री. आर.बी.चव्हाण यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणी संग्रहालय येथील पिवळया वाघाच्या पिंजऱ्याचे क्षेत्रफळ वाढ करणे मागील शिल्लक भिंत बांधणे पिंजऱ्यासमोर खंदक तयार करणे इ.कामासाठी प्राप्त इझालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २७% कमी दराची श्री.आर.बी.चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९०/१६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.घाटी जयभिमनगर स्लम येथे गुलाबवाडी परिसरात ३०० मी.मी. आर.सी.सी.पाईप जलनि:सारण वाहिनी टाकणे बाबत व जोड रस्ता करणे बाबत कामाकरीता सा.बा.खाते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसुची नुसार रु. १,९६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम"खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.७-६-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु. १,९६,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी जयभिमनगर स्लम येथे गुलाबवाडी परिसरात ३०० मी.मी. आर.सी.सी.पाईप जलनि:सारण वाहिनी टाकणे बाबत व जोड रस्ता करणे बाबत कामाकरीता तयार करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,९६,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९१/१७:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कैसर कॉलनी अंतर्गत निवास पासुन ते जाधवचे घरापर्यंत दगडी गटार बांधणेच्या कामाकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,०४,६१०/- चे तयार करण्यांत आले असून सदरील काम लेखाशिर्षक "शहरी भागात खुल्या गटारी बांधणे" यातून प्रस्तावित आहे.

सदरील कामास मा.आयुक्तांनी दि. ७-६-९७ ला मंजुरी दिलेली आहे.तरी सदरील प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी अंतर्गत अंतिया निवासापासुन ते जाधवचे घरापर्यंत दगडी गटार बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,०४,६१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "शहरी भागात खुल्या गटारी बांधणे"या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९२/१८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,जिल्हाधिकारी कार्यालय येथील प्रशासकीय इमारती समोरील फुटपाथवर फरशी किंवा चकर्ड टाईल्स बसविणे बाबत सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,८५,९६०/- चे तयार करण्यांत आले असून सदरील काम "भांडवली रस्ते" या शिर्षकातून केलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथील प्रशासकीय इमारती समोरील फुटपाथवर फरशी किंवा चकर्ड टाईल्स बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. २,८५,९६०/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम "भांडवली रस्ते" या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९३/१९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,नवी वस्ती पदूमपूरा येथे १५०,२५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. जलनि:सारण वाहिनी टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. २,९८,५००/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च जलनि:सारण भांडवली हया आर्थिक शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,नवी वस्ती पदूमपूरा येथे १५०,२५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. जलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,९८,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च जलनि:सारण भांडवली हया शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९४/२०:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,स.सदस्यांनी सन ९७-९८ च्या अंदाजपत्रकासोबत प्रत्येकी एक ब्रिफकेस देण्यात आली.

दि. ११-३-९७ रोजी मा.महापौर यांच्या दालनात त्यावेळच्या मा.महापोर सोबत झालेल्या चर्चेनुसार व्हि.आय.पी.ब्रिफकेस खरेदी करण्यात येवून त्यासर्व स.सदस्यांना पुरविण्यांत आल्या.सदरील ब्रिफकेस व्हि.आय.पी.चे स्थानिक मुख्य वितरक मे.प्रकाश स्टोअर्स यांचे मार्फत बॅगाची तपासणी व नमुने तपासणी करुन त्या मधुन व्हि.आय.पी.ओडी-बि.यु.-१ ज्याची किंमत रु. १३०५/- प्रति नग होती ती चर्चेअंती कमी करुन रु.११००/- प्रतिनगानुसार खरेदी करण्याचे ठरले.त्यासाठी रु.९०२००/- एवढा खर्च आला.

सदरील खर्च किरकोळा लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात आला असून प्रस्ताव कृपया कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,९७-९८ च्या अर्थसंकल्पासोबत सर्व स.सदस्यांना ब्रीफकेस देण्यांत आलेल्या आहेत.मे.प्रकाश स्टोअर्स यांचे मार्फत खरेदी करण्यात आलेल्या बॅगाचा नमुना मा.महापौरांसमक्ष पसंत केल्यानुसार प्रतिनग रु. ११००/- प्रमाणे खरेी करण्यात आलेल्या बॅगांसाठी एकूण खर्च रु. ९०,२००/- ला कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९५/२१:**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की,दि. १०-३-९७ रोजी सर्वसाधारण सभेच्या प्रस्ताव क्र. २४०/१ अन्वये मा.आयुक्त यांनी मान्य केलेल्या दरानुसार महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये बालवाडयांना शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याच्या रक्कम रु. १७,५०,०००/- च्या अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.त्यानंतर सदर प्रस्तावास मा.आयुक्तांनी दुरुस्ती सुचविली.त्यानुसार सदर साहित्य केवळ ५,९९,६२४/-रुपयांचे खरेदी करावयाचे ठरले.त्याप्रमाणे मे.स्कायलाईप यांचेकडून खालील मान्य दराने शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | | | |
|---|---|---|---|
| १) बालवाडी साहित्य एका संचालक | ६% | रिबेट वजा जाता | २०६७/- |
| २) सतरंजी १ नगास | ६% | --//-- | १४८५=२० |
| ३) शैक्षणिक चार्टस (पीव्हीसी) प्रतिसंच | ६% | --//-- | ३९४=३३ |

सदर खर्च सरकारी कर्ज परतफेड या लेखाशिर्षकाखाली करण्याबाबतचा दुरुस्ती प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये बालवाडयांना शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याकरीता मे.स्कायलाईन यांचे मान्य दराने खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) बालवाडी साहित्य एका संचालक | ६% | रिबेट वजा जाता | २०६७/- |
| २) सतरंजी १ नगास | ६% | --//-- | १४८५=२० |
| ३) शैक्षणिक चार्टस (पीव्हीसी) प्रतिसंच | ६% | --//-- | ३९४=३३ |

सदर खर्च सरकारी कर्ज परतफेड या लेखाशिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९६/२२:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती करीता विविध व्यासाचे स्लुस व्हॉल करावयाचे आहेत.त्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ४,८७,५९३/- एवढयाचे तयार करण्यांत येवून स्थायी समितीचा ठराव क्र.५४०/११ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. २३७/९० जी.की.दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात येवून डी.फॉर्मवर निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार (४) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस व वेळेपर्यंत एकूण दोन (२) निविदा सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.अर्थ मुव्हर्स | ०.९१% जास्त |
| २) मे.एस.एस.एस.आय.डी.सी. | २४.०८% जास्त |

वरीलप्रमाणेच्या तुलनात्मक दृष्टया कमी दर हा मे.अर्थमुव्हर्स यांनी दिलेला दर कमी आहे.परंतु कार्यालयास त्यांना दिलेला दर हा जास्तीचा वाटत असल्यामुळे मा.आयुक्त यांच्या सोबत मे.अर्थ मुव्हर्स यांची दराबाबत वाटाघाटी करण्यात आली.त्या मध्ये अंदाजपत्रकीय दराने मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असून मे.अर्थ मुव्हर्स यांनी मान्य केले आहे.तरी वाटाघाटी अंतीमच्या म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार मे.अर्थ मुव्हर्स यांची निविदा स्विकृतीसह प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा व देखभाल व दुरुस्ती करीता विविध व्यासाचे स्लुस व्हॉल खरेदी करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी कमी दराचे निविदाधारक मे.अर्थ मुव्हर्स यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९७/२३:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बौध्द नगर भागात १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. २,०४,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बौध्दनगर भागात १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,०४,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामाच्या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९८/२४:**

कामधेनु सहकारी गृहनिर्माण संस्था जाधववाडी येथे जलनि:सारण वाहीनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,९४,५९४/- चे तयार करण्यात आलेले आहे.सदरील संस्था रेखांकन असुन १००% विकास निधी भरलेला आहे.सदर अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून या कामावर होणारा खर्च ९७-९८ च्या भांडवली कामे जलनि:सारण या लेखाशिर्षकातून करण्यात येत आहे.अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी कामधेनु सहकारी गृहनिर्माण संस्था जाधववाडी येथे जलनि:सारण वाहीनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,९४,५९४ चे स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दशविल्याप्रमाणे कामधेनु सहकारी गृहनिर्माण संस्था जाधववाडी येथे जलनि:सारण वाहीनी टाकण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,९४,५९४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामाच्या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९९/२५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.रशिद मामू कॉलनी येथे समाजमंदिर बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. १९३,०००/-चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सन ९५-९६ मध्ये सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढीव तरतुद मिळेल या अटीवर मा.आयुक्तांनी दि.३-१-९६ ला मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रु. १,९३,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च सन ९५-९६ या वर्षात ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या लेखाशिर्षमधुन सुधारीत अंदाजपपत्रकामध्ये वाढवुन दिलेल्या अर्थ तरतुदीमधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रशिद मामू कॉलनी येथे समाजमंदिर बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,९३,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च ९५-९६ या वर्षात ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या लेखाशिर्षमधून सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढवुन दिलेल्या अर्थ तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१००/२६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.हर्सुल गांव स्लम येथील अर्धगोलाकार गटार दुरुस्त करणे बाबत कामाकरीता सा.बा.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. १,१७,७५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम "अठराखेडी विकास योजना" या शिर्षातून करण्यात येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि. ७-६-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.१,९७,७५०/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल गांव स्लम येथील अर्धगोलाकार गटार दुरुस्त करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१७,७५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "अठरा खेडी विकास योजना" या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०१/२७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.जिन्सी येथील मनपाचे जागेवर दुकान व वाचनालयासाठी इमारत बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दर सुचीनुसार रक्कम रु. ३,१२,७२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.९-६-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु. ३,१२,७२५/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.सदरचा खर्च इतर वाचनालय या लेखा शिर्षामधून करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी येथील मनपाचे जागेवर दुकान व वाचनालयासाठी इमारत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,१२,७२५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर इतर वाचनालय या लेखा शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०२/२८:**

मो.सुरेवाडी येथील जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.४,९९,५५०/- चे तयार करण्यात आले असून सदरील,वसाहत अनधिकृत असल्यामुळे अंदाजपत्रकाच्या २५% (टक्के) लोकवर्गणी रु.१,२४,८८८/- पैकी १,०५,०००/- रु.देण्यांत आले असून उर्वरित रक्कम त्वरीत भरणार आहेत.दि.१०-३-९७ रोजीच्या ठराव क्र.२१३/६ अन्वये सर्वसाधारण सभेत अंदाजपत्रकास मान्यता मिळाली.त्या अनुषंगाने निविदा काढण्यांत आली.विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेला मोहोरबंद निविदा ३ प्राप्त झाल्या.त्या निविदा उपस्थित ठेकेदार समोर उघडण्यांत आल्या ठेकेदाराने दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१) मे.शिवा कन्स्ट्रक्शन ४.४४% जास्त दराने
२) श्री.नंदकुमार घोडेले अंदाजपत्रकीय दराने
३) श्री.जी.आर.घोडेले ३.८३% जास्त दराने

उपरोक्त प्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची अंदाजपत्रकीय दराची निविदा श्री.नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुरेवाडी येथे जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०३/२९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिध्दर्थ उद्यानामध्ये संगीत कारंजे व इतर कामे करण्याच्या कामासाठी सन ९६-९७ च्या शासकीय अनुदानामधून ८०=०० लाख रुपयांची तरतुद ठेवण्यात आली असून सदरच्या तरतुदीमधून संगीत कारंजे बसविण्याचे कामासाठी रक्कम रु. २९,०५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदरील अंदाजपत्रकास दि.---------- च्या सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामास वर नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्याप्रमाणे कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/बी-१/०८/९७ दि. ४-१-९७ अन्वये निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (३) तीन निविदा पत्रके विकल्या गेली असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (३) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली असून प्राप्त निविदा पत्रके दि. ३१-१-९७ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) प्रिमिअर इरीगेशन | २४% | कमी दराने |
| २) नेल्ट्रानिक्स कंपनी | २१% | --//-- |
| ३) दिप ॲण्ड दिप इन्डस्ट्रीज | ०१.१५% | --//-- |

वरील तीनही कंपनीच्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% कमी दराने प्रिमीअर इरीगेशन यांची निविदा आहे.

करीता सर्वात कमी दर असलेली प्रिमीअर इरीगेशन यांची २४% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानामध्ये संगीत कारंजे व इतर कामे करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% कमी दराची मे.प्रिमीअर इरीगेशन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०४/३०:**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी रु. २ लक्ष किंमतीची ग्रंथ संपदा खरेदी करण आहे.वृत्तपत्रांतून ९७-९८ या वर्षासाठी जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्यात.एकूण चार कोऱ्या निविदा विकल्या गेल्या त्यापैकी दोन सिलबंद निविदा विहित मुदतीच्या आत प्राप्त झाल्यात. तुलनात्मक तक्त्यानुसार व्यंकटेश बुक सेंटर,औरंगपुरा,औरंगाबाद यांनी ग्रंथ खरेदीवर सर्वात जास्त सुट १५.५% सुट देण्याचे तर परिमल प्रकाशन यांनी १५% सुट नमुद केली आहे.मा.आयुक्तांनी दि.२९-३-९७ रोजी १५.५% सुट देणाऱ्या व्यंकटेश बुक सेंटर

यांचे दरांना मान्यता प्रदान केली आहे.तरी सर्वात जास्त सुट देणाऱ्या व्यकंटेश बुक सेंटर,औरंगाबादच्या दरांना मान्यता मिळावी  यास्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राकरीता खरेदी करावयाच्या रक्कम रु. २ लक्ष किंमतीच्या ग्रंथ संपदा खरेदी करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी सर्वात जास्त सुट देणाऱ्या म्हणजे १५.५% सुट देणाऱ्या मे.व्यकंटेश बुक सेंटर यांचे दरास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५/३१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, तळेश्वर स.गृह निर्माण संस्था,बेगमपुरा येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे कामाचे अंदाजपत्रक सा.बा.खात्याचे सन ९६-९७ सालच्या दरसुची अन्वये रक्कम रु. १,५०,०००/- तयार करण्यांत आले.या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर कामाचे खच्र विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदी अंतर्गत करण्यात येणार आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तळेश्वर स.गृहनिर्माण संस्था,बेगमपुरा येथील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण" या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०६/३२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.किराडपुरा मनपाच्या शाळा क्र. १ येथील मनपाच्या खुल्या जागेवर सांस्कृतिक सभागृह बांधणे बाबातचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५,००,०००/- चे सा.बा.खात्याच्या सन ९६-९७ सालाच्या दरसुची अन्वये तयार करण्यात आले.त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे.या अनुषगाने सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्याकरीता शहरातील दै.लोकमत,दै.आलमगिर टाईम्स,दै.नवा मराठा इत्यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द केले.विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा १० (दहा) विकले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सीलबंद पाकीटात (३) तीन निविदा प्राप्त झाल्या.सदरील निविदा लेखा-१ यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यांत आले.त्यास दिलेले दर खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) एस.ए.नवाब | ४.९२% | अं.प.दरापेक्षा जास्त दराचे दर |
| २) मो.सिराजोद्दीन सिद्दीकी | ८% | --//-- |
| ३) एच.जी.पठाण | ९.०२% | --//-- |

सदरील दर पत्रकात सर्वात कमी तुलनात्मक दृष्टया श्री.एस.ए.नवाब गुत्तेदार यांचे अं.प.दरापेक्षा ४.९२% जास्त दराचे दर आहे.सदर मंजुरीस्तव मा.आयुक्त यांच्याकडे सादर करण्यांत आले.त्यावर माननीय आयुक्त यांनी तात्काळ वाटाघाटीसाठी बोलावावे या आदेशा अन्वये संबंधीत गुत्तेदार यांची मा.आयुक्त साहेब यांच्याशी दराच्या संदर्भात चर्चा घडवून

आली.त्या संबंधित गुत्तेदार यांनी अ.प.दरात काम करण्यात मान्य केले व त्या मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली.सदर कामाचे खर्च स्थानिक विकास कार्यक्रम सन ९६-९७ आमदार निधी अंतर्गत करण्यांत येणार आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ,मो.किराडपुरा मनपाच्या शाळा क्र. १ येथील मनपाच्या खुल्या जागेवर सांस्कृतिक सभागृह बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची निविदा धारक श्री.एस.ए.नवाब यांचेशी झालेल्या चर्चेनुसार हे काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०७/३३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शाहुनगर (बन्सीलालनगर परिसर) येथील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करणेच्या कामाचे अंदाजपत्रक स्थायी समिती विषय क्र. ७५७/१० दि. २९-३-९७ मंजुरी झालेली आहे. या अनुषंगाने बी-१ नमुन्या निविदा पत्रके मागविण्या करीता शहरातील दै.लोकमत,आलमगीर टाईम्स,दै.नवा मराठा इत्यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत आले.विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण १४ (चौदा) विकले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सील बंदा पाकीटात एकूण (७) सात प्राप्त झाले.

सदरील निविदा लेखा-१ यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले असता दिलेले दराचे तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) एस.एम.मंडोरे | अं.प.दरापेक्षा | २०.८६% | कमी दराचे दर |
| २) मे.साई कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा | १७.०८% | कमी दराचे दर |
| ३) शेख मसुद | --//--- | १७.०८६% | --//-- |
| ४) एम.एम.पठाण | --//-- | १६.८५% | --//-- |
| ५) एस.एच.असोशिएटस | --//-- | १६.५५% | --//-- |
| ६) न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | --//-- | ९% | --//-- |
| ७) एस.ले.नाहोळीकर | --//-- | अंदाजपत्रकीय दराचे दर. | |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मक दृष्टया श्री. एस.एम.मंडोरे यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.८६% कमी दराचे दर आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शाहुनगर (बन्सीलालनगर परिसर) येथील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.८६% कमी दराची श्री.एस.एम.मंडोरे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०८/३४:**

मो.टिळकपथ येथील प्रताप कन्स्ट्रक्शन व मे.सुराणा कन्स्ट्रक्शन यांचे मालकीचा न.भु.क्र.५१९६/१ या मिळकती मधुन अतिशहर अभियंता यांनी रस्त्याचे काम केलेले असुन प्रत्यक्ष जागेवर या न.भु.क्रमांकामधील तेवढया क्षेत्राचा रस्ता म्हणून वापर होत आहे.आता संबंधित जमिन मालकाने रस्त्याकरीता वापरण्यात आलेल्या जागेचा मोबदला मिळावा म्हणून मागणी केली आहे.

सिध्दशीर्घगणकानुसार या भागातील जमिनीचे दर घेऊन या प्रकरणी मुल्यांकन करता रस्त्याखालील ७८-७६ चौ.मी.क्षेत्राचा रु. ६,६९,५४२/- एवढा मोबदला निश्चित करण्यात आला आहे.खाजगी वाटाघाटी मध्ये संबंधिताने हया मुल्यास मान्यता दिलेली आहे.करीता जमिन मुल्य व जमिन संपादन करावयाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

मान्यतेनंतर रितसर नोंदणीकृत दस्त ऐवजाने जमीन हस्तांतरीत करुन घेण्यात येईल.नोंदणीकृत दस्तदेवजकरीता (खरेदी खता करीता नोंदणीकृत दस्तऐवजकरीता (खरेदीखता करीता येणारा खर्च रक्कम रु. ६०,३००/- महानगरपालिका करणार आहे. करीता त्या खर्चाची रक्कम रु. ६०,३००/- श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यात यावी. प्रस्ताव मान्यतेस्व सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मो. मो.टिळकपथ येथील प्रताप कन्स्ट्रक्शन व मे.सुराणा कन्स्ट्रक्शन यांचे मालकीचा न.भु.क्र.५१९६/१ या मिळकती मधील रस्त्याकर संपादित करण्यात आलेल्या ७८-७६ चौ.मी. क्षेत्राचा मोबदला रक्कम रु. ६,६९,५४२/- संबंधितास देण्यात तसेच नोंदणीकृत दस्त ऐवजचा खर्च रु. ६०,३०००/- मनपाने करण्यास व याकरीता अग्रीम रक्कम रु. ६०,३००/- श्री.डी.कालेले शाखा अभियंता यांना देण्याकरीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.या प्रस्तावास याच सभेत स्वीकृती देण्यांत येते.

"जन गण मन" या राष्ट्र गीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-<br>मा.नगरसचिव<br>महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-<br>मा.सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २७-६-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दि. २७-६-९७ रोजी मा.सभापती श्री.प्रभाकर विधाते यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस "मलिक अंबर" या सभागृहात "वंदे मातरम्" या गीताने दुपारी ४.०० वाजता झाली. सभेला अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १)श्री.गिरजाराम हाळनोर | सभासद |
| २) श्री.त्रिंबक तुपे | --//-- |
| ३)श्री.सुभाष टाकळकर | --//-- |
| ४)श्री.कचरु नवपुते | --//-- |
| ५) श्री.अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ६) श्री.विकास जैन | --//-- |
| ७) श्री.भगवान घडामोडे | --//-- |
| ८) श्री.अब्दुल रशिदखाँन (मामू) | --//-- |
| ९) श्री.स.अ.रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| १०) श्री.स.अली मिरा सलामी | --//-- |
| ११) श्री.जोशी संजय रामदास | --//-- |
| १२) श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १३) सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १४) श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| १५) श्री.जयवंत केशवराव ओक | --//-- |

**संवाद :**

**श्री.जयवंत ओक :** स.नगर सेवकाचा स्वेच्छा निधी कोणत्या कामासाठी वापरतात याचा काही नियम आहे का या बाबत खुलासा व्हावा.माझ्या स्वेच्छा निधीतून एम.एस.ई.बी.क्वार्टर मध्ये खेळाचे साहित्य बसविण्यासाठी पत्र दिले आहे.त्यावर विचार झालेला नाही.या पत्राबाबत एम.एस.ई.बी. क्वार्टर मध्ये स्वेच्छा निधीतून खेळाचे साहित्य बसविता येत नाही. असा खुलासा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

**मा.सभापती :** स.सभासदाच्या पत्राप्रमाणे एम.एस.ई.बी.क्वार्टरमध्ये खेळाचे साहित्य बसविण्याची जागा महानगरपालिका मालकीची असेत तर खेळाचे साहित्य बसविता येईल. या बाबत माहिती घ्यावी लागेल.

**श्री.जयवंत ओक :** एम.एस.ई.बी.क्वार्टर बाबत महानगरपालिकेकडे मालमत्ता व पाणी पट्टी कराचा भरणा करण्यांत येतो.या जागेबाबत नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असेल तर तसे पत्र देता येईल.

**शहर अभियंता :** स.नगरसेवकांनी ज्या ठिकाणी खेळाचे साहित्य बसविण्याची मागणी केलेली आहे. त्या जागेवर नियमाप्रमाणे लहान मुलांचे खेळाचे साहित्य बसविता येत नाही म्हणुन पत्र दिले आहे.

**श्री.जयवंत ओक :** नगरसेवकांनी बराच निधी आज पर्यंत अनेक कामासाठी वापरला आहे.महानगरपालिका नागरिंकांकडून कर वसुल करते माझ्या वार्डात काही

महत्वाचा भाग आहे. यात पोलीस हेडक्वार्टर व आणखी काही शासकीय निवासस्थाने अशा काही महत्वाचा भाग आहे.या ठिकाणी काही सुविधा म्हणून लहान मुलांचे खेळाचे साहित्य स्वेच्छा निधीतुन बसविण्याची मागणी केलेली आहे.

**श्री.अब्दुल रशिदखॉंन (मामू)** : स.नगर सेवकाचं सुचनेप्रमाणे माझ्या ही वार्डामध्ये जिल्हा परिषद क्वार्टर व इतर शासकीय निवासस्थाने आहे.अशा ठिकाणी मतदार राहतात.त्या भागात स्वेच्छा निधितून कशा प्रकारे सुविधा द्याव्यात हा ही प्रश्न आहेत.

**श्री.विकास जैन** : नगरसेवक स्वेच्छानिधीतून वार्डातील मुलांचा खेळासाठी साहित्य पुरविल्या नंतर त्या ठिकाणी त्या भागातील व इतर भागातील लहान मुले खेळण्यासाठी घेऊ शकतात.

**श्री.संजय जोशी :** ज्या अर्थी महानगरपालिकेने लेआऊट मंजुर केलेला आहे.त्याअर्थी १० टक्के जागा राखीव ठेवलेले आहे. या शिवाय येथील इमारती बांधकाम परवानगी दिलेली आहे.तर मग अशा ठिकाणी खेळाचे साहित्य नगरसेवक स्वेच्छानिधीतून देण्यात काहीच हरकत नाही.

**मा.आयुक्त :** स.नगरसेवकांनी केलेल्या मागणीनुसार स्वेच्छा निधीतून खेळाचे साहित्य देता येईल.परंतु अशी जागा महानगरपालिका मालकीची असणे जरुरी आहे.म्हणजे पुढे चालून त्या बाबत काही अडचणी निर्माण होणार नाही. लेआऊट मंजुर असले तर मोकळया जागेत असे साहित्य देण्यांत हरकत नाही.

**श्री.स.अ.मिरा सलामी** : ज्या ठिकाणी लहान मुलांकरीता खेळाचे साहित्य बसवायचे असेल त्या ठिकाणी त्या भागाजवळील जी मुले खेळण्यासाठी येतील त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती त्याचठिकाणी नोकरीस आहे काय? याबाबतची विचारणा करुन मा.सभापती यांनी खेळाचे साहित्य बसविणे आवश्यक आहे काय याचा विचार करावा.

**मा.सभापती :** स.सभासद श्री.जयवंत ओक यांनी या जागेबाबत नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे आणि नंतर त्यावर कार्यवाही करण्यात येईल.नगरसेवक स्वेच्छानिधीचे वापराबाबत नियमावली तयार करुन त्याची प्रत सभासदांना देण्यांत यावी.

**श्री.जयवंत ओक** : नगरसेवकांना अनेक कामासाठी प्रशासनास पत्र देतात अशा पत्रांची उत्तरे संबंधीत अधिकाऱ्यांनी व्यवस्थित दिली पाहिजे.परंतु तसे न होता अधिकारी आपल्या पदाचा गैर वापर करुन पत्राबाबत खुलासा करतात हे योग्य नाही.समर्थनगर भागातील नाथ जोगी स्मशानभूमीस संरक्षित किंवा बांधण्या बाबत जे पत्र दिलेले असतांनाही अद्याप पर्यंत या कामाचा अंदाजपत्रक स्थायी समिती समोर मंजुरीसाठी ठेवण्यांत आलेले नाही.नगरसेवकांनी प्रशासनास दिलेल्या पत्राप्रमाणे नगरसेवकांची कामे होणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** स.नगरसेवक श्री.जयवंत ओक यांच्या सुचने बाबत संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता** : स.नगरसेवक यांच्या सुचनेप्रमाणे समर्थनगर येथील नाथ जोशी समाजाचे स्मशान भूमीस संरक्षित भिंत बांधण्याचे कामाचे अंदाजपत्रक तयार करुन संचिका मंजुरीसाठी दाखल करण्यांत आलेली आहे.सदर काम स्थळ पाहणी साठी ठेवण्यांत आलेले आहे.

**श्री.अब्दुल रशिदखाँन (मामू)** : समर्थनगर येथील नाथ जोगी समाजाचा स्मशान भुमीस संरक्षित भिंत बांधण्याची कामाची पाहणी आजच्या पाहणी कार्यक्रमांत करण्यात आली असुन त्यावर निर्णय ही झालेला आहे.

**श्री.सुभाष टाकळकर** : नगरसेवक स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत घेऊन या शहरातील बरेच विद्यार्थी प्रशिक्षणासाठी गेलेले आहे. यापैकी काही विद्यार्थ्यांना मागील आर्थिक वर्षात नगरसेवकांनी स्वेच्छानिधीतून आर्थिक सहाय्य केले आहे.अशा विद्यार्थ्यांना या वर्षी ही प्रशिक्षणासाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतुन आर्थिक मदत देण्यात आली आहे.तेव्हा एकाच विद्यार्थ्याला अशा प्रकारे एकाच प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत देता येते का. विशेष महत्वाची बाब म्हणजे ज्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देण्यात आली आहे.असे विद्यार्थी आर्थिक मदत मिळाल्यानंतर ही प्रशिक्षणास गेले नाहीत.

**मा.आयुक्त :** स.सभासदराचे सुचनेप्रमाणे असे प्रकार घडले असतील तर नगरसेवक स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देणे बंद करणे योग्य राहील.

**श्री.संजय जोशी** : स.सभासद श्री. टाकळकर यांनी सुचविलेल्या प्रमाणे नगरसेवक स्वेच्छानिधीतून वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत मिळविण्याबाबत मेडीकल सर्टिफिकेट देण्याचे इस्कंडल देणे सुरु आहे.तेव्हा वैद्यकीय उपचारासाठी ज्या व्यक्तींना नगरसेवक स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत मजुर केली जाईल अशा वैयक्तीक ऐवजी ज्या डॉक्टरांकडे उपचार घेण्यात येत असेल त्या डॉक्टरच्या नांवे आर्थिक मदतीचा धनादेश देण्यांत यावा.तसेच रोग निदानाबाबात आर्थिक मदतीचे आवश्यकता असल्याचे मेडीकल बोर्डाचे पत्र ही घेण्यात यावे व त्यानंतर आर्थिक मदत देण्यांत यावी.

**मा.सभापती :** सभागृहातील चर्चानुसार प्रशिक्षणार्थींना नगरसेवक स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देणे बंद करण्यात यावे.तसेच ज्या नागरीकांना नगरसेवक स्वेच्छानिधीतून वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत मंजुर झाली असेल अशा नागरिकांच्या नावे आर्थिक मदतीचा धनादेश न देता ज्या दवाखान्यात अथवा डॉक्टरांकडे संबंधीत रुग्ण वैद्यकीय उपचार घेत असेल त्या हॉस्पीटल अथवा डॉक्टरचा नावे मदतीचा धनादेश देण्यांत यावा.याशिवाय आर्थिक मदत करण्यापुर्वी रोगी निदानाबाबत मेडीकल बोर्डाचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.

**श्री.स.अ.मीरा सलामी** : शहरात फैज-ए-आम या नावाने एक सेवाभावी संस्था कार्यरत आहे.या संस्थेतर्फे गरजु नागरिकांना आर्थिक मदत केली जाते.या संस्थेस गरजू नागरीकांना आर्थिक मदत देणे सोईचे व्हावे या दृष्टीने काही नगरसेवकांतर्फे स्वेच्छा निधीतुन संस्थेस आर्थिक मदत देण्याचे पत्र दिले आहे.फैज-ए-आम या सेवाभावी संस्थेचे कार्य आणि तत्परता लक्षात घेता सदर संस्थेस स्वेच्छा निधीतून मदत देण्यात यावी.

**मा.सभापती :** आपण म्हणतात ते पण बरोबर यानंतर संपूर्ण चौकशी करुनची निधी देण्यांत येईल.

**श्री.कचरु नवपुते** : मागील आठवडयात स्थानिक वृत्तपत्रात मनपा आयुक्त व पोलीस आयुक्त यांच्यात वाद अशा अशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.महानगरपालिकेस मनपा करापोटी अंदाजे रु.१३/१४ लाख रुपये पोलीस खात्याकडून येणे बाकी आहे.व पोलीस खात्याचे अंदाजे रु. १४

लाख मनपाकडे बाकी असल्याचे पोलीस आयुक्त व मनपा आयुक्त यांच्यात वाद दिसुन येते असे म्हटले आहे.तेव्हा ही बाब खरी आहे काय?

पोलीस आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक यांनी केलेले अनधिकृत बांधकाम मनपातर्फे पाडण्यात आल्यामुळे अशा प्रकारचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्द होणे योग्य नाही. एखादया सामान्य नागरिकांनी मनपाचा कर भरणा केला नाही तर संबंधीताचे नळ कनेक्शन तोडणे,जप्ती आणणे असे प्रकार केले जातात.पोलीस आयुक्त यांचे स्वीय सहाय्यकांकडून अशा प्रकारे दबाव आणला जात असेल तर त्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री. स.अली मिरा सलामी** : शहरात स्वच्छता मोहीम राबविली जात आहे.अनेक हॉटेल मालक दुकानातील कचरा नालीत टाकतात अशा प्रकारच्या आणि इतर अनेक कामाचे वेळी प्रशासनास नेहमीच पोलीस खात्याची मदत घ्यावी लागते अशा परिस्थितीत दोन्ही विभागाचा समन्वय असणे आवश्यक आहे.

तसेच उपआयुक्त-१ यांचे बाबतीतही स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे.अशा प्रकारच्या बातम्या प्रसिध्द झाल्याने मनपाची बदनामी होत आहे.विनाकारण अशी बदनामी का म्हणुन सहन करावयाची प्रसिध्द झालेली बातमी खरी वा खोटी आहे याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** महानगरपालिकेचे आयुक्त व पोलीस आयुक्त यांच्यात कोणताही वाद नाही. बातमी प्रसिध्द झाली हे खरे आहे.हा गैरसमज आहे असा काही प्रकार झालेला नाही.मनपा आयुक्त व पोलीस आयुक्त यांचे चांगले संबंध आहेत.रशीदपुरा येथील जे काही अनधिकृत बांधकाम होते ते पाडले आहेत.त्या बाबतीत काही गैरसमज झाला असेल तर मोजणी होऊन योग्य कार्यवाही होईल. मनपा प्रशासनातर्फे सन १९९२ पासुन विविध कामानिमित्त (उदा.सर्वसाधारण सभा / अनधिकृत बांधकाम) पोलीस मदत घेण्यात येते.या कामाचे अंदाजे रु. १४ लाख देयक देणे बाकी आहे.नियमाप्रमाणे आवश्यक देयक मागणीनुसार अदा करण्यात येईल.मनपा प्रशासनातर्फे मालमत्ता कर व पाणीपट्टी कराची मागणी पोलीस विभागाकडे करण्यात आली आहे.पोलीस विभाग हे शासकीय कार्यालय आहे या खात्याकडील रक्कम वसूल येईल.

**श्री.स.अ.मीरा सलामी :** विद्यापीठ भागाजवळ असलेली विटभट्टीचे अतिक्रमण काढण्याच्या कामी पोलीस मदत मागविण्यात आली असता प्रत्यक्षात इतर ठिकाणचे अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस मदतीला उपयोग घेण्यात आला ही बाब खरी आहे काय?

**मा.सभापती** : या प्रकरणी पुर्ण तपासणी करावी लागेल.हा प्रश्न सर्वसाधारण सभेच्या कक्षातील आहे.

**श्री.जयवंत ओक** : शहर विकास आराखडयानुसार लेआऊट मधील प्लॉट खरेदी करणे सामान्य नागरिकांना आर्थिकदृष्टया परवडत नाही.म्हणून राखीव जागेवर पाडण्यात आलेले २०X३० चे अनधिकृत प्लॉट सामान्य नागरिक खरेदी करतात.विकास आराखडा तयार करतांना सामान्य नागरीकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला जात नाही.

**मा.सभापती :** सदर प्रकरणी स.सभासदांनी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवणे योग्य होईल.

**श्री.जोशी संजय** : प्रशासनातर्फे शहरात स्लम अपग्रेडेशन योजना राबविण्यात आली असून या योजने अंतर्गत नागरीकांना कर्जही देण्यांत आलेले आहे.यासाठी मनपा

प्रशासनास कर्ज ही घ्यावे लागले आहे.सेवा नागरिकांना देण्यात आलेल्या कर्जाचे वसुलीबाबत काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** सदर प्रकरणी पुढील सभेत खुलासा करता येईल.

**मा.सभापती :** स.सभासदांचे प्रश्नाबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी पुढील सभेत माहिती दयावी.

**श्री.घडामोडे भगवान,श्री.संजय जोशी** : तांत्रिक विभागातील उप अभियंता यांची या विभागातून बदली होऊन एक महिना झालेला असतांना त्यानंतरचे काळात तांत्रिक विभागाचे वाहना वरील इंधन भत्ता अदा करण्यांत आलेला आहे.तेव्हा उप अभियंता यांची बदली झालेली असतांना तांत्रिक विभागाच्या वाहनाचा इंधन भत्ता कसा मंजुर करण्यात आला हे वाहन कोणी वापरले.

**मा.आयुक्त :** उप अभियंता यांची बदली झाली असली तरी तांत्रिक विभाग बंद झालेला नाही.या विभागाची गाडी ही विशिष्ट अधिकाऱ्यांकरीता नाही.या विभागाकरीता अधिकारी नेमला जाईल.विभागाच्या कामासाठी गाडी वापरण्याची परवानगी देण्यांत आली आहे.

**श्री.संजय जोशी,श्री.कचरु नवपुते :** कोणत्या अधिकारात परवानगी दिली याचा खुलासा व्हावा.तांत्रिक कक्षात आपण परवानगी कधी दिली तशी गाडी वापरता येते का? एखादया ऑफिसरची बदली झाली तर आपण त्याच्या असीस्टंटला गाडी वापरण्यासाठी दिली व त्यांच्या गाडीचा इंधन भत्ता कसा देण्यात आला.

**श्री.जयवंत ओक** : या तांत्रिक कक्षातील गाडी बाबत आयुक्तांनी अधिकार दिलेला असेल तर ते बरोबर आहेत.

**श्री.अ.रऊफ अ.रशिद** :आयुक्तांना याबाबत अधिकार असेल तर ठिक आहेत.

**मा.सभापती,श्री.गिराजाराम हाळनोर** : मा.आयुक्त यांनी दिलेल्या परवानगीनुसार गाडीचा वापर केलेला आहे.तसे अधिकार मा.आयुक्त यांना आहेत.

**श्री.भगवान घडामोडे, श्री.संजय जोशी** : मालमत्ता कराचा वेळेच्या आत भरणा करण्याच्या मालमत्ता धारकांना मनपातर्फे करात सुट देण्यात आली या योजनेनुसार मनपास किती प्रमाणात फायदा झाला मालमत्ता करात सुट देण्याची योजना पुन्हा सुरु करावी.तसेच पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी शहरात खोदण्यात आलेल्या इंधन विहीरींचे कामाबाबत नेमण्यात आलेल्या उपसमितीबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी याबाबत खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.आधि)** : पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी शहराच्या ३३ भागात इंधन विहिरी खोदण्यात आल्या आहेत हे काम पूर्ण झाल्यानंतरही काही नगरसेवकांकडून इंधन विहिर खोदण्याची मागणी करण्यात आली आहे.त्यानुसार भूजल सर्वेक्षण विभागाकडे तपासणी फी भरण्याची परवानगी मिळणेबाबत संचिका मंजुरीसाठी सादर करण्यात आली आहे. फी भरणा केल्यानंतर सर्वेनुसार इंधन विहिरी खोदण्यात येतील.

**श्री.जयवंत ओक** : भूजल सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार इंधन विहिरींना पाणी लागले व काही विहिरींना पाणी लागले नाही तेव्हा नगरसेवकांच्या मागणीनुसार आणखी विहिरी खोदण्याची मान्यता व्हावी.

**मा.सभापती :** इंधन विहिरी खोदण्यासाठी आणखी किती लोकांची मागणी आली.

**कार्यकारी अभियंता (पापू अधि.)** : त्यानंतर १५-१६ लोकांची मागणी आलेली आहे.

**श्री.गांगवे बन्सीलाल :** स्वेच्छा निधीतून बोअरवेल खोदण्याची मागणी केली असता रात्री २.०० वाजता बोअरवेल खोदण्याचे काम करण्यात आले.त्याबाबत पत्र प्रशासनास पत्र दिले आहे.रात्रीचे वेळी काम झाल्यामुळे प्रत्यक्षात किती काम झाले हे कळू शकत नाही. माझे पत्रकानुसार नगरसेवकांना बरोबर पाहणी करण्यात येईल असा खुलासा करण्यांत आला पण प्रत्यक्षात कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात बोअरवेल ही १५० का २०० फुट झाली हे कळत नाही.

**श्री.जयवंत ओक :** स. नगरसेवक आपणावर आरोप करीत आहेत.माझ्या समोर बोअर मिळाले.प्रशासनावर मी आरोप करीत नाही व आपणही करू नये.एका ठिकाणी १५ छडया वर टाकण्यासाठी बोर घेतला पण १४ घडीवरच पाणी लागले परंतु राहिलेली एक छडी परत बोअर घेण्यात आले.

**मा.सभापती :** या बाबतीत स.नगरसेवक श्री.घडामोडे जे बोलत आहेत.त्यांनी पुरावा दाखवावा.

**श्री.घडामोडे** : शासनावर जबाबदारी आल्यावर पुरावे दाखवा म्हणतात पण ही गोष्ट चुकीची आहे.जे की,नुरजहाँ बेगम यांनी आरोप केले की,अधिकारी पैसे खातात,परवाच्या दिवशी आपल्या कार्यालयातील (अंतर्गत) असलेले श्री.देवकर यांना घरी जाण्याची पाळी आली आणि प्रशासन म्हणता पुरावे दाखवा प्रत्येक वेळेस पुरावे कसे मिळतील . प्रशासकीयच चौकशी यावर झाली पाहिजेत असे माझे म्हणणे आहे.बोअरवेल खोदण्याच्या कामाबाबत पाच नगरसेवकांच्या सहीचे पत्र देण्यात आलेले आहे.

**मा.आयुक्त :** स.नगरसेवक १) सौ.पदमा शिंदे २) सौ.मंदा काळुसे ३) श्री.गांगवे यांच्यातर्फे पत्र देण्यात आले होते. त्याबाबत खुलासा केलेला आहेत.

**श्री.घडामोडे भगवान** : आणखी दोन स.नगरसेवकांचीच तक्रार आपल्याकडे होती.म्हणजे एकूण ५ लोकांच्या तक्रारी आपल्याकडे होत्या.

**मा.आयुक्त :** स.नगरसेवक सौ.पदमा शिंदे,सौ.मंदा काळुसे,श्री.गांगवे बन्सीलाल यांनी बोअरवेल बाबत केलेल्या तक्रारी नुसार चौकशी केली असता उक्त नगरसेवकांनी काम चांगले झाल्याचे पत्र दिले आहे.स.नगरसेवकांकडून पत्र मिळाल्यानंतर प्रशासनातर्फे कार्यवाही केली जाते.

**श्री.जोशी संजय :** सर्व साधारण सभेच्या निर्णयानुसार मनपा अधिकाऱ्यांना देण्यात येणारे कर्जावर ६% दराने व्याज आकारण्यात येईल असा निर्णय झालेला आहे.तथापी कर्मचाऱ्यांना वाहन कर्ज देतांना प्रशासनाकडून १४% व्याज आकारण्यात येईल असे पत्र कर्मचाऱ्यांना दिले आहे असा भेदभाव करणे योग्य नाही.

**मा.आयुक्त** : ६% व्याजाने कोठेही कर्ज दिले जात नाही.शासनाचा व्याज दर हा १४% आहे.अशा अधिकाऱ्यांकडून ही १४% दराने व्याज आकारणी केली जाईल.त्याबाबतचा प्रस्ताव सभागृहापुढे लवकरच मांडण्यात येईल.तो सभागृहाने मंजुर केल्यास सुरुवाती पासुन आकारणी केली जाईल.

**श्री.अ.रशीदखॉंन (मामू)** : मा.आयुक्त यांनी नियमाचा खुलासा केला आहे. त्यादृष्टीने विचार करणे आवश्यक.

**मा.सभापती :** आपण अलाऊन्स दिला पाहिजेत.ठिक आहे.

**श्री.लांडगे गौतम :** मनपाच्या प्रवेशद्वारासमोर काही कर्मचारी उपोषणाला बसले आहेत.पाणी पुरवठा काही जागा भरावयाच्या होत्या.त्यांना कॉल लेटर ही मिळालेले

नाही.म्हणून हे कर्मचारी उपोषणास बसले त्याचा प्रश्न कसा सुटेल याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** पाणी पुरवठा विभागाकरीता कर्मचारी भरती करतांना ज्याची मुलाखत घेण्यात आलेली आहे.त्यांच्याकडून जन्मतारीख/नाव/शिक्षण /इ.माहिती घेण्यात आली आहे. तथापी या प्रकरणी काही नगरसेवकांकडुन भ्रष्टाचार झाल्याचे पत्र मिळाल्यामुळे ही कार्यवाही बंद करण्यात आली आहे.

**श्री.लांडगे गौतम :** आपण जागा खाली असुनही जे १९८० पासुन काम करतात त्याचे काय? मनपा कार्यालयात काही पदे रिक्त असतांनाही ती भरली असुनही जे १९८० पासुन या कार्यालयात काम करतात त्याचे बाबत प्रशासनाने काय विचार केला आहे याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** पाणी पुरवठा विभागासाठी ४३ जागा भरावयाच्या आहेत.या नेमणूकीबाबत समिती गठन करण्यात आली होती.मनपाकडे असलेल्या यादीनुसार जेष्ठतेप्रमाणे ३३ कर्मचाऱ्यांचे आदेश काढण्यात आले आहेत.ही जेष्ठता यादी उच्च कार्यालयातही दाखल केलेली आहे.अशा सुचना उपोषणार्थींना दिल्या आहेत.

**श्री.कचरु नवपुते :** या कार्यालयात जे जे कर्मचारी ज्या ज्या दिवशी पासून काम करतात याचा पुरावा कार्यालयाकडे नाही का?

**श्री.स.अ.मीरा सलामी** : कार्यालयाने जेष्ठता यादीनुसार जे आदेश काढले आहेत त्यापेकी बरेच उमेदवार कामावर आले नाही.अशा उमेदवारांना प्रशासन किती वेळा पत्र देणार आहे.भरती बाबत आजपर्यंत जी कामे झाली आहेत ती योग्य झ ाली नाहीत.म्हणून याबाबत संशय येतो.जे उमेदवार कामावर आले नाहीत. त्यासाठी वृत्तपत्रात जाहीरात देण्यांत यावी व नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.या कार्यालयात एक कर्मचारी गेल्या दोन वर्षापासून काम करीत आहे. पण अद्याप या कर्मचाऱ्यांचे सेवापट उपलब्ध नाही.याप्रमाणे १०/१० वर्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सेवापट कार्यालयात नाही.

**मा.सभापती :** ज्यांच्या ऑर्डर्स काढली व त्यानुसार ते उमेदवार आले नाही तर त्याचे नाव यादीतुन नियमाप्रमाणे बंद होईल.

**मा.आयुक्त :** अस्थापना विभागाबाबत ही वस्तुस्थिती आहे. कर्मचाऱ्यांची सेवापट व इतर नोंदी योग्य करण्यास किमान सहा महिन्याचा कालावधी लागेल हा सर्व प्रकार गेल्या दहा/बारा वर्षापासून चालू आहे.यासाठी प्रशासनासह आयुक्त श्री.कुलकर्णी व उप आयुक्त श्री.अंभोरे यांचे सर्व नोंदी अदयावत करण्याची जबाबदारी सोपविली आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी** : उप आयुक्त-२ यांनी ज्या ३३ लोकांची लिफ्ट केली ती कशा प्रकारे केली त्यांचा खुलासा करावा.

**श्री.लांडगे गौतम :** यादीत ज्याची नांवे होती अशाचे एक यादी माझ्याकडे आहे ती आपणाकडे देत आहे.(एक पेज) यादी मा.सभापती यांचेकडे दिली.)

**मा.आयुक्त** : ठिक आहे.स.नगरसेवकांच्या सुचनेप्रमाणे यादीतील सीनेरिटीनुसार अशा कर्मचाऱ्यांचा विचार केला जाईल.

**मा.सभापती :** मा.आयुक्तांनी सुचविल्याप्रमाणे जेष्ठतेनुसार पाहणी करुन त्या कर्मचाऱ्यांना सामावुन घेतले जाईल.

**विषय क्र.१०९/१:**

दिनांक १८-६-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर** : मागील सभेच्या वेळी ज्योतीनगर भागमध्ये पिण्याच्या पाण्याच्या नवीन पाईप लाईनला वॉल टाकण्याचा प्रश्न केला होता.परंतु त्याबाबत काहीच कार्यवाही झाली नाही.इतिवृत्त पान क्र. ४ वर "ज्योतीनगर,अमरनगर भागात ज्या नाल्या आहेत" अशी नोंद झाली आहे.तथापी माझ्या वार्डात अमरनगर हा भाग आणि नाल्या या शब्दाऐवजी नाला अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**श्री.जयवंत ओक** : मनपा प्रशासनास इतर कामासाठीही ५०-४५ वॉल आवश्यक आहेत.यास मंजुरी देण्यात आल्यावर हा प्रश्न सुढेल.

**कार्यकारी अभियंता** : पुढच्या मिटींगला याचा खुलासा करण्यात येईल.

**मा.सभापती :** ठिक आहेत पुढच्या मिटींगमध्ये खुलासा करावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** दि. १८-६-९७ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्त पान क्र. ४,५,७,८,६ आदी पानावर नोंदविण्यात आलेल्या नोंदी चुकीच्या असल्याने दि. **१८-६-९७ चे इतिवृत्त पुन्हा दुरुस्त करुन देण्यात यावे.**

**मा.सभापती :** स.सभासदांनी केलेली सूचना मान्य करण्यात येते.नगरसचिव यांनी दि. १८-६-९७ चे सर्व इतिवृत्त पुन्हा दुरुस्त करुन घेण्याची व्यवस्था करावी.

**ठराव :**

दि.१८-६-९७ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्तातील नोंद चुकीच्या असल्याने पुन्हा दुरुस्त इतिवृत्त तयार करुन दयावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.११०/२:**

टाटाच्या वाहनांसाठी लागणारे स्पेअर पार्टस सन ९७-९८ या आर्थिक वर्षात खरेदी करण्यासाठी वार्षिक करार करण्याकरीता वर्तमान पत्रात निविदा सुचना देवून निविदा मागविली असता टाटाच्या वाहनाचे अधिकृत विक्रेते मे.सतिश मोटर्स प्रा.लि.औरंगाबाद यांचे निविदा पत्रक वसुल झाले त्याचे दर खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) जमशेटपुर वरुन येणाऱ्या स्पेअर पार्टस करीता | प्राईजलिस्ट |
| | १) सी.एस.टी. : ४% |
| | २) जकात :१% |
| | ३) फ्रेट : ४% |
| | ४) बँक चार्जेस : २% |
| | ५) सेल्स टॅक्स : १०% |
| २) ठाणेहुन येणाऱ्या स्पेअर पार्टस करीता | १) जकात : १% |
| | २) बँक चार्जेस : २% |
| | ३) फ्रेट : ३% |
| | ४) सेल्स टॅक्स : १०% |

महानगरपालिकेकडे एकूण ५५ वेगवेगळया प्रकारचे टाटा वाहने आहेत व आणखीन ५ टिप्पर नविन येणार आहेत.यासर्व वाहनांसाठी अंदाजे १० लाख रुपयाची स्पेअर पार्टस खरेदी अपेक्षित आहे.

तरी मे.सतिश मोटर्स प्रा.लि.औरंगाबाद यांची निविदा वार्षिक करार करण्याकरीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाटाच्या वाहनांसाठी लागणारे स्पेअर पार्टस सन ९७-९८ या आर्थिक वर्षात खरेदी करण्याकरीता मे.सतिश मोटर्स प्रा.लि.औरंगाबाद यांची निविदा वार्षिक करार करण्यास्तव स्विकारण्यास व त्यासाठी रक्कम रु. १० लाखाचे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१११/३:**

महानगरपालिकेकडे मारुती कंपनीची खालीलप्रमाणे वाहने आहेत.

| | |
|---|---|
| १) मारुती कार-८०० | -२ |
| २) मारुती व्हॅन | -१ |
| ३) मारुती जिप्सी | -२ |
| ४) मारुती-८०० नविन खरेदी करावयाची आहे. | -६ |
| एकूण | ११ |

मारुती कार स्पेअर पार्टस व जॉब वर्क करीता सन १९९७-९८ या वर्षासाठी वार्षिक करार करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता मे.मारुती केअर पॉईट,औरंगाबाद,जे.मारुती वर्कशॉप ओनर्स असोशिएशनचे सभासद आहे.त्यांची एक निविदा प्राप्त झाली आहे.त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) स्पेअर पार्टससाठी प्राईजलिस्ट | १५% |
| २) जॉब वर्कसाठी अंदाजपत्रकीय | २% |

अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी.

जॉबवर्क व पार्टस मिळून या आर्थिक वर्षात अंदाजे १ लाख रुपयाचे काम अपेक्षित आहे.तरी वार्षिक करार करण्यासाठी मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.जोशी** : विषय क्र.३ दर्शविल्याप्रमाणे मनपाकडे खालील प्रमाणे वाहने आहेत. त्यात खाली नंबर ४ मध्ये आपण ६ मारुती-८०० गाडया घेणार आहोत.त्या नव्या घेणार की,जुन्या आणि खरेदीला अजून दोन महिने लागतील.मारुती-८०० या सहा गाडया आपण नवीन घेणार असुन आपण त्याचा सरासरी वर्षाचा खर्च १ लाख रु. दाखवला आहे.नविन गाडयाला स्पेअर पार्टस व जॉबवर्क करण्याची सहजासहजी गरज पडत नाही. तरीही आपण हयात खर्च दाखविलेला आहे.याचा खुलासा करावा.

**मा.सभापती** : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अभियंता यांत्रिकी** : नविन ज्या गाडया घेण्यात येणार आहेत त्याबाबत करासहित वर्षाचा खर्च दाखविलेला आहेत.जॉबवर्कसाठी रु.१,००,०००/-रु. गृहीत खर्च धरलेला आहेत.एखादया ठिकाणी गाडीला धोका होऊ शकतो. त्या दृष्टीने ही रक्कम त्यात सामावलेली आहे.मनपाकडे पेट्रोल मेकॅनिकल नाही.

**श्री.जोशी,श्री.घडामोडे** : नविन जी गाडी खरेदी करण्यात येते तिचा दर इन्शूरन्स काढलेला असतो.नव्या गाडया खरेदी करावयाच्या आणि त्याचा बेकायदेशीर खर्च दाखवता हे चुकीचे आहे.याचा सविस्तर खुलासा करावा. तसेच म.न.पा.च्या वर्कशॉपमध्ये प्रेसिंग होत नाही,गाडी दुरुस्ती होत नाही.पेंटर नाही.जे पेंटर होते त्यांना कमी हजेरी देतात.म्हणून निघुन जातात.सविस्तर माहिती दयावी.

**मा.आयुक्त** : महापालिकेकडे अ.क्र.१ ते ३ नुसार पंाच गाडया आहेत या गाडयांचा दुरुस्तीसाठी वार्षिक करार करण्याची मंजुरी सभागृहापुढे मागण्यांत आली आहे.आवश्यकता असली तरच खर्च करावा लागणार आहे.त्यानुसार वार्षिक कराचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

**श्री.जोशी संजय** : नविन गाडी खरेदी केल्यानंतर त्या गाडीला अंदाजीत १,००,०००/- रु. खर्च येणे हे चुकीचे आहेत. ज्या जून्या गाडया आहेत.त्याचा समावेश धरुन म्हणत असाल तर ठिक आहे. परंतु आपण त्यात नविन ६ मारुती-८००हयाचा खर्च ही लावता तो चुकीचा धरलेला आहे.

**मा.सभापती :** सभागृहाच्या सुचनेप्रमाणे रु.१ लाख ऐवजी रु.५० हजारापर्यंतचा खर्च करण्यास वार्षिक करार करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाकडे असलेले मारुती कंपनीची वाहनांना सन १९९७-९८ या वर्षात लागणारे स्पेअरपार्ट व जॉबवर्कचे कामासाठी मे.मारुती केअर पॉईंट,औरंगाबाद यांचे खालील दर्शविलेल्या दराच्या निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) स्पेअर पार्टससाठी प्राईजलिस्ट १५%
२) जॉब वर्कसाठी अंदाजपत्रकीय २%
अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी.

सन १९९७-९८ या आर्थिक वर्षात रु.१ लाख ऐवजी रु. ५०.००० चे जॉबवर्क व स्पेअरपार्टस खरेदीच्या खर्चास व त्याप्रमाणे वार्षिक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**श्री.हाळनोर गिरजाराम** : सार्व.दिवाबत्तीच्या कामासाठी मनपाने हैड्रोलीक मशिन खरेदी केलेले आहे.या मशिनमध्ये तांत्रिक बिघाड आहे.अशा बिघडलेल्या मशिनच्या सहाय्याने सार्व.दिवाबत्तीचे काम करतांना लाईनमनला काही धोका झाला तर कोणाला जबाबदार धरावयाचे याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता अभियांत्रिकी** : स.सभासद श्री.हाळनोर यांच्याकडील तक्रारीनुसार हैड्रोलिक मशिनचे मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात प्रात्यक्षिक घेण्यात आले.त्यावेळी या मशिनमध्ये कोणत्याही प्रकारचा बिघाड असल्याचे दिसून आले नाही.ज्यावेळी लाईनमन स्पाईडवर काम करतात.त्यावेळी व्यवस्थितरित्या लॅडरचा उपयोग करत नाही. म्हणून काम करते वेळी बिघाड झाल्याचे वाटते.

**श्री.जयवंत ओक** : हैड्रोलिक गाडी मुख्य कार्यालयात मागवून पुन्हा प्रात्यक्षिक घेण्यात यावे.म्हणजे काय बिघाड आहे हे कळून येईल.अन्यथा साईडवर काम करतांना बिघाड झालेले मशिन वापरण्यास काम करणाऱ्या लाईनमनला धोका होण्याचा संभव आहे.

**उप अभियंता विद्युत** : हैड्रोलिक गाडीत बिघाड झाल्याबाबत लाईनमनने तक्रार केली आहे.साईडवर काम करतांना १/२ वेळा असा प्रकार झालेला आहे.आजही

श्रीरामनगर भागात काम करतांना असाच प्रकार झाल्यामुळे हैड्रोलिक गाडी त्याच ठिकाणी अडकुन पडली आहे.

**मा.सभापती :** हैड्रोलिक गाडीतील बिघाडाबाबत अति.शहर अभियंता यांनी चौकशी करुन अहवाल दयावा.तसेच गाडी दुरुस्त करुन घेण्याबाबत संबंधित कंपनीकडे पाठविण्यात यावी.

**श्री.अ.रशिदखॉंन (मामू)** : उप अभियंता यांत्रिकी हे सभागृहाची दिशाभूल करत आहेत.त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.स.अली मिरा सलामी** : उप अभियंता यांत्रिकी हे स.सभासदांच्या सूचनांचा विचार न करता हैड्रोलिक गाडी चांगली असल्याचे सांगत.काम करतांना लाईनमनला अपघात झाला तर उप अभियंता यांत्रिकी यांना जबाबदार धरण्यात यावे.

**मा.सभापती :** उप अभियंता यांत्रिकी यांनी तक्रारीनुसार हैड्रोलिक गाडीचे प्रात्यक्षिक घेतले आहे. त्यावेळी गाडीत दोष असल्याचे दिसून आले नाही.असे संबंधिताचे म्हणणे आहे.

**विषय क्र.११२/४:**

ॲम्बेसेडर कारसाठी लागणारे स्पेअर पार्टस सन ९७-९८ या आर्थिक वर्षात खरेदी करण्यासाठी वार्षिक करार करण्याकरीता वर्तमानपत्रात निविदा सूचना देवून निविदा मागविली असता ॲम्बेसेडर कारचे अधिकृत विक्रते मे. कैलास एजन्सीज प्रा.लि.औरंगाबाद यांचे निविदा पत्रक वसुल झाले.त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

प्राईजलिस्टचे दर

| | |
|---|---|
| १) सी.एस.टी. | ४% |
| २) ट्रान्सपोर्टेशन | ५% |
| ३) जकात | १% |
| ४) इन्शुरन्स | १% |
| ५) एम.एस.टी. | १०% |
| | २१% |

महानगरपालिकेकडे एकूण १४ ॲम्बेसेडर कार/कॉन्टेसा कार आहेत.त्यापैकी एकूण ६ कार हरासी करावयाच्या असल्यामुळे फक्त ८ कार वर यापुढे देखभाल दुरुस्तीचा खर्च राहणार आहे.या वाहनावर वार्षिक स्पेअर पार्टसचा खर्च अंदाजे २ लाख लागेल असे अंदाजीत केलेले आहे.

तरी मे. कैलास एजन्सील प्रा.लि.औरंगाबाद यांचे दर वार्षिक करार करण्यासाठी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ॲम्बेसिडर कारसाठी लागणारे स्पेअर पार्टस सन ९७-९८ या आर्थिक वर्षात खरेदी करण्यासाठी मे.कैलास एजन्सीज प्रा.लि.औरंगाबाद यांचेशी वार्षिक करार करण्यास व यासाठी रु. २ लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११३/५:**

महानगरपालिकेकडे असलेल्या वाहनांसाठी ऑईल/लुब्रीकंटस व डिझेल हे मे.इंडियन कंपनीकडून खरेदी करण्यात येतात.परंतु ॲटोरिक्षा साठी लागणारे पेट्रोल व इतर काही

ऑईल /लुब्रीकंट्स जे इंडियन ऑईल मध्ये उपलब्ध नाहीत.त्या करीता निविदा सुचना देवून निविदा मागविली असता २ निविदा पत्रके वसूल झालीत.

१) मे.आर.एन.लुप्स,औरंगाबाद यांनी आपणांस लागणारे ऑईल/लुब्रीकंट्स दर भरलेले नाहीत.

२) मे.कैलास एजन्सी प्रा.लि.औरंगाबाद हे भारत पेट्रोलियम कंपनीचे डिलर आहेत. त्यांना भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशिल | नग | दर |
|---|---|---|---|
| १) | पेट्रोल | १ लिटर | २४.०९ |
| २) | ब्रेक ऑईल गर्लिग बी.पी.सी.एल.बी.पी.सी.एल. | १/४ लि.<br>१/४ लि.<br>१/२ लि.<br>१/२ लि. | ४५.००<br>८९.००<br>४०.००<br>७२.४९ |
| ३) | व्हील वेअरिंग ग्रीस (कॅस्ट्रॉल) | १/२ किलो<br>१ किलो<br>२ किलो | ४४.००<br>८६.००<br>१७२.०० |
| ४) | ए.पी-३ ग्रीस (कॅस्ट्रॉल) | १/२ किलो<br>१ किलो<br>२ किलो | ४४.५०<br>८८.००<br>१७२.०० |
| ५) | इंजिन ऑईल २ डब्ल्यू/४० | १ लि.<br>२ लि.<br>५ लि. | ८२.००<br><br>३२५.०० |

वर्षाचे अंदाजे रु. २ लाखाचे मटेरियल खरेदी होईल असा अंदाज आहे. पेट्रोलियम प्रॉडक्टसचे दर वेळोवेळी कमी वा जास्ती होतात तेव्हा वेळोवेळी बदललेल्या दरानुसार आपणांस वरील अॅटम खरेदी करून त्याप्रमाणे बिलाची रक्कम अदा करण्यास मंजुरी मिळावी. आलेल्या दराप्रमाणे मे.कैलास एजन्सीज प्रा.लि. औरंगाबाद यांचे वार्षिक करार करण्यास व वेळोवेळी वाढीव दराप्रमाणे मटेरीयल खरेदी त्यांचे कडून करण्यास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,ऑईल/लुब्रीकंटस खरेदी करण्यासाठी सन ९७-९८ या वर्षाकरीता मे.कैलास एजन्सीज प्रा.लि.औरंगाबाद यांचेशी वार्षिक करार करण्यास तसेच अ.क्र.१ ते ५ चे ऑईल/लुब्रीकंट समोर दर्शविलेल्या दराने तसेच वेळोवेळी वाढीव मटेरीयल खरेदी करण्यास व त्यासी लागणाऱ्या रु.२ लाखाचे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११४/६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.रशिद मामू कॉलनी येथे संस्कार केंद्र बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५४१/६ दि. ८-३-९६ अन्वये रक्कम रु. १,४०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे.तसेच सदरचे काम हाती घेण्यासाठी प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची

श्री. अब्दुल खालेफ यांचे निविदा दरास मा.आयुक्तांची दि. १९-९-९६ अन्वये मंजुरी प्रापत झाली असुन दि. २२-१०-९६ ला कार्यादेशही देण्यांत आला होता व त्यानुसार कामही सुरु केले होते. परंतु प्रत्यक्ष स्थळावर स. नगरसेवक यांनी सदर कामाचे क्षेत्रफळामध्ये वाढ करुन छतावर पत्र्याऐवजी स्लॅब टाकण्याची मागणी केली त्यानुसार सदर कामाचे रक्कमेत १,३९,९९७/- चे वाढ होत आहे. म्हणजेच सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ३,३५,०००/- चे होत असून त्यास स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर करा.या अटीवर मा.आयुक्तांनी दि. २९-३-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ३,२५,०००/- ला तसेच सदरील काम हे मुळ निविदा दराने म्हणजे अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सदर खर्च ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा मधून करण्यांत येईल.तसेच पुढील कामास दि. ३१-७-९७ पर्यंत मुदत वाढ देणे योग्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रशिद मामू कॉलनी येथे संस्कार केंद्र बांधणेच्या कामाकरीता सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ३,३५,०००/- ला तसेच सदरील काम या कामाचे मुळ गुत्तेदार श्री.अब्दुल खालेफ यांचेकडून मुळ निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या कामास दि.३१-७-९७ पर्यंत मुदत वाढ देण्यात मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११५/७:**

मौजे गारखेडा येथील स.नं.१ भाग शिवनेरी कॉलनी या मंजुरी रेखांकनामधील खुली जागा जीचे क्षेत्र १९८१.५५ चौ.मी.(२१२१२.५० चौ.फुट) आहे.ती योगविद्याधाम या नोंदणीकृत संस्थेने भाडे पट्टयाने मागणी केलेली आहे.

१) सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १६०/१ दि. २०-११-९६ नुसार मान्य असलेले भाडे रु. १००/- प्रति वर्ष राहील.
२) विकास नियंत्रण नियमावली नुसार अनुशेष वापरासाठी व खुल्या जागेच्या क्षेत्राचे १०% अथवा २०० चौ.मी. दोघांपैकी जे कमी असेल त्यासाठी रितसर बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजुर करून घ्यावा.
३) उर्वरित जागेमध्ये उद्यान अधिक्षक मनपा हयांचे देखरेखीखाली बागेचा विकास करावा.
४) भाडेपट्टयाची मुदत ३० वर्ष राहील परंतु प्रत्येक ५ वर्षानंतर भाडेपट्टयाचे नुतनीकरण करावे लागेल.
५) जागा प्रदान करावयाचे धोरणानुसार इतर सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन घेवून ताब्यात देण्याचे कार्यवाही मालमत्ता विभागाने करावी.प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा येथील स.नं.१/भाग शिवनेरी कॉलनी या मंजुर रेखांकनामधील खुली जागा जीचे क्षेत्र १९८१.५५ चौ.मी.(२१२५२.५० चौ.मी.) आहे. ती जागा योग विद्याधाम या नोंदणीकृत संस्थेस प्रस्तावातील अ.क्र.१ ते ५ च्या अटीचे /शर्तीचे अधीन राहून भाडेपट्टयाने देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११६/८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जय विश्व भारती कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४,८५,८९०/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च पुर्नडांबरीकरण या लेखा खाली सन ९७-९८ च्या तरतुदी मधून करण्यात येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जय विश्व भारती कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ४,८५,८९०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११७/९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जालान नगर व स्टँडर्ड सिल्क मिल कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु. ५,८६,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी दि. १२-६-९७ रोजी मिळालेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालान नगर व स्टँडर्ड सिल्क मिल कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ५,८६,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८/१०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,छत्रपती नगर (गारखेडा) येथील श्री.गुर्जर ते विजयनगर या ५० डी.पी. रस्त्याच्या खडी रस्त्याचे व कल्व्हर्ट चे काम करणे बाबत सन ९५-९६ च्या सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,४७,८९०/- चे तयार करण्यंत आले असून सदरचा खर्च "नविन खडी रस्ते" ९७-९८ च्या तरतुदी मधुन करण्यांत येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,छत्रपती नगर (गारखेडा) येथील श्री.गुर्जर ते विजयनगर या ५० डी.पी. रस्त्याच्या खडी रस्त्याचे व कल्व्हर्ट चे काम करणे करीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. २,४७,८९०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "नविन खडी रस्ते" या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९/११:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा सर्वे नं. १५८४० मधील मंजुर रेखांकन मधील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करुन दगडी नाली बांधण्याचे कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३,६०,०३३/- तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या शिर्षकाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीमधून करण्यांत येईल.करीता प्रस्ताव मंजरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा सर्वे नं. १५८४० मधील मंजुर रेखांकन मधील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करुन दगडी नाली बांधणेकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ३,६०,०३३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भांडवली रस्ते" या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०/१२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,विद्यापीठ कॅन्टीन ते बुध्दलेणी पर्यंत रस्त्यावर पथदिवे बसविणे करीता रक्कम रु. १,४८,९५६/- चे अंदाजपत्रक सा.बां.जिल्हा दर सुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर काम "शहरात नविन पोल लावणे" या लेखा शिर्षाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीनुसार प्रस्तावित आहे.यासाठी २० लाखाची तरतुद आहे.सदरील कामास मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.

तरी विद्यापीठ कॅन्टीन ते बुध्दलेणी पर्यंत रस्त्यावर पथदिवे बसविणे करीत रुपये १,४८,९५६/- अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,विद्यापीठ कॅन्टीन ते बुध्दलेणी पर्यंत रस्त्यावर पथदिवे बसविणे करीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,४८,९५६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "शहरात नविन पोल लावणे" या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१/१३:**

गोविंदनगर या मंजुर रेखांकनातील ७९९.५० चौ.मी.क्षेत्राची खुल्या जागेपैकी दिनांक २०-१०-९२ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ६१/१० श्री.सत्संग आश्रम,गोविंदनगर,बन्सीलालनगर हयांना १००% जागा प्रदान करण्यांत आलेली आहे.सदर जागेचा ताबा संबंधितास मालमत्ता विभागातर्फे देण्यांत आलेला आहे.त्यांचें तर्फे करारनामा देखील करुन घेण्यात आला आहे.

श्री.सत्संग आश्रम गोविंदनगर ट्रस्ट ने शासनाकडे अर्ज करुन सदर जागा ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने व भाडयाची रक्कम कमी करुन मिळण्यासाठी विनंती केलेली आहे.

१) सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १६०/१ दि. २०-११-९६ चे अन्वये खुल्या जागेसाठी रु. १०० प्रति वर्षभाडे आकारणी करावयाचे ठरले आहे.
२) विकास नियंत्रण नियमावली नुसार अनुज्ञेय वापरासाठी व खुल्या जागेच्या क्षेत्राचे १०% अथवा २०० चौ.मी.दोघांपैकी जे कमी असेल त्यासाठी रितसर बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजुर करुन घ्यावा.

३) भाडेपट्टयाची मुदत ३० वर्षे राहील.परंतु प्रत्येक ५ वर्षानंतर भाडेपट्टयांचे नुतनीकरण करावे लागेल.

वरील अटीवर श्री.सत्संग आश्रम,गोविंदनगर ट्रस्टला देण्यांत आलेल्या खुल्या जागेचे भाडे रु.९५४६/- प्रती वर्ष ऐवजी दि. २०-११-९६ च्या सर्वसाधारण सभने मान्यता दिलेल्या नुसार रुपये १०० प्रति वर्षे आकारणी करणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.मान्यतेनंतर नेहमीच्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन पुढील कार्यवाही मालमत्ता विभागाने करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गोविंदनगर या मंजुर रेखांकनातील ७९९.५० चौ.मी.जागेंपैकी श्री.सत्संग आश्रम,गोविंदनगर,बन्सीलालनगर या संस्थेस देण्यांत आलेल्या १००% जागेचे त्यांनी शासनाकडे विनंती केल्यानुसार प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ च्या अटी व शर्तीनुसार तसेच सदर खुल्या जागेचे भाडे रु. ९५४६/- ऐवजी रु.१००/- प्रति वर्ष भाडे आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२/१४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.६ जयभिमनगर घाटी रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावण्याकरीता रक्कम रु.२,८५,०००/- अंदाजपत्रक जि.दर सुचीनुसार तयार करण्यांत आले आहे.सदरील काम "शहरात नविन सोडीयम व्हेपर बसविणे" या लेखा शिर्षाखाली सन ९७-९८ च्या तरतुदी मधून प्रस्तावित आहे. यासाठी ५० लाखाची तरतुद असून मा.आयुक्तांनी सदर कामास मंजुरी मिळाली आहे.

तरी जयभिमनगर घाटी वार्ड क्र.६ येथील रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावण्यासाठी रु. २,८५,०००/- अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६ जयभिमनगर घाटी रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावण्याकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,८५,०००/-च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "शहरात नविन सोडीयम व्हेपर बसविणे" या लेखा शिर्षाखाली करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**:-पुरवणी विषय पत्रिका :-**

**विषय क्र.१२३/१५:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शास्त्रीनगर येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,४४,५६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तदतुदीमधून करण्यात येणार आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,शास्त्रीनगर येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,४४,५६०/- च्या

अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४/१६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,विशालनगर गारखेडा येथील ५० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ४,०२,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च सन ९७-९८ या वर्षाकरीता "भांडवली खडी रस्ते" या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या रु.१०० लक्षच्या तरतुदीमधुन करण्यांत येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,विशालनगर गारखेडा येथील ५० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,०२,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भांडवली खडी रस्ते" या शिर्षकाखाली उपलब्ध तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५/१७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,जालना रोडवरील राणा ले-आऊट येथील अंतर्गत खडी रत्त्यांचे खडीकरण करण्याच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,९२,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च सन १९९७-९८ या वर्षाकरीता "भांडवली खडी रस्ते" या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या रक्कम रु. १०० लक्षच्या तरतुदीमधून करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,जालना रोडवरील राणा ले-आऊट येथील अंतर्गत खडी रस्त्याचे खडीकरण करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,९२,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "भांडवली खडी रस्ते" या शिर्षकाखाली उपलब्ध तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२६/१८:**

अतिक्रमण विभागाकडे असलेली मेटाडोर क्र. एम.डब्ल्यू.पी./ १५०७ ही १४ वर्ष जुनी झाली असून त्यास वारंवार रिपेअरींग करुन वापरणे मनपास आर्थिकदृष्टया परवडणारे नाही. त्यामुळे या वाहनास निर्लेखित करावयाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुर झाला आहे.या ट्रक ऐवजी डबल केबीन असलेली व स्टील बॉडी असलेली स्वराज माझदा-४९ डी हया मॉडेलची ट्रक जी अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांना बसण्याची तसेच अतिक्रमणातील सामान उचलून आणण्यासाठी उपयुक्त असल्यामुळे घ्यावयाची ठरली आहे. हया प्रकारच्या वाहनासाठी मे.भारत इंजिनियरिंग कंपनी,जे विक्रेते आहेत.त्यांच्या कडून दिनांक १५-५-९७ रोजी दरपत्रक आणले असून डी.जी.एस.ॲण्ड डी दराप्रमाणे त्यांनी रु.५,२६,३१५/- चे

दरपत्रक दिले आहे.जे जकात कर धरुन आहे.पूर्ण रक्कमेची अदाई केल्यानंतर अंदाजे एक महिन्यात ट्रक उपलब्ध होईल.डिलेव्हरी च्या वेळेस जर कंपनीने किंमतीत बदल केला तर त्याप्रमाणे बिलाची अदाई करावी लागेल. सरकारने टॅक्सेस मध्ये फेरबदल केला तर त्याप्रमाणे टॅक्सेस भरावे लागतील.हा खर्च तर घसारा निधीमधून करण्यास मंजुरी मिळावी करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अतिक्रमण विभागातील डबल केबीन असलेली व स्टील बॉडी असलेली "स्वराज माझदा-४९" डी हया मॉडेलची ट्रक स्वराज मझदा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. भारत इंजिनिअर कंपनी यांचेकडून त्यांचे दरपत्रकानुसार रक्कम रु.५,२६,३१५/- (जकात कर धरुन) ला खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. डिलेव्हरी पर्यंत जर कंपनीच्या किंमतीत अथवा सरकारने करामध्ये वाढ केल्यास त्याप्रमाणे रक्कम अदाई करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२७/१९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.भावसिंगपुरा गाव स्लम येथे गटार बांधणे,ढापे टाकणे व इतर कामाकरीता सा.बां.खाते यांच वर्ष ९६-९७ च्या दरसुचीनुसार रु.४,७४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम "अठरा खेडी विकास योजना" या शिर्षकातून मंजूर झाले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि. २४-२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.तसेच अंदाजपत्रकास दि.१४-३-९७ रोजी स्थायी समितीत मंजूरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सुहास आर.देशपांडे | २८% | कमी |
| २) श्री.बी.एस.तोरणे | २५.३% | कमी |
| ३) सुखबीरसिंग | २०.०५% | कमी |
| ४) एस.एम.मंडोरे | १३.८६% | कमी |
| ५) ए.डी.इंगळे | ५.२% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी दराची श्री.सुहास आर.देशपांडे यांची निविदा आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.भावसिंगपुरा गाव स्लम येथे गटार बांधणे,ढापे टाकणे व इतर कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी दराची श्री. सुहास आर.देशपांडे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२८/२०:**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की,साथ प्रतिबंधक उपाय योजनेसाठी म्हणून पाणी शुध्दीकरण गोळया क्लोरीन ३० एम.जी.खरेदी करणे जरुरी असल्याने गतवर्षीच्या मंजुर निविदा दराप्रमाणे मे.प्रेमियर असोशियेट नागपुर यांचे दर रुपये

७२=५० पैसे प्रति हजार प्रमाणे स्थायी समितीने मंजुर केल्याप्रमाणे सन ९७-९८ साठीही गतवर्षीच्या दरात संबंधिताकडून अंदाजपत्रकातील रक्कमेनुसार रु.तीन लाख पर्यंत खरेदी करीता मान्यता द्यावी.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साथ प्रतिबंधक उपाय योजनेसाठी म्हणून पाणी शुध्दीकरण गोळया क्लोरीन ३० एम.जी.मे.प्रिमियर असोशिएट नागरपुर यांचेकडून रु.७२=५० प्रति हजार प्रमाणे खरेदी करण्यास तसेच याकरीता रुपये तीन लाख पर्यंतच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२९/२१:**

शहर अभियंता प्रस्ताव सादर केला की,सिध्दार्थ उद्यानाच्या मागे मध्यवर्ती कोंडवाडा व मनपा पाण्याच्या टाकीजवळ धोबी घाटासाठी धोबी लोकांना कपडे धुण्याचे कायमस्वरुपी साहित्य ठेवण्यासाठी एक खोली व अकस्मिक पाऊस व वारा आल्यास बाहेरील कपडे आत सुकण्यासाठी  व पाऊस व वाऱ्यापासून त्यांना संरक्षण मिळण्यासाठी एक हॉल बांधावयाचे आहे.कपडे धुतांना पाय घसरु नये म्हणून परिसरामध्ये खांडकी तसेच संरक्षणाचे दृष्टीने बाजूने तार कुंपन करणेचे काम मा.महापौर यांनी सुचविले आहे. प्रस्तृत सुचविलेल्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ८,७५,६८४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि. १२-६-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रु. ८,७५,६८४/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून प्रस्तावित करण्यात आला आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सिध्दार्थ उद्यानच्या मागे व मनपा पाण्याच्या टाकीजवळ धोबी घाटाकरीता एक खोली बांधणे कपडे सुकण्यासाठी व पाऊस वाऱ्यापासून संरक्षणाकरीता एक हॉल बांधणे,यापरिसरात खांडकी रस्ते तसेच तार कंपण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ८,७५,६८४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती "या लेखा शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२९(अ) :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्यक योजनेअंतर्गत पांढरा हाफ शर्ट,खाकी हाफ पॅन्ट,निळा स्कर्ट,पांढरे पोलके (ब्लाऊज) शर्ट/शलवार म.न.पा.च्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे गणवेश शिलाई करुन पुरवठा करावयाचे आहेत.

सदर गणवेश कापड खरेदीसाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या.आठ पुरवठा धारकांच्या निविदा नमुन्यासह प्राप्त झाल्या.प्राप्त निविदा व नमुनेमा.खासदार,मा.महापौर,सभापती,विरोधीपक्षनेता,उप-आयुक्त-१व

२,शिक्षणाधिकारी,लेखाधिकारी-१ यांनी दिनांक २३-६-९७ रोजी सर्वानुमते प्राप्त दरपत्रकातील कापडाचे नमुने व दर लक्षात घेवून खालील फार्मचे नमुने पसंत केलेले आहे.

| कापडाचे नांव | दर प्रति मिटर | एजन्सीचे नांव |
|---|---|---|
| १) खाकी कापड | ८८.२० | रत्नहिरा ट्रेडर्स |
| २) निळे कापड | ८६.०० | रमेश बिन्नीज |
| ३) पांढरे कापड | ३४.५० | कामधेनु |

वरील प्रमाणे प्राप्त दराबाबत मा.आयुक्त यांनी दि. २७-६-९७ रोजी वरील एजन्सींना वाटाघाटीसाठी बोलाविले होते व चर्चेअंती ५% दर कमी करण्यात आले.त्यानुसार ठरणारे दर याप्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) खाकी कापड | ८८.२० | ५% वता जाता | ८३.८० | प्रति मिटर |
| २) निळे कापड | ८६.०० | ५% वता जाता | ८१.७० | --//-- |
| ३) पांढरे कापड | ३४.५० | ५% वता जाता | ३२.७५ | --//-- |

खरेदी करावयाचे कापडाचा तपशिल याप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) खाकी कापड | ४,७०० मिटर्स x ८३.८० | ३,९३,८६०/- |
| २) निळे कापड | ९,१५५ मिटर्स x ८१.७० | ७,४७,९६३/- |
| ३) पांढरे कापड | ३७.५५० मिटर्स x ३२.७५ | १२,२९,७६२/- |
| | | २३,७१,५८५/- |

वरीलप्रमाणे २३,७१,५८५/- रुपये खर्चाचा प्रस्ताव व मान्यतेस्तव सादर. कापडाची प्रत निविदेमध्ये निर्देशित केलेल्या वर्णनानुसार शासकीय लॅबोरटरीज मार्फत तपासुन घेण्यांत येईल व तद्नंतर त्याचे देयक अदा करण्यात येईल.सदरचा खर्च गणवेश खरेदी ९७-९८ या लेखा शिर्षकांतर्गत करण्यात येईल.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.स.अली मिरा सलामी** : प्रस्तावित विषयानुसार गणवेशाचे कापड खरेदीबाबत कोणत्या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली आहे याचा खुलासा व्हावा.तसेच अशा प्रकारचे महत्वाचे विषय ऐनवेळी ठेवण्यात आल्यामुळे त्याबाबत अभ्यास करण्यास वेळ न मिळाल्यामुळे सभागृहात चर्चा करता येत नाही. खरेदी करावयाच खाकी कपडा कोणत्या मीलचा आहे. याचा प्रस्तावात उल्लेख नाही.

**मा.आयुक्त :** मनपा शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्याविषयीचा प्रस्ताव आहे.शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणारी ही पहिलीच मनपा आहे.हे गणवेश १५ ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनी देण्यात येतात.गणवेशासाठी लागणारे कापड खरेदी प्रकरणी विहित पध्दत अवलंब केलेली आहे. त्यानुसार मा.महापौर,मा.सभापती,मा.विरोधीपक्ष नेता,मा.खासदार यांनी कापडाच्या नमुन्याची तपासणी करुन प्रस्तावित केल्यानुसार कापड खरेदीस मंजुरी दिली आहे. या प्रकरणी आज ३.०० वाजता संबंधित एजन्सी बरोबर वाटाघाटी करण्यात आल्यामुळे प्रस्ताव ठेवला आहे.तो सभागृह थांबवू शकते तथापि १५ ऑगस्ट ला गणवेश देता यावा म्हणून प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

**मा.सभापती :** सविस्तर माहितीसह सदर प्रस्ताव आगामी सभत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सदर प्रस्ताव सविस्तर माहितीसह आगामी सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

"जन गण मन" या राष्ट्र गीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ५-७-९७ रोजी दुपारी ४.०० वाजता भरलेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त.शनिवार दिनांक ५-७-९७ रोजी मा.सभापती स्थायी समिती श्री.प्रभाकर विधाते यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस "मलिक अंबर" या सभागृहात "वंदे मातरम्" या गिताने दुपारी ४.०० वाजता सुरुवात झाली.या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद सभेस उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स.स.श्री.गिरजाराम हाळनोर | सभासद |
| २) श्री.सुभाष टाकळकर | --//-- |
| ३) श्री.त्रिंबक तुपे | --//-- |
| ४) श्री.कचरु नवपुते | --//-- |
| ५) श्री.अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ६) श्री.विकास जैन | --//-- |
| ७) श्री.भगवान घडामोडे | --//-- |
| ८) श्री.अब्दुल रशिद (मामू) | --//-- |
| ९) श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| १०) श्री.जोशी संजय रामदास | --//-- |
| ११) श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १२) सौ.यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १३) श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| १४) श्री.जयवंत केशवराव ओक | --//-- |
| १५) श्री.स.अली मिरा सलामी | --//-- |

**विषय क्र.१३०/१ :**

ऋषी संस्कृती विद्याकेंद्र,औरंगाबाद यांनी मो.उस्मानपुरा येथील श्रेयनगर हया मंजुर रेखांकनातील खुल्या जागांपैकी एक खुली जागा ती त्या मंजुर रेखांकनातील भुखंड क्र. ८१,८२,८६,९१,९२,९३,९४ समोर आहे.ती केंद्राचे विविध उपक्रमा करीता मिळावी म्हणून मागणी केली आहे.संस्थेच्या विविध उपक्रमामध्ये प्रामुख्याने आरोग्य साधना,ध्यान धारणा इ.उपक्रम आहेत.

मागणी केलेली खुली जागा महानगरपालिकेचे ताब्यात असुन महानगरपालिकेने प्रचलीत धोरणानुसार मंजुर रेखांकनातील खुली जागा एखादया सेवाभावी संस्थेस विकसीत करावयास देता येते.त्या खुल्या जागेत विकास नियंत्रण नियमावली नुसार खुल्या जागेच्या १०% किंवा २०० चौ.मी.बांधकाम देय होते.दि.२०-११-९६ च्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.१६०/१ ने रेखांकनातील खुल्या जागांना भाडे पट्टयावर देण्याबाबतचे धोरण व भाडे रक्कम ठरविण्यात आलेली आहे.त्याप्रमाणे दर नमूद केलेली खुली जागा वार्षिक भाडे रु.१००/- आकारणी सदर संस्थेस दिर्घमुदती करीता भाडेपट्टयावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

मान्यतेनंतर संस्थेस आवश्यक ती कागदपत्रांची अटींची पुर्तता करुन करारनामा करुन खुली जागा विकासा करीता हस्तांतरीत करुन देण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,ऋषी संस्कृती विद्या केंद्र,औरंगाबाद या सेवाभावी संस्थेस उस्मानपुरा श्रेयनगर या मंजुर रेखांकनातील खुल्या जागेपैकी भूखंड क्र. ८१,८२,८६,९१,९२,९३,९४ च्या समोरील जागा नियंत्रण नियमावली नुसार १०% किंवा २०० चौ.मी.बांधकाम देय राहील या अटीवर व वार्षिक भाडे रु. १००/- आकारुन सदर संस्थेस दिर्ध मुदतीकरीता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. आवश्यक कागदपत्रांची अटींची पुर्तता करुन करारनामा करुन खुली जागा विकासाकरीता हस्तांतरीत करण्यांत यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३१/२ :**

मो.दमडीमहल येथील न.भू.क्र.११३१२/५ हया जमिनीला पुर्वापार होत असलेला स्मशानभुमीचा वापर विचारात घेऊन महापालिकेने तेथे कुंपनभिंतीचे तसेच टीनरोडचे काम केलेले आहे.आता ही मातंग समाजाची स्मशानभूमी म्हणून वापरात आहे.

दरम्यान जमीन मालक श्री.जुम्माखाँन पि. अशरफखान यांनी स्मशान भूमीची जमिन जी त्याचे मालकी हक्कातील आहे असे नमुद करुन त्या जमिनीचा मोबदला मिळावा म्हणून केली आहे.

न.भु.क्र.११३१२/५ च्या आखिव पत्रिकेवर कारणापुरता उतारा अशी नोंद असून होल्डर म्हणून अर्जदाराचे नांव आहे.आखीव पत्रिकेनुसार न.भू.क्र.११३१२/५ चे एकूण क्षेत्र २७९५.४० चौ.मी. आहे.त्यापैकी २३९५.४० चौ.मी.क्षेत्र स्मशानभूमी करीता वापरात असुन हया वर्षाचे सिध्द दिर्घगणकाच्या दराआधारे खाजगी वाटाघाटीने जमिनीचे मुल्यांकन करता ते रक्कम रु. ७,७७,६५८/- एवढे निश्चित केले आहे.

करीता पुर्वापार वापरात असलेल्या व मनपाने विकसित केलेल्या हया स्मशानभूमीचा पुढेही स्मशानभुमी म्हणून वापर होणार असल्याचे गृहीत धरुन दिलेल्या वजा पटीनंतर निश्चित होणारे मुल्य रक्कम रु. ७,७७,६५८/- च्या मान्यतेसाठी तसेच ही रक्कम जमीन मालकास जमिनीचा मोबदला म्हणून द्यावयाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

मान्यतेनंतर सदरील जमिनीचे संबंधितांकडून नोंदणीकृत दस्तऐवजाने हस्तांतर करुन घेण्यात येईल व हया नोंदणीकृत दस्तऐवजा करीता व खरेदीखताला होणारा खर्च मनपा करणार आहे.त्यासाठी लागणारी रक्कम रु. ७०,०००/- नोंदणीकृत खरेदी खत करुन घेण्यासाठी श्री.कालेले डी.डी. (शा.अ.) यांना अग्रीम म्हणून देण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,दमडीमहल येथील न.भू.क्र.११३१२/५ हया जमिनीचा मातंग स्मशानभूमी करीता वापर होत आहे.हया जमिनीचे मालक श्री.जुम्माखान पि. अशफरखान यांनी स्मशानभूमीकरीता वापरात असलेले क्षेत्र २३९५.४० चौ.मी.मनपाने ताब्यात घेऊन त्याचा मोबदला रु. ७,७७,६५८/- जमीन मालकास अदाई करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. खरेदीकरीता लागणारा खर्च रक्कम रु.७०,०००/- मनपाने करण्यांस व याकरीता श्री.डी.डी.कालेले (शा.अ.) यांना अग्रीम म्हणून देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.सादातनगर स्लम भागात डांबरीकरण रस्ते तयार करणे करीता रक्कम रु.२५,३१,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांचे दरसुची ९५-९६ अनुसार तयार करण्यांत आली असुन मा.आयुक्तांनी दि. ४-१-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली तसेच दि. १०-३-९७, १५-३-९७ व २६-३-९७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.१९२/९ द्वारे सदर कामाची मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा विकण्याचे अंतिम तारीख १२-५-९७ पर्यंत एकूण सहा (६) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस २३-५-९७ रोजी फक्त पाच (५) मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या निविदा दि. २८-५-९७ रोजी उपस्थित ठेकेदाराच्या समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.के.बी.पाथ्रीकर | २४.२१% | अं.प.दरापेक्षा कमी |
| २) श्री.दि.अजितसिंग | २१% | --//-- |
| ३) श्री.रे.कन्स्ट्रक्शन | १८.३१% | --//-- |
| ४) श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १७.९०% | --//-- |
| ५) श्री.मॉस्काट कन्स्ट्रक्शन | १.८६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा १४.२१% कमी दराची असल्यामुळे श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादातनगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २४.२१% कमी दराची श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.चिकलठाणा येथील नविन आठवडी बाजार अंतर्गत खडी रस्तेचे डांबरीकरण करीता रक्कम रु.७,८२,४५०/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग,औरंगाबाद यांच्या दरसुची ९५-९६ नुसार तयार करण्यात आली असून मा.आयुक्तांनी दि. २५-२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली.तसेच दि.१०-३-९७,दि.१५-३-९७ व २६-३-९७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचा विषय क्र. २२४/९७ द्वारे सदर कामाची मंजुरी देण्यांत आली नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी कार्यालयाची निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/३२/९७ दि. ३-५-९७ रोजी निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीची अंतीम दि. १२-५-९७ पर्यंत एकूण सहा (६) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस दि. २३-५-९७ रोजी फक्त पाच (५) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २८-५-९७ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.के.बी.पाथ्रीकर | १९.२१% | कमी अं.प.दरापेक्षा |
| २) श्री.मेस.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १५.९१% | --//-- |
| ३) श्री.डी.अजितसिंग | १५.५% | --//-- |
| ४) श्री.मे.मॉस्काट कन्स्ट्रक्शन | १.८६% | --//-- |

५) श्री.रे.कन्स्ट्रक्शन १६.६०% --//--

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री.के.बी.पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२१% कमी दराची आहे.करीता श्री.के.बी. पाथ्रीकर यांची १९.२१% कमी अ.प.दरापेक्षा निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील नविन आठवडी बाजार अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदा तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १९.२१% कमी दराची श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३४/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणे करीता रक्कम रु. १२,२०,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबाद यांची अनुसुची ९५-९६ अुनसार तयार करण्यांत आली असून मा.आयुक्तांनी दि. १-२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली.तसेच दि. १०-३-९७,१५-३-९७ व २६-३-९७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. २०२/१९ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रीत प्रसिध्दी देवून कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/नि/लेखा ३२ /९७ दि. ३-५-९७ द्वारे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विकण्याची अंतिम तारीख दि. १२-५-९७ पर्यंत एकूण तीस (३०) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस दिनांक २३-५-९७ रोजी फक्त दहा (१०) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या निविदा दि. २८-५-९७ रोजी उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.न्युस्टार कन्स्ट्रक्शन | २८.८८९% | अं.प.दरापेक्षा कमी |
| २) ट्रिस्टार | २७.२००% | --//-- |
| ३) एस.एच.असोशिएट | २५.५५% | --//-- |
| ४) राणा कन्स्ट्रक्शन | २५.०२% | --//-- |
| ५) आकाश (एल.जी.पवार) | २४.८६% | --//-- |
| ६) श्री.सलीम पटेल | २४.४८% | --//-- |
| ७) मे.औरंगाबाद कन्स्ट्रक्शन | २२.७% | --//-- |
| ८) एस.जी.शहा | ७% | --//-- |
| ९) श्री.आर.बी.चव्हाण | २७% | --//-- |
| १०) श्री.मन्नान खाँन | २१% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २८.८८९% कमी अं.प.दरापेक्षा दराची निविदा मे.न्युस्टार कन्स्ट्रक्शन यांची आहे.करीता श्री.मे.न्युस्टार कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा २८.८८९% कमी दराची असलेली निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २८.८८९% कमी दराची मे. न्यु. स्टार कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३५/६ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबसाहेब आंबेडकर विशेष सहाय्य योजने अंतर्गत पांढरा हाफ शर्ट,खाकी हाफ पॅन्ट,निळा स्कर्ट,पांढरे पोलके (ब्लाऊज) शर्ट/सलवार मनपाच्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे गणवेश शिलाई करुन पुरवठा करावयाचे आहेत.सदर गणवेश कापड खरेदीसाठी दै.मराठवाडा,लोकपत्र,गोरज वार्ता या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता आठ पुरवठा धारंकाच्या निविदा नमुन्यासह प्राप्त झाल्या.प्राप्त निविदा व नमुने मा.खासदर,मा.महापौर,मा.सभापती,मा.विरोधी पक्षनेता,मा.आयुक्त,मा.उप आयुक्त-१ व २,शिक्षणाधिकारी,लेखाधिकारी-१ यांनी दि. २३-६-९७ रोजी सर्वानुमते प्राप्त दरपत्रकातील कापडाचे नमुने व दर लक्षात घेऊन खालील फार्मचे नमुने पसंत केलेले आहेत.

| कापडाचे नाव | दर प्रति मिटर | एजन्सीचे नाव |
|---|---|---|
| १) खाकी कापड (एस.कुमार रॉयल्टी) | ८८.२० | रत्नहिरा ट्रेडर्स |
| २) निळे कापड (विक्रांत कमाल सिल्कमिल्स) | ८६.०० | रमेश बिन्नीज |
| ३) पांढरे कापड (मेनचेलॉन फॅब्रीक स्चिमॅन) | ३४.०० | कामधेनु |

वरीप्रमाणे प्राप्त दराबाबत मा.आयुक्त यंनी दि. २७-६-९७ रोजी वरील एजन्सीना वाटाघाटीसाठी बोलाविले होते व चर्चेअंती ५% कमी दर करण्यात आले.त्यानुसार ठरणारे दर खालील प्रमाणे

| कापडाचे नाव | दर प्रति मिटर | ५%वजा जाता येणारे दर प्र.मि | |
|---|---|---|---|
| १) (खाकी कापड) | ८८.२० --//-- | ८३.८० | --//-- |
| २) (निळे कापड) | ८६.०० --//-- | ८१.७० | --//-- |
| ३) (पांढरे कापड) | ३४.५० --//-- | ३२.५७ | --//-- |

खरेदी करावयाच्या कापडाचा तपशिल याप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| खाकी कापड | ४७००X८३.८० | रु. ३,९३,८६०/- |
| निळे कापड | ९१५५ मी.८१.७० | रु. ७,४७,९६३/- |
| पांढरे कापड | ३७५५० मी.३२.७५ | रु. १२,२९,७६२/- |
| | | रु. २३,७१,५८५/- |

वरीलप्रमाणे रु. २३,७१,५८५/- रुपये खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.कापडाचे नमुने निविदेमध्ये निर्देशीत केलेल्या वर्गनानुसार शासकीय निविदेमध्ये निर्देशीत घेण्यांत येईल व तद्नंतर त्यांचे देयक अदा करण्यात येईल.सदरचा खर्च गणवेश खरेदी ९७-९८ या लेखाशिर्षातंर्गत करण्यांत येईल.करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबसाहेब आंबेडकर विशेष सहाय्य योजने अंतर्गत पांढरा हाफ शर्ट,खाकी हाफ पॅन्ट,निळा स्कर्ट,पांढरे पोलके (ब्लाऊज) शर्ट/सलवार मनपाच्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना देण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रकधारक यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार ठरल्याप्रमाणे त्यांनी दिलेल्या दरात ५% कमी करुन खालील दराने कापड त्या त्या एजन्सीच्या नावासमोर दर्शविलेल्या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| कापडाचे नाव | दर प्रति मिटर | ५%वजा जाता येणारे दर प्र.मि | |
|---|---|---|---|
| १) मे.रत्नहिरा ट्रेडर्स (खाकी कापड) | ८८.२० --//-- | ८३.८० | --//-- |

२) मे.रमेश बिन्नीज (निळे कापड) ८६.०० --//-- ८१.७० --
//--
३) मे.कामधेनु (पांढरे कापड) ३४.५० --//-- ३२.५७ --
//--

वरील दराने खाकी कापड ४७०० मीटर्स,निळे कापड ९१५५ मिटर्स व पांढरे कापड ३७५५० मीटर्स खरेदी करण्यास व त्याकरीता येणाऱ्या एकूण रक्कम ररु. २३,७१,५८५/- च्या खर्चास मंजुरी देण्यात येते.सदरील गणवेश १५ ऑगस्ट पूर्वी सर्व विद्यार्थ्यांना वाटप व्हावेत.या दृष्टीकोनातून याच सभेत या ठरावास स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३६/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, छावणी पुलाचे या पुर्व दिशेला मोकळया जागेत औरंगाबाद,मुंबई रस्त्यावर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती बॉझ धातूचा १० फुट उंचीचा पुतळा बसविणे व सभोवताली सुमारे १०५ मी.X १० मी. आकाराचे वाहतुक बेट विकसीत करुन त्यांचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रु. १६,७९,१५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे यामध्ये पुतळा बसविण्यासाठी रक्कम रु. ४,५०,०००/- तसेच स्थापत्य काम व विद्युतीकरणासाठी रक्कम रु. १२,२९,१५०/- ची तरतुद करण्यात आलेली असून सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त झालेल्या रक्कम रु. १०.०० कोटीच्या अनुदानातुन हाती घेतलेल्या कामा मधुन जी बचत होणार त्या बचतीमधुन करण्यांत येणाऱ्या कामासाठी दि. १९-१२-९६ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.१७६/१४ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामापैकी छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याचे कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा /नि/२९/९७ दिनांक २५-४-९७ द्वारे मागविलेल्या सुचनेनुसार श्री.संजय परदेशी यांनी दरपत्रक दिलेले नव्हते.मॉडेल करण्यासाठी त्यांना पुरेसा कालावधी न मिळाल्याने ते स्पर्धेत उतरु शकले नव्हते. त्यामुळे त्यांना कालावधी वाढवुन मागीतला होता व त्यानुसार पुतळयाचे मॉडेल व दरपत्रक दिले.पुतळयांच्या मॉडेलची निवड पुतळा समितीने केली असून मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम (२) मधील परंतुकानुसार मंजुर करुन स्थायी समितीची मंजुरी घेण्याचे आदेश दिले व दराच्या वाटाघाटीसाठी श्री.परदेशी यांना बोलावून सदरील काम रक्कम रु.३.१० लाखात करण्यांचे सुचविले.त्यानुसार श्री. परदेशी यांना खालील अटीवर काम करण्यांचे मान्य केले आहे.

१) पुतळयाची उंची १० फुट असेल व वजन ६५० ते ७०० कि.ग्रॅ. असेल त्यासाठी ६०% कॉपर ३०% ब्रॉस १०% झिंक असे धातेमिश्रण वापरण्यांत येईल.
२) पुतळयाची पोहोच ओरंगाबाद येथे त्यांच्या खर्चाने ते देणार आहेत.
३) पुतळयाची पोहोच केल्यावर पुतळा उतरविणे,चबुतऱ्यावर चढविणे इत्यादी कामाची जबाबदारी मनपाची राहील हे काम त्यांना करावयाचे झाल्यास त्यासाठी खर्च वेगळा (रु.३.१० लाख व्यतिरिक्त) द्यावा लागेल.
४) पुणे येथुन औरंगाबादला पुतळा आल्यावर जकात कर व इतर सर्व कराची जबाबदारी महानगरपालिका औरंगाबादची राहील.
५) पुतळयाची एकूण किंमत चार टप्प्यात द्यावी ते टप्पे खालील प्रमाणे.

अ) कामाच्या आदेशा सोबत २५%

ब) पुतळयाचे क्लेमॉडल पसंत झाल्यावर ५०%
क) पुतळयाचे कास्टींग पुर्ण झाल्यावर वेल्डींग,ग्रॅनडींग इ.कामासाठी २०%
ड) पुतळा पुर्ण झाल्यावर पोहोच मिळण्यापुर्वी ५%
६) त्यांचे दिलेले दर ६ (सहा) महिन्यासाठी त्यांना बंधनकारक राहतील.
तरी वरीलप्रमाणे श्री.संजय परदेशी यांनी अटी दिल्या असुन त्याबाबतचा विचार करता कार्यालयातर्फे वाटाघाटी अंती खालील अटीवर त्यांची निविदा स्विकारण्याचे ठरले आहे.
१) कामाच्या आदेशा बरोबर पैसे देण्यांत येणार नाही.
२) क्ले मॉडेल पसंत पडल्यास ३०% रक्कम देण्यांत येईल.
३) पुतळयाची पोहोच पांच महिन्याच्या आत द्यावी.
करीता वरील प्रमाणे केलेल्या वाटाघाटीनुसार व अटीनुसार श्री.संजय परदेशी यांनी मान्य केलेली किंमत रु. ३.१० लाख मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम (२) दोन मधील परंतुकानुसार प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छावणी पुलाचे या पुर्व दिशेला मोकळया जागेत औरंगाबाद,मुंबई रस्त्यावर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती बॉझ धातूचा १० फुट उंचीचा पुतळा बसविण्याकरीता व श्री.संजय परदेशी यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेल्या रक्कम रु. ३.१० लाख मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम (२) दोन मधील परंतुकानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.हे काम श्री.परदेशी यांचे कडून खालील अटीवर करुन घेण्यात यावे.

१) कामाच्या आदेशा बरोबर पैसे देण्यात येणार नाही.
२) क्ले मॉडेल पसंत पडल्यास ३०% स्लम देण्यांत येईल.
३) पुतळयाची पोहोच पांच महिन्याच्या आंत द्यावी. या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३७/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समर्थनगर येथील चौकात स्वा.सावरकर यांचा पुर्णाकृती पुतळा व स्थापत्याचे काम करणे अशा दोन वेगवेगळया कामासा स्थायी समिती सभा दि.८-३-९६ रोजी प्रस्ताव क्र. ५४६/११ अन्वये रक्कम रु. ५,००,०००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामापैकी स्वा.सावरकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याचे कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. जा.क्र.मनपा /लेखा /नि /२९/९७ दि. २५-४-९७ द्वारे मागविलेल्या सुचनेनुसार श्री.संजय परदेशी यंनी दरपत्रक दिलेले नव्हते.

मॉडल करण्यासाठी त्यांना पुरेसा न मिळाल्याने ते स्पर्धेत उतरु शकले नव्हते.त्यामुळे त्यांनी कालावधी वाढवुन मागीतला होता व त्यानुसार त्यांनी पुतळयाचे मॉडेल व दरपत्रक दिले.पुतळयाच्या मॉडेलची निवड समितीने केली असून मा.आयुक्तांनी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण (५) मधील नियम (२) मधील परंतुका नुसार मंजुर करुन स्थायी समितीची मंजुरी घेण्याचे आदेश दिले व दराच्या वाटाघाटीसाठी श्री.संजय परदेशी यांना बोलावून सदरील काम रक्कम रु. ०२.०० लाखात करण्याचे सुचविले व त्यानुसार श्री.संजय परदेशी यंनी काम करण्यांचे मान्य केलेले आहे.

१) पुतळयाची उंची ७१/२ एवढी असेल वजन ४०० ते ४५० किलो एवढे असेल त्यात ६०% कॉपर ३०% ब्रॉस १०% झिंक असे धातु मिश्रण राहील.

२) पुतळयाची पोहोच औरंगाबाद येथे त्यांच्या खर्चाने ते देणार आहे.
३) पुतळयाची पोहोच केल्यावर पुतळा उतरविणे,चबुतऱ्यावर चढविणे इ.कामाची जबाबदारी महानगरपालिकेची राहील हे काम त्यांनी स्वतः करावयाचे झाल्यास त्यासाठीचा खर्च वेगळा (रु.२.००लाख व्यतिरिक्त) द्यावा लागेल.
४) पुणे येथून औरंगाबादला पुतळा आणल्यावर जकात कर व इतर खर्चाची जबाबदारी महानगरपालिका औरंगाबादची राहील.
५) पुतळयाची एकूण कि किंमत चार टप्प्यात द्यावी ते टप्पे खालील प्रमाणे.
अ) ऑर्डर सोबत २५%
ब) पुतळयाचे क्लेमॉडल पसंत झाल्यावर ब्राँझ कॉस्टींग साठी ५०%
क) पुतळयाचे कास्टींग पुर्ण झाल्यावर वेल्डींग,ग्रॅनडींग इ.कामासाठी २०%
ड) पुतळा पुर्ण झाल्यावर पोहोच मिळण्यापुर्वी ५%
६) त्यांचे दिलेले दर ६ (सहा) महिन्यासाठी त्यांना बंधनकारक राहतील.
तरी वरीलप्रमाणे श्री.संजय परदेशी यांनी अटी दिल्या असुन कार्यालयातर्फे वाटाघाटी नंतर खालील अटीवर त्यांची निविदा स्विकारण्याचे ठरले आहे.
१) कामाच्या आदेशा बरोबर पैसे देण्यांत येणार नाही.
२) क्ले मॉडेल पसंत पडल्यास ३०% रक्कम देण्यांत येईल.
३) जकात कर माफ करण्यांच्या अटीवर.
करीता वरील प्रमाणे केलेल्या वाटाघाटीनुसार व अटीनुसार श्री.संजय परदेशी यंनी मान्य केलेली किंमत रक्कम रु. २.०० लाख मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम २ (दोन) मधील परंतुकानुसार प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,समर्थनगर येथील चौकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याच्या कामाकरीता खालील अटींवर श्री.संजय परदेशी यांच्यातर्फे रक्कम रु. २.०० लाख मध्ये मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम २ (दोन) परंतुकानुसार पुतळा बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
१) कामाच्या आदेशाबरोबर पैसे देण्यांत येणार नाही.
२) क्ले मॉडेल पसंत पडल्यास ३०% रक्कम देण्यांत येईल.
३) जकात कर माफ करण्यांच्या अटीवर.
वैधानिक कार्यवाही व्हावी.या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र.१३८/९ :**

अति.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊन हॉल ते अंजली सिनेमा या रोडवर विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ४,४७,७६५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाल्यानुसार सदरील कामाकरीता दुसऱ्यावेळेस निविदापत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा निविदा पत्रके विकल्या गेली स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | ११% | जास्त दराने |
| २) मे.शाम इलेक्ट्रीकल्स | ९.९ | जास्त दराने |
| ३) मे.आदिनाथ इलेक्ट्रीकल्स | १०% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा मे.शाम इलेक्ट्रीक स्टोअर्स यांची सर्वात कमी म्हणजे ९.९% जास्त दराने आहे.सदरील दिलेले दर जास्त वाटल्यामुळे त्या एजन्सीस वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी दर कमी करण्यास नकार दिल्यानुसार द्वितीय कमी दराच्या एजन्सीस मे.आदिनाथ इलेक्ट्रीकल यांना वाटाघाटीस बोलावले असता ५% अंदाजपत्रकीय पेक्षा दराने काम करण्यांचे मान्य केले आहे.

तरी मे.आदित्य इलेक्ट्रीकल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल ते अंजली सिनेमा या रोडवर विद्युतीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराने दरपत्रक धारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अं.प.दरापेक्षा। ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३९/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,तरुण भारत ते सातारा (मनपा हद्द) या रोडवर सोडीयम व्हेपर्स लावण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या विद्युत दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ७,७०,१८१/- चे तयार करण्यांत आलेले आहे.तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तरुण भारत ते सातारा (मनपा हद्द) या रोडवर सोडीयम व्हेपर्स लावण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.७,७०,१८१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४०/११ :**

अतिशहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,स्ट्रीटलाईट फिक्चर लावण्या करीता ब्रॅकेट व क्लॅम्प खरेदी करण्याच्या कामाकरीता स्थायी समिती विषय क्र. दिनांक २४-४-९७ अन्वये रु.४,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.त्या करीता निविदा पत्रके मागविली असता निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यत एकूण तीन निविदापत्रके प्राप्त झाली.सदरील निविदा पत्रके प्राप्त झाली.सदरील निविदा पत्रके दि.२५-६-९७ रोजी उघडण्यात आली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | ब्रॅकेट | क्लॅम्पसाठी |
|---|---|---|
| १) वर्षा मेटल वर्क्स | अ) ९४/ | अ) ३५/ |
| | ब) ३३८/ | ब) ५८/ |
| २) सत्यम वर्क्स | अ) ९५.५० | अ) ३६/ |
| | ब) ३६०/ | ब) ६०/ |
| ३) गजानन स्ट्रीट फेब्रीकेटर्स | अ) ९५/ | अ) ४२.२५ |
| | ब) ३५०/ | ब) ६५/ |

वरील प्राप्त दरामध्ये ब्रॅकेटसाठी मे.वर्षा मेटल वर्क्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे रक्कम रु. ९४/-रु.प्रतिनग व ३३८/- रु. प्रतिनग व तसे क्लॅम्पसाठी मे.वर्षामेटल वर्क्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया कमी म्हणजे रु.३५/- व ५८/- रु. प्रतिनग असे आहे.परंतु सदरील दर जास्त वाटत असल्याने मे.वर्षा मेटल वर्क्स यांना प्रत्यक्ष दराने वाटाघाटीस्तव बोलावले असता ते सदरील साहित्य ब्रॅकेट रु.९०/- प्र.नग या दराने व क्लॅम्प रु.२७/- साहित्य खरेदी केल्या रक्कम रु. ४,२४,२००/- इतका खर्च येणार आहे.तरी मे.वर्षा मेटल वर्क्स यांचेकडून ब्रॅकेटसाठी प्रति नगर रु. ९०/- व रु.३३८/- व क्लॅम्पसाठी रु. २७/- व रु. ५८/- या दराने खरेदी करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्ट्रीटलाईट फिक्चर लावण्या करीता ब्रॅकेट व क्लॅम्प खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रक धारक मे.वर्षा मेटल वर्क्स यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार ब्रॅकेट रु. ९०/- व ३३८/- प्रतिनग या दराने व क्लॅम्प रु. २७/- व ५८/- प्रतिनग या दराने खरेदी करण्यास सर्वानमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४१/१२ :**

महानगरपालिका औरंगाबाद सहा.संचालक नगररचना यांनी प्रस्ताव सादर केला की,मनपातर्फे जाधववाडी येथे वाहतूक नगराचे काम प्रस्तावित आहे.या वाहतुकनगराच्या कामासाठी एकंदर २५ एकर जागा लागणार आहे.प्रस्तावित जाधववाडी येथील वहतुक नगराची जागा ही कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या मालकीची आहे.त्याकरीता सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती,औरंगाबाद,मा.खासदार औरंगाबाद,मा.महापौर व मा.आयुक्त यांची संयुक्त बैठक दि. ५-७-९७ रोजी मा.आयुक्त यांच्या दालनात झाली.

वरील बैठकीत संयुक्त रित्या खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) एकूण २५ एकर जागेचा करारनामा करणे व त्यातील १० एकर जागेचा ताबा सत्वर घेणे.
२) भाडेपट्टयाची रक्कम ४० पैसे प्रति चौरस फुट प्रति वर्ष या प्रमाणे रु. १,७४,२४०/- येत आहे.
३) भाडेपट्टयाची मुदत ९९ वर्षा करीता राहील व प्रथम ३० वर्षाकरीता करारनामा करण्यात यावा.
४) भाडेपट्टयाचा दर हा शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहील.

करीता कृषी उत्पन्न बाजार समिती,औरंगाबाद यांच्याकडून १० एकर जमीन ४० पैसे प्रति चौ.फुट प्रति वर्ष या दराने ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,जाधववाडी येथील प्रस्तावित वाहतुक नगराकरीता कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मालकीची असलेली २५ एक जागा खालील अटी व शर्तीनुसार घेण्यास मंजुरी देण्यात येते.

५) एकूण २५ एकर जागेचा करारनामा करणे व त्यातील १० एकर जागेचा ताबा सत्वर घेणे.
६) भाडेपट्टयाची रक्कम ४० पैसे प्रति चौरस फुट प्रति वर्ष या प्रमाणे रु. १,७४,२४०/- येत आहे.

७) भाडेपट्टयाची मुदत ९९ वर्षा करीता राहील व प्रथम ३० वर्षाकरीता करारनामा करण्यात यावा.

८) भाडेपट्टयाचा दर हा शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहील.

वरील अटी व शर्तीनुसार कृषी उत्पन्न बाजार समिती कडून १० एकर जमीन ४० पैसे प्रति चो.फुट प्रति वष्र या दराने ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**शिक्षणाधिकारी** : महापालिका शाळेत एकूण २७६०० विद्यार्थी मागील वर्षी शिक्षण घेत होते.गत वर्षी बालवाडी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आला नव्हता.मनपा शाळेत चालु वर्षी १००० विद्यार्थ्यांची भर पडली असून आणखी अंदाजे ५०० विद्यार्थी प्रवेश घेतील असा अंदाज आहे.

**श्री.अभिमन्यु भालेराव** : मनपाच्या एकूण शाळा किती आहेत.या शाळोत किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.तीन वर्ष सलग एकाच शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात याव्यात असा प्रस्ताव असतांना मसनतपुर या शाळेत गेल्या अकरा महिन्यापुर्वी बदलून आलेल्या मुख्याध्यापिका यांची बदली का करण्यात आली याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी** : जेष्ठता क्रमांकानुसार शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. या बदल्या करतांना शैक्षणिक कामात सुसुत्रता रहावी.या दृष्टीने नियमानुसार शिक्षकांकडून पसंतीनुसार पांच शाळांची नांवे मागविण्यात आली होती.

**मा.सभापती** : शिक्षक बदली प्रकरणांत पसंतीनुसार पांच शाळा नांवे का मागविण्यात आली अशा वेळी अनेक शिक्षकांनी एकाच शाळोस पसंती क्रम दिला तर बदल्या कशा करणार याबाबत खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी** : बदली करतांना पसंती क्रम विचारला जातो.तसेच प्रत्येक शाळेवर पदवीधर शिक्षक असावा असाही नियम ठेवण्यात आला होता.

**श्री.नवपुते :** नियमाप्रमाणे विद्यार्थी संख्येनुसार किती शिक्षक कमी आहे.याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** ४० विद्यार्थी संस्थेस एक शिक्षक असा नियम आहे.

**श्री.नवपुते :** नारेगांव शाळेत एकूण किती विद्यार्थी व किती शिक्षक आहेत याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** नारेगांव शाळेत ११ शिक्षक व १००० विद्यार्थी आहेत.

**श्री.स.अ.मिरा सलीमी :** मनपा शाळेत २७६०० विद्यार्थी शिक्षण घेत असून ६०० शिक्षक आहेत.यानुसार ४० विद्यार्थ्यांना एक शिक्षक या नियमाप्रमाणे शिक्षक संख्या योग्य असतांना नारेगांव शाळेत शिक्षकांची संख्या कमी का याचा खुलासा व्हावा.

**श्री.टाकळकर :** वसंत भुवन येथील शाळेत १४० विद्यार्थी आणि ९ शिक्षक अशी स्थिती आहे.

**श्री.भालेराव** : मसनतपुर येथील शाळेत अकरा महिन्यापूर्वी बदलून आलेल्या मुख्याध्यापिका यांची पुन्हा बदली करण्यात आली आहे.तसेच ज्या दोन शिक्षकांची या शाळेत बदली करण्यात आली आहेत.ते शिक्षक अद्यापपर्यंत रुजू झाले नाहीत.तीन वर्ष पर्यंत बदली न करण्याचा नियम आहे.तरीही

मुख्याध्यापिका यांची बदली करण्यात आली अशा प्रकारे मसनतपुर आगारच्या शाळेवर अन्याय केला जात आहे.

**श्री.घडामोडे :** मागील सभेच्या वेळी बदली प्रकरणाबाबत चर्चा केली असतांना बदली प्रकरणी प्रशासकीय बाब आहे असा खुलासा सभागृहात करण्यांत आला होता.मग आजच्या सभेत बदली प्रकरणांवर कोणत्या आधारे चर्चा केली जात आहे.याचा खुलासा व्हावा.

**श्री.गौतम लांडगे** : शिक्षकांच्या बदल्या करतांना शाळेचा पसंतीक्रम द्यावा असा नियम ठेवण्यास आमच्या भागात शिक्षक कसे येतील.तेव्हा पसंतीक्रमानुसार शाळेत बदल्या का केल्या जात नाही.

**श्री.ओक जयवंत** : मनपा शाळेत विद्यार्थी संख्येनुसार शिक्षकांची संख्या कमी असेल तर शिक्षकांची पदे भरण्यात यावीत.शिक्षकांच्या बदल्या करतांना पसंती क्रमानुसार शाळेत बदली करणे हे योग्य नाही.मनपा शाळेतील पदवीधर शिक्षक इयत्ता पहिली/दुसरीच्या वर्गांना शिकवतात.हेही योग्य नाही.ही वस्तुस्थिती आहे.तेव्हा पुढील सभेत मनपा शाळेत किती शिक्षक आहेत.त्यापैकी किती पदविका व पदवीधारक आहेत.शाळांची संख्या /विद्यार्थी संख्या /पदविका व पदवीधर शिक्षक देण्यात यावी.गेल्या १०x१२ वर्षापासून एकाच शाळेत शिकवणाऱ्या शिक्षकांनी बदली बाबत वारंवार अर्ज देऊन अशा शिक्षकाच्या बदल्या झाल्या नाहीत.याबाबत खुलासा करण्यात यावा.

**शिक्षणाधिकारी** : अंदाजे ७० शिक्षकांची आवश्यकता भासेल.

**श्री.गौतम लांडगे** : शिक्षकांच्या बदल्या करतांना पसंतीक्रम देण्याची सवलत का देण्यांत आली.

**श्री.अ.रशिदखाँन(मामू)** : मनपा शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांपैकी किती शिक्षक स.नगरसेवकांचे नातेवाईक आहेत अशा शिक्षकांकडून प्रशासनावर दबाव येतो का? याचा खुलासा व्हावा.

**श्री.अ.रऊफ :** शिक्षणाधिकारी यांनी चिठ्ठी पाठवून शाळेत सामान ठेवून घ्यावे.असे मुख्याध्यापक यांना कळविले असतांना ही मु.अ.नी.चिठ्ठी कचऱ्याच्या टोपलीत टाकून दिली अशा मुख्याधपकांवर कार्यवाही करणार का?

**मा.आयुक्त :** सभागृहात शिक्षक बदली प्रकरणावर चर्चा चालू आहे.कर्मचाऱ्यांचया बदल्या करणाऱ्याबाबत सर्वसाधारण सभेत निर्णय झाला आहे.या निर्णयानुसार लोकप्रतिनिधीकडून प्रशासनास सर्वतोपरी सहकार्य मिळाले आहे.कोणत्याही प्रकारचा दबाव आलेला नाही.यात उप अभियंता / लिपीक/शिपाई वर्गाच्या बदल्या केल्या गेल्या आहेत.त्याप्रमाणे १०० शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.मनपा शाळेतील सर्व शिक्षकांच्या एकाच वेळी बदल्या करणे योग्य होणार नाही.शासकीय नियमानुसार एका संवर्गातील एकूण संख्येच्या १०% पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांच्या एकाच वेळी बदल्या करता येत नाही. उर्वरित शिक्षकाच्या येत्या ऑक्टोंबर / मार्च मध्ये बदल्या करण्यात येतील.शिक्षकांच्या बदल्या करतांना शिक्षणाधिकारी यांना पुर्ण अधिकार देण्यात आले होते व त्यासाठी खालील नियम घालुन देण्यांत आले आहेत.

१) तक्रारी ज्यांच्या आहेत त्यांची क्रमवारी प्रथम क्रमाकांनी असावी.

२) जे अपंग / हृदयाचे त्रासी शारीरीक त्रास त्यांना जवळ लगत बदली करावी.

३) अल्पशा कालावधीत सेवानिवृत्त होणार आहेत त्यांना मान ठेवनू त्यांच्या बदल्या कराव्यात.

४) विनंतीवरुन ज्या काही बदल्या करावयाच्या आहेत त्या कराव्यात.कर्मचाऱ्यांची बदली करतांना बदली होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या पसंतीचे तीन ठिकाण या क्रम विचारण्याचा अधिकार बदली करणाऱ्या अधिकाऱ्यांस असतो.कर्मचाऱ्यांच्या सोईच्या ठिकाणी बदली झाली तर प्रशासकीय कामात प्रगती होते अशी प्रथा आहे.या उलट कर्मचाऱ्याविषयीची तक्रार व इतर कारणासाठी बदली करतांना प्रशासनास दिलेला पूर्ण अधिकार असतो.शिक्षणाधिकारी यांनी योग्य पध्दीतीने शिक्षकांच्या बदल्या केल्या आहेत.स.सभासद श्री. भालेराव यांचेकडील सुचनेची प्रशासनाने दखल घेतली आहे.

**श्री अभिमन्यु भालेराव** : शिक्षकांच्या बदल्या करतांना शिक्षक त्यांच्या घराजवळील शाळेत बदली करण्याची मागणी करतात शाळेत बदली झाल्यास शिक्षकांची इतर कामेही होतात.

**श्री.गौतम लांडगे** : मागील शैक्षणिक वर्षात मनपा शाळेतील शिक्षणाचा दर्जा चांगला होता.चालु वर्षातील शैक्षणिक दर्जा कसा आहे.याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी** : सदर प्रकरणी पुढील सभेत माहिति देण्यांत येईल.

**श्री.सुभाष टाकळकर** : मनपा शाळेतील बालशिक्षकांना ठराविक वेतानावर काम करतात अशा शिक्षकांना नेमणूक देतांना बालवाडी शिक्षकांना मिळणारे वतन विचारात घेता त्याच्या घराजवळ असलेल्या शाळेत नेमणूक देण्यात यावी.

**मा.सभापती :** मनपा शाळेचा सर्वे करुन आवश्यकतेनुसार शिक्षकांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही शिक्षणाधिकारी यांनी करावी.

**श्री.संजय जोशी :** मनपा वाहन क्र.एम.एच-२०-१८६० हे वाहन गेल्या महिन्यात शासकीय कामासाठी मनपा हद्दीबाहेर नेण्यात आले होते काय दि. ३०-५-९७ रोजी ही गाडी कोठे गेली होती व कोणत्या कामासाठी नेण्यात आली होती.याचा खुलासा लॉग बुकची पाहणी करुन करण्यात यावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी पुढील सभेत सदर प्रकरणी माहिति द्यावी.

**श्री.अ.रशिदखॉंन (मामू)** : मनपाच्या कामासाठी निविदा भरतांना गुत्तेदार ३०/३५% कमी दराच्या निविदा भरतात.त्यामुळे काम योग्य होत नाही याचाही विचार करणे आवश्यक आहे.सभागृहात एका चांगल्या मुद्दयावर चर्चा होत आहे.मनपा कामाचा दर्जा चांगला राहण्यासाठी ४/५ अधिकारी व २/३ नगरसेवकांचा समावेश असलेली उपसमिती गठ्ठीत करण्यात यावी.या समितीने शहरात चालू कामाची दर ४ दिवसांची पाहणी करावी.

**श्री.संजय जोशी :** नियमाप्रमाणे मनपा कामाचे लेखा परिक्षण केले गेले असते तर आता पर्यंत जकात / पाणी पुरवठा इ.भागात जे भ्रष्टाचार झाले ते झाले नसते.

**मा.मुख्य लेखा परिक्षक** : सन १९९४ पर्यंतच्या कामाचे लेखापरिक्षण या पुर्वीच झालेले होते. त्यानंतर सन १९९४-९५ व ९५-९६ या वर्षाचे लेखा परिक्षण पूर्ण केले गेले आहे. याशिवाय जो खर्च केला जातो. त्याबाबतचा अहवाल वेळोवेळी मा.सभापती यांचे कडे दिला जातो.

**श्री.संजय जोशी** : १० कोटीच्या शासकीय अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामाचे नियंत्रण मा.मुख्य लेखापरिक्षक यांचेकडे सोपविण्यात आले आहे.यावर क्रॉस चेक कोणता आहे वस्तुत: ते काम  लेखाधिकारी यांचे मार्फत होणे आवश्यक आहे आणि त्यानंतर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे मार्फत त्यावर क्रॉस चेक करणे आवश्यक आहे.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये मा.मुख्य लेखापरिक्षक हे पद स्थायी समिती सर्वसाधारण सभा आणि मा.आयुक्त यांचेशी संलग्न आहे.

**श्री.घडामोडे :** तांत्रिक विभागात ठराविक वेतनावर  किती कर्मचारी काम करतात.

**श्री संजय जोशी** : ठराविक वेतनावर काम करणारे तांत्रिक कर्मचारी मोजमाप नोंदवही चेक करतात अशी माहिती आहे हे योग्य आहे काय?

**मा.सभापती :** सदर प्रकरणी पुढील सभेत संबंधीत अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**श्री.कचरु नवपुते** : स्थायी समितीच्या विषय पत्रिकेवर २/४/विषय सभागृहापुढे ठेवण्यत येतात.तेव्हा बजेटची स्थिती काय आहे.अनेक संचिकावर बजेट शिल्लक नाही असा शेरा मागवण्यात येतो.

**श्री.गौतम लांडगे** : सभागृहातील चर्चेनुसार योग्य नोंद घेण्यात येत नाही नविन नियुक्ती केलेल्या लघु लेखकांची उप आयुक्त-२ यांचेकडे बदली आहे आणि त्या ठिकाणी काम करणारे उच्चश्रेणी लघुलेखकांची बदली मिटींग विभागात केली आहे. हे कसे याचा खुलासा व्हावा.लघु लेखकांच्या मुलाखतीसाठी किती उमेदवार आले होते.दि.१८-६-९७ च्या स्थायी समितीचे इतिवृत्त अद्याप दुरुस्त करुन मिळाले नाही.उप आयुक्त-२ कडील लघुलेखक उच्चश्रेणीतील असून त्यांना बदलुन या ठिकाणी दै.वेतनावरील नविन व्यक्ती नेमणू करणे हे योग्य नाही.नविन लघुलेख हा फक्त मिटींग विभागासाठी इतिवृत्त घेण्यासाठी ठरले.परंतु तो चुका करीत असल्यास कोणता निकष लावला?

**नगरसचिव :** सभाकक्ष विभागाकडील कर्मचारी वृध्दबाबत प्रशासनाकडे अहवाल मांडल्यानंतर प्रशासनातर्फे श्री.खोब्रागडे यांनी सभाकक्षात बदली करण्यात आली आहे. परंतु श्री.खोब्रागडे अद्याप या विभागात रुजू झाले नाहीत.स्थायी समितीचे इतिवृत्त मी स्वत: तपासुन घेत आहे.

**मा.उप आयुक्त-१** : मिटींग विभागासाठी लघुलेखकाचे पद नव्हते.गेल्या ४/५ महिन्यापुर्वी तसा प्रश्न सभागृहात चर्चेला निघाला होता.त्यानुसार लघुलेखकाच्या मुलाखतीसाठी सेवायोजन कार्यालयाकडून यादी मागवून मुलाखती घेण्यात आल्या.या मुलाखतीसाठी लेखा परिक्षेस ८० व तोंडी परिक्षेस २० असे गुण निश्चित करण्यात आले होते.मुलाखती नुसार ज्या लघुलेखकांची नियुक्त करण्यात आली आहेत.त्यांचे सभेतील इतिवृत्तांत चुकांमुळे नविन लघुलेखकांस त्यांना समज देण्यात आली आहे.व यापुढेही अशा चुका झाल्यास त्यांना आपण कामावरुन काढु शकतो.त्यांना कायम करण्यात आले नाही. नगरसचिव यांचे मागणीनुसार श्री. खोब्रागडे यांची बदली मिटींग विभागात करण्यात आली आहे.नविन लघुलेखक यांना अनुभवासाठी सभेचे इतिवृत्त घेण्यास सांगितले आहे.

**लेखाधिकारी :** स.सभासद श्री.कचरु नवपुते व श्री.संजय जोशी यांचेतर्फे बजेट बाबत विचारण्यात आलेल्या प्रकरणांची माहिती पुढील सभेत देण्यात येईल.माहे जाने / फेब्रु /मार्च मध्ये बऱ्याच कामांना मंजुरी देण्यात आल्यामुळे बजेट बुक

झाले आहे.४ कोटी शासकीय अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामाची अंदाजपत्रके तयार केली जात आहे.यासर्व कामाबाबत माहिती घ्यावी लागेल.

**श्री.विकास जैन,श्री.गौतम लांडगे,श्री.हाळनोर गिरजाराम** : एखादया कामाचे अंदाजपत्रक तयार केल्यानंतर लेखाधिकारी यांची तजविज होण्यापूर्वीच सदर संचिका या ना त्या कारणासाठी सारखी या टेबलावरुन त्या टेबलावर फिरत रहाते.हा प्रकार आहे मिळालेल्या माहिती नुसार कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी बँकेत असलेले फिक्स डिपॉझीट तोडण्यात आले आहे.हे खरे आहे काय?

**मा.सभापती** : लेखाधिकारी यांनी बजेट बाबत पुढील सभेत माहिती द्यावी.

"जन गण मन" या राष्ट्र गीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
मा.नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १६-८-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मा.सभापती श्री.प्रभाकर विधाते यांचे अध्यक्षतेखाली दि. १६-८-९७ रोजी स्थायी समितीची सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्त.**

**सभेची सुरुवात "वंदेमातरम्" या गिताने दु.४.०० झाली.सभेस स.स.खालीलप्रमाणे उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १)स.स.श्री.गिरजाराम हाळनोर | सभासद |
| २) --//--सुभाष टाकळकर | --//-- |
| ३) --//--त्रिंबक तुपे | --//-- |
| ४)--//--कचरु नवपुते | --//-- |
| ५) --//-- अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ६) --//--भगवान घडामोडे | --//-- |
| ७) --//--अब्दुल रशिदखाँन (मामू) | --//-- |
| ८) --//--स.अली मिरा सलामी | --//-- |
| ९) --//--स.अ.रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| १०) --//--जोशी संजय रामदास | --//-- |
| ११) --//--गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १२) --//--यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १३) --//--गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| १४)--//--जयवंत केशवराव ओक | --//-- |

**संवाद :**

**श्री.स.अली.मीरा सलामी** : भारतीय ५० व्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने सर्वांचे अभिनंदन करून बधाई देण्यात येते.शासन पातळीवर व औरंगाबाद मनपाचे वतीनेही चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन करुन सुवर्ण महोत्सव अतिशय उत्कृष्टपणे साजरा करीत आहोत.परंतु एक खंत या ठिकाणी अशी आहे की, महानगरपालिकेतील शालेय विद्यार्थ्यांना गणवेश शिवून अद्याप मिळालेले नाहीत व गणवेश शिवुन देण्याचे आदेशही अद्याप आलेले नाहीत.याचे कारण काय?१५ ऑगस्टला गणवेश शिवून वाटप करण्याचे आदेश मागील दोन महिन्यापुर्वीच्या बैठकीत केलेले असतांनाही प्रशासनाने चूक केलेली दिसून येते.पुन्हा असे समजले की,संबंधित गुत्तेदार हा कोर्टात गेलेला आहे.त्यांचे कारण काय आहे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**मा.शिक्षणाधिकारी :** शालेय विद्यार्थ्यांना गणवेश शिवुन मिळणेच्या संदर्भात दरपत्रके मागविण्यात आलेले होते.संबंधित गुत्तेदाराकडे कोणकोणते गणवेश शिलाईसाठी द्यावयाचे ते कळवायचे होते.प्राप्त निविदा धारकांपैकी शासन अंगिकृत एम.एस.आय.डी.सी.यांना कमिटीचे कंत्राट द्यावयाचे ठरविले होते.परंतु याबाबत बराच उशिर झाल्याने मा.महापौर यांनी या संदर्भात पत्र दिले.(ते वाचून दाखवितात)

**श्री.कचरु नवपुते** : ५० व्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्ताने महानगरपालिकेने जे कार्यक्रम आयोजित केले ते सर्व कार्यक्रम स्तुल असुन अभिनंदनास पात्र आहेत व तसा प्रस्ताव बैठकीत मंजूर करावा.शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश शिलाई बाबत दोन तीन गुत्तेदारांकडे कामे वाटप करून तात्काळ शिवून घ्यावयास पाहिजे होते.परंतु तसे झाले नाही आणि विद्यार्थ्यांना १५ ऑगस्ट पर्यंत गणवेश वाटप करता आलेले नाही.या संदर्भात अनेक पालक व विद्यार्थ्यांना गणवेशा बाबत सारखी ओढ असल्याने मा.महापौर,स.स.श्रीहमीद ताबा व मी स्वत: अशा तिघांनी मिळुन मा.आयुक्त यांचेकडे पत्राने कळविले की,२-३ गुत्तेदारांकडून विद्यार्थ्यांचे गणवेश तातडीने शिवून घ्यावेत कारण गणवेश शिलाईला बराच कालावधी झालेला असल्याने स्थायी मध्ये २-३ गुत्तेदारांना कामे वाटुन शिवुन घेण्याची कार्यवाही करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : मागील वर्षी १५ ऑगस्ट पूर्वीच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आलेले होते.या वर्षासाठी सुध्दा माहे मार्च ९७ च्या बैठकीतच प्रशासनाला स्थायी समितीने अदेशीत केलेले होते. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.याचा खेद वाटतो.

**श्री.कचरु नवपुते :** ज्यावेळी मनपाने कपडा खरेदी केलेला होता त्याचवेळेस एका एजन्सीला फिक्स करुन द्यावयाचे ठरलेले होते.

**श्री.रशिदखॉंन (मामू)** : त्यावेळी असा निर्णय दिलेला होता की,विद्यार्थ्यांचे गणवेश फारच मोठया प्रमाणात शिवायचे असून अल्पशा कालावधीत शिवून मिळणार नाहीत.तेव्हा २-३ गुत्तेदारास सदाचे काम देऊन कार्यवाही करावी.

**श्री.संजय जोशी** : एमएसआयडीसी ही संस्था शासन अंगीकृत असून या संस्थेला गणवेश शिलाईचे काम न दिल्यास शासनाचे धोरणाचे आपण अंमलबजावणी करीत नाही असे दिसून येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :मागील वर्षी एमएसआयडीसी या संस्थेला गणवेश शिलाईचे काम दिलेले होते आणि ते काम वेळेवर झाले होते.

**श्री.रशिदखॉंन (मामू)** : मागील वर्षी सदरील शिलाईचे काम तीनदा करुन दिलेले होते.

**श्री.संजय जोशी** : शासनाचे असे धोरण आहे की,शासन अंगिकृत कोणतीही संस्था असल्यास त्यांना प्रथमत:प्राधान्य द्यावे व त्यांचेकडुनच काम करवुन घ्यावे असे असतांना इतर कुठल्याही व्यक्तींकडून काम करवून घेऊ नये.

**श्री.रशिदखॉंन (मामू) :** यावर्षी १५ ऑगस्ट राष्ट्रीय सन होऊन सुध्दा गेलेला आहे आणि सुवर्ण महोत्सवी वर्षात शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश मात्र अद्यापही मिळालेले नाहीत व वेळही बराच झालेला आहे.याकरीता एका व्यक्तीस शिलाईचे काम न देता २-३ एजन्सीला गणवेश शिलाईचे काम देवून तातडीने कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** विद्यार्थ्यांचे गणवेश शिलाई तातडीने करुन वाटप करणे आहे.यासाठी सभागृहात मंजुरी देणे आवश्यक आहे.

**श्री.भगवान घडामोडे,श्री.संजय जोशी** : सभागृहात एकत्रित चर्चा करुन घेणे आवश्यक आहे शासन अंगीकृत संस्थेस सदरचे काम द्यावे.

**श्री.स.अली मिरा सलामी** : काम कोणत्याही एजन्सीला देण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे.अमुक एका एजन्सीला काम दयावे असे बंधनकारक नाही.गणवेश शिवून १५ ऑगस्ट पर्यंत प्रशासनानी स.सदस्यांच्या पत्राची दखल घेतलेली नाही.

**श्री.अ.रशिदखाँन (मामू)** : काही स.सदस्यांनी मिळून दि.२ ऑगस्ट ९७ रोजी प्रशासनाला पत्र दिलेले होते.त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही आणि कपडाही नविन आणलेला नाही.

**मा.सभापती :** विद्यार्थ्यांचे गणवेश शिलाई बाबत मागील बैठकीच्या वेळेसच प्रशासनातर्फे प्रस्ताव आलेला होता.परंतु त्यावेळी मी स्वाक्षरी केलेली नाही व स्थायी समितीची सभाही झालेली नाही. त्यामुळे सदरील प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी,श्री.रशिदखाँन (मामू)** : सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करावयाचे असून आणखी नविन कपडा अद्यापही मागविण्यात आलेला नाही.

**श्री.संजय जोशी** : माझी पुन्हा सूचना आहे की,विद्यार्थ्यांचे गणवेश शिलाइ्रचे काम शासन अंगिकृत संस्था एम. एस.एस.आय.डी.सी.ला द्यावे.अन्यथा त्या व्यतिरिक्त एजन्सीला दिल्यास माझा विरोध नोंदवावा.

**मा.सभापती :** मागील सभेच्या वेळेस बऱ्याचशा प्रस्तावांना कार्योत्तर मंजुरी स्थायी समितीने दिलेली आहे.तेव्हा त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावयास पाहिजे होती.

**श्री.अभिमन्यु भालेराव,श्री.गिरजाराम हाळनोर** : विद्यार्थ्यांचे गणवेश शिलाईला एवढया कालावधीची वाट न पाहता नियम ६७ (३) प्रमाणे कार्यवाही करावयास पाहिजे होती व गणवेश शिवून वाटप करणे आवश्यक होते आणि याबाबतचा अधिकार स्थायी समितीला आहे की,गणवेश शिलाईचे काम कोणत्या एजन्सीला द्याव.परंतु शासनाचे गाईडलाईन्स वापरात आणणे आवश्यक असून शासनाचे अंगिकृत संस्थेलाच काम द्यावे असे बंधनकारक नाही.

**मा.सभापती** : शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश तातडीने शिवुन वाटप करणेसाठी तीन एजन्सीला कामे देवून प्रशासनाने कार्यवाही करावी व प्रशासनाने एका महिन्याच्या कालावधीत गणवेश शिवून घेणेची कार्यवाही करावी.

**श्री.संजय जोशी,श्री.भगवान घडोमोडे** : यास आमचा विरोध असून शासन अंगिकृत संस्थेलाच शिलाईचे काम द्यावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : खत प्रकल्पाची योजना मनपा राबविणार आहे.त्यानुसार त्या ठिकाणी मनपातर्फे पाणी व वीज पुरवठा उपलब्ध करुन द्यावा.जेणेकरुन सदरील प्रकल्प योग्यरित्या चालु शकेल.

**उप अभियंता** : संबंधित खत प्रकल्प एजन्सीनेच वीज पुरवठा उपलब्ध करुन घ्यावे असे आहे.त्यामुळे मनपातर्फे कार्यवाही झालेली नाही.

**मा.सभापती :** महानगरपालिकेने याबाबतच्या मंजुरी प्रस्तावातील अटी व शर्तीप्रमाणे सुविधा पुरवावयाच्या त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.संजय जोशी** : जिल्हाधिकारी कार्यालया अंतर्गत रजिस्ट्री करीत असतांना मुळ मालकाच्या नावानुसारच रजिस्ट्री केली जाते.त्यानुसारच एन.ए.ले.आऊट मंजुरीसाठी कागदपत्रे दाखल केल्या जातात.यासाठी मनपाने रजिस्ट्री कार्यालयाकडे पत्र देवून अशी अट घालावी की,महानगरपालिकेच्या हद्दीतील रजिस्ट्री करावयाच्या असल्यास एन.ए.व लेआऊट जागा,जमिनी असल्याशिवाय रजिस्ट्री खत करु नये.नसता शहरात अनधिकृत वसाहती कोणत्याही जागेवर रजिस्ट्री करुन वाढत आहेत व ज्यामुळे सर्व ताण मनपावर पडते आहे.याबाबतची आखणी मनपाने करावी.

**सहा.संचालक नगर रचना** : नियमाप्रमाणे तसे करता येत नाही.

**श्री.संजय जोशी** : आपण पत्राने विचारणा करुन कार्यवाही करावी.

**सहा.संचालक नगर रचना** : कोणत्याही बांधकाम परवानगीच्या वेळेस आम्ही रितसर सर्व कागद छाननी करुनच रितसर परवानगी देतो.

**श्री.संजय जोशी :** एखादया संस्थेने किंवा जमिन मालकाने १५ वर्षापर्यंत खुली जागा घेऊन ठेवलेली आहे व १६ वर्षानंतर त्यांनी बांधकामासाठी महानगरपालिकेकडे रितसर परवानगी मागितली तर ते आपण देतो परंतु गेल्या १५ वर्षापासुनचा त्या खुल्या जागेवरील टॅक्स आपण वसुल करीत नाही व मागील कागदपत्रांची पाहणी करीत नाही.ज्यामुळे मनपाचे आर्थिक उत्पन्नाचे नुकसान होते.याबाबतची आवश्यक ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** या संदर्भात मा.आयुक्त यांनी कार्यवाही करावी.

**श्री.कचरु नवपुते :** १०६ (३) मध्ये असे नमुद केल्याप्रमाणे प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यावयास पाहिजे व स्थायी समितीली प्रत्येक महिन्याला लेखा अहवाल द्यावयास पाहिजे.गेल्या ४-५ महिन्यापासून ऑडिट अहवाल प्राप्त झालेला नाही.

**मा.सभापती** : माझ्याकडे लेखा अहवाल दिलेला आहे.अहवालाच्या प्रती सर्व स.सदस्यांना झेरॉक्स करून देण्यांत येईल.

**मुख्य लेखा परिक्षक** : माहे नोव्हेंबर ९६ मध्ये लेखा अहवाल मा.सभापती यांचेकडे दिलेला आहे व सन १९९६-९७ चा वार्षिक अहवाल येत्या ८-१० दिवसांत पूर्ण करुन देण्यात येईल.

**श्री.स.अली मिरा सलामी** : मी.दि.३०-१२-९६ ला स्वेच्छा निधीतून लाईट बसविणेबाबत पत्र दिलेले आहे व संचिका तयार झालेली आहे.परंतु काहीही कार्यवाही नाही.

**उप अभियंता विद्युत** : स.स.चे एकत्रिक पत्र घेऊन कार्यवाही करण्यांत येते.

**मा.सभापती** : स.स.चे पत्रानुसार त्वरीत कार्यवाही व्हावी.

**श्री.स.अली मिरा सलामी** : माझ्या वार्डातील डांबरीकरणाचा प्रस्ताव होता त्यावर अद्यापही कार्यवाही नाही.माझ्या मागील स.स.नी पत्र दिले त्याचे बाबतीत कार्यवाही झ ाली परंतु माझ्या वार्डात अद्यापही काम प्रलंबीत आहे.बजेट उपलब्ध नसल्यास रिव्हाईंड बजेटमध्ये करावे.

**उप अभियंता (बां.)** : अंदाजपत्रकीय तरतुद शिल्लक नाही.अंदाजपत्रक तयार आहे.

**मा.सभापती :** ठिक आहे.रिव्हाईंड बजेटमध्ये काम करुन घ्यावे.

**श्री.त्रिबंक तुपे** : शहरातील साफसफाई मोहिमे अंतर्गत कचरा कुंडया काही वार्डात पाहिजे आहेत.याबाबत काय झाले.

**मा.सभापती :** या संदर्भात मंजुरी देण्यात येत आहे.

**श्री.त्रिबंक तुपे** : खोकडपुरा या भागात बंजारा कॉलनी स्किम बऱ्याच टपऱ्या अनधिकृत रोडवर बसत आहेत काय याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** त्याठिकाणच्या टपऱ्या यापूर्वीच हटविण्यात आलेल्या आहेत. आता तेथील अनधिकृत टपऱ्या हटविण्यात याव्यात.

**श्री.गौतम लांडगे :** या भागातील अनधिकृत टपऱ्या उठविण्यात याव्यात व रितसर ज्यांनी इतर भागात परवानगी मागितलेली आहे त्यांनाच देण्यात याव्या.

**सहा.संचालक नगररचना** : ज्या अनधिकृत टपऱ्या आहेत व रोडमध्ये येताते त्या टपऱ्या १५ दिवसांत हटविण्यात याव्यात.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : शहरात वाढती लोकसंख्या लक्षात घेता व बेरोजगारी वाढत आहे.त्यामुळ मनपाकडे रितसर परवानगी मागितली असता मिळत नाही.

**श्री.त्रिबंक तुपे,श्री.संजय जोशी** : त्यामुळे अनधिकृत टपऱ्या वाढत आहेत.

**मा.सभापती :** या संदर्भात सर्वसाधारण सभेत मंजुरीचा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : बऱ्याचशा व्हीआयपी रोडवरही टपऱ्या बसविल्या जातात.पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयासमोर जसे ग्रिल बसवून जागा व्यापून घेतलेली आहे.त्याप्रमाणे सर्व रस्त्यावरील कडेला मनपाने कार्यवाही करावी.

**श्री.गौतम लांडगे** : झोन-५ मधील दै.वेतनावर जे कर्मचारी आहेत.त्यांना अद्यापही रोजंदारीचा पगार दिलेला नाही याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** संबंधित झोन अधिकारी यांना तशा सुचना द्याव्यात की,रोजंदारी वरील हजेऱ्या महिन्याच्या कोणत्या तारखेपर्यंत पाठवाव्यात व त्यानुसार लेखा विभागाने बिले बनवुन महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पगार देण्याचे करावे.

**श्री.संजय जोशी** : मागील वेळेस पापू-विभागातील दै.वेतनावरील कर्मचारी यांना कायम करणेसाठी प्रशासनाने कार्यवाही केली होती व काही उपोषणास बसलेले होते.त्याबाबत काय झाले?

**मा.सभापती** : शासनाकडे २०० कर्मचाऱ्यांचे मंजुरीचा प्रस्ताव पाठविलेला आहे.तो मिळाल्यानंतरच कार्यवाही करता येईल.

**श्री.गौतम लांडगे :** या संदर्भात प्रशासनाने एक कमिटी तयार केलेली होती व या कमिटीने १५ दिवसापर्यंत अहवाल सादर करणार होती. परंतु अद्यापही अहवाल प्राप्त नाही.

**श्री.संजय जोशी :** काही शिष्टमंडळांना दै.वेतनावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्यात येणार असे आश्वासन दिलेले असतांनाही प्रशासनाने किती वेळ लावावा.याबाबत कर्मचाऱ्यांनी कोर्टात जाऊन कंटेन्ट ऑफ कोर्ट दाखल करावा का?

**उप आयुक्त-२** : या संदर्भात बऱ्याचशा स.स.नी आक्षेप नोंदविलेला असल्याने मा.आयुक्त यांनी कमिटी तयार केलेली आहे.

**श्री.संजय जोशी** : ज्या स.स.ज्या कर्मचाऱ्यांचे आक्षेप नोंदविलेले आहेत.त्यांचे बाबतीत सुनावणी घ्यावी व बाकी कर्मचाऱ्यांना कायम करावे नसता काही कर्मचारी आत्मदहन करतील तर त्यास जबाबदार कोण राहणार?

**मा.सभापती :** ज्या कर्मचाऱ्यांचे आक्षेप असतील त्यांचे सुनावणी करून इतर कर्मचाऱ्यांबाबत कार्यवाही करावी.

**श्री.अभिमन्यु भालेराव :** माझ्या वार्डातील शाळेत जवळपास ७५० विद्यार्थी संख्या आहे.परंतु शाळेत शिक्षकांची संख्या शिकवणूकीसाठी कमी आहे.मी गेल्या कित्येक बैठकामध्ये बोलता.परंतु शिक्षण अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही केलेली नाही.ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकवणुकीवर परिणाम होत आहे.

**मा.सभापती** : शिक्षण अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**मा.शिक्षणाधिकारी :** जवळपास ११ शिक्षकांना नविन ठिकाणी दिलेले आहे.पैकी नारेगांव शाळेत ३ व मसनतपुर येथील शाळेत सुध्दा नविन शिक्षक देण्यात आलेला आहे.मात्र काही शब्दांनी त्यांच्या शाळेतील कोणत्या वर्गात किती मुले आहेत व किती शिक्षकांची आवश्यकता आहे ते कळविलेले नाही.तसे कळविल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल व तसे संबंधित मुख्याध्यापकांना सुचना दिलेल्या आहेत.

**श्री.गौतम लांडगे** : माझ्या माहितीप्रमाणे ज्या शाळेत फक्त १६ विद्यार्थी आहेत.त्याठिकाणी शिक्षक देण्यात आलेला आहे व ज्या शाळेत १४० विद्यार्थी संख्या मात्र त्या ठिकाणी शिक्षकच दिलेला नाही.तेव्हा प्रशासनाने जाणीवपुर्वक कोणताही निर्णय घेवू नये.

**मा.शिक्षणाधिकारी** : ज्याठिकाणी शिक्षकांची मागणी आहे.त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.फक्त काही शाळांमध्ये ग्रॅज्युएट शिक्षकांची अट आहे.त्याबाबतीत विचार विनिमय चालू आहे.

**श्री.अभिमन्यू भालेराव** : मागील बैठकीत शिक्षण अधिकाऱ्यांनी जसे आश्वासन दिलेले होते.त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वर्ग निहाय किती असते.याची आकडेवारी घेऊन व प्रत्यक्ष शाळांना भेटी देऊन पाहणी करावी.

**मा.सभापती :** ठिक आहे.मंगळवार दि.१९-८-९७ च्या नंतर काही स.स.यांचे समवेत शिक्षणाधिकरी यंनी काही शाळांना भेटी देऊन पाहणी करावी व तसा अहवाल सादर करावा.

**श्री.गौतम लांडगे** : डॉ.श्रीमती आशाताई साळवे या आपल्याकडे आरोग्य अधिकारी म्हणून फिक्स पे रु.३५००/- वर काम करीत होत्या नंतर त्यांनी प्रशासनाने फक्त रु. २०००/- फ्रिक्स पे वर आणले तेव्हा पुर्ववत डॉ.श्रीमती साळवे यांना रु.३५००/-फिक्स पे देवून भरबाकी फरकासह रक्कम अदा करावी.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी या संदर्भात कार्यवाही करावी.

**श्री.गौतम लांडगे** : मनपाच्या विविध विभागाधुन विविध कामांना अंदाजपत्रकीय मंजुरी मिळालेली आहे.मात्र काही विभागातील अंदाजपत्रकीय बजेट शिल्लक नसल्याने ते काम थांबलेले आहेत.तेव्हा जे कामे सध्या ब्लॉक झालेले आहेत त्यासर्व ब्लॉक असलेल्या कामांना मंजुरी मिळालेली असून ती कामे न थांबता प्रथम प्राधान्याने ती काम अगोदर करावे व आता ज्या प्रस्तावांना मंजुरी मिळणे ती नंतर करावे.

**मा.सभापती** : ठिक आहे.प्रशासनाने त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.स.अली मिरा सलामी :** शासनाने मागील वर्षी रु.१०.०० कोटीचे अनुदान दिले त्या खर्चाच्या हिशोबाची माहिती द्यावी.त्याचप्रमाणे आता यावर्षी पुन्हा शासन रु.४.०० कोटीचे अनुदान दिलेले आहे.त्यामध्ये कोणकोणते कामे प्रशासन करणार याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** शासन ज्यावेळी शासकीय अनुदान देते त्यावेळी याखर्चासाठी शासकीय पातळीवर कमिटी आहे.त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार प्रशासन कामावर खर्च करते.

**श्री.स.अली मिरा सलामी** : शासनाच्या कमिटीवर मनपातील पदाधिकारी यांना घेवून मनपातील कोणत्या कामावर किती खच्र करावे याचा अधिकार द्यावा.

**श्री. अभिमन्यू भालेराव** : माझ्या वार्डातील बऱ्याच ठिकाणी अतिक्रमणे होत आहेत.याबाबत अतिक्रमण विभागाची संपर्क साधुनही काहीही कार्यवाही झालेली नाही.एका ठिकाणावरुन खुल्या जागेतील लोक सर्रास माती खोदून नेतात व त्या ठिकाणी असा मोठा एक खड्डा झालेला आहे.जर उदयाला त्या खडडयात पडून जिवित हानी झाली तर त्यास कोण जबाबदार? सदरची जागा तहसिलची असून बरेचसे लोक अनधिकृत वसाहती करुन राहत आहेत यास आळा घालणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** प्रशासकीय अधिकारी व मालमत्ता अधिकारी यांनी स्थळ पाहणी करावी व तहसिल कार्यालयास पत्र पाठवून कार्यवाही करावी.

**श्री.संजय जोशी :** मालमत्ता विभागामध्ये एक क.लि.श्री.सिद्दीकी कर्मचारी गेल्या ७-८ वर्षापासून कामावर येत नाही.त्यांची चौकशी चालू असतांना उप आयुक्त-२ त्यावेळेचे माजी उपआयुक्त श्री.अंभोरे यांनी संबंधिताला कामावर घ्यावे असे चौकशीत म्हटलेले आहे.ते कसे काय ? मनपाच्या नियामात तसे आहे काय ?एखादा कर्मचारी न सांगता ७-८- वर्षापासून फरार असल्यास काय नियम आहेत.नियमाप्रमाणे वर्तमान पत्रात नोटीस बजावून कार्यवाही केली काय? याची माहिती द्यावी व चौकशी करुन कामावर घेण्याचे प्रशासन कार्यवाही करते याची माहिती द्यावी.

**मा.उपआयुक्त-२** : चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे.फक्त स्क्रुटनी करणे बाकी आहे.

**मा.सभापती :** पुढील बेठकीत सविस्तर माहिती द्यावी.

**श्री.जयवंत ओक** : जायकवाडी प्रकल्पातून औरंगाबाद शहराला पाणी पुरवठा होणे पूर्वी येथून जवळच असलेल्या नेहरी अंबर येथून शहरातील बऱ्याचशा भागाला पाणी पुरवठा सतत होत होता.परंतु आता तेथील पाणी पुरवठयातून हर्सुल जवळील काही शेतकऱ्यांनी पाईप फोडून स्वत:च्या शेतीकडे पाणी वळविले व शहराचा पाणी पुरवठा त्यामुळे तुटलेला आहे.याकडे प्रशासनाने गंभीर दखल घेऊन कार्यवाही करावी व नेहरी अंबर येथील पाईप लाईन फोडणाऱ्यावर कार्यवाही करावी.काही स.स.नी सोबत जाऊन पाहणी करावी.

**मा.सभापती** : ठिक आहे.गुरुवार दि. २१-८-९७ रोजी काही स.स.व कार्यकारी अभियंता (पापू) यांचेसह पाहणी करुन पुढील बैठकीत माहिती सादर करावी.

**विषय क्र.१४२/१ :**

दिनांक १८-६-९७,२७-६-९७ व ५-७-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.संजय जोशी** : दि.१८-६-९७ च्या इतिवृत्तातील विषय क्र.९६/१६ पृष्ठ क्र.१८ मधील प्रस्तावातील कामाबाबत "आदर्श झोपडपट्टी" या लेखा शिर्षातून खर्च करण्यास संबंधित विभागाने कार्यवाही करावी.

**शहर अभियंता :** सदरचे काम याच लेखा शिर्षातून अंदाजपत्रकीय तरतुदीमधून करण्यात येते.

**मा.सभापती :** तशा प्रकारची दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री.संजय जोशी :** दि. १६-८-९७ च्या इतिवृत्तातील विषय क्र.२० मधील पृष्ठ क्र.७ मध्ये काही विभागात दै.वेतनावर कनिष्ठ अभियंता हे कार्यालयातील अंदाजपत्रकाचे एम.बी.रेकॉर्ड तयार करतात.तेव्हा दैनिक वेतनावरील किंवा फिक्स पगारावरील कनिष्ठ अभियंता यांना यापुढे एम.बी.रेकॉर्ड तयार करण्यास सांगु नये व प्रशासनातील महत्वाची कामे या कर्मचाऱ्योंडे देवू नये अशी प्रशासनाने प्रत्येक विभागातील कोणत्याही संवर्गातील फिक्स पेमेंट असलेल्या कर्मचाऱ्यांबाबत योग्य ती दखल घेऊन त्यांना सुचना द्याव्यात.

**शहर अभियंता :** फिक्स पे वर काम करणारे कनिष्ठ अभियंता हे एम.बी.रेकॉर्ड घेतात व त्यावर उप अभियंता यांची देखरेख असते.

**श्री.संजय जोशी** : संबंधित कनिष्ठ अभियंता एम.बी.रेकॉर्ड व्यवस्थित घेतलेले नसल्यास त्यास पुढे जबाबदार कोण राहणार? यासाठीचा फिक्स पगारावरील किंवा दैनिक वेतानावरील कर्मचाऱ्यास एम.बी. रेकॉर्ड करण्यास सांगु नये.

**श्री.गौतम लांडगे,श्री.अभिमन्यु भालेराव** : कनिष्ठ अभियंताने वैयक्तीक जबाबदरीने काही केल्यास शहर अभियंता यांनी स्वत:वर जबाबदरी घ्यावी.

**शहर अभियंता :** कर्मचारी पुरेसे नाहीत यासाठी कायम स्वरुपी कर्मचारी दिल्यास योग्य होईल.

**मा.सभापती** : स.स.श्री.जोशी यांनी सुचना केल्याप्रमाणे फिक्स पे वर काम करीत असलेले किंवा दैनिक वेतनावर काम करीत असलेल्यांवर कोणतीही प्रशासनाने जबाबदारीचे काम न टाकता काम घ्यावे व कायम स्वरुपी कर्मचारी नेमणूक करुनच कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मागील इतिवृत्त.

१) दि.१८-६-९७ च्या इतिवृत्तातील विषय क्र.९६/१६ पृष्ठ क्र.१८ मधील प्रस्तावातील कामाबाबत "आदर्श झोपडपट्टी" या लेखा शिर्षातून खर्च करण्यास संबंधित विभागाने कार्यवाही करावी.व अशा सर्व पुढील प्रस्तावात याच लेखा शिर्षाखाली खर्च करण्याबाबत प्रस्तावात नोंद घ्यावी असे सर्वानुमते ठरले.

२) दि.१८-६-९७ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.८मध्ये प्रशासनातील काम करणारे अधिकारी सर्वश्री एस.बी.झनझन,अग्निशमन अधिकारी डी.बी.लोखंडे,कामगार अधिकारी,श्री.एच.आर.बाहेती व पी.के.खोब्रागडे उप आयुक्तांचे स्विय सहा.यांना आकृतीबंध कृती आराखडयात वेतनश्रेणी रु. २२०० ते ३७०० अशी इतर अधिकाऱ्याप्रमाणेच करण्यात यावी.ज्यामुळे प्रशासनास आर्थिक बोजा कोणताही पडणार नाही. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) दि.१६-८-९७ चे विषय क्र.२० मधील दि. १६-८-९७ च्या इतिवृत्तातील विषय क्र.२० मधील पृष्ठ क्र.७ मध्ये काही विभागात दै.वेतनावर कनिष्ठ अभियंता हे कार्यालयातील अंदाजपत्रकाचे एम.बी.रेकॉर्ड तयार करतात.तेव्हा दैनिक वेतनावरील किंवा फिक्स पगरावरील कनिष्ठ अभियंता यांना यापुढे एम.बी.रेकॉर्ड तयार न करता प्रशासनाने कायम स्वरुपी कनिष्ठ अभियंता किंवा उप अभियंता यांचेकडूनच एम.बी.रेकॉर्ड यापुढे तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या व इतर दुरुस्त्याबाबत दि.१८-६-९७,२७-६-९७ व दि.५-७-९७ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आसिफबाग स.न. १/२ मधील श्रीमती असरी बेगम यांच्या मंजुर ले आऊट मधील रस्त्याचे खडीकरण करण्याचे कामासाठी सा.बां.खात्याचे सन ९५-९६ च्या डि.एस.आर.दराने रक्कम रु.४,५३,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरच्या मंजुर ले आऊटसाठी १००% विकास निधी भरलेला असून तयार करण्यात आलेले अं.प.रक्कम रु.४,५३,४००/- ला मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आसिफबाग स.न. १/२ मधील श्रीमती असरी बेगम यांच्या मंजुर ले आऊट मधील रस्त्याचे खडीकरण करण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,५३,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४४/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राणानगर मंजुर रेखांकनामध्ये १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,१०,८२५/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राणानगर मंजुर रेखांकनामध्ये १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,१०,८२५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम उपलब्ध गुत्तेदाराकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४५/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्रेयनगर येथील स.नं. ४३ मधील मंजुर रेखांकनात १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,२२,२९४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदी मधून करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रेयनगर येथील स.नं. ४३ मधील मंजुर रेखांकनात १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,२२,२९४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.सदर काम उपलब्ध गुत्तेदाराकडून करुन घेण्यात यावे.

**विषय क्र.१४६/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ज्योतीनगर येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची स्लुस व्हॉल्व बसविणे आहेत. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,३२,४६५/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती मधुन करण्यांत येणार आहे.तरी अं.प.मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्योतीनगर येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची स्लुस व्हॉल्व बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,३२,४६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४७/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बंजारा कॉलनी,गांधीनगर,बहादुरपुरा,भागात दुषित पाणी पुरवठा होत असल्यामुळे अस्तित्वात असलेली जुनी आर.सी.सी.जलवाहिनी काढून त्या ठिकाणी नविन १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ दरसुचीनुसार रक्कम रु. ३,३४,१७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीचया तरतुदीमधून करण्यात येणार आहे.प्रस्तुत काम त्वरीत हाती घ्यावयाचे असल्यामुळे अल्पमुदतीची निविदा नोटीस काढुन निविदा मागविण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बंजारा कॉलनी,गांधीनगर,बहादुरपुरा,भागात दुषित पाणी पुरवठा होत असल्यामुळे अस्तित्वात असलेली जुनी आर.सी.सी.जलवाहिनी काढून त्या ठिकाणी नविन १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,३४,१७०/- (मनपातर्फे पुरविण्यात येणारे पाईप्स रु.१,९१,०००/- व मजूरी रक्कम रु.१,९३,०००/-) च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.या भागात दुषित पाणी पुरवठा होत असल्याने सदर काम उपलब्ध गुत्तेदारांकडून त्वरीत करुन घ्यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४८/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर येथे १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ५,८५,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,संजय नगर येथे १५० मी.मी.व २०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,८५,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१४९/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मोंढा ते निजामगंज चौक या रस्त्यावर सोडीयम स्ट्रीट लायटींग करीता रु. ४,९७,७००/- चे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च "शहरात सोडीयम व्हेपर बसविणे" या लेखाशिर्षाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.करीता अं.प.मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोंढा ते निजामगंज चौक या रस्त्यावर सोडीयम स्ट्रीट लायटींगच्या खर्चास रक्कम रु.४,९७,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५०/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, निजामगंज चौक ते जिन्सी चौक पर्यंत सोडीयम लायटींग करणेच्या कामाकरीता रक्कम रु.२,३७,४२९/- चे अं.प.सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदर कामाचा खर्च शहरात सोडीयम व्हेपर बसविणे या लेखाशिर्षाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निजामगंज चौक ते जिन्सी चौक पर्यंत सोडीयम लायटींग करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,३७,४२९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५१/१० :**

अतिरिक्त अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा गेट ते मकबरा रोड सोडीयम दिवे बसविणे करीता रक्कम रु. ६,८०५७३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर काम "शहरात सोडीयम व्हेपर दिवे लावणे" या लेखा शिर्षाखाली सन ९७-९८ च्या तरतुदी मधून प्रस्तावित आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा गेट ते मकबरा रोड सोडीयम दिवे बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,८०५७३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५२/११ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व ज.नि.यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.भवानीनगर येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता अं.प.रक्कम रु.१,३१,७३८/- चे परिसर अभियांत्रिकीच्या दरसुची सन ९५-९६ नुसार प्रस्तावित केले आहे.सदरील खर्च लेखाशिर्षा "देखभाल व दुरुस्ती" सन ९७-९८ यातुन प्रस्तावित केले आहे.मा.आयुक्तांनी दि. ४-८-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,मो.भवानीनगर येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,३१,७३८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५३/१२ :**

कार्यकारी अभियंता (पा पु व ज.नि) यांनी प्रस्ताव सादर केला की,इंदिरानगर बायजीपुरा येथे गल्ली क्र.२८ व २९ मध्ये जुनी १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज पाईपलाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. १,२५,०००/-चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकीच्या सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे.सदरील काम "भांडवली तरतुदी" ९७-९८ या लेखा शिर्षकातून प्रस्तावित असून मा.आयुक्तांनी दि. १५-७-९७ ला प्रशासकीय मंजूरी दिली आहे.करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा येथे गल्ली क्र.२८ व २९ मध्ये जुनी १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज पाईपलाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५४/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,कैलासनगर विद्युत वाहीनी सध्या रात्रंदिवस चालू ठेवण्यात येत आहे.कारण शव केव्हा येईल याची खात्री नसते.तरी पण विद्युत वाहिनी दिनांक १६-४-९७ पासून कार्यान्वित झाल्यापासून आतापर्यंत तीन शव दहन करण्यात आले आहेत.

विद्युत वाहिनी रात्रंदिवस चालु असल्यामुळे विजेचा वापर रात्रंदिवस होत आहे.त्यामुळे विद्युत वाहिनीचे बिल जास्तीचे येत आहे.म्हणून विद्युत वाहिनीचे ऑपरेशन ठराविक वेतन वेळेत चालू बंद करण्याची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत चालु ठेवण्यात येईल.त्यामुळे विजेचे बिल कमी होण्यास मदत होईल.तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर** : सदरचा प्रस्ताव स्थायी समितीकडे येण्याचे कारण काय?

**उप अभियंता विद्युत** : माहे जुन महिन्याचे १२ तासांचे रु.३५,०००/- विजेचे बिल प्राप्त झाले आहे व विद्युत वाहिनी मात्र रात्रंदिवस चालु असते.यासाठी सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.विद्युत वाहिनीचा उपयोग करण्यापूर्वी दोन तीन तासांच्या अवधीत माहिति मिळाल्यास योग्य राहील.

**श्री.संजय जोशी,श्री.त्रिबंक तुपे,श्री.भगवान घडामोडे** : स्मशानभूमीच्या बाबतीत या ठिकाणी जास्त चर्चा करणे योग्य नाही.परंतु प्रशासनामार्फत अडथळे होता कामा नये.याची खबरदारी घ्यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** विद्युत वाहिनीचा ज्यांना वापर करावयाचा असतो.त्यांनी या बाबतीत तीन चार तास महानगरपालिकेस पूर्व सुचना द्यावी.याबाबत स्थानिक वर्तमानपत्र व कार्यालयातील नोटीस बोर्डवर सुचना फलक लावून प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त :** आतापर्यत या स्मशानभूमीत ३ प्रेतांसाठी जवळपास १.४५ लाख रु.खर्चाचे विजेचे बिल प्राप्त झाले व विज रात्रंदिवस चालू रहाते.सदरील बाब लोकांच्या भावनेशी निगडीत असल्याने सकाळी ८ ते सायं.६ पर्यंत विद्युत वाहीनीचे ऑपरेशन चालु ठेवण्यासाठी मनपाचा आर्थिक खर्च विजेच्या बिलाचा कमी करणेसाठी हा बदल करणेसाठी लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेणे आवश्यक असलयाने सदरचा प्रस्ताव आलेला आहे.

**श्री.जयवंत ओक,श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.संजय जोशी :** स्थानिक वर्तमानपत्रातून जाहीर प्रगटन व कार्यालयासमोर तसेच स्मशानभूमी ठिकाणी नागरिकांच्या माहितीसाठी बोर्ड लावावे व तोपर्यंत सर्वांसाठी खुले ठेवावे.

**मा.सभापती :** सदरील बाबतीत स्मशानभूमीत व महानगरपालिका कार्यालयासमोर बोर्ड लावून जाहीर प्रगटन वर्तमानपत्रात द्यावे.प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विजेचा वापर कमी व्हावा या दृष्टीने कैलासनगर येथील विद्युत वाहिनीचे ऑपरेशन सकाळी ८.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत चालू ठेवण्याकरीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५५/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.शहाबाजार येथील मनपा शाळेवर अर्ध्या भागावर पहिला मजला बांधणे व अस्तित्वात असलेल्या तळ मजल्यावर जुन्या भागामध्ये वाढ करणेच्या कामासाठी सर्वसाधारण सभा दिनांक १०-३-९७ ठराव क्र. २०४/२२ अन्वये रक्कम रु.७,९४,३२०/- चे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार केलेल्या अंदाजत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/३२/९७ दि. ३-५-९७ अन्वये बी-१ नमुन्यात दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण अंतिम तारखेपर्यंत प्राप्त झाली.ती.दि. २८-५-९७ ला उघडण्यात आली असता श्री.शेख शरीफ यांची अं.प.दरापेक्षा २०% जास्त दराची निविदा आहे.त्यामुळे संबंधितास पत्र देवून दराचे वाटाघाटीसाठी मा.आयुक्तांचे दालनात दि. १७-६-९७ ला बोलाविण्यात आले.मा.आयुक्तांचे दालनात झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अं.प.दरापेक्षा २०%जास्त ऐवजी १०%जास्त दराने करण्यास मा.आयुक्तांनी दिनांक १७-६-९७ अन्वये मंजुरी दिली असून गुत्तेदारानेही लेखी संमती दर्शविली आहे.सबब सदर काम श्री.शेख शरीफ यांचेकडून अं.प.दरापेक्षा २०% जास्त ऐवजी १०% जास्त दराने करुन घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.संजय जोशी :** सदरचा प्रस्ताव १०% जास्त दराने का आलेला आहे.याची माहिती दयावी.

**शहर अभियंता :** सदरील प्रस्ताव मागील वर्षीचा आहे.या बाबत दोनदा निविदा मागविण्यात आल्या आता डि.एस.आर.च्या दरान्वये सदरचे काम पहिल्या मजल्यावरील असुन सन १९९५-९६ च्या दरान्वये १०% जास्तीचे दर वाढलेले आहे.

**श्री.गौतम लांडगे :** सदरील प्रस्ताव फेरनिविदा मागवुन ठेवावा.

**मा.सभापती :** प्रस्ताव रिकॉल करुन शॉर्ट निविदा मागवून काम करावे.

**ठराव :**

सदर प्रस्तावाबाबत पुन्हा अल्प निविदा मागवून काम करुन घ्यावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५६/१५ :**

मसनतपुर शहानगर येथे १०० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता अं.प.रक्कम रु.४,८७,२५३/- चे तयार करण्यात येऊन त्यास स्थायी समिती ठराव क्र.१७४/४/ दि.१४-३-९७ अन्वये मान्यता देण्यांत आली असुन दै.वर्तमानपत्रात निविदा सुचना देऊन निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतम तारखेपर्यंत एकूण १२ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.लक्ष्मण कन्स्ट्रक्शन | ०.१०% | कमी दराने |
| २) सुरेश बी.साधवानी | ३% | जास्त दराने |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया कमी दर हा मे.लक्ष्मण कन्स्ट्रक्शन यांचा आहे.परंतु त्यांनी दिलेले दर स्पर्धात्मक नसल्यामुळे मा.आयुक्तांचे सोबत मे.लक्ष्मण कन्स्ट्रक्शन यांची दराबाबत वाटाघाटी करण्यात आल्या.त्यामध्ये अं.प.दरापेक्षा २% कमी दराने मा.आयुक्तांनी मान्यता दिली असून गुत्तेदाराने संमती दिली आहे.तरी अं.प.दरापेक्षा २% कमी दराची मे.लक्ष्मण कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकृतीसह प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मसनतपुर शहानगर येथे १०० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटी नुसार सदर काम अं.प.दरापेक्षा २% कमी दराने मे.लक्ष्मण कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५७/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,बारापुल्ला भागातील खांडकीची दुरुस्ती करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अं.प.रक्कम रु. १,९७,६००/- चे तयार करण्यात आले होते व त्यानुसार सदरच्या अंदाजपत्रकास दि.३०-७-९६ च्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.१२६/६ अन्वये मंजुरी मिळलेली आहे.

सदरच्या कामाचे अंदाजपत्रकात खांडकी दुरुस्ती सोबत रक्कम रु. १६,०३८/- इतके खडी रस्ता तयार करण्याचे काम होते.ते काम स्लम विभागाकडून करण्यात आलेले असून उर्वरित कामामध्ये नविन खांडकी बसविणे,जुनी खांडकी दुरुस्त करणे,पॉईरींग करणे हे काम होते.परंतु या कामाऐवजी सदरील ठिकाणी पूर्ण नविन शहाबाद फरशी बसविण्यात यावी म्हणून तेथील स.नगरसेवक (सध्या महापौर साहेब) श्री.रशिद मामू यांनी विनंती केलेली आहे.त्यानुसार सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास एकूण खर्च रक्कम रु. ४,२९,४६०/- इतका येत आहे.परंतु मुळ अंदाजपत्रक रु. १,९७,६००/- चे आहे व शहाबाद फरशी बसविण्यासाठी रु.२,३१,८६०/- इतका जास्तीचा खर्च लागणार आहे.

तरी सुधारीत अं.प.रु.४,२९,४६०/- ला तसेच मुळ अं.प.रु.१,९७,६००/- वजा जाता उर्वरित रक्कम रु. २,३१,८६०/- इतक्या जास्तीच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गौतम लांडगे, श्री.संजय जोशी,श्री.त्रिबंक तुपे, श्री.जयवंत ओक :** आमच्या वार्डातील कामाचे बाबतीत अनेकदा पत्र देवूनही कार्यवाही झालेली नाही व अंदाजपत्रकही तयार केलेले नाही.खांडकी ३ फुटावर बसवित असल्यास फरशी ५ फुटापर्यंत बसवावे.

**उप अभियंता (बां.) :** या ठिकाणी खांडकी असुन तोडकी मोडकी व खराब झालेली असल्याने प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे.

**मा.सभापती :** सदरील प्रस्ताव रद्द करण्यात येतो फक्त खांडकी रिपेअर करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव सर्वानुमते रद्द करण्यात येतो फक्त खांडकी दुरुस्त करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५८/१७ :**

मा.आयुक्तांच्या मान्यतेनुसार प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगांव येथील महानगरपालिकेच्या (प्रकल्प विभाग) बालवाडीत विद्यार्थी प्रवेश संख्या १३० पर्यंत तर संजयनगर मुकुंदवाडी येथे ७६ प्रवेश संख्या झाली आहे.एका शिक्षिकेकडे एवढया प्रमाणावर विद्यार्थी सोपविणे योग्य नाही.एका सत्रात कमाल ४० विद्यार्थी असावेत यासाठी ११ ते २ दरम्यान त्याच इमारतीत वरील बालवाडीचे विभाजन करुन दुपारच्या सत्रात त्याच इमारतीत बालवाडी सुरु करण्यात यावी.तसेच खालील ठिकाणी किराडपुरा बालवाडी २ सेविका प्रियदर्शनी इंदिरानगर येथे एक सेविका, चौसरनगर बालवाडीत एक सेविका,नारेगांव बालवाडीत दोन सेविका व एक बालवाडी शिक्षिका संजयनगर (मु) येथे बालवाडी शिक्षिका व सेविका आंबेडकरनगर येथे दोन सेविका अशी मानधनावरील (एकूण ४ बालवाडी शिक्षिका व सेविकां ९ पदे निर्माण करणे योग्य.सेविकांना दरमहा रु.३००/- व बालवाडी शिक्षिकेस दरमहा रु.५००/- मानधन देण्यात यावे.सदर पदे अंशकालीन आहेत.वरील पदे निर्मितीमुळे दरमहा रु.४७००/- खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी नारेगावं.,चौसरनगर,संजयनगर (मु) व प्रियदर्शनी इंदिरानगर मधील बालवाडी शिक्षिका व सेविकांच्या मानधनावर होणारा खर्च शासकीय उपलब्ध अनुदानातून व इतर बालवाडयांवर होणारा खर्च कमकुवत घटक कल्याण निधीतून करण्यात येईल. आंबेडकरनगरमध्ये एक खोली भाडयाने घेणे आवश्यक राहील.सेविकेची नियुक्ती करतांना त्याच वस्तीतील महिलेस प्राधान्य देण्यात यावे.प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,खालील बालवाडयांसाठी अनुक्रमे किराडपुरा २ सेविका,प्रियदर्शनी इंदिरानगर १ सेविका,चौसरनगर १ सेविका,नारेगाव १ सेविका,संजयनगर मु.१ सेविका,आंबेडकरनगर २ सेविका असे एकूण ९ सेविका तसेच नारेगांव येथील

बालवाडीसाठी १ बालवाडी शिक्षिका,संजयनगर मु.१ बालवाडी शिक्षिका,आंबेडकरनगर बालवाडीसाठी २ शिक्षिका असे एकूण चार बालवाडी शिक्षिकाचे पदे निर्मिती करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.बालवाडी शिक्षिकांसाठी द.म.रु.५००/- मानधन व सेविकांसाठी द.म.रु.३००/- मानधन देण्याची मंजुरी देण्यात येते.

या बालवाडयांपैकी नारेगांव,चौरसनगर,संजयनगर,(मु.) व प्रियदर्शनी इंदिरानगर या बालवाडयातील शिक्षिका व सेविकांचे मानधन शासकीय अनुदानातून करण्याकरीता मंजुरी देण्यात येते.व इतर बालवाडयासाठी इतर कमकुवत घटक कल्याण निधीतून करण्याबाबत मंजुरी देण्यात येते.

सदरील पदे भरतांना त्याच वस्तीतील महिला सेविकांना प्राधान्य देण्याची व आंबेडकरनगर येथे एक खोली भाडेने घेण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५९/१८ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला की,श्री.शेख रफीक शेख बशीर यांनी अर्ज दिला आहे की, मो.जाफरगेट आठवडी बाजार येथे मनपाच्या जागेवर १६X३० फुटाच्या जागेवर १० वर्षापासुन लोहारी व्यवसाय करीत आहे.ज्यावेळी १९७६ साली माझ्या वडीलांची जागा भुसंपादन केली त्यावेळीपासून भाडेकरु म्हणून माझ्या वडीलांना जागा नगरपरिषदेने दिली होती.सध्या त्याच जागेवर मी व्यवसाय करीत आहे.माझ्या वडीलांचे नांव शेख बशीर शेख बने असुन मला सदर जागेचे भाडे लावून द्यावे बाबत विनंती अर्ज केला आहे.

नगर परिषदेच्या मार्केटसाठीचे ४०,५०,आणि १०० क्र.५४ फाडर मार्केट साठीचे ४०,५०,आणि १०० हया रस्त्यात बाधीत होणाऱ्या जमीनीच्या विशेष भूसंपादन अधिकारी व नगर परिषदेतर्फे संपादन केली आहे व त्यावेळी भाडेकरुचे नांव श्री.शेख बशीर शेख बने असून पुरवणी पंचनामा मध्ये नमुद केले आहे.

तसेच सदर प्रकरणात नगर रचना विभागाचा अभिप्राय घेतला असता त्यांनी अभिप्राय दिला आहे की,नाल्याकडून सफिल पासुन दक्षिणेकडे ३.२५ मी.पर्यंत जमिन वि.यो.मध्ये बाधीत होत नाही.तरी रुंदीला १६ ऐवजी फक्त ३.२५ मीटर रुंद व ९.०० मीटर लांब म्हणजे २०.२५ चौ.मी.जागा आहे.तसेच वरील अर्जदार गेल्या १० वर्षापासुन व्यवसाय करीत आहे.२) सदरील जागा रस्त्यातील रहदारीला अडथळा होत नाही.३) १०० फुट रस्त्याच्या भुसंपादनाच्या कार्यवाहीवरुन अर्जदाराचे वडील संपादन केलेल्या जागेत भाडेकरु होते.

तसेच जागाचे भाडे निश्चिती साठी भाडे समिती समोर ठेवले असता त्यांनी या जागाचे भाडे रु.२१/- प्रति चौ.मी.प्रतिमहा प्रमाणे निश्चित केलेले आहे.तरी जागा भाडयाने देणे बाबत स्थायी समितीसमोर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भू.क्र.१२९५६ चे साईट क्र.५४ मध्ये नाल्याकडील सफीलापासून दक्षिणेकडे ३.२५ मीटर व रुंदीला ३.२५ मीटर लांबीला ९ मीटर म्हणजेच २०.२५ चौ.मी.श्री.शेख बशीर शेख बने यांच्या ताब्यात असलेल्या खुल्या जमिनीस दरमहा प्रति चौ.मी. रु. २१/- प्रमाणे भाडे आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६०/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गणेश कॉलनी येथे वाचनालय इमारत बांधावयाची आहे.या कामासाठी रक्कम रु.३,००,५००/- चे अं.प.तयार करुन स्थायी समितीच्या ठरावानुसार ठराव क्र.५९४/५ दिनांक २९-१-९७ अन्वये मंजुरी देण्यांत आली.

सदर कामासाठी निविदा सुचना क्र.१८/१७ दि.१३-३-९७ अन्वये बी-१ निविदा मागवण्यात आल्या होत्या.तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दरानी निविदा प्राप्त झाली करीता संबंधित मक्तेदारास मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार वाटाघाटीस बोलाविण्यात आले.वाटाघाटीअंती मा.आयुक्तांच्या आदेशानुसार सदरील कामाची फेरनिविदा करण्यात आली.

सदर कामासाठी फेरनिविदा सूचना क्र. ४०/९७ दि.६-६-९७ अन्वये बी-१ निविदा मागविण्यात आल्या.कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण (९) नऊ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण तीन (३) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.मन्नानखाँन | १३% | जास्त दराने |
| २) श्री.काझी नुर मोहियोद्दीन | ७.०१% | कमी दराने |
| ३) श्री.मो.जावेद | २.७६% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ७.०१% कमी दराची श्री.काझी नुर मोहियोद्दीन यांची निविदा आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,गणेश कॉलनी येथे वाचनालय इमारत बांधावयाच्या कामसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ७.०१% कमी दराची श्री.काझी नुर मोहियोद्दीन यांच निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६१/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सादतनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधकाम करणेकरीता रक्कम रु.२८,७१,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबाद यांनी दरसुची सन ९५-९६ नुसार तयार करण्यात आले असून मा.आयुक्तांनी दि. २२-१२-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली तसेच दि.१०-३-९७ , १५-३-९७ व २६-३-९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे विषय क्र. १९१/८ अन्वये सदर कामास मान्यता दिली.नंतर रितसर वृत्तपत्रात कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/३२/९७ दि.३-५-९७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम दि.१२-५-९७ पर्यंत एकूण २७ निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस फक्त सात (७) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि.२८-५-९७ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सलीम पटेल | २९.९९% | अं.प.दरापेक्षा कमी |
| २) आर.बी.चव्हाण | २९% | कमी |
| ३) राणा कन्स्ट्रक्शन | २७.२०% | कमी |
| ४) सुपर कन्स्ट्रक्शन | २३.४३% | कमी |
| ५) बसरा कन्स्ट्रक्शन | १९% | कमी |
| ६) एम.एम.कन्स्ट्रक्शन | २०.७१% | कमी |

७) रश्मा कन्स्ट्रक्शन १३.२३% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २९.९९% कमी दराची निविदा श्री.सलीम पटेल यांची आहे.सदर काम ठेकेदार कशाप्रकारे करणार याबाबत दर पृथःकरण मागविण्यात आले असता त्यांनी वरील दरात काम करण्यास संमती दिली.तथापी २९.९९% इतक्या कमी दरात कामाचा दर्जा(स्पेसिफिकेशन) प्रमाणे राहणार नाही.तसेच स.नगरसेवक यांनी दिनांक १६-६-९७ रोजी पत्राद्वारे फेरनिविदा मागविणे बद्दल विनंती केली आहे.

स्लम विभागात ४ ज्युनिअर इंजिनिअर ऐवजी २ ज्युनिअर इंजिनिअर काम करीत आहे.नॉर्मसप्रमाणे काम करावयाचे म्हणजे निगरानी करीता वेळ मिळणार नाही.याचा विचार करुन २९.९९% कमी दराची निविदा मान्य करण्यास विचारार्थ सादर.

**मा.सभापती** : रिकॉल करण्यात यावा.

**ठराव :**

वरील प्रस्ताव रिकॉल करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६२/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,किराडपुरा (जसवंतपुरा) महानगरपालिकेच्या शाळेसमोरील खुल्या जागेत क्रिडांगण तयार करण्याचे कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ४,२६,०००/- एवढयाचे अं.प.तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.कार्यालयीन निविदा सुचना क्र. ३२/९७ जि.की,दै.वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागगविण्यात आल्या.कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१७) सतरा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण (१२) बारा सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) विपुल कन्स्ट्रक्शन | २७.०२% | कमी |
| २) शेख मसुद | २३.८८% | कमी |
| ३) युनायटेड कन्स्ट्रक्शन | २२.०५% | कमी |
| ४) एस.ए.देशमुख | १९.३०% | कमी |
| ५) मन्नान खान | १८.८६% | कमी |
| ६) एस.ए.नवाब | १८.०९% | कमी |
| ७) सलीम पटेल | १६.९२% | कमी |
| ८) एस.एच.असोशिएटस् | १५.७५% | कमी |
| ९) पठाण एच.जी. | ९.०१% | कमी |
| १०) न्युसुपर कन्स्ट्रक्शन | ८% | कमी |
| ११) एस.ए.नाहोलीकर | ६.५०% | कमी |
| १२) व्ही.जी.याडकीकर | अं.प.दराने | |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २७.०२% कमी दराची मे.विपुल कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.करीता प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**मा.सभापती** : सदरील प्रस्ताव रिकॉल करण्यात यावा.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव रिकॉल करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६३/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,दत्तनगर भागातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९५-९६ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अं.प.रक्कम रु.४,०८,५६२/- चे तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती ठराव क्र. ६९/१४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

परंतु सदरील ठिकाणी ड्रेनेज व पाणी पुरवठयाचे पाईपलाईन टकाणेसाठी दोन गल्ल्यांमध्ये काम थांबविण्यात आले होते व त्याऐवजी शेजारच्या गल्ल्यांमध्ये जेथे डांबरीकरणाचे काम झालेले नव्हते तेथे काम करण्यात आले.

तरी ज्या ठिकाणी काम करावयाचे राहुन गेले होते त्या ठिकाणचे काम करण्यासाठी रु.१,४२,१५६/- एवढया अतिरिक्त रक्कमेची आवश्यकता आहे.हे वाढीव काम कंत्राटदाराच्या मुळ निविदा दरानुसार म्हणजे अ.प.दरापेक्षा १३.५१% कमी दराने करण्यात येईल.

करीता वाढीव कामासाठी तयार करण्यात आलेले अं.प.रक्कम रु. १,४२,१५६/- च्या वाढीव रक्कमेस मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दत्तनगर भागातील रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी वाढीव कामाकरीता वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. १,४२,१५६/- ला तसेच सदर काम मुळ,गुत्तेदाराकउडुन अं.प.दरापेक्षा १३.५१% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६४/२३ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.लोहार गल्ली मोंढा मे.राणा ऑईल डेपो येथे गटार पुर्ण बांधकाम करणे करीता अं.प.रक्कम रु.५,१४,६९३/- चे परिसर अभियांत्रिकीच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदरील कामास मा.आयुक्तंनी दि.१५-१-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.तसेच सर्वसाधारण सभा दि. २८-५-९७ ला ठराव क्र.१९९/१६ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/४०/९७ दि. ६-६-९७ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सतरा निविदा विक्री झाल्या व त्यापैकी चार (४) निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.शेख शरीफ | ०.०५% | अं.प.दरापेक्षा कमी |
| २) श्री.आर.एस.भाटीया | ११% | अं.प.दरापेक्षा जास्त |
| ३) मे.हयात कन्स्ट्रक्शन | ५% | --//-- |
| ४) मे.बसर कन्स्ट्रक्शन | १५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.शेख शरीफ यांची निविदा आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.लोहार गल्ली मोंढा मे.राणा ऑईल डेपो येथे गटार पुर्नबांधकाम करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.शेख शरीफ यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६५/२४ :**

विविध प्रकारच्या डिझेल वाहनांच्या मायको कंपनीचे वॉश पंप ॲटोमायझर आदीचे स्पेअर पार्टससही रिपेअरींग करण्याच्या कामासाठी सन ९७-९८ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक करार करणेकरीता वर्तमानपत्रात निविदा सुचना देऊन निविदा मागविली असता एकच निविदा पत्रक प्राप्त झाले दर जास्ती असल्यामुळे दुसऱ्यांदा फेर निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा पत्रके वसुल झाली.

१) मे.नवजीवन ॲटो सर्व्हिस सेंटर,औरंगाबाद यांनी स्पेअर पार्टस व जॉबवर्कसाठी एम.आर.पी. प्राईजलिस्ट दर ७.५% असे दर दिले होते.

२) मे.चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲण्ड डिझेल सर्व्हिस,औरंगाबाद यांनी स्पेअर पार्टस एम.आर.पी. दराप्रमाणे व जॉबवर्क १०% कमी दराने असे दर दिले होते.मे.चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स हे मायको कंपनीचे अधिकृत विक्रेते नाहीत परंतु मे.नवजीवन ॲटो सर्व्हीस सेंटर,औरंगाबाद हे मायको कंपनीचे अधिकृत विक्रते आहेत.त्यामुळे चांगल्या प्रतीचे पार्टस अधिकृत विक्रेत्याकडे मिळतील यासाठी मा.आयुक्तांनी मे.नवजीवन ॲटो सर्व्हीस सेंटर,औरंगाबाद यांना वाटाघाटीस बोलावले असता सदरील एजन्सीने दि. ४-८-९७ रोजी स्पेअर पार्टस एम.आर.पी.दराने व जॉबवर्क १०% कमी दराने करण्याचे मान्य केले आहे.

तरी मे.नवजीवन ॲटो सर्व्हिस सेंटर,औरंगाबाद यांचे वाटाघाटीनंतरचे दराने सन ९७-९८ या आर्थिक वर्षासाठी करार करण्यास मंजुरी मिळावी.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डिझेल वाहनांच्या कंपनी वॉशपंप ऑटोमायझर स्पेअर पार्टस व जॉबवर्क साठी मे.नवजीवन ऑटो सर्व्हिस सेंटर,औरंगाबाद या मायको कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार स्पेअर पार्टस एम.आर.पी. दराने व जॉबवर्क १०% कमी दराने करण्याकरीता सन ९७-९८ वर्षासाठी करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६६/२५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शहरातील हातपंप दुरुस्तीसाठी या वर्षात लागणाऱ्या स्पेअर पार्टस करीता अंदाजे २.०० लाख खर्च येईल.वर्ष ९७-९८ या आर्थिक वर्षात इंडिया मार्क हातपंप दुरुस्तीसाठी लागणाऱ्या स्पेअर पार्टसचा पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता विक्रीच्या वेळेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या.निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स ॲण्ड सर्व्हीसींग,औरंगाबाद. | अं.प.दरापेक्षा ३.५% जास्त |
| २) मे.संदीप सेल्स कार्पोरेशन,औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा ४.८% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी  दर मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसींग,औरंगाबाद यांचे असून अं.प.दरापेक्षा ३.५% जास्त आहे.सदरील दर जास्त वाटल्याने मा.आयुक्तांसमोर संबंधितांस वाटाघाटीस बोलावून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करण्याबाबत मा.आयुक्तांनी सुचविले संबंधित एजन्सीने त्यास मान्यता दिली.त्यानुसार सदरील काम मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस,औरंगाबाद यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करुन घेण्याचे मान्यतेस्वत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील हातपंत दुरुस्तीसाठी ९७-९८ या आर्थिक वर्षात इंडिया मार्क हातपंप दुरुस्तीसाठी लागणाऱ्या स्पेअर पार्टसचा पुरवठा करण्याकरीता तिरुपती इलेक्ट्रीकल्य सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस,औरंगाबाद यांचेकडून अं.प.दरापेक्षा ५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६७/२६ :**

महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या विविध मॉडेल्सच्या जीपसाठी स्पेअर पार्टस खरेदी करण्यासाठी सन ९७-९८ या आर्थिक वर्षाकरीता वार्षिक करार करण्यासाठी कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून निविदापत्रके मागविण्यात आली असता एकूण दोन निविदापत्रके विक्री झाली व प्राप्त झाली ती खालीलप्रमाणे आहेत.

१) मे.रत्नप्रभा मोटार्स,औरंगाबाद

२) २) मे.भारत ॲटो स्टोअर्स,औरंगाबाद

यांचे दर प्राईज लिस्ट १९% मध्ये सेल्सटॅक्स,जकात,इन्शुरन्स,ट्रान्सपोर्ट,हॅलिंग चार्जेस येतात.दोन्ही एजन्सीचे दर सारखे असल्यामुळे दोघांनाही वाटाघाटीसाठी मा.आयुक्तांनी बोलावून दर कमी करण्यास सांगितले असता मे.भारत ॲटो स्टोअर्स,औरंगाबाद यांनी ते ३% सुट देण्यास तयार आहेत असे पत्र दिले.त्यामुळे दर प्राईजलिस्ट १६% असे होतात.

महानगरपालिकेकडे असलेल्या ताफयासाठी वार्षिक स्पेअर पार्टस अंदाजे ३.०० लाखाचे सन ९७-०८ या आर्थिक वर्षात खरेदी होतील असा अंदाज आहे.तरी मे.भारत ॲटो स्टोअर्स,औरंगाबाद जे महिन्द्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत.त्यांचे दर मंजुर करुन वार्षिक करार करण्यास मंजुरी मिळाली.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनीच्या विविध मॉडल्सच्या जीपसाठी स्पेअर पार्टस् खरेदी करण्यासाठी सन ९७-९८ या वार्षिक वर्षाकरीता कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.भारत ऑटो स्टोअर्स,औरंगाबाद यांचेशी दर प्राईज लिस्ट १६% या दराने करार करण्यास सर्वानमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६८/२७:**

मो.समाधान कॉलनी येथील न.भु.क्र.१८०९२ हा कु.प्रेमलता पिता रतनलाल येथील लग्नानंतरचे नांवा सौ.प्रेमलता  श्री.निवास भुतडा यांचे मालकीची आहे.ही मिळकत मंजुर विकास योजनेच्या आरक्षण क्र. ८९ (खुली जागा) मध्ये बाधीत होते.मिळकत धारकाने मनपास म.प्र.व न. अधिनियम १९६६ चे काम १२७ अन्वये खरेदी सुचना दिली होती.त्या आधीच हया मिळकतीचे भुसंपादनाची प्रशा.ठराव क्र. ६१४दि.२५-१०-९४ रोजी

मान्य झालेला आहे.आता संबंधित जमिन मालकाने खाजगी वाटाघाटीने जागा देवून जागेचा मोबदला म्हणून मागणी केलेली आहे.

सिध्द शिर्घ्र गणकानुसार भागातील जमीनीचे दर घेऊन या प्रकरणी मुल्यांकन करता मिळकतीचे क्षेत्र ४१४.०० चौ.मी.क्षेत्राच्या रु. ७,९३,४२२/- एवढा मोबदला निश्चित करण्यांत आला आहे. खाजगी वाटाघाटीमध्ये संबंधिताने हया मुल्यांकनास मान्यता दिलेली आहे.करीता जमीन मुल्य व जमीन संपादनाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मान्यतेनंतर रितसर नोंदणीकृत दस्त ऐवजाने जमिन हस्तांतरीत करुन घेण्यात येईल.नोंदणीकृत दस्तऐवजा करीता / खरेदीखता करीता येणारा खर्च एकूण रु. ८०,०००/- महानगरपालिका करणार आहे.करीता खर्चाची रक्कम रु. ८०,०००/- श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांनी अग्रीम म्हणून देण्यांत यावी.प्रस्ताव मान्यतेसतव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र.१८०९२ ही मिळकत विकास योजनेत बाधीत होत असल्यामुळे एकूण मिळकतीचे क्षेत्र ४१४.०० चौ.मी.संपादन करुन त्याचा मोबदला जमीन मालक कु.प्रेमलता पि.रतनलाल जेथलीया लग्नानंतरचे नाव सौ.प्रेमलता श्रीनिवास भुतडा यांनी खाजगी वाटाघाटीत मान्य केल्यानुसार रक्कम रु. ७,९३,४२२/- (सात लक्ष त्र्याण्णव हजार चारशे बावीस) संबंधितास देण्यास तसेच नोंदणीकृत दस्तऐवज करीता रक्कम रु. ८०,०००/- श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६९/२८:**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की,मौज चिकलठाणा येथील मुख्य रस्ता जालना औरंगाबाद या रोडवरील जागावरील ग्रामपंचायत काळापासुन हॉटेल्स अस्तित्वात आहे.त्याबाबत जागेची पाहणी केली असता खालील दर्शविलेल्या नांवासमोर तपशील खालील प्रमाणे माहिती आहे.

| अ.क्र. | नांव | जागेचा आकार |
|---|---|---|
| १) | उत्तम गणाजी बनसोडे | बांधकाम १६.३x६ मीटर = १०६५ चौ.फुट |
| २) | किसन बाळुमन लख्णाना | बांधकाम २१.०मी.x६.०मीटर १५८२ चौ.फुट |
| ३) | किसन लक्ष्मण मेहता | बांधकाम १७.८मी.४.७५मी.खुली जागा १०.० मी.x४.७५ मी. |
| ४) | रंगनाथ शंकरराव कोरडे | बांधकाम २०.५मीx५.० मीटर खुली जागा ५.० मी.६.० मीटर |
| ५) | दिलीप सी. जैस्वाल | बांधकाम १४.५०x९.० मीटर |
| ६) | जगन्नाथ रिठे | बांधकाम १८.० मी.x३.२० मी. |
| ७) | मोहन प्रतापजी भट | बांधकाम १५.५ मी.x६ मी. खुली जागा ६.५ x७.० मीटर |
| ८) | रा.फ.गौत्रे | बांधकाम ८.० मी.x६.० मी. खुली जागा ४.० मी.x६.० मी. |

| | | |
|---|---|---|
| ९) | विष्णु सौ.शिरसागर | बांधकाम ८.० मी.x६.० मी.<br>खुली जागा ४.० मी.x६.० मीटर |
| १०) | आर.जी.जाधव | बांधकाम ३.५० मी.x६.० मीटर |
| ११) | श्री.म.ए.सातपुते | बांधकाम ३.५० मी.x६.० मीटर |
| १२) | रामलाल रपलाल जैस्वाल | ३०.० मीटर x ६.० मीटर |

वरील जागांपैकी अ.क्र.१ ते ७ यांची प्रस्तावित जागा जालना रोड १२३ रुंद रस्त्याने बाधित जागा सोडुन पाठीमागे जागा शिल्लक रहाते.अ.क्र.८ ते ११ यांची प्रस्तावात विकास योजनेत रस्त्यात संपुर्ण जागा बांधीत होते.त्यांची मागील भागात जागा शिल्लक राहात नाही.

वरील इसमांना नोटीस देण्यांत आल्या होत्या तथापी त्यांनी ग्रामपंचायतीच्या काळात जागा भरणा केलेली (पावती झेरॉक्स) पावती सादर केलेली आहे.तसेच त्यांनी मनपा अस्तित्वात झाल्यानंतर विभागीय कार्यालयात काही महिने किराया जमा केला आहे.

सदर प्रकरणात नगररचना विभागाचा अभिप्राय मागविण्यांत आला असता अभिप्राय दिला आहे की, मिळकतीचा आखीव पत्रिका उपलब्ध नसल्याने विकास योजना पडताळणी करता येत नाही.तथापि मंजुर योजना नुसार रोड रस्ता मध्ये मिळकतीच्या बाधीत भाग वगळता उर्वरित भागावर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१) मनपा जोपर्यत रस्ता रुंदी करण्याचे काम हाती घेत नाही तोपर्यंत म्हणजे १९८२ ते ९० पर्यंत जुन्या लिज दराप्रमाणे १९९० ते ९५ चे सुधारीत दराने
१९९५-९७ चे मनपाचे नविन दराने
भाडे वसुलीची कार्यवाही करता येईल.
२) रस्ता रुंदी करणाच्या वेळी संबंधित भाग स्वत: काढून घेतील त्याचा मोबदला मागण्याचा अधिकार राहणार नाही.तसा करारनामा त्यांच्याकडून घेता येईल.
३) मनपाच्या नियोजित काही बांधकाम प्रस्ताव असल्यास जागा परत घेतली जाईल.
४) वेळोवेळी भाडयामध्ये कसलीही सुचना न देता भाडे करण्यात येईल.
५) जो पर्यंत रस्ता मोठा होत नाही तोपर्यंत भाउे भरणा करावा लागेल.
६) जागेचा अकृषीकर मालमत्ता कर सामान्यकर व इतर कर भाडया व्यतिरिक्त भरावे लागेल.
७) मनापाचे ठरविलेल्या प्रमाणे अनामत रक्कम, सुरक्षा रक्कम, विकास निधी, शहर विकास निधी, साफसफाई कर भाडेकरुस भरावा लागेल.

तरी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचाराथ्र सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील मुख्य रस्ता जालना औरंगाबाद रोडवरील जागेवर ग्रामपंचायत काळापासून हॉटेल्स अस्तित्वात आहे.त्या जागेचे मालक प्रस्तावातील अ.क्र.१ ते ७ च्या अटी व शर्तीनुसार रस्ता रुंदीकरणापर्यंत जागा भाडेपट्टयाने देण्यास सर्वानमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७०/२९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.फुलेनगर स्लम भागात खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे करीता रक्कम रु. १०,६२,०००/- चे अंदाजपत्रक

सा.बां.विभाग,औरंगाबाद यांची दर सुची ९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असून मा.आयुक्त यांनी दि.२२-४-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केला आहे.तसेच सर्वसाधारण सभा दि. ३१-५-९७ च्या विषय क्र. ८/५ द्वारे मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/४३/९७ दि. २५-६-९७ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम दि. ४-७-९७ पर्यंत एकूण चार कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या तारखेस १७-७-९७ पर्यंत एकूण तीन मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि. २२-७-९७ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) एम.एस.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २०.९६ % | अं.प.दरापेक्षा कमी |
| २) आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १९.८९% | --//-- |
| ३) श्री.डि.अजितसिंग | १५.०५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९६ कमी दराची निविदा एम.एस.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची आहे.करीता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

सदर काम ९७-९८ वर्ष झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत डांबरी रस्ते शिर्षमध्ये खर्च करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.फुलेनगर स्लम भागात खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २०.९६% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७१/३०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,लाजननगर येथील उद्यान विकसीत करावयाचे आहे.सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची सन ९६-९७ च्या दरसुची नुसार ९,२०,६००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.सदर कामाचा खर्च हा शासकीय अनुदान सन ९६-९७ मधुन करण्यांत येणार आहे.(रु.चार कोटी मधुन) तरी रक्कम रु. ९,२०,६००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लाजननगर येथील उद्यान विकसीत करावयाचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.९,२०,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च शासकीय अनुदान ९६-९७ मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७२/३१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.चिकलठाणा (गांव) व चौधरी कॉलनी (चिकलठाणा) येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता रक्कम रु. १३,१६,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ अनुसार तयार करण्यात आली असून मा.आयुक्तांनी दि. ३-३-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.तसेच दि. ३१-५-९७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.९/६ दि.३१-५-९७ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची

प्रगट निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/४३/९७ दि. २५-६-९७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक ४-७-९७ पर्यंत एकूण चार कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस १७-७-९७ रोजी फक्त तीन मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २२-७-९७ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) एम.एस.मास्कॉट कन्स्ट्रक्शन | १५.९६ अं.प. दरापेक्षा कमी | |
| २) आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १४.७९ | --//-- |
| ३) श्री.डी.अजितसिंग | ११% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.९६% कमी दराची निविदा एम.एस.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची आहे. करीता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

सदर काम १८ खेडी विकास योजना ९७-९८ या शिर्षअंतर्गत खर्च करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा (गांव) चौधरी कॉलनी (चिकलठाणा) येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.९६% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७३/३२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.बनेवाडी गावापासुन ते स्मशानभूममी पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व डांबरी करण करणे कामाकरीता रक्कम रु. ४,५५,३००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांची दरसुची ९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असून मा.आयुक्तांनी दि. २-८-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदर काम झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम ९७-९८ अंतर्गत डांबरी रस्ते या शिर्ष खर्च करण्यात येईल.मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.बनेवाडी गावापासुन ते स्मशान भुमी पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व डांबरी करण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,५५,३००/- च्या अंदाजपत्रकास तसे सदर खर्च झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम ९७-९८ अंतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७४/३३:**

ड्रेनेज चेकअप दुर करण्यासाठी असलेल्यस हायप्रेशर जेटींग मशिनचे हायप्रेशर जेटींग होज पाईप जे पूर्वी ९४ मध्ये खरेदी केले होते ते खराब झाले असून चेकअप काढण्याचे काम व्यवस्थित होत नाही.सदरील पाईप वारंवार जागेजागी जॉईंट करुन जवळपास गेले वर्षभर चालविले,परंतु आता ते रिपेअर होवू शकत नाही.म्हणून १२२ मीटर लांबीचे व २०० मीटर बार वर्कींग प्रेशर वर चालणारे व विशिष्ट गुणवत्ता असलेले इंपोर्टेड जेटींग होज खरेदी साठी जेटींग मशिनच्या अधिकृत विक्रेत्याकडून असलेल्या दराने रुपये

३,१४,३७९/- चे अंदाजपत्रक तयार केले व वर्तमानपत्रात निविदा सुचना देवून निविदा पत्रके मागविण्यात आली असता एकूण ३ निविदा पत्रके वसुल झाली.सर्वात कमी दर मे.कॅम मार्केटींग, पुणे यांचे होते व ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.४% जास्ती दराचे होते त्यांना वाटाघाटी साठी बोलावले असता त्यांनी २.१% जास्तीचे दराने पुरवठा करण्याचे मान्य केले तरी पण हे दर जास्तीचे आहेत असे वाटल्याने फेरनिविदा मागविण्याचे मा.आयुक्तांनी आदेशित केले.

फेर निविदा मागविली असता एकूण २ निविदा पत्रके वसुल झालीत त्यात मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस,औरंगाबाद यांचे दर रु. २,९४,६३०/- चे आले असून ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.२७% कमी दराचे आहेत.तरी पण त्यांना परत मा.आयुक्तांनी वाटाघाटीसाठी बोलाविले असता त्यांनी आणखीन २% दर कमी करण्याचे मान्य केले म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.२७% कमी दराने पुरवठा करण्याचे मान्य केले असून १२२ मीटर पाईप पुरवठा करण्यासाठी २,८८,३८०/- खर्च होईल.

तरी वाटाघाटी नंतर आलेल्या दरास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हायप्रेशर जेटींग मशिनचे हायप्रेशर जेटींग होज पाईप मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्या ॲण्ड सर्व्हिस,औरंगाबाद यांचे कडून ८.२७% कमी दराने खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. २,८८,३८०/- च्या खर्चास सर्वानुमतें मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७५/३४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.४४ कासारी बाजार येथील रोडचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ६,९३,३५०/- चे तयार करण्यात आलेले असून सदरचा खर्च पुर्नडांबरीकरण या लेखा शिर्षकाखाली ठेवण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४४ कासारी बाजार येथील रोडचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,९३,३५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च पुर्नडांबरीकरण या लेखा शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७६/३५:**

अतिरिक्त शहर अभियंता हे प्रस्ताव सादर करीत आहेत की,सुभेदारी विश्राम गृहाजवळ नेहरु बालोद्यान येथे छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या इमारतीच्या उभारणीचे काम जवळ जवळ पुर्णत्वाकडे जात आहे.

त्या अनुषंगाने दि. ७-४-९७ रोजी पुराण वस्तु संग्रहालय समितीची जी बैठक झाली.त्या बैठकीत ठरल्यानुसार खालील कामे संग्रहालयाच्या परिसरात /इमारतीत विविध कलावंताकडून करुन घ्यावयाची आहेत.

१) छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय नेहरु बालोद्यान औरंगाबाद येथे ५० फुट लांब व ३० फुट रुंद व सुमारे २० फुट उंच हॉलमध्ये तसेच ३ मी.उंच x २.५ मी.रुंद व १.२ मी. खोल भिंतीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर,कारकिर्दीवर आधारीत वास्तववादी चित्रशिल्पे (म्युरल्स) तयार करुन भिंतीवर लावावयाचे असून सदरील कामाचे माध्यम फायबर ग्लास (एफ. आर.पी.) हे असेल.
२) छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय नेहरु बालोद्यान,औरंगाबाद येथे ५० फुट लांब व ३० फुट रुंद व २० फुट उंच अशा हॉलमध्ये शिवाजी महाराज यांच्या जीवनावर व कराकीर्दीवर आधारीत वास्तववादी आकाराचे शिल्प / पुतळे यांच्या साहयानेविविध प्रसंग उभे करावयाचे आहेत.पुतळे / शिल्प हे विविध रंगी असावेत.पुतळयांचे /शिल्पाचे माध्यम हे फायबर ग्लास असेल.
३) छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय नेहरु बालोद्दान येथे ५० फुट लांब व ३० फुट रुंद व २० फुट उंचा अशा हॉलमध्ये शिवकालीन किल्ले रायगड,राजगड,विजयदुर्ग,प्रतापगड,सिंहगड,शिवनेरी सिंधुदुर्ग व तोरणा या किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करुन त्यांची योग्य रचना करणे,सदरील किल्ल्याच्या प्रतिकृती फायबर ग्लास या माध्यमात तयार होतील.
४) छत्रपती शिवाजी महराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या दालनापैकी किल्ल्याच्या प्रतिकृतीचे जे दालन असेल त्या दालनात भिंतीवर शिवकालीन प्रमुख किल्ल्यांची छायाचित्रे लावावयाची आहे.

सदरील कामे वर्तमान पत्रातून जाहीर निविदा मागवून करण्याचा मानस आहे.आलेल्या निविदा नमुने / दर इ.साठी तपासणी व कलावंताची निवड करणेस्तव एक तज्ञ समितीचे गठण मा.आयुक्त मनपा यांचे अध्यक्षतेखाली करण्यात येईल व हया समितीमार्फत निवडलेल्या कलावंताकडून ही कामे करुन घेण्यात येतील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीतस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या परिसरात इमारतीत विविध कलावंताकडून प्रस्तावातील अ.क्र. १ ते ४ मध्ये दर्शविलेली कामे मा.आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठण करुन या समिती मार्फत निवडलेल्या कलावंता कडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७७/३६:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,हरसिध्दी पशुसंवर्धन सोसायटी हर्सुल येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु.२,१४,५०५/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.प्रस्तुत कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदी मधुन करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हरसिध्दी पशुसंवर्धन सोसायटी हर्सुल येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,१४,५०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.संबंधित वॉर्डाच्या

नगरसेविका यांनी काम तातडीने करण्याबाबत मागणी केलेली आहे.तरी सदर काम उपलब्ध गुत्तेदाराकडून करुन घेण्यात यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७८/३७:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पद्मपुरा येथील फायर ऑफिसच्या मागे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु. १,४१,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पदमपुरा येथील फायर ऑफिसच्या मागे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,४१,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने करुन घेण्याचे दृष्टीने उपलब्ध गुत्तेदाराकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७९/३८:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो. उस्मानपुरा भागात १५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु.जी.लाईन काढुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ६,६८,०००/- यास सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. २००/९७ दि. १०-३-९७ द्वारे अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यावर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण पंधरा निविदा विक्री झाल्या होत्या.त्यापैकी एकूण सात निविदा प्राप्त झाल्या असुन त्याखालील प्रमाणे दर दिलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) राणा कन्स्ट्रक्शन | ३१.९९% | कमी |
| २) खर्डीकर कन्स्ट्रक्शन | २५.२५% | --//-- |
| ३) आर.बी.चव्हाण | २५.००% | --//-- |
| ४) एस.एम.मंडोरे | २२.७६% | --//-- |
| ५) मो.सोहल सिद्दीकी | २२.२९% | --//-- |
| ६) संजीवनी कन्स्ट्रक्शन | १६.९७% | --//-- |
| ७) राजीव कन्स्ट्रक्शन | १२.१२% | --//-- |

वरील दर पाहता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.९९% कमी दराची निविदा राणा कन्स्ट्रक्शन यांची आहे.करीता निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा भागात १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यू जी.लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३१.९९% कमी दराची राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८०/३९:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मराठवाडा सांस्कृतिक मंडळ पासुन ते अंजली सिनेमा गृह जवळील नाल्यापर्यंत ६०० मी.मी.व्यासाची पावसाचे पाणी वाहुन जाण्यासाठी आर.सी.सी.जलनि:सारण वाहीनी टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी यांच्या सन ९४-९६ च्या दरसुची प्रमाणे रक्कम रु.३,७१,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च हा "खुली गटारी" बांधणे हया आर्थिक लेखाशिर्षखाली करण्यात येईल.तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,मराठवाडा सांस्कृतिक मंडळ पासुन ते अंजली सिनेमा गृह जवळील नाल्यापर्यंत ६०० मी.मी.व्यासाची पावसाचे पाणी वाहुन जाण्यासाठी आर.सी.सी.जलनि:सारण वाहीनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,७१,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च हा "खुली गटार बांधणे" या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८१/४०:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.भवानीनगर येथील जुनी ड्रेनेज पाईप लाईन अप्रूटींग करणेच्या कामाकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,१५,१७०/- चे परिसर अभियांत्रिकीच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार प्रस्तावित केले आहे.

.या कामाचा समावेश देखभाल व दुरुस्ती सन ९७-९८ या लेखाशिर्षा खाली प्रस्तावित केले आहे.

सदरील कामास मा.आयुक्तांनी दि. ७-८-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भवानीनगर येथील जुनी ड्रेनेज पाईप लाईन अप्रुटींग करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,१५,१७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८२/४१:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिल्पानगर येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु. १,४३,३८०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे.तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , शिल्पानगर येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,४३,३८०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने सुरु करावयाची असल्याने उपलब्ध गुत्तेदाराकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८३/४२:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मसनतपुर येथे १५० मी.मी.व ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.जलनि:सारण वाहिनी टाकणेबाबत अंदाजपत्रक रु. ४,२५,३२०/- यास स्थायी समितीमध्ये विषय क्र.७१३/३ दि. ४-३-९७ द्वारे मान्यता मिळाल्यानंतर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण एकोणतीस निविदा विक्री झाल्या होत्या त्यापेकी तीन निविदा प्राप्त झाल्या असून खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.नरेंद्र शेट्टी | ४.८५% | जास्त दराने |
| २) श्री.सलिम पटेल | ४.५०% | जास्त दराने |
| ३) श्री.शेख शरीफ | ५% | जास्त दराने |

वरील दर पाहता तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ४.५०% जास्त दराची निविदा श्री.सलीम पटेल यांची आहे.मा.आयुक्त यांनी संबंधित काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मान्यता दिली असून श्री.सलीम पटेल यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास लेखी संमती दिली आहे.तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मसनतपुर येथे १५० मी.मी.व ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी श्री.सलीम पटेल यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करणेस लेखी संमती दिल्या मुळे त्यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८४/४३:**

सिडको एन-११ /सी -१ व सी-५ या सेक्टर मध्ये १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू. १२,८१,३२९/-चे तयार करण्यांत आले असून सर्वसाधारण सभा ठराव क्र.२१०/३ दि.१०-३-९७ अन्वये मंजुरी मिळाली. त्यानुसार स्थानीक वृत्तपत्राने निविदा मागविण्यात आल्या.निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण १९ निविदा विक्री झाल्या आणि सिलंबद निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ७ (सात) निविदा प्राप्त झाल्या त्यामध्ये तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. ए.एस.फारुकी | ३०.८६% | कमी दराने |
| २) श्री.सलीम पटेल | २८.५९% | --//-- |
| ३) श्री.लक्ष्मण कन्स्ट्रक्शन | २७.९९% | --//-- |
| ४) श्री.नंदकुमार घोडेले | २२.०० | --//-- |
| ५) राणा कन्स्ट्रक्शन | १७.०२% | --//-- |
| ६) श्री.व्ही.जी.स्वामी | ८.५५% | --//-- |
| ७) न्यु.स्टार कन्स्ट्रक्शन | २% | --//-- |

उपरोक्त प्रमाणे सर्वात कमी दराची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.८६% कमी दराने श्री.ए.एम.फारुकी यांची निविदा आहे.सदर निविदेस मा.आयुक्तांनी मंजुरी दिली असून स्थायी समितीच्या मंजुरीसाठी व विचारार्थ सादर.

**मा.सभापती** : रिकॉल करण्यात यावा.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की,सदरील कामाकरीता पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात.

**विषय क्र.१८५/४४:**

हर्सुल येथे ८०,१००,१५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.२,२७,०००/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून सदरील कामावर होणारा खर्च भांडवली काम पाणी पुरवठा ९७-९८ लेखा शिर्षातून करण्यात येणार आहे.सदरील अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

तरी हर्सुल येथे जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २,२७,०००/- चे प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथे ८०,१००,१५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,२७,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम उपलब्ध गुत्तेदाराकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८६/४५:**

मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी अग्निशमन विभागासाठी नायलॉन रोप लॅडर खरेदीसाठी फॉयर एस्केप इंजिनिअरींग कार्पोरेशन,मुंबई या उत्पादक कंपनी कडुन मा.आयुक्त यांच्या सुचनेनुसर २% (दोन टक्के) दर कमी करुन १० रोप लॅडर खरेदीचा प्रस्ताव रु. २,४२,५५०/- सर्व करासहीत सादर करण्यात येत आहे.सदरील खर्च ९७-९८ या आर्थिक वर्षात अग्निशमन साहित्य खरेदी या शिर्षातून होणार आहे.

सदरील रोप लॅडर हे अग्निशमन केंद्र एम.आय.डी.सी.वाळुज व शहर अग्निशमन दालासाठी वापरण्यास येणार आहे.तसेच त्यांच्या अटी व शर्तीनुसार ४०% ॲडव्हॉन्स रक्कम फायर एस्केप इंजिनिअरींग कार्पोरेशन मुंबई यांना पुरवठा आदेशा सोबत द्यावी लागणार आहे.रोप लॅडर खरेदीचा प्रस्ताव.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,अग्निशमन विभागासाठी नायलून रोप लॅडर एम.आय.डी.सी. वाळुज व शहर अग्निशमन विभागाकरीता एकुण १० रोप लॅडर मे.फायर एस्केप इंजिनिअरींग कार्पोरेशन,मुंबई यांचे कडुन खरेदी करण्यास तसेच याकरीता येणाऱ्या रक्कम रु. २,४२,५५०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८७/४६:**

लेखाधिकारी-१ यांनी प्रस्ताव सादर केला की,महानगरपालिका अधिकाऱ्यांना कार्यालयीन वाहन देण्याऐवजी महानगरपालिकेने त्यांना चार चाकी वाहन खरेदीस्तव रु.२.०० लाख कर्ज मंजुर केलेले आहे.अशा एकूण १२ अधिकाऱ्यांना ( उप अभियंता व लेखाधिकारी-१ यांना) कर्ज मंजुर केलेले आहे.कर्जवाटप समितीने (मा.आयुक्त,उप आयुक्त-१,मुख्य लेखापरिक्षक,विधी सल्लागार,लेखाधिकारी-१ यांचे गठीत समितीने) उपरोक्त १२

अधिकऱ्यांना प्रतिमाह रु.१८००/- वाहनभत्ता/ पेट्रोल अलांउन्स देण्याबाबत शिफारस केलेली आहे.महाराष्ट्रातील इतर महानगरपालिका मध्ये मुख्य लेखाधिकारी यांना कार्यालयीन वाहन देण्यात आलेले आहे.महानगरपालिकेचे लेखाधिकारी-१ हे इतर महानगरपालिकातील मुख्य लेखाधिकाऱ्यांचीच कर्तव्ये पार पाडीत असल्यामुळे त्यांना कार्यालयाने वाहन देण्याऐवजी चार चाकी वाहन कर्ज देण्यात आलेले आहे.त्यामुळे कर्ज वाटप समितीने शिफारस केल्यानुसार उपरोक्त-१२ अधिकाऱ्यांना प्रतिमाह रु.१८००/- पेट्रोल अलाऊन्स मंजुर करण्याच्या विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री.संजय जोशी** : अधिकारी वर्गांना रु. ३०००/- चा प्रस्ताव होता त्यास मी विरोध केलेला होता परंतु आता पुन्हा या ठिकाणी प्रस्ताव आलेला आहे.तेव्हा सर्वसाधारण सभेत पारित झालेल्या प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही करावी.

**मुख्येलेखा परिक्षक** : रु. ३०००/- बाबत सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन प्रस्ताव केलेला होता.प्रशासनामार्फत झालेला नाही.

**श्री.गौतम लांडगे,श्री.श्री.संजय जोशी,श्री.कचरु नवपुते,श्री.त्रिबंक तुपे** : प्रस्तावानुसार ज्या अधिकाऱ्यांना वाहन भत्ता/ पेट्रोल अलाऊन्स द्यावयाचे ठरले व ज्यांनी कार्यालयातर्फे रु. २.०० लाखाचे कर्ज घेऊन वाहन खरेदी केलेले आहे.त्यांचे बाबत आतापर्यंतचे लॉगबुक तपासुन त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**मुख्य लेखा परिक्षक** :रु. ७५० ते १२०० पर्यंतचे वाहन भत्ता सन १९९१ च्या दराप्रमाणे आहे व कमीत कमी रु. १८०० पर्यंत केलेले आहे व लॉगबुक यांची पाहण करुनच कार्यवाही करण्यात येते.

**मा.आयुक्त :** अधिकाऱ्यांना वाहन खरेदीसाठी १४%प्रमाणे रु. २.०० लाखासाठीचे जे कर्ज दिलेले आहे ती वसुली कार्यालयातर्फे करण्यात येते.वाहनाचे लॉगबुक प्रतिदिन ४५ कि.मी.आवश्यक आहे व रु.२६००/- ची मर्यादा आहे.महानगरपालिकेतील कामासाठी वापरण्यात येणारे वाहन त्याचे एव्हरेज लॉगबुक प्रमाणे पडताळणी करुनच कार्यवाही करण्यात येते.

**मा.सभापती :** ज्या वेळेस कार्यालयातर्फे अधिकारी वर्गाला मनपाचे कर्ज रु.२.०० लाखाचे वाहन घेण्यासाठी वितरीत करण्यात आले व जेव्हापासून संबंधितांनी गाडी खरेदी केली.त्यावेळेस पासून त्या गाडीचे एव्हरेज लॉगबुकानुसार पाहणी करून संबंधितांना रु.१८००/- पेट्रोल अलाऊन्स देणेस हरकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतील ज्या १२ (बारा) अधिकाऱ्यांना चार चाकी वाहन खरेदीकरीता कर्ज देण्यात आलेले आहे.त्या अधिकाऱ्यांना (११ उप अभियंता व लेखाधिकारी-१ यांना) कर्ज वाटप समितीने शिफारस केल्यानुसार प्रतिमाह रु.१८००/- (एक हजार आठशे रुपये) पेट्रोल अलाऊन्स वाहन खरेदीच्या तारखेपासून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८८/४७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुकुंदवाडी येथे खुल्या जागेत आरोग्य केंद्र बांधावयाचे आहे.त्यासाठी सर्वसाधारण सभा दिनांक २०-१२-९५ विषय क्र.६ अन्वये मान्यता देण्यात आली.त्यानुसार सां.बां.विभागाचे सन ९५-९६ चे दरसुचीनुसार रक्कम रु.४,५०,०००/- चे अंदाजपत्रक बनवुन त्यास स्थायी समिती ठराव क्र. ३९२/१४ दि. १९-१-

९६ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.त्यानुसार निविदा मागुन दि. २९-९-९६ क्र. २५८/९७ अन्वये मे.अमित कन्स्ट्रक्शन यांच्यातर्फे अंदाजपत्रकीय दरानुसार काम करुन घेण्यास मान्यता देण्यांत आली.

त्याप्रमाणे त्यांच्या तर्फे काम करुन घेण्यात येत आहे.मुळ अंदाजपत्रक हे ढोबळ मानाने तयार करण्यांत आले होते.सद्य स्थितीत इमारतीचा जिना ग्लेज्ड टाईल्स,ए वन डोअर तसेच ड्रेनेजचे काम करणे शिल्लक राहीले आहे.त्यासाठी सुधारीत अं.प.रु. १,६०,०००/- चे तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.तरी उक्त काम हे मंजुर निविदा धारकातर्फे बी-१ दरानुसार करुन घेण्यास व वाढीव अंदाजपत्रकीय मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकुंदवाडी येथे खुल्या जागेत आरोग्य केंद्र बांधण्याचे कामाकरीता जिना,ग्लेज्ड टाईल्स,ए वन डोअर इ.वाढीव कामाकरीता सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. १,६०,०००/- ला तसेच सदरील वाढीव काम मुळ कामाचे निविदाधारका तर्फे बी-१ दरानुसार करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८९/४८:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.राजीवगांधीनगर सिडको,मुकुंदवाडी येथे २५% लोकवर्गणी घेऊन जलनि:सारण वाहीनी टाकावयाची आहे.यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २९/२७ दि. २०-७-९६ अन्वये नागरी सुविधा पुरविण्यास मान्यता देण्यात आली आहे.त्या अनुषंगाने सदर भागात १५० व २५० मी.मी. व्यासाची ज.नि.वाहिनी टाकण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची ९५-९६ नुसार रक्कम रु. ५,९३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार सदर भागातील नागरीकांना २५% लोकवर्गणी जमा करण्यासाठी कळविण्यात आले होते.परंतु प्रत्यक्षात २५% लोकवर्गणी म्हणून रु. ५१,०००/- एवढी रक्कम जमा झाली आहे. त्यामध्ये कार्यालयाचे ७५% रक्कम रु. १,५०,०००/- एवढी टाकून एकूण रक्कम रु.२,००,०००/- दोन लाखापर्यंचे काम महापालिकेस करावयाचे आहे. तरी रुपये दोन लाखापर्यंतचे कामाच्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राजीवगांधीनगर,सिडको मुकुंदवाडी येथे २५% लोकवर्गणी घेऊन जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरीता एकूण रु. २,००,०००/- (दोन लाख) पर्यंतच्या कामाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या भागातील नागरीकांनी नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यांकरीता उपोषणही केले होते.

**विषय क्र.१९०/४९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बारापुल्ला दरवाजा ते लिटल फ्लॉवर स्कुल पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण खडीकरण करुन मध्ये दुभाजक बांधणेच्या कामासाठी दि. २०-९-९६ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.६५/४ अन्वये अं.प. रक्कम रु. १०,५४,२००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा /लेखा /नि/३२/९७ दि. ३-५-९७ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण २३

(तेवीस) निविदा पत्रके विकल्या गेली असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण ८ (आठ) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.

प्राप्त निविदा २८-५-९७ ला उघडण्यात आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. आर.बी.चव्हाण | ३२% | कमी |
| २) मे. राणा कन्स्ट्रक्शन | ३२% | कमी |
| ३) मे.एस.एच.असोशिएटस | २७.७५% | कमी |
| ४) श्री.विकास गोविंद जाधव | २७% | कमी |
| ५) श्री.सै.शरीफ | २२.७८६% | कमी |
| ६) श्री.एस.एम.मंडोरे | २४.१०% | कमी |
| ७) श्री.अब्दुल सलीम | २१.३% | कमी |
| ८) श्री.सलीम पटेल | १६.९२% | कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प.दरापेक्षा ३२% कमी या दराने मे.राणा कन्स्ट्रक्शन व श्री.आर.बी.चव्हाण या दोघांचे समसमान दर आले असता दोघांनीही त्यांचेकडून संमतीपत्र मागविल असता मे.राणा कन्स्ट्रक्शन कं.यांनी हे काम श्री.आर.बी. चव्हाण यांना देण्यांस हरकत नाही म्हणून संमतीपत्र दिलेले आहे.

तरी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प.दरापेक्षा ३२% कमी दराने मे.राणा कन्स्ट्रक्शन कं.यांनी दिलेल्या संमतीपत्राच्या आधारे सदरील काम श्री. आर.बी.चव्हाण यांची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बारापुल्ला दरवाजा ते लिटल फ्लॉवर स्कुल पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण खडीकरण करुन मध्ये दुभाजक बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा तुलनात्मकदृष्टया कमी असलेल्या म्हणजेच अं.प.दरापेक्षा ३२% कमी दराचे दोन दरपत्रकाधारकापैकी श्री.राणा कन्स्ट्रक्शन कं.यांनी दिलेल्या संमतीपत्राच्या आधारे सदरील काम श्री. आर.बी.चव्हाण यांच्याकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९१/५०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, म्हाडा कॉलनी पीरबाजार येथील मोकळया जागेवर प्रा.आरोग्य केंद्र बांधावयाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु. ७,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी मा.आयुक्तांनी दि. १४-८-९७ अन्वये शिफारस केली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रु. ७,४०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखा मधून सन ९७-९८ च्या सुधारीत अंदाजपत्रकात करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, म्हाडा कॉलनी पीरबाजार येथील मोकळया जागेवर प्रा.आरोग्य केंद्र बांधावयाच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ७,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने या

लेखाशिर्षामधुन ९७-९८ च्या सुधारीत अंदाजपत्रकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९२/५१:**

प्रकल्प अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नगरसेवक स्वेच्छानिधीतून बेरोजगार युवक व युवतींना तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी अर्ज प्राप्त होतात.मा.आयुक्तांची दि. ३१-३-९७ च्या मान्यतेनुसार प्रशिक्षणाचा दर निश्चितीसाठी निविदा दै.लोकमत,तसेच दै. आलमगिरी टाईम्स मधुन जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

त्याप्रमाणे एकूण १७ एजन्सीनी निविदा भरली होती.समुदाय संघटकांनी संबंधित एजन्सींना प्रत्यक्ष भेटी देऊन संस्थांची पाहणी करुन अहवाल दिला. प्रशिक्षणासाठी निवडावयाच्या एजन्सीसाठी काही निकष तयार करण्यात आलेत.एकूण १४ निकषपात्र एजन्सी आहेत. सदर निविदा फक्त दर निश्चितीसाठी मागविण्यात आलेल्या आहेत.दर निश्चिती नंतर योग्य व निकषपात्र कोणत्याही संस्थेस प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल.ज्या एजन्सींनी निविदा भरलेली नाही अशाही निकषपात्र संस्थांना प्रशिक्षणाचे कामे देता येतील त्यांचेकडून अनामत रक्कम घेण्यात येईल याचे कारण असे की, शहराच्या विविध भागात एजन्सीज व प्रशिक्षणार्थी आहेत.त्यांना सोईचे होईल.

दिनांक ११-७-९७ रोजी ५ वाजाता प्रकल्प संचालक यांच्या दालनात बेरोजगार युवक/ युवतींना प्रशिक्षण देण्याकरीता संस्था प्रमुखाची बैठक आयोजीत केली होती.

सदर बैठकीचे आयोजन प्रशिक्षणाचे दर निश्चित करण्यांसाठी होती. एकूण १७ निविदा पैकी निकष पात्र १४ संस्थांपैकी १० संस्थाच प्रतिनिशी उपस्थित होते. (प्रपत्र अ वर निकष आहेत.)

अ संगणक :

१) कॉम्प्युटर लॅब सिडको एन-७ ,औरंगाबाद.
२) सोनल कॉम्प्युटर,अंजली समोर,औरंगाबाद.
३) देवगिरी इले.कं.प्रा.उल्कानगरी,औरंगाबाद.
४) देवगिरी व्हॅली संस्था,औरंगाबाद.
५) मधुरा कॉम्प्युटर्स,औरंगपुरा,औरंगाबाद.

ब एल.एस.व्ही / रिक्षा चालक प्रशिक्षण :

१) सिलेक्ट मोटर ड्राईव्हींग स्कुल,लक्ष्मी कॉलनी,औरंगाबाद.
२) परफेक्ट ड्राईव्हींग स्कुल,औरंगाबाद.
३) बॉम्बे मोटार ड्राइव्हींग स्कुल,भडकल गेट,औरंगाबाद.

क.इतर प्रशिक्षण :

१) महिला औद्योगिक केंद्र,किलेअर्क,औरंगाबाद.
२) इंदिरा क्राप्ट टिचर संस्था,किलेअर्क,औरंगाबाद.

या संस्थेच्या प्रतिनिधी सोबत प्रशिक्षणासाठी दर निश्चिती बैठकीत सुरवातीस प्रकल्प संचालक व लेखाधिकारी यांनी आढावा घेतला त्यात निकष व अटीची पुर्तता करणाऱ्या संस्थाची माहिती घेतली. निविदा मध्ये दर्शविलेले दर वाटाघाटीद्वारे कमी करण्यांत येऊन दर निश्चित करण्यांत आले.

एकूण १० व्यवसाय प्रशिक्षणामध्ये दर निविदाद्वारे प्राप्त झाले होते.त्यांचे खालील प्रमाणे फरक तक्ता तयार करण्यात आला.सर्व साहित्य प्रशिक्षणा संस्थानी घ्यावयाचे ठरले आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नांव | कालावधी | निकष प्राप्त संस्थाचे निविदाद्वारे प्राप्त झालेले दर | वाटाघाटी अंती निश्चित केलेले दर. |
|---|---|---|---|---|
| १) | डि.टि.पी.ऑपरेटर कोर्स | ६ | रु.३०००/- | २५००/- |
| २) | फंडामेंटल कॉम्प्युटर (संगणक क्षेत्रातील प्रशिक्षण) | ६ | रु.२४००/- | २३००/- |
| ३) | चारचाकी वाहन चालक प्रशिक्षण परवानासह | १ | रु.१३५०/- | १३००/- |
| ४) | रिक्षाचालक प्रशिक्षण परवानासह | १ | रु.८७०/- | ८५०/- |
| ५) | बुक बाईडींग | १ | रु.३००/- | २८५ /- |
| ६) | इलेक्ट्रानिक टाईपिंग | ३ | रु. ३६०/- | ३४०/- |
| ७) | शिवणकाम | ३ | रु.२८५/- | २७०/- |
| ८) | हस्तकला | ३ | रु. ५००/- | ४७५/- |
| ९) | पाकीट बनविणे | ३ | रु. ३००/- | २८५/- |
| १०) | फाईल तयार करणे | ३ | रु.५००/- | ४७५/- |

उपस्थित एजन्सीच्या संमतीनुसार त्यांच्या स्वाक्षरी घेण्यांत आलेल्या आहेत. प्रत्येक वार्डातून बेरोजगार युवक / युवतींची शिफारस स. सदस्य करतील.निकष प्राप्त अटींची पुर्तता करणाऱ्या कोणत्याही संस्थेस (निविदा न भरलेल्या इच्छुक व निकषप्राप्त संस्थासह) प्रशिक्षणार्थीना पाठविण्यात येईल.

कारण त्यामुळे दूर अंतरावरील प्रशिक्षार्थींना संस्थास जाणे येणेचा त्रास टळेल.ज्या संस्थाची निवड होईल.त्या संस्थामार्फत रु. १० चा बॉण्ड पेपरवर करार नामा करुन घेण्यांत येईल.खालील बाबी मान्य केल्यास संगणक प्रशिक्षणाकरीता ५०% देयक हे प्रशिक्षण कालावधी ३ महिने पूर्ण झाल्यानंतर देता येईल व शिल्लक ५०% देयक प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर संस्थेस देण्यात येईल.

प्रशिक्षणार्थीकडून होणारे कोणत्याही प्रकारचे नुकसान नुकसानीस महापालिका जबाबदार राहणार नाही. प्रशिक्षणार्थ व प्रशिक्षण देणाऱ्या संस्था महानगरपालिका हद्दीतील असतील.संगणकाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनी शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या परिक्षेस संस्थांच्या खर्चाने प्रशिक्षणार्थीचा फॉर्म भरावा ही अट संस्थांनी मान्य केली.

अ) संगणकाचे प्रशिक्षण देण्यासाठी संस्थेसाठी निकष :

१) संस्था शासनमान्य असणे जरुरीचे आहे.
२) प्रशिक्षणासाठी जागा किमान ४०० स्क्वे.फुट असावी.
३) संगणकाची संख्या किमान ४/५ असणे जरुरीचे आहे.
४) एकाचवेळी किमान २०/२५ प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण देण्याची क्षमता असावी.
५) प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक किमान चार ते पाच असावेत.
६) सदर प्रशिक्षक बी.एस्सी./ एम.एस.सी.कॉम्प्युटर किंवा या पेक्षा उच्च अर्हताधारक असावेत.
७) प्रशिक्षणार्थी शासकीय परिक्षेस बसण्यांस पात्र राहतील ही जबाबदारी संस्थाची असेल.
८) प्रति दिन प्रात्यक्षिक दोन तास व थेअरी १ तस किमान बंधनकारक राहील.

९) यापूर्वी संस्थाने शासकीय /निमशासकीय योजनेअंतर्गत प्रशिणार्थी प्रशिक्षित केले असणे आवश्यक असावे.

१०) संस्थेकडे दुरध्वनी व्यवस्था असावी.

११) प्रशिक्षणार्थी मासिक अहवाल प्रती महानगरपालिकाकडे सादर करावा.

१२) प्रशिक्षणार्थीकडून कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास मनपा जबाबदार राहणार नाही.

१३) ज्या संस्थांची मनपा प्रशिक्षणासाठी निवड करील अशा संस्थांस रु. १० बॉण्ड पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे.

१४) निश्चित केलेले दर प्रशिक्षणापुर्वी आगाऊ रक्कम म्हणून मिळणार नाही.

१५) संबंधित प्रशिक्षणार्थींना परिक्षा घेऊन उत्तिर्ण प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण द्यावे.

१६) नगरसेवकांनी प्रकल्प विभागामार्फत शिफारस केलेल्या प्रशिक्षणार्थींनाच प्रशिक्षण देण्यांत येईल.

१७) वरील अटी व नियमांची पुर्तता करणाऱ्या कोणत्याही संस्थेस मनपा प्रशिक्षणार्थी मंजुर झाल्याच्या दराप्रमाणे देऊ शकेल.हे अधिकार उप-आयुक्त यांना असावेत.

ब) रिक्षा /एल.एम.व्ही.वाहन चालक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थासाठी पात्रता निकष :

१) सदर संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

२) सदर संस्थाकडे स्वत:च्या मालकीच्या दोन रिक्षा व चार चाकी वाहन ३ असणे आवश्यक आहे.लागू असेल त्यानुसार.

३) संस्थेकडे दोन प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.

४) प्रति प्रशिक्षणार्थी प्रती दिन किमान ७ मी.मी. किंवा ३० मिनिटे प्रशिक्षण देणे संस्थेस बंधनकारक आहे.

५) प्रशिक्षण संपल्यानंतर संस्थेने स्वखर्चाने प्रशिक्षणार्थींना परवाना मिळून देणे आवश्यक आहे.

६) संस्थेचे प्रशिक्षण देते वेळी झालेला अपघात व इतर नुकसान भरपाईस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

७) प्रत्येक प्रशिक्षणार्थीची मासिक हजेरी मनपास पाठविणे आवश्यक राहील.त्यावर त्यांच्या सहया असाव्यात.

मान्यतेस्तव सादर.

**मा.सभापती :** स्विकृतीसह मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,अ.क्र.१ ते १० च्या प्रशिक्षणाकरीता त्या कोसच्या पुढे दर्शविलेल्या दराप्रमाणे स.सदस्यांनी शिफारस केलेल्या बेरोजगार युवक / युवतींना (निविदा न भरलेल प्रशिक्षणार्थींना व निकषप्राप्त संस्थासह) प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षणार्थींना पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

प्रशिक्षणाकरीता ज्या संस्थाची निवड होईल त्या संस्थेमार्फत १० रु. बॉण्ड च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन घ्यावा.संगणक प्रशिक्षणाकरीता ५०% देयक तीन महिने कालावधी पुर्ण झाल्यानंतर व ५०% देयक प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर संस्थेस देण्यांत यावे.संगणक प्रशिक्षणाकरीता अ.क्र.१ ते १७ व रिक्षा / एलएमव्ही वाहन चालक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांसाठी पात्रता निकष प्रस्तावातील अ.क्र. ते ७ प्रमाणे राहतील.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९३/५२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पंचकुवा कब्रस्तान येथील नाल्या कडील संरक्षीत भिंतीची उंची वाढविणे व सपाटी करण करणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुची सन ९६-९७ नुसार रक्कम रु. ४,४८,३००/- चे तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च हा स्मशानभुमी विकास या तरतुदी मधुन करण्यांत येणार आहे.

करीता रक्कम रु. ४,४८,३००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पंचकुवा कब्रस्थान येथील नाल्याकडील संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व सपाटीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,४८,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "स्मशानभुमीत विकास " या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९४/५३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बेगमपुरा ढिंबरगल्ली मध्ये खांडकी व फरशी बसविण्याचे कामासाठी सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,१५,३००/- चे तयार करण्यात आलेले असून सदरचा खर्च "नविन खांडकी रस्ते" सन ९७-९८ याशिर्षकातून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बेगमपुरा ढिंबरगल्ली मध्ये खांडकी व फरशी बसविण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१५,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.सदरील काम ६७ (सी/३) अन्वये अं.प.दराने उपलब्ध गुत्तेदाराकडून त्वरीत करुन घेण्यात यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९५/५४:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाविर चोक ते रेल्वेस्टेशन रोड (रस्ता) रुंदीकरणामुळे त्या ठिकाणी काम करतांना रोलर चालवल्या नंतर जलवाहिनी फुटेल म्हणून जलवाहिनीची खोली वाढवून व १५० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु. ७,६६,२००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.प्रस्तुत कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे.काम तातडीचे करणे असल्याने महानगरपालिका भंडारातुन पाईप्स पुरवठा करण्यात येईल व काम लेबर पेमेंट वर करुन घेण्यात येईल.तरी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महावीर चौक ते रेल्वेस्टेशन रोड रुंदीकरणाच्या कामात रोलरमुळे जलवाहिनी फुटू नये म्हणून खोली वाढवून व १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तयार केलेल्या रक्कम रु.७,६६,२००/- (मनपातर्फे पुरविण्यात येणारे पाईप्स रु. ५,०७,७२७-५० व मंजुरी रक्कम रु.२,५८,४७२/-)

च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.काम तातडीने करावयाचे असल्याने उपलब्ध ठेकेदारामार्फत करुन घेण्यात यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९६/५५:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला बारी कॉलनी येथे दगडी गटारीवर आर.सी.सी.स्लॅब टाकणेच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रु.१,७६,५९०/- चे तयार करण्यात आले,परिसर अभियांत्रिकीच्या दरसूची ९६-९७ नुसार सदरील अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम लेखा शिर्षक "शहरी भागात खुल्या गटारी बांधणे" या मधुन प्रस्तावित केले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि. १-८-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बारी कॉलनी येथे दगडी गटारीवर आर.सी.सी.स्लॅब टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,७६,५९०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.सदरील काम तातडीचे असल्याने उपलब्ध गुत्तेदाराकडून त्वरीत करुन घ्यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९७/५६:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.किलेअर्क येथील मस्जीद पासुन श्री.फैय्याज यांच्या घरापर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकीच्या सन ९६-९७ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ७,००,०००/- चे तयार करण्यात आले आहे.,

सदरील कामाचा समावेश "नाला ट्रेनिंग" या लेखा शिर्षकातून प्रस्तावित केले आहे. सदरील कामास मा.आयुक्तांनीही दि. ३१-७-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे किलेअर्क येथील मस्जीद पासुन श्री.फैय्याज यांच घरापर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रु.७,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च नाला ट्रेनिंग या लेखाशिर्षकातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९८/५७:**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ८० फुट रुंद रस्त्याचे बांधीत मिळकत मौजे शहानुरवाडी येथील न.भु.क्र.१६३०६ म्यु.घ.क्र.५-८-१ व १६३०६ म्यु.घ.क्र.५-८-१ / पी हया मिळकती अर्जदार श्री.अब्दुल रशिदखॉंन पिता अब्दुल हमीदखॉ यांनी ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने श्री.महंमद नसिरोद्दीन खान महंमद गयासोद्दीन खान (मुख्त्यार आम) यांचे तर्फे घेतली आहे.

हया बाधित जागेचे एकूण क्षेत्र ८५.८९ चौ.मी.आहे.त्याचे बाधित क्षेत्रासह मोबदला रु. १,०२,१८२/- इतका येतो.तरी अर्जदाराचे मुख्त्यार आम श्री.तरबेज खॉ अब्दुल रशिदखॉ. यांनी सदर बाधित जागेच्या बदल्यात गारखेडा सर्वे नं. ५३ मध्ये जागा मागितली आहे.

अर्जदाराच्या शहानुरवाडी येथील जमीन व इमारतीचे मुल्यांकन रु. १,०२,१८२/- च्या एवढी जमीन सर्वे नं. ५३ गारखेडा मधील ३०X ४० त्यांना जागा देता येईल.

तरी अर्जदारास सर्वे नं. ५३ मधील महानगरपालिकेच्या जागेतून ८० फुट रुंद रस्ता पासुन १५ अंतर सोडून पुर्वोत्तर कोपऱ्यात ३०X ४० आकाराची जागा देणे बाबत तसेच बांधकाम परवानगी देतांना समोर सोडलेली १५ जागा समोरील सामासिक अंतर धरु बाकीची सामासिक अंतर एका बाजूस ६ फुट व मागील सामासिक अंतर ५ फुट सोडुन बांधकाम परवानगी देणे बाबत स्थायी समितीकडे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ८० फुट रुंद रस्त्याचे बांधीत मिळकत मौजे शहानुरवाडी येथील न.भु.क्र.१६३०६ म्यु.घ.क्र.५-८-१ व १६३०६ म्यु.घ.क्र.५-८-१ / पी हया मिळकती अर्जदार श्री.अब्दुल रशिदखाँन पिता अब्दुल हमीदखॉ यांनी ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने श्री.महंमद नसिरोद्दीन खान महंमद गयासोद्दीन खान (मुख्त्यार आम) यांचे तर्फे घेतली आहे.

हया बाधित जागेचे एकूण क्षेत्र ८५.८९ चौ.मी.आहे.त्याचे बाधित क्षेत्रासह मोबदला रु. १,०२,१८२/- इतका येतो.या जागेच्या मोबदल्यात सर्व्हे नं. ५३ गारखेडा येथील ३०X४० जागा अर्जदारास मनपाच्या जागेतून ८० फुट रुंद रस्त्यापासून १५ फुट अंतर सोडून देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९९/५८:**

मालमत्ता अधिकारी मा.आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर केला की,सिध्दार्थ उद्यानातील सन १९९० पासुन ४X६ आकाराच्या टपऱ्या भाडयाने देण्यात आलेल्या होत्या तथापि श्री.शिवराम गोपालराव पाडलकर यांनी त्यांच्या स्टॉल श्री.आसाराम रामभाऊ राजगुरे यांना १९९० पासुन दिला असून तेच स्वत: भाडे भरणा करुन त्या जागेवर व्यवसाय करीत आहे.

मुळ भाडेकरु यांनी अटी-शर्ती नुसार सिध्दार्थ उद्यान येथे जागा भाडयाने देण्यात आली होती.अटी-शर्ती तील अट क्र.५ अन्वये मनपाच्या पुर्व परवानगी शिवाय माझ्या ताब्यात असलेली जागा मी कोणी दुसऱ्यास पोटभाडयाने देणार नाही.किंवा त्याबाबत मिळालेले हक्क दुसऱ्यास हस्तांतर करणार नाही व इतर अटी-शर्ती नुसार भाडयाने देण्यात आली होती.

तथापि यापूर्वी मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवण्यात आला होता.तरी सदर प्रस्ताव खालील अटी-शर्तीप्रमाणे पारित झालेला आहे.

१) मुळ भाडेकरुनी भाडेपट्टी करारनामा अटी-शर्तीचे उल्लघंन केलेले असल्याने त्यांच्या भाडेपट्टया रद्द करुन टपरी जमा करुन एकाच आकाराच्या डिझाईनमध्ये टपऱ्या असाव्यात.
२) पोटभाडेकरुंना १५% भाडे वाढवुन परवाना त्यांचे नांवे नुतनीकरण करुन द्यावा.
   वरील ठरावाप्रमाणे सिध्दार्थ उद्याना पोट भाडेकरुच्या नांवे नुतनीकरण करुन देण्यात आलेले आहे.
   तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करावी किंवा कसे याबाबत मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्थायी समितीने पारीत केलेल्या ठरावातील अटी व शर्तीनुसार सिध्दार्थ उद्यानातील पोट भाडेकरुच्या नावे नुतनीकरण करुन देण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२००/५९:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत पांढरा हाफ शर्ट,खाकी हाफ पँट,निळा स्कर्ट,पांढरे पोलके (ब्लाऊज) शर्ट/ सलावार मनपाच्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे गणवेश शिलाई करुन द्यावयाचे आहेत.सदर गणवेश शिलाईसाठी दै.मराठवाडा,दै.लोकपत्र,दै.गोरजवार्ता या स्थानिक वर्तमापत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या .तीन पुरवठा धारकांच्या निविदा नमुन्यासह प्राप्त झाल्या.या निविदाधारकांनी मा.आयुक्त यांनी शिलाईदराबाबत व शिलाईच्या दर्जाबाबत चर्चेसाठी बोलाविण्यात आले असता कमी करण्यात आलेले दर व त्यांना विभागून दिलेले काम याप्रमाणे.

निविदेतील कमी केलेले दर.

| अ.क्र. | गणवेशाचा तपशील | दर | फार्मचे नांव |
|---|---|---|---|
| १) | पंजाबी शर्ट | १०/- ९.९० प्र.नग | एम.एस.एस.आय.डी.सी. |
| २ | सलवार | १०/- ९.९० | --//-- |
| ३) | मिनी फ्रॉक | १५/- १५.०० | --//-- |
| ४) | हॉफ पँट | ९.३६/- ९.२५ | सरस्वती महिला गृहउद्योग |
| ५) | हाफ शर्ट | ९.००/- ८.९० | --//-- |
| ६) | स्कर्ट | १०/- ९.९० | भारत ड्रेसेस |
| ७) | ब्लाऊज | ९.४० ९.४० | --//-- |

वरील प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

अंदाजे २६,००० गणवेश शिवावे लागतील.

दरम्यान स्थायी समितीचे सभापती यांनी दि. २५-७-९७ तजविज केली की,हे सर्व एम.एस.एस.आय.डी.सी.यांना देण्यांत यावे व प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात येईल.

प्रकरणात मा.श्री.अब्दुल रऊफ /मा.श्री. ताबा यांच्या तक्रारी वरुन मा.महापौर यांना पत्र दिले की,ठरल्याप्रमाणे तिन्ही गुत्तेदारांना समप्रमाणात काम द्यावे. अन्यथा काम थांबविण्यात यावे.

तरी प्रकरण स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत पांढरा हाफ शर्ट,खाकी हाफ पँट,निळा स्कर्ट,पांढरे पोलके (ब्लाऊज) शर्ट/ सलावार मनपाच्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना एकूण २६००० गणवेश शिलाईकरीता खालील दर्शविल्याप्रमाणे फार्मच्या नांवासमोर दर्शविलेल्या दराने गणवेश शिवुन घेण्यास मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | गणवेशाचा तपशील | दर | फार्मचे नांव |
|---|---|---|---|
| १) | पंजाबी शर्ट | ९.९० प्र.नग | एम.एस.एस.आय.डी.सी. |
| २ | सलवार | ९.९० | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | मिनी फ्रॉक | १५.०० | --//-- |
| ४) | हॉफ पँट | ९.२५ | सरस्वती महिला गृहउद्योग |
| ५) | हाफ शर्ट | ८.९० | --//-- |
| ६) | स्कर्ट | ९.९० | भारत ड्रेसेस |
| ७) | ब्लाऊज | ९.४० | --//-- |

तिन्ही फार्मला त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे काम सम प्रमाणात देण्यात यावे.गणवेश शिलाईचे काम त्वरीत सुरु करण्याचे दृष्टीने या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०१/६०:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त औरंगाबाद महानगरपालिकेने ०९ ऑगस्ट ९७ ते १५ ऑगस्ट ९७ दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. सदर कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दिनांक १४ ऑगस्ट १९९७ रोजी औरंगाबाद शहरातील सर्व स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार करण्याचे ठरविण्यात आले आहे. सदर कार्यक्रमासाठी प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकास एक शाल, एक श्रीफळ,पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी स्मृतीचिन्हें २५०,शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ तितक्याच संख्येने लागतील तसेच निंत्रण पत्रिका कार्यक्रमांसाठी इतर व्यवस्था चहापान इ.मिळुन अंदाजे रु. १,१०,०००/- खर्च येईल.

स्मृतिचिन्ह तयार करण्याचे काम हे विशिष्ट कलाकुसरीचे असल्याने व ३-४- दिवसांत तयार करावयाचे असलयाने शहरातील विशिष्ट कारागीराकडून दरपत्रके मागविण्यात आली व मा.आयुक्त यांचे दालनात पदाधिकारी व अन्य अधिकारी यांचे समवेत चर्चा करुन "साई क्रिएशन्स" औरंगाबाद यांनी प्रति २५०/- रु.दराने स्मृतिचिन्हें तीन दिवसात तयार करुन देण्याचे कबुल केले.त्यामुळे २५० नग तयार करण्याचे काम त्यांना सोपविण्यात आले.त्यासाठी एकूण ६२,५००/- इतका खर्च येईल.सदरचे खर्चास व संविदा करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम (२) मधील परंतुका नुसार मान्यता देण्यात यावी.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ,भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त औरंगाबाद महानगरपालिकेने ०९ ऑगस्ट ९७ ते १५ ऑगस्ट ९७ दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. सदर कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दिनांक १४ ऑगस्ट १९९७ रोजी औरंगाबाद जिल्हयातील सर्व स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार करण्यात आला.सदरच्या सत्कारा साठी शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ,निमंत्रण पत्रिका,चहापान इ.खर्चास रु. १,१०,०००/- च्या तसेच स्मृतीचिन्हे तयार करण्यासाठी लागणाऱ्या रक्कम रु. ६२,५००/- च्याखर्चास व "स्मृतीचिन्हे" "साई क्रिएशन" औरंगाबाद यांचेकडून दरपत्रके मागविल्यानुसार मंजुरी देण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम (२) मधील परंतुकानुसार सवानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच"जन गण मन" या राष्ट्र गीताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
मा.नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १७-९-१९९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा.सभापती श्री. प्रभाकर विधाते यांचे अध्यक्षतेखाली दि.१७-९-९७ रोजी स्थायी समिती सभा संपन्न झाली.तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने दुपारी ४.०० वाजता झाली.सभेला अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.**

१) श्री.गिरजाराम हाळनोर
२) श्री.सुभाष टाकळकर
३) श्री.त्रिंबक तुपे
४) श्री.कचरु नवपुते
५) श्री.अभिमन्यु भालेराव
६) श्री.विकास जैन
७) श्री.भगवान घडामोडे
८) श्री.रशिदखॉंन (मामू)
९) श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद
१०) श्री.स.अली मिरा सलामी
११) श्री.जोशी संजय रामदास
१२) श्री.गौतम लिंबाजी लांडगे
१३) सौ.यशोदा धनंजय वाडेकर
१४) श्री.गांगवे बन्सी तुळशीराम

**श्री.कचरु नवपुते :** मा.सभापती यांना मी विनंती करतो की,सर्व प्रथमत: स्वर्गवासी श्रीमती मदर तेरेसा यांना याठिकाणी ००.०१ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**श्री.संजय जोशी** : यास माझे अनुमोदन आहे,याच बरोबर आपल्या महानगरपालिकेतील कर्मचारी श्री.देशपांडे यांनाही ००.०१ मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा.सभापती :** ठिक आहे.
(यानंतर ००.०१ मिनिटे उभे राहुन स्व.श्रीमती मदर तेरेसा व श्री.देशपांडे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**श्री.संजय जोशी :** या वर्षीच्या औरंगाबाद शहरात गणपतीच्या काळात महानगरपालिकेतील विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी रात्री २.०० वाजेपर्यंत काम केले.त्याबद्दल सभागृहातर्फे त्यांचे आभार मानावे.

**श्री.भगवान घडामोडे :** यास माझे अनुमोदन आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाची पावती त्यांना दयावी.कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट कामाबद्दलचे पुरस्कार म्हणून वेतनवाढ कधी दिल्या जाते याची माहिती दयावी.

**श्री.कचरु नवपुते :** आपण कर्मचाऱ्यांना जे इक्रीमेंट देत असतो. त्याचा काही कालावधी आहे काय? जे कर्मचारी असतील त्यांना एक इनक्रिमेंट दयावे.विद्युत विभागामध्ये ६-६ महिने पासुन इन्क्रिमेंट नाहीत.

**उप आयुक्त-१ :** इन्क्रीमेंटसाठी शासनाचे काही नियम असतात. त्यासाठी दरवर्षी बैठक दयावी लागते.१) प्रत्येकाचे सी.आर.पहावे लागते.२) कुणा कर्मचाऱ्यांची चौकशी चालू आहे काय ? ३) इ.बी.क्रॉस व ४) पात्रता पाहुनच कर्मचाऱ्यांना विचार पुर्वक इन्क्रीमेंट दयावे लागते.लाईट विभागामधील ज्या ज्या कर्मचाऱ्यांना दिले नसतील त्याच्या नावाचा आपण उल्लेख करावा.

**उप अभियंता विद्युत :** विद्युत विभागातील सर्वश्री खांडेकर,मगर व किंबहुने या कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ मिळालेली नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** प्रशासनामार्फत वार्षिक वेतनवाढ बाबत दिरंगाई करणे योग्य नाही.

**अति.शहर अभियंता** : एखादया कर्मचाऱ्यांची कार्यालयीन चौकशी ई.बी.क्रास व गोपनीय हे पाहुनच वार्षिक वेतनवाढ दिली जाते.या व्यतिरिक्त नाही.

**श्री.सय्यद अली मिरा सलामी,श्री.संजय जोशी :** महानगरपालिकेतील बांधकाम विभागाचे जे इंजिनिअर आहेत.त्यांनी टेलीफोनचे १.५० कोटी रुपयाची भर आपल्या महानगरपालिकेच्या तिजोरीत टाकली आहे.करीता या सभागृहात त्यांचे अभिनंदन करावे.

**श्री.कचरु नवपुते :** महानगरपालिकेत जे कर्मचारी चांगल्या प्रकारे काम करीत आहेत.त्यांना इंक्रीमेंट मिळत नाही व जे कर्मचारी चांगल्या प्रकारे करीत नाही. त्यांना इंक्रीमेंट मिळते.ते योग्य नसून प्रशासनाने याबाबतची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता** : ज्या ज्या कर्मचाऱ्यांना इंक्रीमेंट मिळत नाही.त्यांना वेगवेगळया प्रकारच्या कारणास्तव मिळत नाही.नियमानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याला वार्षिक वेतनवाढ द्यावीच लागते.

**श्री.संजय जोशी :** विद्युत विभागातील कर्मचारी रात्री १.३० पर्यंत कामे करतात. महानगरपालिकेने पत्र दिले आहे की,एम.एस.ई.बी.चा लाईनमन बरोबर असेल तरच विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या समवेत काम करावे नसता लाईट विभागामधील कर्मचाऱ्यांचा मृत्यूहाणी झाल्यास त्यास जबाबदार कोण राहील.याच विभागातील श्री.मगर नावाचे कर्मचारी आहेत त्यांच्या डोक्यात ब्रॅकेट पडले.त्यामुळे ते जखमी झाले होते.परंतु त्यांना महानगरपालिकेतर्फे एकही पैसा मिळालेला नाही. अशा कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेतर्फे सेफगार्ड देण्याची व्यवस्था व्हावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**लेखाधिकारी -१** : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या खांबावर महानगरपालिकेचे लाईनमनने चढून काम करुन नकोस असे आदेश आपण काढलेले आहेत.

**विद्युत अभियंता** : एम.एस.ई.बी.विभागाचे कर्मचारी सोबत असल्याशिवाय महागनापालिकेतील लाईट विभागातील कर्मचारी यांनी काम करु नये .परंतु लाईनमन कमी असल्याने तरीही कर्मचारी रात्री उशिरापर्यंत कामे करतात.ज्या कर्मचाऱ्यांचे वार्षिक वेतनवाढ थांबलेली असेल त्याबाबत पाहुन त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

**मा.सभापती :** १) विद्युत लाईनमन काम करीत असतांना त्या सेफ्टी ॲटम देण्याची व्यवस्था करावी.२) वार्षिक वेतनवाढ थांबलेली असेल त्यांची वेतनवाढ बाबत पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री.गौतम लांडगे** : सर्व कर्मचाऱ्यांचे ग्रुप इन्शुरन्स काढावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** महानगरपालिकेत काही कर्मचाऱ्यांना पेट्रोल अलाउन्स जो वाढवला आहे.तो लाईनमन कर्मचाऱ्यांना आपण देतो का?

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**लेखाधिकारी-१** : ज्या कर्मचाऱ्यांनी गाडी वापरली असेल व कर्मचाऱ्यांनी गाडी वापरल्याचे प्रमाणपत्र कार्यालयात दाखल करतील त्यांना आपण प्रमाणपत्रा आधारे पगार पत्रकात पेट्रोल अलाऊन्स देतो.

**श्री.कचरु नवपुते,श्री.संजय जोशी,श्री.भगवान घडामोडे,श्री.विकास जैन :** महानगरपालिकेमध्ये जे दैनिक वेतनावरील तात्पुरती जेष्ठता यादी तयार केली या जेष्ठता यादीत मा.उच्च न्यायालयाच्या जेष्ठता यादीत दै.वेतनावरील कर्मचारी यांची नावे आहेत ते वगळण्यात आले आहे व इतरांची नावे आदेश काढलेले आहेत.उदा.१) अर्जुन दाभाडे २) बाबासाहेब शंकर व इतर ४ असे ६ कर्मचारी या सर्वांची जेष्ठता डावलून व नियम बाहय मनपा प्रशासनाने आदेश काढुन दिलेले आहे.त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचा अपमान केलेला असून पेंटींग कामासाठी पात्रता काय आहे व यांनाच घेण्याचे कारण काय यांची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त-२** :पेंटर कामासाठी सहा मजूर दैनिक वेतनावर मा.आयुक्त यांच्या मंजुरीने घेतले आहे.

**उप अभियंता बांध-२ :** महानगरपालिकेत कामावर घेतांना या ६ दै.वेतनावरील पेंटर म्हणून कामावर घेतलेले आहे.त्याचे काम पट्टे मारण्याचेही काम करतात व मा.आयुक्त यांच्या मंजुरीने तीन महिन्यासाठी घेतलेले आहे.त्याचे काम स्किल वर्कचे आहे व दै.वेतनावरील कर्मचाऱ्याप्रमाणे रु.३४/- पगार देण्यात येतो.

**श्री.संजय जोशी,श्री.अब्दुल रशिद खॉन (मामू),श्री.कचरु नवपुते,श्री.गिरजाराम हाळनोर :** ६ दैनिक वेतनावरील मजुरांना जेष्ठता यादीत नावे नसतांनाही घेतले ते योग्य नसुन पेंटर म्हणून आदेश दिलेले आहेत.परंतु या ठिकाणी या ६ मजुरांच्या यादीत एक व्यक्ती दाभाडे नावाचा हा अपंग मजुर आहे जो अपंग मजुर आहे.जो अपंग व्यक्ती आहे तो फिरुन पेंटरचे काम करुन शकतो का? कोणत्या आधारे या मजुराला घेतले.अशा प्रकारचे अनेक उदा.कार्यालयात आहेत जे की, प्रशासन नियम बाहयरित्या मजुरांना आदेश देवून कामावर घेतात. यापुर्वी सुध्दा झोन २ ला दहा दै.वे.वर मजुरांना कामावर लावले.तेव्हा अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी.पेंटर मजुरांची पात्रता काही वेगळी आहे काय याची माहिती दयावी.

**श्री.स.अली मिरा सलामी :** जेष्ठता यादी या ठिकाणी मागवुन घ्यावी.यामुळे दुसऱ्या दै.वेतनावरील मजुरांचा प्रश्न पडतो.कोर्टाचे आदेश आपण मानत नाही का? अस्था-१,२ मधुन हया संचिका जातात.अधिकारी या बाबत सविस्तर पाहणी करीत नाही काय? जर अशी पध्दत असल्यास कोर्टचा अवमान आपण करीत आहात हे सिध्द होते.

**उप आयुक्त-२ :** या ६ मजुरांना पेंटर म्हणून घेतलेले आहे.त्यांचे स्किलवर्क आहे व तीन महिन्यासाठीचे आदेश आहेत.मा.आयुक्तांशी चर्चा करुन या बाबत योग्य ते निर्णय घेऊनच पुढील कार्यवाही करावी लागेल.

**उप अभियंता :** पेंटर म्हणून दैनिक वेतनावर मजूर या दै.वेतनावर कामाचे आदेश आहेत त्याची पात्रता अशी वेगळी नाही.

**बांध-२,मा.सभापती :** ज्या सहा पेंटीगचे कामाचे मजुरांना आदेश दिलेले आहेत.त्यांची नांवे जेष्ठता यादीत नसतांना घेतले यामुळे त्यांना कामावरुन काढुन टाकावे व याबाबत आस्था-२ चे अख्त्यारीत सदरची कार्यवाही व्हावी.याबाबत जे दोषी अधिकारी असतील त्याचेवर कार्यवाही करण्यात यावी.आणि यादीतील सुचीनुसारच आदेश काढुन पुढील बैठकीत माहिती दयावी.

**श्री.संजय जोशी,श्री.अब्दुल रशिदखाँन (मामू) :** शहरात मोबाईल्स फोनचे टॉवर्स लावलेले आहे.त्यास महानगरपालिकेची परवानगी नाही ते टॉवर्स इतके उंच आहे की,अपघात होण्याची शक्यता असते.शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी उंच टॉवर्स बांधकामाबाबत महानगरपालिका व विमान प्रधिकरण यांची "नाहरकत" घेण्याची आवश्यकता नाही काय? याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**नगररचनाकार :** या संदर्भात संबंधितांनी कागदपत्र दाखल केलेले आहे परंतु परवानगी अद्याप दिलेली नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** शहरात मोबाईल्स शेडचे टॉवर्स लावण्यासाठी आपण परवानगी दिलेली नसून त्यांच्या कागदपत्रांची पुर्तता पुर्ण झाल्यानंतर परवानगी देऊ शकतो.याबाबत काही सामान जप्त करण्यात आलेले आहे.

**श्री.अ.रशिदखाँन (मामू),श्री.संजय जोशी :** याबाबत आपणावर पॉलीटीकल प्रेशर आले तरी आपण काय करणार स.सदस्या यांनी सभागृहात या बाबत निर्णय घ्यावा व घरापासून वरपर्यंत किती अंतरावर टॉवर असावे याचाही उल्लेख परवानगी पत्रात असावा.

**मा.सभापती :** शहरात मोबाईल्स फोनचे जे टॉवर्स होत आहे.त्यास स्थगिती देऊन संबंधितांनी कागदपत्र दाखल केलेले असल्यास त्याची छाननी करुनच प्रशासनाने परवानगी दयावी.सोबतच विमानतळ प्राधिकरण यांचेही "नाहरकत प्रमाणपत्र" लागेल काय? याची पुर्तता करुनच कार्यवाही व्हावी.

**श्री.कचरु नवपुते :** नगररचना विभागात कोणताही बाहेरचा नागरिक त्यांच्या वैयक्तीक कामासाठी गेल्यास त्या ठिकाणी कर्मचारी वर्ग व अधिकारी नेहमी गैरहजर राहतात.उदा.कुणाला बिल्डींगची परवानगी,कुणा व्यक्तीला डिपॉझीट रक्कम भरावयाची असते तर विभागात अधिकारी उपस्थित राहत नाही.नेहमी अधिकरी साईटवर जातात असे कर्मचारी सांगतात. व ज्या कर्मचाऱ्यांना इमारत निरीक्षका बरोबर कामे करण्याचे वाटप झालेले आहेत. त्यामुळे नागरीक त्रस्त झालेले आहेत.यावरुन तेथील कामे खोळंबतात पर्ययाने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते.यासाठी आवश्यक ती कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** संबधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त-१ :** आपण मागच्या वेळेस जो "आकृतीबंध "आराखडा याबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडला होता.परंतु त्यास मंजुरी मिळालेली नाही म्हणून बऱ्याचशा विभागात कर्मचारी वर्ग असुन त्या विभागात एका कर्मचाऱ्याला एकाच वेळात दोन-दोन कामे करावी लागतात.नगररचना विभागातील काही कर्मचाऱ्यांना शहरातील बांधकामाबाबत झोन अखत्यारीत कामे वाटुन दिलेली आहेत.तसेच अधिकारी यांनी सकाळच्या वेळेत साईटवर व दुपारच्या वेळात

कार्यालयात हजर रहावे असे कळविण्यत येईल म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सुटतील.

**श्री.संजय जोशी,श्री.कचरु नवपुते :** शहरात जे अनधिकृत बांधकाम चालतात ते आपण थांबवित नाही.प्रशासनाने कर्मचाऱ्यांना जास्तीचे कामे देऊ नये असे आमचे म्हणणे नाही.परंतु अधिकारी वेळेवर हजर नाही.याबाबत प्रशासनाने कठोर कार्यवाही करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : ज्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही.

**प्रशासकीय अधिकारी** : शहरात जे अनधिकृत बांधकाम होते आहे त्या संदर्भात प्रशासनाने झोन निहाय २२ इमारत निरीक्षक यांची नियुक्ती केलेली आहे व अनधिकृत बांधकामू ज्याच्या भागात होतात त्यामुळे आळा बसविण्याचे प्रशासनाचे प्रयत्न आहेत.ज्यामध्ये अनधिकृत टपऱ्या,घरे वगैरेचा समावेश आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी, श्री.गिरजाराम हाळनोर** : : प्रत्येक विभागातील जे अधिकारी असतील त्यांच्यावर जी जबाबदारी आहे ती त्यांनी पार पाडावी व दुपारी ३ च्या नंतर कार्यालयात थांबुन नागरिकांचे कामाबाबत समस्या सोडाव्यात.प्रशासकीय दृष्टया कोणत्या कर्मचाऱ्यांना कोणते काम दयावे हा प्रश्न प्रशासनाचा आहे.परंतु नागरिकांची कामे व्यवस्थित होणे महत्वाचे आहे.

**श्री.भगवान घडामोडे, श्री.संजय जोशी** : हा जो प्रश्न या सभागृहात उपलब्ध झाला आहे.ही प्रशासकीय बाब आहे.अधिकारी यांनी वेळेवर हजर रहावे व काम पूर्ण करावे.काही बरेचसे कनिष्ठ अभियंता यांना कामे नाहीत तर काही विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशासन कामे करण्याचे आदेश देते हे कसे?

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी यापुढे सकाळी साईटवर गेल्यास कार्यालयात रजिस्टरवर नोंद करुन जाणे व दुपारी ३.०० नंतर कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात यांची नोंद घ्यावी.

**श्री.गौतम लांडगे** : ५ सप्टेंबर या "शिक्षक दिनी" कार्यक्रम चालु असतांना बालवाडी शिक्षिकेचे मानधन वाढवावे या हेतूने स्टेजवर जे निवेदन दिले होते.त्याबद्दल खुलासा करावा.

**श्री.संजय जोशी :** कार्यक्रम चालू असतांना निवेदन देणे हे चुकीचे आहे.

**मा.सभापती :** बालवाडी शिक्षिकांनी "कार्यक्रम चालू" असतांना स्टेजवर निवेदन देणे हे चुकीचे आहेत तरी ही निवेदन घेतले व कार्यक्रम संपल्यावर यावर मा.आयुक्त साहेब यावर चर्चा करणार होते.परंतु त्यांनी निवेदन घेऊन आल्यावरच त्यांना आम्ही समज दिली की,या ठिकाणी निवेदन देणे चुकीचे आहेत.आपण कार्यालयात यावे.त्यावर सविस्तर चर्चा करता येईल.

**श्री.अली मिरा सलामी :** बालवाडी शिक्षकांनी आपल्याकडे जे निवेदन दिले आहे ते बरोबर आहे.निवेदन न घेतल्यामुळे बालवाडी शिक्षिकांची पत्रकारासमोर बेइज्जत झाली.त्यामुळे कार्यक्रम संपेपर्यंत शिक्षिका त्या ठिकाणी थांबुन होत्या व निवेदन स्विकारणेची वाट पाहत होते.

**श्री.भगवान घडामोडे :** स.सदस्यांनी या ठिकाणी कायद्याला धरुन बोलावे.एखादया संघटनेचे आपण नेते,अगर युनीयनचे व्यक्ती आहेत.या अर्थाने आपण बोलू नये.बालवाडी शिक्षिकांना महाराष्ट्रात कोठेही १०००/- रुपयाच्या वर मानधन नाही तरी आपल्या महानगरपालिकेतील बालवाडी शिक्षिकांना रु.१०००/- च्या वर मानधन देऊ नये अशी आपणास विनंती आहेत.कुणालाही निवेदन दयावयाचे असल्यास विशिष्ट वेळ व कयार्यालयाच्या कामकाजात दयावे असे

असतांना कार्यक्रमांच्या ठिकाणी येऊन निवेदन देणे योग्य नसुन निदर्शने सुध्दा गेटच्या बाहेर करावे.

**मा.सभापती :** यावर विचार विनिमय करुन कार्यवाही केली जाईल.सदरच्या पगरवाढीचा प्रश्न सर्वसाधारण सभेचा आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** शहरात खत प्रकल्पाचा प्रपोजल तयार केले त्या ठिकाणी वीज व पाणी व्यवस्था महानगरपालिकेतर्फे पुरविल्या जातात काय?

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता :** सदरील बाबत प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवला आहे.प्रस्ताव मंजुर होऊन आल्यावर योग्य ती कार्यवाही करता येईल.

**कार्यकारी अभियंता :** सदरील बाबत प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवला आहे.प्रस्ताव मंजुर होऊन आल्यावर योग्य ती कार्यवाही करता येईल.

**मा.सभापती :** पाण्याच्या पाईपलाईनसाठी किती खर्च येणार आहेत.

**कार्यकारी अभियंता :** सी.ए.बजेट आहेत त्यात ७ लाख ८० हजार वसूली करणार आहेत.याबाबत पुढच्या बैठकीत सविस्तर माहिती देऊ.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी पुढच्या बैठकीत माहिती दयावी.

**श्री.त्र्यंबक तुपे,श्री.कचरु नवपुते** : शहरात जाफरगेट येथे रविवार आठवडी बाजार भरतो किती अंतरापर्यंत बाजार भरावा त्याचे मनपाकडे नियम आहेत काय? खुलासा संबंधित अधिकारी यांनी करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी याबाबत खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी** : जाफरगेट येथील आठवडी बाजार भरतो.येणाऱ्या लोकांची संख्या जास्त असते.बाजार असल्यामुळे जागा नसेल तर येणारा व्यक्ती मर्यादेच्या बाहेरच्या रस्त्यात बसणारच.

**श्री.त्र्यंबक तुपे,श्री.कचरु नवपुते** : या बाजारात जे दुकानदार असतात ते व्यवस्थित जागेची मर्यादा पाडुन बसत नाही.त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना त्रास होतो.या ठिकाणी (चारा कात्रण) कडबा कत्रण वाले सर्व जागेवर घाण करुन ठेवतात व बाजारात येणाऱ्या लोकांकडून जास्तीच्या पावत्या फाडतात हे जाणूनबुजून भ्रष्टाराचार करतात.याबाबत संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांना मी सुचना करु इच्छितो की, त्यांनी स.नगरसेवकांच्या या तक्रारीवर त्वरीत कार्यवाही करावी.जे कोणी जास्तीच्या पावत्या फाडुन जनतेची दिशाभूल करतात.त्यांच्यावर संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.सिध्दार्थ गार्डन व पिरबाजार येथील बाजाराच्या गुत्तेंदरांचे बाबतीत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री.अभिमन्यु भालेराव :** महानगरपालिकेतर्फे प्रत्येक वार्डात ज्या ज्या प्रकारची कामे चालू असतात.त्या कामाबद्दल स.नगरसेवकांना माहिती देण्यात येते का?

**मा.सभापती :** या प्रश्नाबाबत सर्वस्वी जबाबदारी ही अधिकारी यांची राहील.स.सदस्यांना कळवावे असा आजपर्यंत केठेही उल्लेख झालेला नाही.

**श्री.अभिमन्यु भालेराव :** सिडको एन-१ येथे पाणी पुरवठयाबाबबत जी पाईप लाईन होते आहे.यात गुत्तेदार आर.एल.बारवाल हे असून संबंधित गुत्तेदाराच्या कामाकडे संबंधित अधिकारी यांनी स्वत: जातीने लक्ष घालुन काम केलेले नाही.त्यासाठी ज्या त्या वार्डातील ज्या त्या ठिकाणी काम चालू असते.याची माहिती संबंधित नगरसेवकांना दिली पाहिजे.यात अधिकारी यांना गुत्तेदार हे कोणत्या प्रकारचे साहित्य वापरतात कोणत्या कंपनीचे साहित्य

वापरतात.तसेच ते आवश्यक कालावधी पर्यंत टिकेल की नाही याची खात्री त्या अधिकारी यांनी करुन घेतली पाहिजे.कंत्राटदार हे फक्त काम पूर्ण केल्यानंतर टेस्टींग करुन देतात.त्यानंतर काही थोडया दिवसातच त्याचे नुकसान होते.ती सर्व नुकसानीची बोजा महानगरपालिकेला होतो.संबंधित अधिकारी हे या ठिकाणी मनमानी प्रमाणे काम करीत असल्यास आपण योग्य प्रकारे पाहणी करुन कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता :** सिडको एन-१ येथील ज्या पाणी पुरवठयाचे पाईप लाईनचे काम आहे यात गुत्तेदार आर.एल.बारवाल होते.कंत्राटदाराला मी स्वत: विचारणा केलेली आहे व प्रत्यक्ष काम मी स्वत: बऱ्याच वेळेस पाहुन आलेलो आहे.या कामासाठी आय.एस.आय.मार्कचे पाईप वापरलेले असून वॉल,डीप.पाईप,बेल्ट हे चांगल्या प्रकारचे वापरण्यात आलेले आहेत.एसी पाईपलाईन मराठवाडयात दोन कंपन्या आहेत व त्यांचेकडे आय.एस.आय.चे प्रमाणपत्र आहे.त्याचे कडील टेस्टींग केल्याशिवाय मटेरियल घेतल्या जात नाही.

**श्री.स.अली मिरा सलामी :** कंत्राटदार मात्र एस आयचे पाईप व साहित्य वापरत नाहीत.या ठिकाणी दुसऱ्या कंपनीचे पाईप मागवून त्यावर आय एस आयच्या कंपनीचे शिक्के मारतात व ते आपण कामात लावलेले दाखवतात. याबाबत संबंधित अधिकाऱ्याला विचारणा करावी की,आपण पाईप चेक करता की,नाही चांगल्या प्रतिचे पाईप वापरात आणता काय? ते विचारणा करावी की,आपण पाईप विचारणा करावी जे काम १० लाख,५ लाख रुपयापर्यंत जाते.याठिकाणी ते पाईप अगर कोणता माल तपासून घेतात का?हया बाबत आण शहानिशा करावी.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता :** मराठवाडयात १ ते २ कंपन्या आहेत.आय एस आयच्या आहेत.या कंपन्याकडून आपण मटेरीयल मागवितो व आम्ही फॉईलमध्ये रिपोर्टींग करतो व काम झाल्यानंतर त्यांची टेस्टींग करुनच संबंधित एजन्सीला देयक देण्याबाबतची शिफारस करतो.

**श्री.विकास जैन :** महानगरपालिकेतील पाणी पाईप लाईन यांचे काम पूर्ण झाल्यानंतर व त्या कामाची फिल्ड टेस्टींग झाल्यानंतर आपण पेमेंट देतो,उदा.या ठिकाणी आपण लाईट टयूब जे लावतो ते आज आहेत.उदया बंद होतील यांची जबाबदारी कोण घेणार याचे काही मेन्टनन्स नसते काय? उगीचच आरोप करणे योग्य नाही.एजन्सी हे टेंडर भरुन नियमाप्रमाणे पुरवठा करते किंवा कुणाची बदनामी करणे बरोबर नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी यापुढे स.नगरसेवकांना माहिती दयावी व ज्या ठिकाणी महानगरपालिकेचे काम चालू असेल त्या ठिकाणी आपण जातीने लक्ष घालून योग्य त्या प्रकारच्या साहित्याचा वापर कंत्राटदार करतात की नाही याची माहिती घेत जावी व स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे तेथील कामाची स्थळ पाहणी करावी.

**श्री.अब्दुल रशिदखॉन (मामू) :** आमखास (शिवाजी) मैदान जवळील डॉ.बाबसाहेब आंबेडकर (संशोधन केंद्राच्या) रिसर्च सेंटर इमारतीचे जे बांधकाम झाले आहे.त्या ठिकाणी पाऊस पडल्यावर त्या इमारतीतून पाणी पाझरते अशी बातमी "विश्वमित्र दैनिक" वृत्तपत्रात बातमी छापून आलेली आहे या इमारतीचे

बांधकाम व्यवस्थित होत नाही व जे झालेले आहेत ते व्यवस्थित झालेले नाही.ही छापून आलेली बातमी बरोबर आहे का? यांची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यंनी या बाबत खुलासा करावा.

**शहर अभियंता :** ही बातमी आपण सांगितल्यानुसार मला कळालेली आहे.याबाबत मी त्वरीत पाहणी करुन कार्यवाही करण्यत येईल.परंतु माझ्या माहितीप्रमाणे तेथील काम सध्याही चालू असून त्यानुसार तशी बातमी छापलेली असेल असे वाटते.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

**विषय क्र.२०२/१:**

दिनांक १६-८-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते : १)** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.२४ मधील विषय क्र.१६९/२८ च्या ठरावात १ ते ७ व १२ अशी दुरुस्ती व्हावी.त्याच प्रमाणे याच ठरावातील पृष्ठ क्र. २५ मध्ये प्रस्तवात जालनारोड १२३ फुट असा उल्लेख आहे.त्याऐवजी १३२ फुट अशी दुरुस्ती व्हावी.

**श्री.रशिद (मामू)** : पृष्ठ क्र.१५ मधील विषय क्र.१५७/१८ प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. त्याचप्रमाणे पृष्ठ क्र. १४ मधील विषय क्र. १५५/१४ मंजुर करण्यात यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर : १)** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ४२ मधील विषय क्र. १९८/५७ मध्ये अर्जदारास सर्व्हे नं.५३ मधील मनपाच्या जागेतून ८० फुट रुंद रस्त्यापासून १५ फुट अंतर सोडून पुर्वोत्तर कोपऱ्यात ३०x४० फुट आकाराची जागा देणेबाबत तसेच बांधकाम परवानगी देतांना समोर सोडलेली १५ फुट जागा समोरील सामासिक अंतर धरुन सामासिक अंतर एका बाजूस ६ फुट व मागील सामासिक अंतर ५ फुट सोडून बांधकाम परवानगी देणे अशी दुरुस्ती व्हावी.

२) त्याचप्रमाणे पृष्ठ क्र.१३ व १४ मधील विषय क्र.१५४/१३ मधील ठरावात कैलासनगर स्मशानभुमीत विजेचा वापर कमी व्हावा या दृष्टीने मयत व्यक्तींच्या नातेवाईकांनी किंवा आप्तेष्टांनी मनपास किंवा कैलासनगर स्मशानभुमीच्या कर्मचाऱ्यांस त्याच दिवशी तीन तास अगोदर सुचना द्यावी.म्हणजे विद्युत दाहिनी ऑपरेशचा वापर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करता येईल.सकाळी ८.०० ते सायं.६.०० अशी न ठेवता मयताच्या कैलासनगर येथ्ील स्मशानभुमीत आणण्यापूर्वी तीन तास अगोदर सुचना देणेस बंधनकारक असावे अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा.सभापती :** ठिक आहे वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री.संजय जोशी :** पृष्ठ क्र.७ वर आपल्या महानगरपालिकेमधील कर्मचारी श्री.सिद्दीकी क.लिपीक गेल्या ७ ते ८ वर्षापासून न सांगता कार्यालयात हजर नाहीत.व निलंबीत केल्यानंतर त्यांचा चौकशी अहवाल प्रशासनास सादर झालेला आहे.याबाबत काय कार्यवाही झाली याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** याबाबत स्क्रुटनी चालू आहे.पुढच्या बैठकीत माहिती देण्यात येईल.

**श्री.संजय जोशी :** पृष्ठ क्र. ८ वर एम.बी.रेकॉर्ड व्यवस्थित घेतलेले नसल्यास त्यास पुढे जबाबदार कोण राहणार?याबाबत माहिती दयावी.

**शहर अभियंता :** कर्मचारी पुरेसे नाहीत यासाठी कायम स्वरुपी कर्मचारी दिल्यास योग्य होईल.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी सुचना केल्याप्रमाणे एम.बी.रेकॉर्ड प्रशासनाने कोणत्याही दै.वेतनावरील कर्मचाऱ्यावर न टाकता कायम स्वरुपी कर्मचारी नेमणूक करुनच कार्यवाही करावी.याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**श्री.संजय जोशी :** पृष्ठ क्र.५ वर मागील वेळेस पापू-विभागातील दै.वेतनावरील कर्मचारी व लाईनमन यांना आपण घेणार होतो.या बद्दल काय कार्यवाही केली याची माहिती दयावी.

**मा.सभापती** : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त-२** : याबाबत कर्मचाऱ्यांना सेवेत घेतांना त्यांच्या जेष्ठता यादी तयार करणे संदर्भात स्क्रुटणी चालू आहे. त्यानंतरच कार्यवाही करणे योग्य होईल.

**मा.सभापती :** वरील सर्व दुरुस्तीसह विषय क्र.१ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

**१)** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.२४ मधील विषय क्र.१६९/२८ च्या ठरावात १ ते ७ व १२ अशी दुरुस्ती व्हावी.त्याच प्रमाणे याच ठरावातील पृष्ठ क्र. २५ मध्ये प्रस्तवात जालनारोड १२३ फुट असा उल्लेख आहे.त्याऐवजी १३२ फुट अशी दुरुस्ती व्हावी.

**२)** पृष्ठ क्र.१५ मधील विषय क्र.१५७/१८ प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. त्याचप्रमाणे पृष्ठ क्र. १४ मधील विषय क्र. १५५/१४ मंजुर करण्यात यावा.

**३)** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ४२ मधील विषय क्र. १९८/५७ मध्ये अर्जदारास सर्व्हे नं.५३ मधील मनपाच्या जागेतून ८० फुट रुंद रस्त्यापासून १५ फुट अंतर सोडून पुर्वोत्तर कोपऱ्यात ३०X४० फुट आकाराची जागा देणेबाबत तसेच बांधकाम परवानगी देतांना समोर सोडलेली १५ फुट जागा समोरील सामासिक अंतर धरुन सामासिक अंतर एका बाजूस ६ फुट व मागील सामासिक अंतर ५ फुट सोडून बांधकाम परवानगी देणे अशी दुरुस्ती व्हावी.

१५) त्याचप्रमाणे पृष्ठ क्र.१३ व १४ मधील विषय क्र.१५४/१३ मधील ठरावात कैलासनगर स्मशानभुमीत विजेचा वापर कमी व्हावा या दृष्टीने मयत व्यक्तींच्या नातेवाईकांनी किंवा आप्तेष्टांनी मनपास किंवा कैलासनगर स्मशानभुमीच्या कर्मचाऱ्यांस त्याच दिवशी तीन तास अगोदर सुचना द्यावी.म्हणजे विद्युत दाहिनी ऑपरेशचा वापर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करता येईल.सकाळी ८.०० ते सायं.६.०० अशी न ठेवता मयताच्या कैलासनगर येथ्रील स्मशानभुमीत आणण्यापूर्वी तीन तास अगोदर सुचना देणेस बंधनकारक असावे अशी दुरुस्ती करण्यात यावी.या व इतर दुरुस्तीसह दि.१६-८-९७ च्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०३/२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वेदांतनगर येथील मुख्य रस्त्यावर विद्युती करणाच्या कामासाठी निविदा सुचना क्र./ले./४०/९७ दि. ६-६-९७ प्रमाणे काढण्यात आल्या असता विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण १० कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व मोहोरबंद निविदा स्विकारण्याचे अंतिम तारखेपर्यंत खालील प्रमाणे तीन निविदा दर प्राप्त झाले.

| | |
|---|---|
| १) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | ४.५ % जास्त दराने |
| २) मे.सत्यम वायर | ०.५% --//-- |

३) मे.आदित्य इलेक्ट्रीकल १% कमी दराने

तुलनात्मकदृष्टया मे.आदित्य इलेक्ट्रीकल यांचे दर सर्वात कमी म्हणजे रु.१% कमी दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा असल्याने त्यास मा.आयुक्त यांची मान्यता मिळाली आहे.

तरी मे.आदित्य इलेक्ट्रीकल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमीचे दर स्विकारण्यास विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते :** प्रस्ताव सभागृहासमोर ठेवलेला आहे,परंतु या ठिकाणी प्रस्तावात एकूण रक्कम दाखवलेली नाहीत.

**कार्यकारी अभियंता :** त्यातील एकूण रक्कम रु. ४.०७ लाख आहे.

**मा.सभापती :** दुरुस्तीसह वरील विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ,वेदांतनगर येथील मुख्य रस्त्यावर विद्युती करणाच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची मे.आदित्य इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमतें मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०४/३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,आर.टी.ओ.ऑफीस मागील रस्त्यावर विद्युतीकरणाच्या कामासाठी (रक्कम रु.३.६० लाखाचा) निविदा सुचना क्र.ले /४०/९७ दि.६-६-९७ प्रमाणे काढण्यात आल्या असता विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण १२ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व मोहोरबंद निविदा स्विकारण्याचे अंतिम तारखेपर्यंत खालील प्रमाणे तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या आहे.

१) आदित्य इलेक्ट्रीकल १% जास्त दर
२) लुना इलेक्ट्रीकल ३.५% --//--
३) सत्यम वायर ०.९% कमी दर

तुलनात्मकदृष्टया मे.सत्यम वायर यांचे दर सर्वात कमी म्हणजेच रु.०.९% कमी दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्याने त्यास मा.आयुक्त यांची मान्यता मिळाली आहे.

तरी मे.सत्यम वायर यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९% कमी दर स्विकारण्यास विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आर.टी.ओ.ऑफीस मागील रस्त्यावर विद्युती करणाच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९% कमी दराची मे.सत्यम वायर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०५/४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,विविध ठिकाणी ३ सेट सोडीयम फिटींग व टुबरल पोल रोवण्याच्या कामासाठी एकंदरीत अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विद्युत दर सुची सन ९६-९७ नुसार रक्कम रु.४,९६,०००/- चे तयार करण्यात

आलेले असून वेळोवेळी मा.नगरसेवक यांच्या मागणीनुसार त्यांच्या वॉर्डात सदर संचिकेतील टिप्पणी पान ३ प्रमाणे एकूण २० फिटींगचे रोवण्याचे काम आहे.सदर अंदाजपत्रक स.नगरसेवकाच्या स्वेच्छा निधी या शिर्षकाखाली करण्यास मा.लेखाधिकारी-१ व मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.सदरचा खर्च ९७-९८ वर्षात करण्यात येईल व सदरचे साहित्य स्टोअरमध्ये जमा स्वरुपात ठेवण्यात येईल.

तरी विविध ठिकाणी स.सदस्यांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या वार्डात पोल रोवणे व सोडीयम दिवे लावणेचे अंदाजपत्रक रु.४,९६,०००/- मंजुरी देण्याच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध ठिकाणी ३ सेट सोडीयम फिटींग व टुबलर पोल रोवण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९६,०००/- च्या अंदाजपत्रतास तसेच सदर खर्च स.सदस्याचे नगरसेवक स्वेच्छा निधी या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०६/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,कैसर कॉलनी भागात ट्रेनचेसचे किरकोळ पॅचेसचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,०२,२१८/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "रस्ते दुरुंस्ती" या शिर्षकातून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी भागात ट्रेनचेसचे व किरकोळ पॅचेसचे खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,०२,२१८/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "रस्ते दुरुस्ती" या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०७/६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,विभाग क्र.१ अंतर्गत रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां.खात्याचे दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ४,९९,३९५/- चे तयार करण्यात आलेले असून सदरचा खर्च "रस्ते दुरुस्ती" या शिर्षकातून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. १ अंतर्गत रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९९,३९५/- च्या अंदाजपत्रकास सदर खर्च रस्ते दुरुस्ती या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०८/७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,कैसर कॉलनी प्रभाग अंतर्गत फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,७२,५००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी प्रभागा अंतर्गत फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,७२,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "नविन खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०९/८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागेश्वरवाडी प्रभागाअंतर्गत रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,३८,६००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन खडी रस्ते" या लेखा शिर्षकाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीतून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वरवाडी प्रभगाअंतर्गत रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,३८,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरखर्च "नविन खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१०/९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,बुक्कलगुडा व नवाबपुरा येथे शहाबाद फरशी बसविण्याच्या कामासाठी सन ९६-९७ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,१८,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रकीय प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,बुक्कलगुडा व नवाबपुरा येथे शहाबाद फरशी बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,१८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "नविन खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२११/१०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,चेलीपुरा येथील ५० डी.पी रोडचे रुंदीकरण करुन खडीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,५४,२००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च नविन खडी रस्ते या शिर्षकातून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,चेलीपुरा येथील ५० डी.पी रोडचे रुंदीकरण करुन खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,५४,२००/-च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "नविन खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१२/११:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,विभाग क्र.३ मधील विविध रस्ते दुरुस्तीच्या वार्षिक देखभाल संबंधी कामे करण्यासाठी सन ९६-९७ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४,९९,५००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च "रस्ते दुरुस्ती" (पॅचवर्क) या शिर्षकातून सन ९७-९८ च्या तरतुदीतून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र.३ मधील विविध रस्ते दुरुस्तीच्या वार्षिक देखभाल संबंधी कामे करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ४,९९,५००/-च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "रस्ते दुरुस्ती" (पॅचवर्क) या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१३/१२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शासकीय वैद्यकीय महाविदयालय मुख्य दरवाजा ते पानचक्की या रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,९६,९५५/-तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,शासकीय वैद्यकीय महाविदयालय मुख्य दरवाजा ते पानचक्की या रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,९६,९५५/-च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "नविन खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१४/१३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सोना मंगल कार्यालय ते किराणा चावडी पोलीस स्टेशन पर्यंतच्या ४० फुट डी.पी.रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी दि. ४-३-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ६९८/५ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ३,०५,३२०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा / लेखा / नि/३२/९७ दि.३-५-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण १५ (पंधरा) निविदा पत्रके विकल्या गेली असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण सात (७) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन प्राप्त निविदा पत्रके दि. २८-५-९७ रोजी उघडण्यात आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.शेख शरीफ | २६% | कमी दराने |
| २) श्री.आर.बी.चव्हाण | ३१% | --//-- |
| ३) श्री.एस.एच.असोशिएटस | २७.७२% | --//-- |
| ४) श्री.नरेंद्र शेट्टी | २३% | --//-- |
| ५) श्री.एस.अे.नवाब | २१.९३% | --//-- |
| ६) श्री.ए.एन.पटेल | १३.३३% | --//-- |
| ७) रश्मी कन्स्ट्रक्शन | ०७.७७% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६% कमी या दराने श्री.शेख शरीफ यांची निविदा आहे.

तरी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६% कमी या दराने श्री.शेख शरीफ यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सोना मंगल कार्यालय ते किराणा चावडी पोलीस स्टेशन पर्यंतच्या ४० फुट डी.पी.रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६% कमी दराची श्री.शेख शरीफ यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१५/१४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,ईटखेडा,शंकरनगर वसाहत येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी सन ९६-९७ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु. ४,०१,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समितीच्या सभेमध्ये प्रस्ताव क्र.७२०/१० दि.१४-३-९७ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च "रस्ते देखभाल व दुरुस्ती" ९६-९७ या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखपर्यंत एकूण (२६) सहव्वीस कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१२) बारा निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.बसरा कन्स्ट्रक्शन | ३५.८६% | कमी दराने |
| २) एस.एच.असोशिएटस | ३५.७६% | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३) सुखबीर सिंग | ३५.००% | --//-- |
| ४) मो.जावेद | ३३.३४% | --//-- |
| ५) श्री.जी.के.पवार | ३०.३०% | --//-- |
| ६) आकाश कन्स्ट्रक्शन | २९.७८६% | --//-- |
| ७) एस.एम.मंडोरे | २७.८६% | --//-- |
| ८) सुहास आर.देशपांडे | २८.००% | --//-- |
| ९) के.बी.पाथ्रीकर | २४.९१% | --//-- |
| १०) एस.ए.देशमुख | २३.५०% | --//-- |
| ११) रश्मी कन्स्ट्रक्शन | १८.००% | --//-- |
| १२) एस.जी.पवार | १७.८६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.८६% कमी दराने मे.बसरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

करीता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.८६% कमी दराची मे.बसरा कन्स्ट्रक्शन कं.यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ,ईटखेडा,शंकरनगर वसाहत येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ३५.८६% कमी दराची मे.बसरा कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१६/१५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सेव्हन हिल सुराणानगर,महेशनगर भागातील खडी रस्त्याचे काम करणेसाठी सन ९६-९७ चे सां.बां.खात्याचे डी.एस.आर दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,५७,८००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन खडीकरण" या शिर्षकातून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सेव्हन हिल सुराणानगर,महेशनगर भागातील खडी रस्त्याचे काम करणेकरीता तयार केलेल्या रक्कम रु. १,५७,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "नविन खडीकरण" या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१७/१६:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,नागेश्वरवाडी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे बाबत अंदाजपत्रकास रक्कम रु. २७,६३,०००/- यास सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.२४५/४ दि. १०-३-९७ द्वारे मान्यता देण्यात आली.

कार्यालयाची निविदा सुचना क्र.४५/९७ दि. ३०-६-९७ अन्वये दै.वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पंधरा (१५) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण आठ (८) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) श्री.आर.बी.चव्हाण | ३३.००% | अं.प.दरापेक्षा कमी दराने |
| २) // राणा कन्स्ट्रक्शन | ३२.९९% | --//-- |
| ३) // बसरा कन्स्ट्रक्शन | ३०.८६% | --//-- |
| ४) // सलीम पटेल | २५.२६% | --//-- |
| ५) // खर्डीकर कन्स्ट्रक्शन | २५.२५% | --//-- |
| ६) // नंदकुमार घोडेले | २३.००% | --//-- |
| ७) // के.बी.पाथ्रीकर | २२.२१% | --//-- |
| ८) // शे.शरीफ | २०.५०% | --//-- |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. आर.बी.चव्हाण यांचा आहे. म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.००% कमी असा दर आहे.

तरी श्री.आर.बी.चव्हाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.००% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,नागेश्वरवाडी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३% कमी दराची श्री.आर.बी.चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१८/१७:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.कैसर कॉलनी भागामध्ये १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.सदर कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ६,१२,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. ६,१२,०००/- मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.कैसर कॉलनी भागामध्ये १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,१२,०००/- चया अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भांडवली कामाच्या" तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१९/१८:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.किलेअर्क येथील मस्जीदपासून श्री.फैय्याज यांच्या घरापर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकीच्या सन ९६-९७ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ७,००,०००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील कामाचा समावेश "नाला ट्रेनिंग" या लेखा शिर्षकातून प्रस्तावित केले आहे.सदरील कामास मा.आयुक्तांनी दि. ३१-७-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्तावास यापूर्वी झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये मंजुरी मिळाली असल्याने सर्वानुमते वगळण्यात येतो.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२०/१९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.भिमनगर,भावसिंगपुरा स्लम येथे अर्धगोलाकार गटार बांधणे व गटार दुरुस्त करणे बाबत कामाकरीता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ७,५७,५९३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम "देखभाल व दुरुस्ती" या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि. ३-३-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.तसेच अंदाजपत्रकास दि. ३१-५-९७ ला सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळाली आहे.प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण वीस निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) सलीम पटेल | १४.९९% | कमी |
| २) आर.बी.चव्हाण | ०.०१% | कमी |
| ३) एस.एम.मंडोरे | ५% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९% कमी दराची असलेली श्री.सलीम पटेल यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.भिमनगर,भावसिंगपुरा स्लम येथे अर्धगोलाकार गटार बांधणे व गटार दुरुस्त करणे बाबत कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२१/२०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,निरंजन गृहनिर्माण सोसायटी मधील मनपाच्या खुल्या जागेवर सभागृह बांधावयाचे आहे.त्यासाठी सा.बां.खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ७,४४,८४०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभा दि. १०-३-९७ ठराव क्र. १८७/४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

कार्यालयीन निविदा सुचना क्र. ४३/९७ अन्वये दै.वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपग्रंत एकूण (१२) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस व वेळेपर्यंत एकूण (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.बी.सत्रे | ७% | जास्त दराने |
| २) मे.साई कन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |

उपरोक्त तुलनात्मकदृष्टया मे.साई.कन्स्ट्रक्शन यांनी दिलेला दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराचा आहे.त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्तीचा वाटत

असल्यामुळे मा.आयुक्त यांच्या दालनात दि. ६-८-९७ रोजी दराबाबत मे.साई कन्स्ट्रक्शन यांच्याशी वाटाघाटी करण्यात आल्या त्यामध्ये सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असुन गुत्तेदाराने त्यास लेखी संमती दिली आहे.

तरी मे.साई कन्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटीच्या अंतिम दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने निविदा स्विकृतीसह प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निरंजन गृहनिर्माण सोसायटी मधील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर सभागृह बांधण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम मे.साई कन्स्ट्रक्शन यांचेकडूल अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२२/२१:**

लेखाधिकारी-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्वच्छ औरंगाबाद मोहिमे अंतर्गत शहरात विविध ठिकाणी कचराकुंडया ठेवणे आहे.त्यासाठी वर्तमानपत्रात दोनदा जाहिर निविदा प्रसिध्द करुन नमुन्यासह दर मागविण्यात आले. मागविण्यात आलेले दर तसे प्राप्त नमुने तांत्रिक दृष्टया तपासुन मा.आयुक्त यांनी दर वाटाघाटी अंती खालील प्रमाणे मान्य केले आहे.

१) ७०० एम.एस.एनपीआर क्रॉस ८३ -८९० प्र.नग
एम.एच.आरसीसी.

२) ८०० एम.एन.पी.आर.क्रॉस ८३ - १०४०/-प्र.नग
एम.एम.आरसीसी.

एकूण अंदाजे प्रत्येकी १०० नग कचराकुंडी खरेदीस वरील ठरावानुसार एकूण रु.१,९३,०००/- खर्च येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वच्छ औरंगाबाद मोहिमे अंतर्गत शहरात विविध ठिकाणी कचराकुंडया ठेवण्याकरीता खालील दर्शविल्याप्रमाणे प्रत्येकी १०० नग कचराकुंडया खरेदी करण्यास व त्याकरीता रक्कम रु.१,९३,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

१) ७०० एम.एस.एनपीआर क्रॉस ८३ -८९० प्र.नग
एम.एच.आरसीसी.

२) ८०० एम.एन.पी.आर.क्रॉस ८३ - १०४०/-प्र.नग
एम.एम.आरसीसी.

**विषय क्र.२२३/२२:**

सहाय्यक संचालक नगररचना औरंगाबाद यांनी प्रस्ताव दिला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ अ (दुरुस्ती) नुसार महानगरपालिकेस प्रत्येक वित्तीय वर्षाकरीता "पर्यावरण अहवाल" त्यानंतर येणाऱ्या ३१ जुलै पुर्वी महानगपालिका आयुक्तांनी प्रसिध्द करणे कायद्याने बंधनकारक आहे.

सदर पर्यावरण अहवालास शहरातील भागावर नकाशे,पर्यावरण विषयक विधि बाबींचा सद्यस्थितीचा आकडेवारी व इतर भोगोलिक माहितीचा समावेश असेल. तसेच वेळोवेळी शासनाचे आदेशाप्रमाणे त्यास इतर बाबी अंतर्भूत केल्या जातील.

पुणे महानगरपालिकेने अशा प्रकारचा पर्यावरण अहवाल हा सन ९५-९६ साठी "मशाल" या खाजगी संस्थेकडून करुन घेतला त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने व नांदेड महानगरपालिकेने त्याच "मशाल" या पुणे येथील खाजगी संस्थेस सदरचा पर्यावरण अहवाल तयार करणेसाठी नियुक्त केले आहे.

सदर मशाल संस्थेशी संपर्क साधला असता त्यांनी अंदाजे खर्च रुपये २.०० लाख येईल असे सांगितले.

करीता पर्यावरण अहवाल "मशाल" पुणे संस्थेकडून करुन घेण्यास व अंदाजे रु. २.०० लाख खर्चाचा प्रस्ताव स्थायी समिती विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते :** सदरचा अहवाल हा २ लाख रुपयाचा कशासाठी पाहिजे आहे.दुसऱ्या महानगरपालिकेने २ लाख रुपयाची तरतुद करावी.सदरचा प्रस्ताव सभागृहापुढे मांडणे योग्य नाही.तो रद्द करावा.

**मा.सभापती :** ठिक आहे.सदरचा प्रस्ताव सर्वानुमते स्थगीत ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव सर्वानुमते स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र.२२४/२३:**

चिकलठाणा, औरंगाबाद येथील आठवडी बाजार पुर्वीच्या प्रशासकीय ठराव क्र. २६२ दि.४-१-९४ अन्वये ६ एकर जागा गट नं.४१० चिकलठाणा मधील घेण्याबाबत मान्यता मिळाली होती.परंतु ठराव क्र.२२२ दि. ६-४-९५ अन्वये त्या वेळी ३ एकर जागा घेण्यात आली.आता प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती तेथील नागरिक व सन्माननीय सदस्य यांचे मागणीनुसार उर्वरित ३ एकर जागा घेणे आवश्यक आहे.तरी सदर ३ एकर वाढीव हद्दीची जागा घेण्याबाबत संबंधित मिळकतधारक यांना दि. ३१-७-९७ रोजी वाटाघाटीस्तव बोलाविले असता मिळकत धारकाने चालु शिर्घ्रगणकाचे दराने जागा महानगरपालिकेस देण्याचे मान्य केले आहे.

वाटाघाटीप्रमाणे मिळकत धारक १) श्री.मोहंमद रजा खान पिता गेसुदरासखान २) श्री.मोहंमद युसुफ खॉंन पिता मोहमंद जैसुदरासखान ३) श्रीमती तैयुबुनिसा बेगम भ्र.सिराज अहेमद खॉंन ४) श्रीमती प्यारी बेगम भ्र.गेसुदरासखॉन यांना मिळकतीचा मोबदला रु. ९,७४,८३६/- द्यावा करीता जमीन मुल्य व जमीन संपादनाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मान्यतेनंतर रितसर नोंदणीकृत दस्त ऐवजाने जमीन हस्तांतरीत करुन घेण्यात येईल.नोंदणीकृत दस्त ऐवजाकरीता /खरेदी खताकरीता येणारा खर्च एकूण रु. ९७,७००/- महापालिका करणार आहे.करीता हया खर्चाची रक्कम रु. ९७,७००/-श्री.डी.डी.काळेले शाखा अभियंते यांना अग्रीम म्हणून देण्यात यावी.प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते :** सदरील प्रस्ताव हा गट नं.४१० मधील असून जी जमीन घ्यावयाची ती मागील रेटप्रमाणे घेण्यात यावी.या गट नंबर मधील एकूण ६ एकर जमीन होती त्यास आपण ३ एकर घेतली व ३ एकर घेतलेली नाही.तर जी तीन (३) एकर घेतलेली नाही ती पेसे अभावी मनपाने घेतलेली नाही का? ती जमीन आपल्याला घेणे आवश्यक आहे.

**नगर रचनाकार :** प्रस्तावात दर्शविलेली जी ३ एकर जमीन आहे.ती जमीन रोड लगत असल्याने त्याची आजचया बाजार भावाने किंमतीला घ्यावी लागणार आहे.

**श्री.संजय जोशी :** मागील जी जमीन मनपाने घेतलेली आहे.त्याच किंमतीत ती जमीन मालक कसे पैसे घेणार त्यासाठी आपल्याला वाटाघाटी करण्याचा अधिकार आहे.

**श्री.कचरु नवपुते :** सदरील जमीन ही एकाच गट नं.मधील असल्याने त्याच किंमतीत घेण्यात यावी.

**मा.सभापती :** प्रस्तावात दर्शविलेली ६ एकर जमीन पैकी ३ एकर जमीन मागील रेटप्रमाणे आपण मागणी करुन संबंधितास रक्कम अदा करु.त्यानुसार मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

चिकलठाणा येथील गट नं.४१० पैकी, जालना रस्त्याच्या उत्तरेकडील भागात आठवडी बाजारासाठी वाढीव ३ एकर जमीन संपादन करण्यासाठी वाढीव ३ एकर जमीन संपादन करण्यासंबंधी प्रस्तावित केले आहे.या जागेपैकी ग.नं.४१० पैकी पुर्वी महानगरपालिकेने १९९५ मध्ये त्यावेळेसचे रेडी रेफनच्या दराच्या दराने ३ एकर जागेसाठी रु. १५,७३,०००/- इतका मोबदला देऊन संपादन केलेले आहे व त्याची खरेदीखत करुन घेण्यात आले आहे.त्यामुळे ही किंमत आता बाजार मुल्य झालेली आहे.

शासन महसुल व वन विभागाने निर्णयाप्रमाणे रेडी रेकनर किंवा बाजारमुल्य या पेक्षा जी जास्त किंमत आहे त्या दराने मोबदला देण्याची तरतूद आहे. शिवाय त्यात ३०% सोलेशियन व ३६% जादा रक्कम देण्याची देखील तरतूद आहे.परंतु सदर प्रकरणात जमीन मालक पुर्वी जेवढा मोबदला दिलेला तेवढयाच मोबदल्यात म्हणजेच ३ एकर जमीन रु.१५,७३,०००/- इतक्या मोबदल्यात देण्यात तयार आहे. भुसंपादन अधिकाऱ्यामार्फत जागा घेतल्यास त्यास ३०% दिलासा रक्कम द्यावी लागेल. व त्यांना न्यायालयात जाता येईल.परंतु महानगरपालिकेस जागेची निकड असल्याने ३ एकर जागेचा मोबदला रु.१५,७३,०००/- देण्यास व खरेदीखत महानगरपालिकेच्या हक्कात महानगरपालिकेच्या या खर्चाने करुन घेण्यास व खर्चाच्या मान्यता देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२५/२४:**

महानगरपालिकेच्या मालकीची विविध वाहने/यंत्र सामुग्री तथा जुने निघालेले स्पेअर पार्टस इत्यादीची पाहणी मा.आयुक्त यांनी नेमलेल्या ऑक्शन मिटीने दिनांक १०-४-९७ रोजी केली व ऑक्शन कमिटीच्या शिफारशीनुसार ठराव क्र.२८/२५ दि. ३१-५-९७ च्या सर्वसाधारण सभेत उपरोक्त साहित्य निर्लेखीत करण्यास मंजुरी मिळाली आहे.त्यानुसार चार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन लिलाव नोटीस द्वारे निविदा पत्रके विक्री झाली व त्यापैकी फक्त ९७ निविदा पत्रके वसुल झाली. ऑक्शन कमिटीने प्रत्येक ॲटमची कमीत कमी यावयाची किंमत ठरवुन सिलबंद लिफाफा ठेवला होता जो दिनांक २६-८-९७ रोजी उघडण्यात आला.तसेच आलेली निविदा पत्रके पण उघडण्यात आली.व तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

जास्तीचे प्राप्त दर ज्यांचे आले आहेत ते मंजुर करण्यासाठी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे शिफारस करण्यात येते.

टेंडर क्र.१६ एम.एच.झेड./ २०१५ या ट्रॅक्टरसाठी प्राप्त निविदा पत्रकामध्ये दोन एजन्सीचे सारखेच जास्तीचे दर प्राप्त झाल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलावून दर निश्चित करण्यास मंजुरी मिळावी.

टेंडर क्र.-११ एम.एक्स.व्ही./३७९३ जीप,टेंडर क्र.-१३ एम.डब्ल्यु पी/१५०७ टेंडर क्र.-१५ एम.एच.झेड/३८६८,टेंडर क्र.-२४ जुने जळालेले ऑईल,टेंडर क्र.-२५ जुने स्पेअर पार्टस या ॲटम साठीचे दर सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे जास्तीचे आलेले आहेत.परंतु ऑक्शन कमिटीने ठरविलेल्या किंमतीपेक्षा कमी आल्यामुळे त्यांना वाटाघाटीस बोलावून दर निश्चित करण्यास मंजुरी मिळावी.

टेंडर क्र.-१ एम.एक्स.व्ही. / १७९ कार,टेंडर क्र.-५ एम.व्ही.जी. / ८८९० कार,टेंडर क्र.-२० अस्फॉल्ट मिक्सर या तीन ॲटमसाठी कोऱ्या निविदा विक्री झाल्या.परंतु एरव्ही निविदा प्राप्त न झाल्यामुळे त्यासाठी फेर निविदा मागविण्यात येतील.

अ) मंजुरीसाठी शिफारस केलेले निविदा धारक :

| अ.क्र. | निविदा क्रमांक | जास्ती निविदा भरणाऱ्याचे नाव | मनपाची किंमत | निविदामधील जास्तीची किंमत | सेल्स टॅक्स |
|---|---|---|---|---|---|
| १) | नि.क्र.-२ (एम.एक्स.व्ही/ ३१३८) | श्री.सचिन वैद्य,"गुरुकृपा" म्युनिसिपल कॉलनी किलेअर्क,औरंगाबाद | २५०००.०० | ३१,१५१.०० | ३११५/- |
| २) | नि.क्र.-३ (एम.ए.ए/१००) | श्री.आर.वाय.शिंदे अशोकनगर,मसनतपुर ,औरंगाबाद | २५०००/- | २७,५५१.०० | २७५५/- |
| ३) | नि.क्र.-४ (एम.ए.ए./१०१) | श्री.मजहरखाफन फजरुद्दीन,मकाईगेट, घाटी,गौतमनगर, औरंगाबाद | २५०००/- | ३२,७८६.९२ | ३२७९/- |
| ४) | नि.क्र.-६ (एम.व्ही.जी/८८ ८९) | श्री.मजहरखॉन फजरुद्दीन,मकाईगेट, घाटी,गौतमनगर, औरंगाबाद. | २५०००/- | ३५,७८६.९२ | ३५७९/- |
| ५) | नि.क्र.७(एम. एक्स.व्ही/२९० ८) | श्री.अब्दुल रशिद शे.अब्दुल,न्यु रोड,मंजुरीपुरा, औरंगाबाद. | ३५०००/- | ६१,७८६.०० | ६१७९/- |
| ६) | नि.क्र.-८ (एम.एक्स.व्ही/ २९०९) | श्री.कैलास सोनाजी झुंबड | ४००००/- | ८१,७५१.०० | ८१७५/- |
| ७) | नि.क्र-९ (एम.एक्स.व्ही./ | श्री.रियाजखॉन उस्मानखॉन,न्यु | ४००००/- | ६६,७८६.०० | ६६७९/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २९१०) | रोड,मंजुरपुरा, औरंगाबाद. | | | |
| ८) | नि.क्र-१० (एम.एक्स.व्ही/ ४४३४) | श्री.रियाजखॉन उस्मानखॉन,न्यु रोड,मंजुरपुरा, औरंगाबाद. | ४००००/- | ६६,७८६.०० | ६६७९/- |
| ९) | नि.क्र-१२ (एम.ए.ए./१४६ ९) | श्री.रियाजुद्दीन महंमद मुजोफोद्दीन, सिकंदर पार्क,मकसुद कॉलनी,औरंगाबाद. | ४५०००/- | ५१,७८६.०० | ५१७९/- |
| १०) | नि.क्र.-१४ (एम.सी.ए./२६ ६९) | श्री.एम.ए.मुसळे,प्लॉट नं.५६,एन-५,सिडको,औरंगाबाद. | ३००००/- | ६७,७७७.०० | ६७७८/- |
| ११) | नि.क्र-१७ (एम.एच. झेड/२०१४) | श्री.अरुण प्रभाकर खैरनार,दिपक टॉकीज मागे,प्लॉट क्र.-३२,कॅम्प रोड,मालेगांव.जि. नाशिक. | १००००/- | ३२,५०१.०० | ३२५०/- |
| १२) | नि.क्र-१८(एम.एच.बी. ७०५९) | श्री.धनंजय काळुसे,सिडको,एन-२,महाजन कॉलनी,औरंगाबाद. | ७५००/- | २०,००२.०० | २०००/- |
| १३) | नि.क्र-१९(एम.डब्ल्यु. पी/४०५) | श्री.सलीम पटेल,घ.नं.४-८-९६,कैसर कॉलनी,औरंगाबाद. | ७५००/- | ११,१११.०० | ११११/- |
| १४) | नि.क्र-२१ (८२५x२० न्यु टायर) | श्री.जी.एस.धम्मासिंग, रेल्वेस्टेशन,एम.आय. डी.सी.,औरंगाबाद. | ८०००/- | १६०००.०० | १६००/- |
| १५) | नि.क्र-२२ (८२५x२० रिमोल्ड टायर) | श्री.डी.एस.काकडे,सिडको,एन-६जी-२१/१,औरंगाबाद. | २०००/- | २,५००.०० | २५०/- |
| १६) | नि.क्र-२३(जुने टायर) | श्री.अब्दुल कय्युम अ.रशिद,गोदावरी टायर,शिवाजी नगर,जालना मार्केट जवळ,नांदेड. | १००००/- | १८,५००.०० | १८५०/- |
| १७) | नि.क्र-२६ (होज पाईप विथ कपलिंग) | श्री.सर्व्हिसेस, औरंगाबाद.१८ एस.टी.कामगार भवन | १००००/- | १०,०००.०० | १३००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सी.पी.एस.रोड, औरंगाबाद. | | | |
| | | एकुण | ३,८५,०००/- | ६,३४,५६२.०० | ६३,७५८ /- |

<u>ब) वाटाघाटीसाठी असलेले निविदा धारक :</u>

| अ.क्र. | निविदा क्रमांक | जास्ती निविदा भरणाऱ्याचे नाव | मनपाची किंमत | निविदामधील जास्तीची किंमत | सेल्स टॅक्स |
|---|---|---|---|---|---|
| १) | नि.क्र-११ (एम.एक्स.व्ही/ ३७९३) | श्री.रियाजुद्दीन हनिफ, सिकंदर पार्क,मकसुद कॉलनी,औरंगाबाद. | ४५०००/- | ३२,७८६.०० | ३२७९/- |
| २) | नि.क्र.१३ (एम.डब्ल्यु.पी/१ ५०७) | श्री.महंमद जकीरोद्दीन सिद्दीकी,बुढीलाईन, औरंगाबाद. | ४००००/- | २६,७८६.०० | २६७९/- |
| ३) | नि.क्र-१५ | श्री.शे.मिनाज शे.बुरान,चिकलठाणा, मुळे गल्ली,औरंगाबाद. | ५००००/- | ३५,१७५.०० | ३११७/- |
| ४) | नि.क्र-२४ (वर्न ऑईल) | श्री.कृष्णा एस.बनेकर | २००००/- | १५,०००.०० | १९५०/- |
| ५) | निक्र-२५ (जुने पार्टस) | मे.सुभाष आईस फॅक्टरी,जुना बाजार,औरंगाबाद. | ४८०००/- | ३८,०००.०० | ४९४०/- |
| ६) | नि.क्र-१६ (एम.एच. झेड./२०१५) | श्री.अशद पटेल,व अब्दुल हाजी अ.करीम,टाकळकर हौसिंग सोसायटी,औरंगाबाद. | १००००/- | २५,७८६.०० | २५७९/- |
| | | एकुण | २,१३,००० /- | १,७३,५३३/- | १८,५४४ /- |

१) तरी (अ) प्रमाणे एकुण १७ निविदांना आलेली किंमत मनपाने काढलेल्या किंमतीपेक्षा जासत असल्यामुळे त्यास मंजुरी व स्विकृती मिळावी.म्हणजे मनपाच्या खजान्यात रक्कमेचा भरणा करुन घेवून डिलीव्हरी देता येईल.

२) ब) मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकुण ६ निविदासाठी वाटाघाटीस बोलावुन जास्तीत जास्त येणाऱ्या किंमतीत /वाहने/यंत्रसामुग्रीचे दर निश्चित करण्यास मा.आयुक्त यांनी परवानगी द्यावी म्हणजे त्याप्रमाणे मनपाच्या खजान्यात रक्कमेचा भरणा करुन घेवुन डिलीव्हरी देता येईल.

३) ज्या ॲटमसाठी निविदा आलेल्या नाहीत व तसेच ज्या ॲटमसाठी वाटाघाटी नंतरही योग्य किंमत आली नाही अशासाठी फेर निविदा बोलावण्यास मंजुरी मिळावी.

तरी वर दर्शविल्याप्रमाणे १,२,३ ला मंजुरी व स्विकृती मिळण्यासाठी प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते :** महानगरपालिकेने ठरवुन दिलेल्या दराप्रमाणे घ्यावयाचे असल्यास हरकत नाही.

**मा.सभापती :** ठिक आहे.मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीची विविध वाहने /यंत्रसामुग्री तथा स्पेअर पार्टस विक्री करण्याकरीता मागविण्यात आलेल्या निविदा पत्रकानुसार

१) अ) मध्ये दर्शविलेल्या १७ निविदांना आलेली किंमत मनपाने काढलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्याने सदर निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२) ब) मध्ये दर्शविल्याप्रमाणे सहा निविदांसाठी वाटाघाटीस बोलावून जास्तीत जास्त येणाऱ्या किंमतीत वाहने / यंत्रसामुग्रीचे दर निश्चित करण्यास मा.आयुक्तांना परवानगी देण्यात येते.त्याप्रमाणे मनपाच्या फंडातून रक्कमेचा भरणा करुन घेऊन डिलेव्हरी देण्यात यावी.

३) ज्या ॲटमसाठी निविदा आलेल्या नाहीत व तसेच ज्या ॲटमसाठी वाटाघाटी नंतरही योग्य किंमत येणार नाही अशासाठी फेरनिविदा मागविण्यास मंजुरी देण्यात येते.

वरील प्रमाणे अ.क्र.१,२,व ३ ला मंजुरी देण्यात येते.तसेच याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२६/२५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,विभाग क्र.१,२,व ३ अंतर्गत डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणेसाठी सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.५,४६,७७०/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (पॅचवर्क) या लेखा शिर्षाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभाग क्र.१,२,व ३ अंतर्गत डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ५,४६,७७०/-च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "रस्ते देखभाल व दुरुस्ती (पॅचवर्क) "या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२७/२६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.४४ अंतर्गत खांडकी रिपेअरींग व आर.एस.फ्लोअरींग काम करणेच्या कामासाठी सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.४,८१,८९५/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन खांडकी रस्ते " सन ९७-९८ या शिर्षकातून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.४४ अंतर्गत खांडकी रिपेअरींग व आर.एस.फ्लोअरींगचे काम करणेसाठी तयार केलेल्या रक्कम रु.४,८१,८१५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "नविन खांडकी रस्ते" या लेखाशिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२८/२७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,बुक्कुलगुडा,रमणस्तपुरा,नवाबपुरा व जिन्सी भागा अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.८,७१,३२०/- या अंदाजपत्रकास दि.१९-२-९७ विषय क्र.१६४/२ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविद सुचना क्र.मनपा/लेखा/नि/४३/९७ दि.२५-६-९७ अन्वये प्रगट फेर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण चार (४) निविदा पत्रके विकल्या गेली असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण एक (१) निविदा दर भरलेली प्राप्त झाली.निविदा दि.२२-७-९७ रोजी उघडण्यांत आली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) श्री.एम.अे.सिद्दीकी ०३.००% कमी दराने

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०३.००% कमी दराने श्री.एम.अे.सिद्दीकी यांची निविदा आहे.करीता तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०३.००% कमी दराची श्री.एम.अे.सिद्दीकी यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बुक्कुलगुडा,रमणस्तपुरा,नवाबपुरा व जिन्सी भागा अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेली श्री.एम.ए.सिद्दीकी यांची अं.प.दरापेक्षा ३% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२९/२८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगपुरा ते मिलकॉर्नर पर्यंत रस्ता दुभाजकावर लोखंडी रेलींग बसविणे या कामासाठी सन ९६-९७ चे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.११,७०,४८५/- चे अंदाजपत्रक सर्वसाधारण सभा दि.१० मार्च १९९७ विषय क्र.२२५/१८ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुख्ना क्र.मनपा/लेखा/नि/३२/९७ दि. ३-५-९७ अन्वये निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण वीस (२०) निविदा पत्रके विकल्या गेली असून निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकूण अकरा (११) निविदा पत्रके दर भरलेली प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दि.२८-५-९७ रोजी उघडण्यात आल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सलीम पटेल | ३५.०१% | कमी दराने |
| २) श्री.शेख शरीफ | ३३.३४% | --//-- |
| ३) // अब्दुल सलाम | २९.३०% | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ४) // आर.बी.चव्हाण | २८.००% | --//-- |
| ५) मे.एस.एच.असोशिएटस | २५.६१% | --//-- |
| ६) श्री.शेख मसुद | २२.९२% | --//-- |
| ७) न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | २०.००% | --//-- |
| ८) न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | १९.९८% | --//-- |
| ९) श्री.मन्ना खॉन | १७.५०% | --//-- |
| १०) मे.यात्रिव कन्स्ट्रक्शन | १४.२५% | --//-- |
| ११) श्री.एम.एम.मंडोरे | ०८.१४% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३५.०१% कमी दराने श्री.सलीम पटेल यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा ते मिलकॉर्नर पर्यंत रसता दुभाजकावर लोखंडी रेलींग बसविणेचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३५.०१% कमी दराची श्री.सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३०/२९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा एम.आय.डी.सी.येथील ए.पी. आय.ते एम.एस.ई.बी.या रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु.१७,२७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास दि.१७-७-९७ रोजी विषय क्र.२४/२१ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण तीन (३) निविदा पत्रके दर भरणा प्राप्त झाल्या पासुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.डि.अजितसिंग | २८.५% | कमी दराने |
| २)आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २७.११% | --//-- |
| ३) श्री.चारराम एन आशान्ना | २२.१९% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया श्री.डि.अजितसिंग यांच्या निविदापत्रकाचे दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.५% कमी दराची श्री.डि.अजितसिंग यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा एम.आय.डी.सी. येथील ए.पी.आय.ते एम.एस.ई.बी.भांडार या रस्त्याचे खडीकरण करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २८.५% कमी दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३१/३०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,बन्सीलाल नगर येथे स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ते हॉटेल आशियाना पर्यंतच्या रस्त्याचे पुर्ण डांबरीकरण करण्यासाठी सन

९६-९७ सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु.५,५७,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.त्या दि.१७-७-९७ च्या सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.२३/२० नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण सात (७) निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण तीन (३८ निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाल्यापासुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.डी.अजितसिंग | २८.५०% | कमी दराने |
| २) आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २७.११% | --//-- |
| ३) श्री.के.बी.पाथ्रीकर | २०.२१% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया श्री.डी.अजितसिंग यांच्या निविदापत्रकाचे दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.५०% कमी दराने आहे.

करीता सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २८.५०% कमी दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बन्सीलाल नगर येथे स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ते हॉटेल आशियाना पर्यंतच्या रस्त्याचे पुर्ण डांबरीकरण करण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २८.५०% कमी दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३२/३१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.चिकलठाणा (चौधरी कॉलनी ) येथे नविन ३०० एम.एम.अर्धगोलाकार गटार बांधणे या कामाकरीता रू.९,७९,३८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.आयुक्तांनी दि.२१-२-९७ राजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.तसेच दि. ३१-५-९७ रोजी झालेली सर्वसाधारण सभेचा विषय क्र.१२/९ दि. २८-५-९७ अन्वये सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्या नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/४३/९७ दि. २५-६-९७ अन्वये निविदा मागीतल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम दि. ४-७-९७ पर्यंत एकूण २३ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारीख १७-७-९७ रोजी फक्त नऊ (९) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या निविदा दि.२२-७-९७ रोजी उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांना दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.राणा कन्स्ट्रक्शन | ३३.१०% | अं.प.दरापेक्षा कमी |
| २) श्री.आर.बी.चव्हाण | ३१% | --//-- |
| ३) श्री.सलीम पटेल | ३०% | --//-- |
| ४) मे.फाईस्टार कन्स्ट्रक्शन | २५.०१% | --//-- |
| ५) श्री.राजेंद्र शिंदे | १३.०१% | --//-- |
| ६) श्री.एम.एम.फारुकी | २५% | --//-- |
| ७) श्री.अब्दुल सलीम | १७.१७% | --//-- |
| ८) मे.संजीवनी कन्स्ट्रक्शन | ११.९२% | --//-- |
| ९) श्री.सय्यद रफिकोद्दीन | ३.३०% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.१०% कमी दराची निविदा मे.राणा कन्स्ट्रक्शन यांची आहे.सदर काम ठेकेदारास कसे परवडणार बद्दल त्यांचे कडून खुलासा मागीतला असता ठेकेदारांना कळविले की त्याचं स्वत:चे ट्रक ट्रॅक्टर व ब्रेकर मशिन आहे.म्हणून परवडत आहे. तरी ही संबंधित विभागाचे याचे मते असे की,१५%कमी दराची काम स्पेशिपीकेशन प्रमाणे करुन घेणे करीता कठीण होते.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा (चौधरी कॉलनी ) येथे नविन ३०० एम.एम.अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३३.१०% कमी दराची मे.राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३३/३२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेस बांधकामासाठी लागणाऱ्या सिमेंट खरेदीसाठी दि.२५-६-९७ रोजी जाहिरात देऊन त्या दि. २२-७-९७ रोजी लेखाधिकारी-१ यांचे दालनात शहर अभियंता व उपस्थित पुरवठाधारक यांच्यासमोर उघडण्यांत आल्या.

१) सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया यांचे निविदा रु.२२०० प्रति मेट्रीक टन अधिक. जकात ३% ६६% प्रति टन एकूण २२६६ असा देतो (म्हणजे प्रति गोणी ११३.३० पैसे ) सिमेंट कॉर्पोरेशन यांनी निविदा उघडण्यापुर्वी त्यांचे दि.१९-७-९७ च्या पत्राने कळविले की,नजर चुकीने विक्री कर हा आकरण्यात आला नाही तो या दरामध्ये समाविष्ट करण्यात यावा अशी विनंती केली आहे.विक्रीकर जर मुळ २२०० प्रति टन मध्ये मिळवला तर २४८६ अधिक जकात ३% ७४.५८ प्रति टन २५६०.५८ पैसे प्रति टन म्हणजे प्रति गोणी १२८.०२ असा होतो.

२) ओरीएन्ट कं.यांनी त्याचे दर २४१७ प्रति मे.टन अधिक जकात ७२.५१ पैसे २४८९.५१ पैसे प्रति टन म्हणजे १२४.४७ प्रति गोणी असा होतो.

३) मे.व्ही.ऐ.ट्रेडींग यांनी सर्व करासह २७०० प्रति टन दर दिला असून प्रति गोणी १३५ हा येतो.

सदर तपशिलवार टिपनी मा.आयुक्त साहेब यांचेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आले.मा.आयुक्तांनी दि.४-८-९७ राजी सा.सा.आय.कं.चर्चेसाठी बोलाविले त्यादिवशी चर्चा होऊ शकली नाही नंतर दि. १३-८-९७ रोजी परत चर्चेसाठी बोलाविण्यात आले दि. १३-८-९७ राजी सा.सा.आय.बरोबर चर्चा करण्यात आली.त्यांनी २२६६ प्रतिटन भरणे ११३.३० पैसे प्रति गोणी प्रमाणे सिमेंट दर मान्य नाही व विक्रीकर हा दयावा लागेल असे म्हणणे आहे.जर मुळ किंमतीत विक्रीकर मिळवला तर प्रति टन २४८६ अधिक ३% जकात कर ७४.५८=२५६०.५८ पैसे म्हणजे १२८.०२ पैसे प्रति गोणी असा येतो.म्हणजे सी.सी.आय.कं.दुसऱ्या क्रमांकावर येते.म्हणून प्रथम क्रमांकाचे पुरवठाधारक यांना २१-८-९७ ला चर्चेसाठी बोलाविण्यात आले त्यात सी.सी.आय.कं.लि.हजर राहुन एक पत्र दि. २०-८-९७ चे पत्रक देऊन प्रति टन २४६० प्रति टन म्हणजे १२३ रु. प्रति गोणी असा दर दिला आहे.तसेच ओरीएन्ट कंपनीच्या प्रतिनिधीने दर कमी करण्याबाबत अधिकार नाही.आम्ही कंपनीस दर कमी करण्याबाबत विचारणा करु असे लेखी दिले.त्याप्रमाणे ओरीएन्ट सिमेंट कं. यांचे मुळ दरात म्हणजे रु. २४८९.५१ प्रति टन म्हणजे १२४.४५ च्या ऐवजी प्रतिटन २३८० प्रति मेट्रीक टन अधिक जकात ७१.४० एकूण २४५१.४० प्रति टन म्हणजे प्रति गोणी

१२२.५७ प्रति गोणी येतो. हे सुधारीत दर त्यांनी त्यांचे दर पत्रक २८-८-९७ ने कळविले आहे. सदर दर कं.सी.सी.आय.दरापेक्षा कमी आहे.(०.४३ पैसे प्रति गोणी ने कमी आहे.) कमी दराचे दर ओरीएन्ट कं.कमी असल्याने मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर मंजुरीसाठी प्रस्तावित केले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेस बांधकामासाठी लागणाऱ्या सिमेंट खरेदीकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच २४५१.४० प्रति टन म्हणजे रु. ११२.५७ प्रति गोणी ना दराची मे.ओरीएन्ट कंपनी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३४/३३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,समर्थनगर स्मशानभुमी सुविधा उपलब्ध करणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसुची अन्वये रक्कम रु. ४,०६,१५०/- एवढे यांचे तयार करण्यात आलेले आहे.सदर कामाचा खर्च विकास योजनेअंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदी अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रु.४,०६,१५०/- चे अंदाजपत्रक विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर स्मशानभुमी सुविधा उपलब्ध करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,०६,१५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण" या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३५/३४:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील विविध प्रकारच्या इलेक्ट्रीक मोटार रिवायडींगच्या कामासाठी या वर्षात अंदाजे २.०० लाख खर्च येईल.वर्ष ९७-९८ या आर्थिक वर्षात मोटार रिवायडींगच्या कामासाठी व वार्षिक करार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता विक्रीच्या वेळेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या त्यांचे दर

| | | |
|---|---|---|
| १) मे.लुना इलेक्ट्रीकल्य,औरंगाबाद | १% | अं.प.दरापेक्षा कमी |
| २) मे.सिटीजन्स इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद | १.५% | अं.प.दरापेक्षा जास्त |
| ३) मे.नोमी इलेक्ट्रीकल्स कॉर्पोरेशन औरंगाबाद. | ३.८% | अं.प.दरापेक्षा जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर मे.लुना इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद यांचे असून अं.प.दरापेक्षा १% कमी आहेत.सदरील दर जास्त वाटल्याने मा.आयुक्तांसमोर संबंधितास वाटाघाटीस बोलावून हे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करण्याबाबत मा.आयुक्तांनी सुचविले. संबंधित एजन्सीने त्यास मान्यता दिली आहे.त्यानुसार सदरील काम मे.लुना इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करुन घेण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध प्रकारच्या इलेक्ट्रीक मोटार रिवायडींगच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारक मे.लुना इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद.यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अं.प.दरापेक्षा ५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३६/३५:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,पन्नालालनगर,श्रेयनगर नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सर्वसाधारण सभामध्ये ठराव क्र.२४६/५ द्वारे दि. १०-३-९७ अन्वये रक्कम रु.२२,१०,०००/- अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/नि/४५/९७ दि.३०-६-९७ अन्वये बी-१ निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (१६) सोळा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ११ (अकरा) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) राणा कन्स्ट्रक्शन | ३७.९९% | अं.प.दरापेक्षा कमी दराने |
| २) श्री.आर.नि.चव्हाण | ३३.००% | --//-- |
| ३) श्री.फाईस्टार कन्स्ट्रक्शन | ३०.०१% | --//-- |
| ४) श्री.अब्दुल सलाम | ३१.५५% | --//-- |
| ५) श्री.डी.अजितसिंग | २९.००% | --//-- |
| ६) एलोरा कन्स्ट्रक्शन | २७.०६% | --//-- |
| ७) श्री.सलीम पटेल | २६.२५% | --//-- |
| ८) श्री.खर्डीकर | २५.२५% | --//-- |
| ९) श्री.मो.सलीम | २५% | --//-- |
| १०) श्री.नंदकुमार घोडेले | २४.८०% | --//-- |
| ११) एस.एम.मंडोरे | २२.८६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे.राणा कन्स्ट्रक्शन यांचा आहे.म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.९९% कमी असा दर आहे.

तरी मे.राणा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.९९% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ,पन्नालालनगर,श्रेयनगर नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापेकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३७.९९% कमी दराची मे. राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३७/३६:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की,मोतीवालानगर येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकीच्या दरसुची ९५-९६ नुसार रु. ६,५८,४३५/-चे प्रस्तावित

करण्यात आले असून भांडवली तरतुद सन ९७-९८ या लेखा शिर्षकातून प्रस्तावित केले आहे.

सदरील कामाच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभाने दि. ३१-५-९७ मध्ये विषय क्र.२५/२२ ने मंजुर झालेला आहे.सदरील कामाची निविदा सुचना जा.क्र.मनपा/लेखा /नि /४३/९७ दि. २५-६-९७ अन्वये वर्तमानपत्रात बी-१ नमुन्यात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकूण २१ (एकवीस) निविदा विक्री झाल्या व त्या पैकी पांच (५) निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

१) मेसर्स राणा क.क्र. ३२.९९% अं.प.दरापेक्षा कमी दराने
२) श्री.विलास गो.जाधव २८.२६% --//--
३) श्री.सलीम पटेल २५.०१% --//--
४) मेसर्स फाव्हस्टार कं.क. २५% --//--
५) श्री.एस.एम.हक १६.५०% --//--

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९९% कमी दराची निविदा मेसर्स राणा कं.यांची निविदा आहे.तरी सदरील निविदेस मा.आयुक्तांनी दि.४-९-९७ ला स्थायी समितीच्या समोर सादर करण्यास मंजुरी दिलेली आहे.तरी मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोतीवालानगर येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३२.९९% कमी दराची मे.राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३८/३७:**

उप आयुक्त-२ महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की,महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयासाठी ९७-९८ या एका वित्तीय वर्षाकरीता निविदा मागविण्यात येऊन स्थायी समिती ठराव क्र.७८६/३९ दि. २९-३-९७ नुसार मंजुरी प्राप्त झाली आहे. श्री.बालाजी ट्रेडींग कं. व प्रभात सहकारी ग्राहक संस्था (म) औरंगाबाद यांनी किराणा पदार्थाचे मंजुर दराप्रमाणे पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली.त्यामुळे किराणा पदार्थ,भाजीपाला व फळफळावळ यासाठी फेर निविदा मागविल्या असता भाजीपाला व फळफळावळासाठी (२) निविदांची विक्री झाली व (२) निविदा प्राप्त झाल्या परंतु किराणा पदार्थासाठी निविदा विकली गेली नाही. फळफळावळ व भाजीपाला करीता (२) निविदा विक्री झाली व (२) निविदा प्राप्त झाल्या.

| | | श्री.आसेफखॉन लतीफ | श्री.प्रभाकर पवार |
|---|---|---|---|
| अ.क्र. | पदार्थाचे नांव | प्रति डझन/ प्रति किलो<br>रु. पैसे | प्रति डझन / प्रति किलो<br>रु. पैसे |
| १) | केळी | १० २५ | ९ ५० |
| २) | कोबी | १५ ०० | १२ ०० |
| ३) | मोसंबी | २५ ०० | २४ ०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | चिकु | १९ ७५ | १९ ०० |
| ५) | काकडी | १६ ०० | १४ ०० |
| ६) | पालकभाजी | ३ ०० | २ २५ |

तुलनात्मक दृष्टयाने श्री.प्रभाकर विश्वनाथ पवार यांचे दर कमी आहेत.संबंधितांनी दिनांक १-९-९७ पासुन वित्तीय वर्षापर्यंत पुरवठा करावयाचा असल्याने मासिक रु. २०००/- पर्यंत प्रमाणे (८) महिने करीता रुपये १६०००/- खाद्य पदार्थ संभवतो.,

तसेच किराणा पदार्थांसाठी कोणीही निविदा भरलेली नाही.त्यामुळे मा.आयुक्त यांचे आदेशाप्रमाणे यापुर्वी चेअरमन प्रभाग सहकारी ग्राहक संस्था व श्री.बालाजी ट्रेडींग कंपनी औरंगाबाद यांनी दिलेल्या मुळ दर (मा.आयुक्त यांनी कमी करण्यापुर्वी) व निविदा मध्ये नमुद केलेले त्यांचे मुळ दर पुरवठा करण्यास त्यांनी लेखी संमती दिल्यामुळे किराणा पदार्थासाठी दर मंजुर झाल्यास दि.१-९-९७ पासुन एका वित्तीय वर्षासाठी (८) महिन्यापर्यंत प्रतिमाह रु.९०००/- प्रमाणे रु. ७२,०००/- खर्च संभवतो.

| अ.क्र. | किराणा पदार्थ | बालाजी ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद. | चेअरमन प्रभात स.ग्राहक संस्था | मा.आयुक्तांशी चर्चेनंतर कमी करण्यात आलेले दर |
|---|---|---|---|---|
| | | प्रति किलो रु. पैसे | प्रति किलो रु. पैसे | रु. पैसे |
| १) | गहु | ९ ५० | ८ ५० | ८ ५० |
| २) | मुगदाळ | २५ ५० | २५ ५० | १५ ०० |
| ३) | शेंगदाणे | २५ ५० | २५ ०० | २१ ०० |
| ४) | तांदुळ | ९ ९० | १० ९० | ८ ५० |
| ५) | गुळ | १० ९० | १२ ०० | ९ ५० |
| ६) | निरमा पावडर | २१ ९० | २० ०० | १७ ०० |

वरील दर्शविल्याप्रमाणे तुलनात्मकदृष्टया श्री.बालाजी ट्रेडींग कंपनीचे गुळ व तांदुळाचे भाव कमी आहेत व चेअरमन प्रभात सहकारी ग्राहक संस्था यांचे गहु,मुगदाळ,शेंगदाणे व निरमा पावडर यांचे भाव कमी आहेत.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिका प्राणी संग्रहालयासाठी भाजीपाला व फळफळावळाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया कमी दर असलेली श्री. प्रभाकर विश्वनाथ यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच किराणा पदार्थांसाठी बालाजी ट्रेडींग कं. व चेअरमन,प्रभात सहकारी ग्राहक संस्थेचे त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| भाजीपाला व फळफळावळ | प्रति किलो / प्रति टन |
|---|---|
| १) केळी | ९.५० |
| २) कोबी | १२.०० |

| | | |
|---|---|---|
| ३) मोसंबी | २४.०० | |
| ४) चिकु | १९.०० | |
| ५) काकडी | १४.०० | |
| ६) पालक भाजी | २.२५ | |

किराणा पदार्थ :

| | | | |
|---|---|---|---|
| बालाजी ट्रेडींग कं.औरंगाबाद | गुळ | रु. १०.९० | प्र.किलो |
| | तांदुळ | रु. ९.९० | प्र. किलो |
| प्रभात सहकारी ग्राहक संस्था | गहु | रु. ८.५० | प्र.किलो |
| | मुगदाळ | रु. १५.०० | प्र.किलो |
| | शेंगदाणा | रु. २१.९० | प्र.किलो |
| | निरमा पावडर | रु.१७.०० | प्र.किलो |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३९/३८:**

मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,अग्निशमन विभागासाठी आलेल्या मोठया आगीवर किंवा रेस्क्यकॉलवर तसेच जिल्हयातील कॉलवर काम करण्यासाठी एकही फ्लोटींग पंप अग्निशमन विभागाकडे नव्हता त्या दृष्टीने चक्रदेव आणि कंपनी नागपुर यांचे कडून चर्चेनुतर दोन टक्के दर कमी करुन पाण्यावर तरंगणारे पंप ज्याची किंमत रु.५,५८,६००/- (सर्व करासहित) आहे.पंप खरेदी करण्यासाठी मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.पुरवठा आदेशासोबत ४० टक्के रक्कम ॲडव्हान्स दयावा लागणार आहे.अग्निशमन साहित्य खरेदी शिर्षकामधुन (१० लाख) सदरील खरेदी सन ९७-९८ या वर्षी करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव व वैधानिक कार्यवाहीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागाकरीता फ्लोटींग पंप खरेदी करण्यासाठी चक्रदेव आणि कंपनी नागपुर यांचे दरास तसेच सदरील पंप खरेदीसाठी लागणाऱ्या रक्कम रु.५,५८,६००/- (सर्व करासहित) खर्चास तसेच पुरवठा आदेशासोबत ४० टक्के रक्कम ॲडव्हॉन्स देण्याकरीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.सदर खर्च "अग्निशमन साहित्य खरेदी" (१० लाख) या शिर्षकातुन करण्यात यावा.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४०/३९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,चिकलठाणा येथे रु.१०,००,०००/- चे सभागृह बांधणेच्या कामासाठी मा.ना.श्री.हरीभाऊ बागडे मंत्री महोदय महाराष्ट्र राज्य व मा.आ.श्री.शालीग्राम बसैय्ये बंधु यांचे आमदार निधीतुन प्रत्येकी रु. ५,००,०००/- या प्रमाणे रु. १०,००,०००/- निधी देणार आहे.महानगरपालिका क्षेत्रातील चिकलठाणा येथे सभागृहाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांचे अधिपत्याखाली करुन इच्छितात.तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर (मा.आयुक्त साहेब व मा.ना श्री.हरीभाऊ बागडे साहेब यांची चर्चा झाली आहे.)

**संवाद :**

**श्री.स.अली मिरा सलामी :** सदर प्रस्तावात मा.ना.श्री.हरीभाऊ बागडे,मंत्री महोदय व आमदार श्री.शालीग्राम बसैय्ये हे प्रत्येकी सभागृह बांधण्याच्या कामासाठी रु.

५.०० लाख देणार असे एकूण १० लाख रु.होत असून हे १० लाख रु.आपल्या महानगरपालिकेच्या जागेवर बांधणेबाबत सा.बां.खात्याकडे पाठविण्यापेक्षा मनपाकडे पैसा दयावा व ते बांधकाम मनपाने करावे.

**श्री.गौतम लांडगे** : मा.ना.हरीभाऊ बागडे व आ.बसैय्ये हे एकूण १० लाख,सभागृह बांधण्याच्या कामासाठी देणार तर त्यांनी ते काम बांधकाम खात्यामार्फत बांधणार आहेत.सदरील रक्कम रु.१० लाख त्यांनी महानगरपालिकेकडे दयावी.

**श्री.जोशी संजय :** मा.ना.हरीभाऊ बागडे व आ.बसैय्ये हे त्यांच्या निधीतुन सभागृह बांधण्याच्या कामासाठी बांधकाम विभागाकडुन ते काम पुर्ण करुन घेणार आहेत.फक्त मंजुरी मागत आहे.त्याची मा.आयुक्ता बरोबर चर्चा झाली आहेत.ती मंजुरी देण्यांस हरकत नाही.अशा प्रकारचा विशाध करणे योग्य नसुन सर्वानुमते मंजुरी दयावी.

**श्री.अ.रऊफ,श्री.कचरु नवपुते,श्री.गौतम लांडगे,श्री.अभिमन्यु भालेराव,श्री.अली मिरा सलामी :** मा.हरीभाऊ बागडे व श्री.शालीग्राम बसैय्ये यांची चिकलठाणा येथे सभागृह बांधणेच्या कामासाठी प्रत्येकी रु. ५ लाख असे १० लाख रु.बांधकाम खात्यामार्फत हे काम पुर्ण करणार आहेत.सदरील रक्कम त्यांनी महानगरपालिकेकडे जमा करुन व आणखी काही रक्कम लागल्यास महानगरपालिकेच्यामार्फत टाकण्यात येईल.मा.ना.हरीभाऊ बागडे व आ.बसैय्ये हे महानगरपालिकेकडे रक्कम देण्यास नकार देत असेल तर महानगरपालिकेवर त्यांचा विश्वास नाही. असा त्याचा अर्थ होतो.तेव्हा मा.मंत्री महोदय यांच्याशी चर्चा करावी.

**श्री.संजय जोशी :** अशा प्रकारचा विरोध स.सदस्य यांनी करु नये.

**श्री.भगवान घडामोडे :** बांधकाम सां.बांधकाम विभागामार्फत होणार आहे.त्यास परवानगी दयावी नसता आम्ही निषेध करतो.

**मा.सभापती :** मा.मंत्री महोदयांनी सदरील रक्कम बांधकाम खात्याकडे न देता त्यांनी ही रक्कम महानगरपालिकेकडे अदा करावी तशी त्यांना आपण विनंती करू त्यामुळे सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत येतो.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव सर्वानुमते स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र.२४१/४०:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सन ९७-९८ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारे फर्निचर दर निश्चितीसाठी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यांत आल्या.प्राप्त एकूण ३ निविदा धारकांना मा.आयुक्तांच्या दालनात दि. ३०-८-९७ रोजी दरात वाटाघाटीसाठी बोलाविण्यात येऊन मा.आयुक्तांनी प्राप्त कमी दरात १०% कमी दराने फर्निचर खरेदसाठी मान्यता दिली आहे.तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| अ) | वर्षा मेटल वर्क्स | प्राप्त कमी दर |
| १) | एक्झिक्युटिव्ह फोमची खुर्चीस्पेफीकेशन ॲक्युरा | ४,९५० |

| | | |
|---|---|---|
| | हया कंपनीचे नंबर डब्ल्यु एक्स १००३ बॅक कव्हर हेड रेस्ट टॉयलींग फॅसीलिटी अे.बी.सी.बॅक कव्हर स्टर्डडी कॉस्टर. | |
| २) | ४) सागवानी लागडी फोमची खुर्ची २x१ १/२x१ १/२सीट व बॅकसाईड कुशन. | १,२००/- |
| ३) | ऑफीस आलमारी मोठा लोखंडी ३x६x१ १/२ २२ गेज सीट चार कप्प्यांसह. | ३८००/- |
| ४) | प्लायवुड सनमाईक बेंच ६ फुट लांब ६x१ १/२x१ स्टालपाईप एक इंच सनमायकाटॉप | १४००/- |
| ५) | बुक केस ५x२ १/२x१ चार ग्लास चार लॉक २४ गेज | ४६००/- |
| ६) | लोखंडी टेबल ४x८ सनमायका टॉप स्कॉयर पाईप १८ गेज एगल फ्रेम २५x३ एफएम. | ७५००/- |
| ७) | इंडस्ट्रियल ॲकर,३x६x१ १/२ २२ गेज सीट १५ कप्पे लॉकसह. | ८८७५/- |
| ब) | रोषन सेल्स कॉर्पोरेशन | |
| १) | रिव्हॉल्व्हींग फोमची खुर्ची ॲक्युरा हया कंपनीचे नंबर डब्ल्यू एक्स १००४ विदाऊट हेड रेस्ट पी.यु.हॅडल डायलींग फॅसिलीटी ऐ.बी.सी.बॅक कव्हर स्टर्डडी कॉस्टर. | ४५००/- |
| २) | फायबर चेअर्स,निलकलम सी.एच.आर.२००९ एम डब्ल्यु एच जीबीके फोमसह सेल्स कंपनीची डायमंड. | ८००/-<br>४७५/- |
| ३) | ऑफिस एस.टाईप केनिंग खुर्ची लाकडी हॅड राऊंड पाईप केनिंगसह. | ६५०/- |
| ४) | ऑफिस टेबल २x४ सनमायका टॉप २२ गेज सीट तीन ड्रॉवर सह. | २३००/- |
| ५) | लोखंडी बेंच ६ फुट लांब ६ x१ १/२x१ १८ गेज २५x३ एमएम.एम.एस.सीट ॲगल फ्रेम. | १२००/- |
| ६) | साईड रॅक प्लायवुड लागडी १९ एम.एम.२x१/२x३x२ स्लायडींग डोअरसह. | ३५००/- |
| क) | स्वस्तिक ट्रेडींग | |
| १) | रिव्हॉल्व्हींग केनिंग खुर्ची राऊंड पाईप कनिंगसह ४ व्हील रिव्हॉल्व्हींग फॅसिलिटी. | १२५०/- |
| २) | एस टाईप लोखंडी खुर्ची राऊंड पाईप सीट टॉप व बॅक १८ गेज. | ९००/- |
| ३) | ऑफिस आलमारी लहान लोखंडी ४x२ १/२x१ १/२एम.एस.सीट २२ गेज तीन कप्प्यासह. | २१५०/- |

| | | |
|---|---|---|
| ४) | एक्झीक्यूटीव्ह टेबल ३X५१/२X२ १/२ २२ गेज सीट,एका बाजुस कपाट,दुसऱ्या बाजुस तीन ड्रावर. | ३८००/- |
| ५) | लोखंडी स्टुल १ १/२X१X१सनमायका टॉप एक इंच राऊंड पाईप ॲगल २५X३ एम.एम. | २०५/- |
| ६) | लोखंडी रॅक ३X६X१ १/२ ५०X६ ॲगल १८ गेज. | १५५०/- |
| ७) | लोखंडी बेंच ३ फुट १ १/२X३X१ १८ गेज एमएससीट राऊंड पाईप १ इंची ॲगल फ्रेम २५X३ एमएम. | ४७५/- |

दर निश्चितीस्तव तसेच अंदाजे सहा लाख खर्च अपेक्षित आहे.तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सन ९७-९८ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारे फर्निचर खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी खाली एजन्सीच्या नांवासमोर दर्शविलेल्या ॲटमचे दर कमी असल्याने सदर दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

अ) वर्षा मेटल वर्क्स अ.क्र.१ ते ७

ब) रोषन सेल्स कॉर्पोरेशन अ.क्र.१ ते ६

क) स्वस्तिक ट्रेडींग अ.क्र.१ ते ७

वरील एजन्सीच्या नांवासमोर दर्शविलेल्या ॲटमला संबंधित एजन्सीशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे १०% कमी दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४२/४१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,रेल्वेस्टेशन येथील साधना लॉज जवळ मनपाचे मंगल कार्यालय व दुकान केंद्र बांधावयाचे आहे.त्यासाठी रु. ४३,२२१४७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२२२/१५ दिनांक १०-३-९७ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.त्यानुसार कार्यालयाची निविदा सुचना क्र.४०/९७ दि.६-६-९७ अन्वये दै.वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या.कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१०) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व तसेच सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस व वेळेपर्यंत एकूण (७) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त निविदा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) श्री.एस.पी.सोधी ४% कमी दराने

२) // सलीम पटेल ७.९२% --//--

३) एस.एच.असोशिएटस ५.५५% --//--

४) शिवा कन्स्ट्रक्शन ९.९९१% --//--

५) श्री.स.सलाम ५.८६% --//--

६) राणा कन्स्ट्रक्शन ७.८६% --//--
७) एलोरा कन्स्ट्रक्शन ७.७८६% --//--

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे.शिवा कन्स्ट्रक्शन यांचा आहे.म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९१% कमी असा दर आहे.

तरी मे.शिवा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९१% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री.अभिमन्यु भालेराव** : सदरील प्रस्तावावर संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** रेल्वेस्टेशन येथे साधना लॉज जवळ मंगल कार्यालय व दुकान बांधावयाचे आहे.त्यासाठी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन हा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवलेला आहे.

**श्री.अभिमन्यु भालेराव** : संबंधित अधिकारी यांनी व्यापारी संकुल करण्यासाठी या बांधकामास मंजुरी मागविलेली आहे.आपण या दुकाना बांधल्यानंतर सदरील दुकान किती विक्री होतील व व्यापारी त्याची पूर्णता रक्कम मनपास अदा करु शकतील.काही त्या बांधल्यानंतर काही कालावधी खाली राहिल्यानंतर मनपाची त्यात खुप नुकसान होणार आहे.

**शहर अभियंता** : व्यापारी संकुलही आपण एक लगत बांधणार आहोत.ज्या ज्या दुकाना विक्री होतील.त्या दुकाना आपण एक लगत असलेल्याच दुकान देणार आहेत.

**श्री.विकास जैन :** सदरील प्रस्तावाची आवश्यकतेनुसार गरज भासत नाही व या प्रस्तावास मंजुरी देऊ नये.हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**मा.सभापती :** सदरील प्रस्ताव सर्वानुमते स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव सर्वानुमते स्थगित ठेवण्यांत येतो.

**विषय क्र.२४३/४२:**

विविध आकारचे एकूण ५९ टायर/टयुब्स खरेदी करण्यासाठी रु.२,९५,९५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन वर्तमानपत्रात निविदा सुचना देऊन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ४ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व तेवढयाच प्राप्त झाल्या.तुलनात्मक तक्ता तयार केला असता मे.लोंढा टायर हाऊस,वाळुज,औरंगाबाद यांचे दर कमी असुन त्यांनी "ॲपोलो टायर्स" या कंपनीच्या टायर्ससाठी दर भरले असुन ते कमी दराचे आहेत.भारतातील चांगल्या नावाजलेल्या कंपन्यातर्फे ही कंपनी असुन त्यांनी जकात व सर्व टॅक्सेस सह खालील प्रमाणे दर भरले आहेत.

| अ.क्र. | टायर / टयुब साईज | संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | ६.००X१६(६पी.आर) टायर/टयुब | १० | २१५०/- | २१५००=०० |
| २) | ५.९०X१५(६पी.आर.) टायर/टयुब. | ८ | १७००/- | १३६००=०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३) | ७.००X१५(१२पी.आर.) टायर/टयुब. | ४ | ३९५०/- | १५८००=०० |
| ४) | ७=००X१६(१६पी.आर.) टायर/टयुब | २४ | ४७५०/- | ११४०००=०० |
| ५) | ९.००X२०(१६पी.आर.) टायर/टयुब/फ्लॅप. | १३ | ८६५०/- | ११२४५०=०० |
| | एकुण ५९साठी रुपये | | | २७७३५०=०० |

तरी वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे टायर /टयुब /फ्लॅप्स खरेदी करण्याच्या मंजुरीस्तव सादर.टायर/टयुब्सची डिलीव्हरी घेतांना पेमेंट द्यावे लागेल अशी अट मंजुर करण्यास हरकत नाही.टायर्स त्वरीत घेणे जरूरी असल्यामुळे सदरील ठराव याच बैठकीत कायम करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध आकारचे एकूण ५९ टायर/टयुब्स खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रधारक मे.लोंढा टायर हाऊस,वाळुज,औरंगाबाद यांचेकडुन उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.१ ते ५ समोर दर्शविलेल्या विवरण व दराप्रमाणे टायर खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.टायर /टयुब्सची डिलीव्हरी घेतांना पेमेंट देण्याच्या अटीस मान्यता देण्यात येते.टायर्स त्वरीत घेणे आवश्यक असल्याने या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४४/४३:**

सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की,श्री.कमलाकर फंड हे महानगरपालिकेत उप आयुक्त यापदावर शासनाकडुन प्रतिनियुक्तीने दि. ९-७-९६ रोजी मध्यान्हांनंतर रुजु झालेले आहेत.

तथापि ते रुजु झाले त्या तारखेस महानगरपालिकेचे वर्ग-२ साठी असलेले निवासस्थान रिक्त नसल्यामुळे त्यांनी खाजगी निवासस्थान भाडयाने घेतलेले आहे.ज्याचे मासिक भाडे रु.३५००/-असुन दरमहा जुलै ९६ पासुन ते स्वत: अदा करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेतर सेवा,निलंबन व बडतर्फी सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ३९ (ड) नुसार स्वीयतेर सेवेतील अधिकाऱ्यांस विनामुल्य अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांस योग्य वोटेल तितक्या योग्य प्रमाणात /मोबदल्यात निवासस्थान उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे.

त्यानुसार उप आयुक्त सध्या रहात असलेल्या इमारतीचे भाडे शहर अभियंता यांचे कडून प्रमाणित करुन घेण्यांत आले.ज्यानुसार ते महानगरपालिका टॅक्स वगळुन रु.३२२९/- तर महानगरपालिका टॅक्स धरुन रु. ४५८५/- इतके ठरविण्यात आले आहे.

उप आयुक्त सध्या रहात असलेल्या इमारतीचे भाडे शहर अभियंता यांचे कडुन प्रमाणित करुन घेण्यांत आले.ज्यानुसार ते महानगरपालिका टॅक्स वगळुन रु.३२२९/- तर महानगरपालिका टॅक्स धरुन रु. ४५८५/- इतके ठरविण्यांत आले आहे.

उप आयुक्त यांना महानगरपालिकेने निवासस्थान उपलब्ध करुन दिले असते तर त्यांना नियमाप्रमाणे मिळणारा घरभाडेभत्ता रु.६००/- व घरभाडे रु.२३०/- असे एकूण ८३०/- देय राहीले नसते.

करीता म.ना.से.(पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा) नियम १९८१ चे नियम ३९ (ड) नुसार घरभाडे रु. ३२२९/- मधुन ८३०/- वजा जाता रु.२२९९/- प्रतिमहा प्रमाणे इमारत ताब्यात घेतल्यापासूनच्या तारखेपासून श्री कमलाकर फंड,उप आयुक्त यांना घरभाडे मंजुरी करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेतर सेवा) नियम १९८१ चे नियम ३९ (ड) नुसार मनपात प्रतिनियुक्तीवर असलेले उप आयुक्त श्री.कमलाकर फंड यांना शहर अभियंता यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे घरभाडे रु.३२२९/- मधून (घरभाडे भत्ता व घरभाडे) असे एकूण रु.८३०/- वजा जाता रु.२३९९/- प्रतिमहा प्रमाणे इमारत ताब्यात घेतल्यापासुनच्या तारखेपासून घरभाडे देण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४५/४४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.रशिद मामू कॉलनी (गरमपाणी) येथील सार्वजनिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयावर सिमेंट कॉंक्रीट छत टाकणे व संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी सा.बां. खात्याचे ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रु.१,९७,७०८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.महापौरांनी दिलेल्या अभिप्रायानुसार दि. ३१-८-९७ रोजी मा.पुतळयास काही समाज बांधवांनी अपमानीत केले व तेथे जातीय तणाव निर्माण झाला असे कळविले.शहराची शांतता रहावी या दृष्टीकोनातून सदर पुतळयाच्या भोवती संरक्षित भिंत व छत टाकणे इत्यादी सुविधा करुन देण्याबाबत आदेशित केले आहे.सदरी काम हे स्वेच्छा निधीतुन एक विशेष बाब म्हणुन करणे बाबत ाविचार करता येईल असे मा.आयुक्तांनी दि.४-९-९७ रोजी सुचविले आहे.तर मा.महापौरांनी सदर काम हे एक विशेष बाब म्हणून मनपा फंडातून करण्यात यावे असे सुचविले आहे.या कामाची तातडी लक्षात घेता या कामाची निविदा मागविण्यात आल्या आहेत.

सबब सदर कामाचे रक्कम रु. १,९७,७०८/- चे अंदाजत्रक तसेच सदर कामाचा खर्च मनपा फंडातुन अथवा स्वेच्छा निधीतुन करण्याच्या विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.रशिद मामू कॉलनी (गरमपाणी) येथील सार्वजनिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयावर सिमेंट कॉंक्रीट छत टाकणे व संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी सा.बां. खात्याचे ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रु.१,९७,७०८/- च्या अंदाजपत्रकास स.सदस्याच्या स्वेच्छा निधीतून एक विशेष बाब म्हणून अथवा महानगरपालिका फंडातून तातडीने काम सुरु करुन खर्चास मान्यता देण्यात येते व याबाबत सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव शिफारस करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर "जन गण मन" या राष्ट्र गीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| मा.नगरसचिव | मा.सभापती |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | स्थायी समिती, |
| | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३-१०-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.मा.सभापती प्रभाकर विधाते यांचे अध्यक्षतेखाली दि.३-१०-९७ रोजी स्थायी समितीची सभा सपंन्न झाली. तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने दुपारी ४.०० वाजता झाली.सभेस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.**

१) श्री.गिरजाराम हाळानोर
२) श्री.सुभाष टाकळकर
३) श्री.कचरु नवपुते
४) श्री.अभिमन्यु भालेराव
५) श्री.विकास जैन
६) श्री.भगवान घडामोडे
७) श्री.रशिदखाँन (मामू)
८) श्री.स.अ.रऊफ म.अ.माबुद
९) श्री.स.अली मिरा सलामी
१०) श्री.जोशी संजय रामदास
११) श्री.गौतम लिंबाजी लांडगे
१२) श्री.गांगवे बन्सी
१३) श्री. जयवंत ओक.

**संवाद :**

**भगवान घडामोडे :** महानगरपालिकेतील कर्मचारी विद्युत लाईनमन अब्दुल जब्बादखाँन अब्दुल रहेमान यांना या सभागृहात एक मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात आली.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : यास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :** ठिक आहे.सभागृहात १ मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात येते.अब्दुल जबार विद्युत लाईनमन यांना १ मिनिटे सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात आली.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** श्री.अब्दुल जबार विद्युत लाईनमन यांच्या कुटुंबियांना महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्यात यावी.ठिक आहे.अब्दुल जबार विद्युत (लाईनमन) यांच्या कुटुंबियांना महानगरपालिकेतर्फे १० हजार रु.निधी म्हणून देण्यांत येईल.

**श्री.स.अली मिरा सलामी :** मागील स्थायी समिती सभेत शहरातील ज्या ज्या ठिकाणी मोबाईल्स टॉवर्सचे बांधकाम होत होते.त्याबद्दल चर्चा झाली हे टॉवर्स धोक्याचे आहेत त्या कारणाने आपण ते टॉवर्स बंद करण्याचा निर्णय घेतलेला होता.परंतु पुष्पनगरी येथे सध्या या मोबाईल्स टॉवर्सचे काम आता सध्या चालु आहे.चालू असलेल्या बांधकामाची आपण परवानगी दिली आहे का? दिली असल्यास माहिती दयावी.याबाबत आजू बाजूच्या राहणाऱ्या लोकांना धोका होण्याचे संभव टाळता येत नाही.त्या कारणाने काही नागरीकांनी तक्रार पत्र या ठिकाणी दाखल केले आहे.याची माहिती द्यावी.या अगोदर ही दि. १२-८-९७ रोजी निवेदन दिले होते. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** याबाबबत संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**सहा.संचालक नगररचनाकार :** महानगरपालिकेतर्फे ४ टॉवर्सचे परवानगीसाठी अर्ज आले आहेत.१) जालना रोड बग्गा इंजिनिअरींग २) क्रांतीचौक कॉर्नर २) जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ ४) पुष्पनगरी येथे कागदपत्राची सविस्तर छाननी व नाहरकत प्रमाणपत्रा अधारे फक्त ३ मोबाईल टॉवर्सला परवानगी दिलेली आहे.पुष्पनगरीतील टॉवर्सला नाही.

**श्री.स.अली मीरा सलामी :** बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे. आजूबाजूच्या नागरीकांना या टॉवर्स पासुन धोका होण्याची शक्यता आहे. तसेच हे मोबाईल्स टॉवर्स बांधकाम करतांना त्याची उंची किती असावी याचे नियोजन काय असावे. तसेच आपण जालना रोडवर ज्यांना परवानगी दिली आहे जालना रोड हा हायवे रोड आहेत. या ठिकाणी रहदारी जास्त प्रमाणात असल्याकारणाने या ठिकाणचे बांधकाम थांबावे व परवानगी देवू नये.त्याचप्रमाणे पुष्पनगरीतील बांधकाम सध्या चालू आहे.ते त्वरीत थांबवावे.

**मा.सभापती :** सदरील बांधकाम चालू आहे.त्या भोवतालच्या मालकांनी एन.ओ.सी .दिलेली आहे व संबंधितांनी कोर्टात ऑफिडेव्हीट केलेले आहेत.त्यानुसार ते बांधकाम चालु आहेत.काही झाल्यास संबंधित मालक जबाबदार राहील.

**श्री.जयंवत ओक,श्री.स.अली मीरा सलामी,श्री.घडामोडे भगवान :** मोबाईल्स टॉवर्स बांधकाम यास आपण परवानगी देत आहे.तेथील नागरीकांच्या जर काही तक्रारी असेल तर तेथील ते बांधकाम बंद करावे जेणे करुन अपघात अगर जिवति हानी होणार नाही.जर काही झाल्यास प्रशासनास जबाबदार धरल्या जाईल व यात सर्वस्वी पदाधिकाऱ्यांची बदनामी होईल याचा आपण विचार करावा.नागरीकांच्या तक्रारीनुसार जेथे परवानगी दिली नसेल ते तोडुन टाकावे व तेथील बांधकाम बाबत आपण टेक्नीकल प्रमाणे चेक केले का? याची माहिती दयावी.

**सहा.संचालक :** मोबाईल्स टॉवर्सचे जे बांधकाम चालू आहेत त्या बाबत संबंधित स्ट्रकचरल इंजिनिअर हे जबाबदार आहेत.त्यांनी सर्व अटींची पुर्तता पुर्ण करुनच ते बांधकाम केलेले आहेत व ते संबंधित मालकाचे स्ट्रकचरल इंजिनिअर असून त्याचे मार्फत काय्रवाही त्यांनी केलेली आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** मोबाईल्स टॉवर्सचे बांधकाम हे ६० फुटावरुन ९० फुटावर गेलेले आहे.आज ही पदाधिकारी यांनी माझ्या बरोबर यावे व पुष्पनगरीतील हे बांधकामाचे प्रत्यक्ष पाहणी करावी व त्यानुसारच प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री.गौतम लांडगे :** मोबाईल्स टॉवर्स बांधकामाचे एस.एफ.आय.असेल त्यांचे कल्क्यूलेट असेल याबाबत माहितीही केलेली नसते.आपण याबाबत बिल्डींग, त्या ठिकाणची डिजाईन वगैरे बघून त्यानुसार परवानगी दिलेली आहेत का? त्यांचा खुलासा करावा.या ठिकाणचे स्ट्रकचरल डिझाईन बी ॲण्ड सी कडुन काढुन मागवुन घ्यावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :**आमचा मोबाईल टॉवरच्या बांधकामाशी विरोध नाही.परंतु ते विशिष्ट ठिकाणी व बांधकाम कसे असावे यासाठी चर्चा करीत आहोत व तेथील एस.एफ.आय.सिमीत केलेली आहे काय? काही मालक स्वत:च्या उद्योगासाठी टॉवर उंच करण्याचे बांधकाम करीत असल्यास आणि त्यामुळे मागेपुढे जिवितास धोका झाल्यास ते आम्ही सहन करणार नाही.

१) पुष्पनगरीतील जे बांधकाम चालू आहे ते योग्य नाही.
२) टॉवर ६० फुटापेक्षा उंच असावे का?
३) उंची व लोड बाबत माहिती दयावी.

**श्री.भगवान घडामोडे :** टॉवर बांधकामाशी एस एफ आय शी काही संबंध आहे काय?

**सहा.संचालक नगररचनाकार :** याबाबत सर्व स्ट्रकचरल इंजिनिअरने लिहुन दिलेले आहेत्यामुळे सर्वस्वी जबाबदारी त्यांची राहील व टॉवरची १० एम ची केबीन वगैरे राहील.परंतु एस एफआय शी त्याचा काहीही संबंध नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** तेथील बांधकाम बंद केले असून सामानही उचलून आणण्यात आले आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :**नागरिकांने माझ्याकडे जे निवेदन दिले आहेत ते चुकीचे आहेत का? मोबाईल्स टॉवर्स आहेत ते ६० फुटांपेक्षा उंच नको आहे.या रस्त्यावर रहदारी जास्त आहे. त्याबाबत नागरीकांना धोका होण्याची शक्यता आहे. तेथील काम रात्रंदिवस चालू आहे.त्यामुळे जिवितास हानी होऊ शकते. अशा अनधिकृत बांधकामास प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** मोबाईल्स टॉवर्सचे जेथे विना परवानगी बांधकाम चालू असेल ते त्वरीत बंद करुन टाकण्याबाबत संबंधित अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

**सहा.संचालक :** संबंधित कामाचे बांधकामाबाबत नगररचना विभागातील कर्मचाऱ्याला पाहणी करण्यासाठी पाठविण्यात आले आहे. पाहणीनंतर कार्यालयात अहवाल सादर करतील त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदरील इमारतीची स्ट्रॅविटीसाठी लोड घेणे शक्य आहे.काय ते संबंधित मालकानी दिलेले आहे.त्यमुळे संबंधित मालकच जबाबदार राहतील. तेथील लांबी रुंदी मोजमाप करुन सविस्तर आराखडा तयार करण्यात येईल. त्यानंतरच कार्यवाही होईल.

**मा.सभापती :** पुष्पनगरी येथील मोबाईल्स टॉवर्सचे बांधकाम बाबत सार्वजनिक बांधकाम विभागातील स्ट्रकचरल इंजिनिअर यांचे कडुन डिझाईन प्लॅन(नकाशा) मागवून घ्यावे व त्याची पाहणी करुन प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री.कचरु नवपुते :**स्थायी समिती सभागृहात मागे ४-५ महिन्यापुर्वी नेहरु रोजगार योजनेबाबत चर्चा झाली होती की,महानगरपालिकेतर्फे जे नेहरु रोजगार योजनेचे फार्म वाटप झाले होते परंतु अदयाप पर्यंत त्याची सबसेडी आलेली आहे का?आतापर्यंत का आली नाही याची माहिती दयावी.आपल्या कार्यालयामार्फत आपण कार्यवाही केली काय? इतका विलंब का लागला याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** आतापर्यंत नेहरु रोजगार योजनेच्या अनुदाना संदर्भात तीन-चार वेळा संपर्क साधलेला आहे व मंत्रालयाशी व मा.सचिव नगरविकास विभाग यांचेशी पत्र व्यवहारही केलेला आहे.जवळपास रु.२०.०० लाखाची मागणी केलेली आहे.शासनाकडे फॅक्सद्वारे कळविण्यात आलेले आहे.६० टक्के अनुदान केंद्र शासनाकडुन प्राप्त होते.तरीही याबाबत अनुदान आलेले नसल्याने मी स्वतः मंत्रालयात जाऊन आलेलो आहे.ज्यावेळेस अनुदान प्राप्त होईल. त्यानंतरच बँकांशी संपर्क साधुन कळविणेत येईल तो पर्यंत नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** संबंधित अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे खुलासा बरोबर आहे.६० टक्के केंद्र सरकार देते व ४० टक्के राज्य सरकार अनुदान देते.यापुढील कार्यवाही करून त्यांनी लवकरात लवकर हे काम पुर्ण करावे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करुन मागील फॉर्म वाटप झालेले त्याची सर्वस्वी पुर्तता पुर्ण करुन घ्यावी व पुढील नेहरु रोजगार योजनेबाबत फॉर्म वाटप बंद ठेवावे.

**श्री.गौतम लांडगे :** शासनाकडून ४०% अनुदान येणे आवश्यक आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** केंद्र शासनाकडून अनुदान बाबत महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करावा व गरीब लोकांना न्याय दयावा.

**श्री.संजय जोशी :** शहरातील महानगरपालिकेने मोजणी करावयाची,कर आकारणी करावयाची सुरुवात केली आहे.दोन कर आकारणी विभागातील कर्मचाऱ्यांना काम पाहण्याचा अधिकार असतांना त्या ठिकाणी एकच कर आकारणी विभाग काम पाहते व दुसऱ्या कर आकारणी विभाग त्या कामाकडे दुर्लक्ष करते.माझ्या वार्डामध्ये कामाबाबत मी संबंधित अधिकारी यांचेकडे गेलो असता त्या ठिकाणी कुणीही जागेवर नव्हते.कोणते काम कुणाकडे आहे याचा ताळमेळ दिसत नाही.त्याठिकाणी अधिकारी हजर राहत नाही.

**उप आयुक्त-१** : शहरातील जी मालमत्ता आहे याची मोजणी करावयाची व आवश्यक ठिकाणी नंबर दयावयाचे जबाबदारीचे काम कर आकारणी १ व २ या अधिकाऱ्यांना मा.आयुक्तांनी आदेश दिलेले आहेत.त्यानुसार संबंधित अधिकारी हे काम पाहतील.स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे कर्मचारी हे कार्यालयातील कामे व्यवस्थित करतात किंवा नाही याची तपासणी करण्यात येईल.

**मा.सभापती :** स.सदस्य जोशी यांच्या तक्रारीनुसार उपायुक्त-१ यांनी कर आकारणी १ व २ यांनी एकत्रितपणे काम करण्याची जबाबदारी देण्याची कार्यवाही करावी.

**श्री.भगवान घडामोडे :** विठ्ठलनगर,रामनगर येथील नागरीकांनी पाणी पुरवठयाबाबत ठराविक रक्कमेच्या नुसार माजी आयुक्त यांनी १ हजार रु.कमी देण्याच्या निर्णयानुसार तेथील नागरीकांना परत महानगरपालिकेतर्फे पाण्याचे बिले मिळाली आहेत.ते आपण कमी करणार नाही का?तेथील नागरीकांना आतापर्यंत पाणी प्रश्न सुटलेला नाही.

**कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा :** याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री.सुभाष टाकळकर :** महानगरपालिका झोन नं.७ मध्ये २ ट्रॅक्टर पाणी पुरवठयाची महानगरपालिकेने दिले होते.परंतु दोन ट्रॅक्टर मधील एक ट्रॅक्टर बंद आहे.या भागात दोन ट्रॅक्टरने पाणी पुरवठा योग्य त्याप्रमाणात होतो.परंतु एक ट्रॅक्टर टायर खराब झाले आहेत.त्या कारणाने ते बंद आहे.करीता जे बंद झालेले ट्रॅक्टरला टायर बसवून तेथील दोन ट्रॅक्टरने पाणी पुरवठा करण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** : मी संबंधित झोनला व एन-५ पाण्याच टाकी येथे नागरीकांना पाण्याचा त्रास होत असल्यास तातडीने एक ट्रॅक्टर पाठविण्याचे सुचना केलेल्या आहे.

**मा.सभापती :** या भागात दोन ट्रॅक्टर होते परंतू एक ट्रॅक्टर काही कारणास्तव बंद झाले तरी संबंधित अधिकारी यांनी त्या ट्रॅक्टरची दुरुस्ती करुन सुरळीत पहिल्या प्रमाणे पाणी पुरवठा करण्यात यावा याची नोंद घ्यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :**शहरात डासाचे प्रमाण खुप झाले आहे.शहरात बऱ्याच ठिकाणी खाच-खळगे असुन त्यात पाणी साठलेले आहेत व त्याप्रमाणे शहरात काही ओसांड भागात व इतर ठिकाणी गाजर गवत खुप मोठया प्रमाणत आहेत.हे शहरातील गाजर गवत त्वरीत कापून टाकावे. यामुळे डासांचे वाढते प्रमाण कमी होईल.

**मा.सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकिय अधिकारी :** डासांचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी एक मोहीम आपण हाती घ्यावी लागेल. डास निर्मुलन पंधरवाडा ही उपाययोजना करणे आवश्यक राहील.तसेच शहरात ज्या ज्या ठिकाणी गाजर गवत आहेत ते ही लवकरात लवकर काढण्यात येईल व आपणास डासांचे प्रमाण कमी करता येईल.

**मा.आयुक्त :** शहरातील जे गाजर गवत आहेत व जे गाजर गवत महानगरपालिकेच्या जागेवर आहेत ते आपण काढु शकतो.परंतु बऱ्याच ठिकाणी शहरात खाजगी जागेवर गाजर गवत आपणांस आढळुन येते.गाजर गवत १० पैसे किलोने विकत घेण्यासाठी काढण्यास त्रास होतो. याबाबतचे अधिकार आपण आता झोनल कमीशनरला दिले आहेत. पावसाळा संपलेला आहे.दिवाळीपर्यंत हे गाजर गवत आपण काढण्याची मोहीम हाती घेणार आहोत."संपुर्ण डास निर्मुलन योजना" ही मोहीम आपण हाती घेणार आहोत.त्याबाबतचा सर्वे करुन मुंबई डास निर्मुलन नावाने एक संस्था आहे.त्या संस्थेमार्फत शहरातील संपूर्ण डासांचा नायनाट करण्यासाठी एक व्यापक मोहीम हाती घ्यावयाची आहे.

**श्री.कचरु नवपुते :** चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत महाराष्ट्र डिस्ट्रलरीज कंपनीचे जे पाणी वाहुन साचते.त्यामुळे डासांची उत्पत्ती होते.त्यामुळे या भागात खुप डास झालेले आहेत.त्यासाठी जेथे घाण पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होते.त्या ठिकाणी महानगरपालिकेने योग्य ती मोहिम राबवुन उपाययोजना करावी.त्यामुळे चिकलठाण्यापर्यंत तेथील पाण्याचा त्रास नागरीकांना सतत होत असतो.याची प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री.अभिमन्यु भालेराव :** औद्योगिक क्षेत्रातील ज्या कंपन्या आहेत त्यांच्या मधुन जे वायू बाहेर निघतात त्याप्रमाणे आपण पत्र देऊन त्यांना कळवावे.पाणी पत्रक काढावे,नोटीस काढावी,चिकलठाणा येथील महाराष्ट्र डिस्ट्रीलरीज कंपनी व इतर अखत्यारीत अनेक कंपन्यांचा समावेश होतो आहे.त्यानुसार कार्यवाही करावी.कारण माझ्या वार्डात डासांचा उपद्रव फारच मोठया प्रमाणात असुन शाळेतील मुलांना ड्रेस वाटप कार्यक्रमांचे वेळी मा.आयुक्त व इतर पदाधिकारी यांना पाहण्यात हा भाग आलेला आहे.

**मा.सभापती :** मा.आयुक्त व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केल्यानुसार लवकरच योग्य ती उपाययोजना करण्यात येईल.ज्या ठिकाणी साचलेले पाणी आहे. सांडपाणी असते त्या ठिकाणी औषध फवारणी प्रशासनाने तातडीने करावीत.

**श्री.बन्सी गांगवे :** संजयनगर येथील ड्रेनेज आहे ती दुरुस्ती करावी व त्या ठिकाणी ही ड्रेनेज घुशीने पुर्णपणे पोखरलेली आहे.त्यामुळे सदरील नागरीकांस त्रास होत आहे.यावर कार्यवाही करावी.

**श्री.गौतम लांडगे :** आंबेडकर नगर येथील १५ टक्के घरामध्ये जी ड्रेनेज पाईपलाईन झाली आहे.तीचे काम योग्य रितीने केलेले नाही.त्यात निष्काळजीपणा झालेला आहे. त्यामुळे लाईन सारखी चोकअप होत असते आणि दुर्गंधी सारखी येत असते.कारण त्या ठिकाणची लेव्हलींग व्यवस्थित न घेतल्याने हा परिणाम आपणास दिसुन येत आहे.त्यासाठी मी प्रशासनाला नविन लाईन टाकुन देणेसाठी पत्र दिलेले आहे.

**कार्यकारी अभियंता :** एस.डब्ल्यु नी पाईप लाईन बाबत अंदाजपत्रक आल्यानंतर मी पाहणी केली आहे.चेकर उघडून बसवल्या आहेत.त्यावेळेस आपण कमी खर्चाची योजना राबवली त्यावेळेस ५-६ गाडया मी पाहणी केली आहे. याबाबत संबंधित अधिकारी यांना ज्या ज्या ठिकाणी काम व्यवस्थित पणे झाले नाहीत त्याबाबत दुरुस्ती करुन कार्यवाही करण्यास सांगितले.

**श्री.संजय जोशी :** मो.आंबेडकरनगर सिडको येथील ड्रेनेज पाईपलाइनची पाहणी करावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी सदरील कामाबाबत स्वत: पाहणी करुन काम योग्य त्या पध्दतीने झाले की नाही याची कार्यवाही करावी.

**श्री.गौतम लांडगे :** याठिकाणी जे शौचालय झाले आहे.त्याचे काम व्यवस्थित झालेले नाही तेच काम पुन्हा पुन्हा करीत आहेत या ठिकाणी शौचालयाची जी पाईपलाईन आहेत ती मधुन दुर्गंधी निघते आहे. घाण पाणी बाहेर निघते आहे. २-३ वर्षाला तेच काम पुन्हा पुन्हा अंदाजपत्रक तयार करुन काम करण्यास सुरुवात करतात.सदरील काम व्यवस्थित झालेले नसुन त्यामुळे नागरीकांना सतत त्रास होत आहे.

**कार्यकारी अभियंता :** १) संजयनगर (पू) म्हाडा अंतर्गत ६.०० मी.मी.व्यासाची पाईपलाईन अंदाजपत्रक तयार करुन टाकण्यात आलेली आहे.त्या ठिकाणी मागे ६ वर्षापुर्वीचे चेंबर्स बसवून आयएसआयचे ठाणे टाकण्यात आलेले होते.तेथील लाईन सुरळीत चालू होती.तेथील २०-२२ गल्ल्या चेक करुन ज्या लाईन बंद आणि खराब आहेत त्याबाबत संबंधित उप अभियंता यांना मी आदेशित केलेले आहे.आणि त्याठिकाणचे अंदाजपत्रक तयार करुन कार्यवाही करण्याची सुचना दिलेल्या आहेत.

४) त्याचप्रमाणे मो.आंबेडकर (सिडको ) येथील प्रत्यक्षात मी पाहणी केली असता त्यावेळेसची पाईपलाईन ही व्यवस्थित पणे जोडलया गेली नाही व शौचालयाची लाईन वेगळी असून तेथील नागरीकांच्या तक्रारी वरुन स्लोप मिळविण्यासाठी वेगळे अंदाजपत्रक तयार करुन कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**श्री.संजय जोशी :** आधीचा खर्च वेगळा व नंतरचा खर्च वेगळा आदीचे अंदाजपत्रक २५ हजार नंतरचे २० हजार खर्च करणे. ही जबाबदारी कोणावर आहे. असा दोनदा खर्च करणे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान व भुर्दंड होत आहे.याची प्रशासनाने दखल घ्यावी.संबंधित अधिकारी दिशाभूल करीत आहे.

**श्री.गौतम लांडगे :** डॉ.आंबेडकर नगर येथे शौचालयाचे कामासाठी रू.२५/- हजाराचे अंदाजपत्रक केलेले आहे. कारण त्या ठिकाणचे काम व्यवस्थित झालेले नसल्याने सतत दुर्गंधी होत होती. त्यामुळे पुन्हा रु.२०/- हजाराचे कामाचे

अंदाजपत्रक माझ्या मागणीनुसार केलेले आहे. आधीच्या कामाबाबत संबंधित गुत्तेदारांकडुन पैसा वसुल करावा.

**मा.सभापती :** सदरील तक्रारीनुसार संबंधित अधिकारी यांनी त्वरीत पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री.स.अली मिरा सलामी :** मिटमिटा येथील नाल्यावर जे शौचालय केले आहेत. त्यास लगत जे सेप्टीटँक केले आहे. त्याचा स्लोप व्यवस्थित नसल्याने वापर होईल अशा रितीने बांधलेले नाही. तेथील महानगरपालिका तर्फे शौचालय बांधलेले आहे.त्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, त्या ठिकाणी जनावरे बांधतात व कडबा /घास ठेवलेल आहे.याकडे अधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष करतात.याबाबत कधी कुणी पाहणी केली आहे काय? जे शौचालयाचे बांधकाम झाले त्यामध्ये लाखो रुपयांचे महानगरपालिकांचे नुकसान झाले आहे.कारण नागरीकांना त्याचा वापर होत नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती दयावी.

**शहर अभियंता :** मिटमिटा येथील शौचालयाचा वापर करतांना व तेथील सेप्टाटँक हे व्यवस्थित असुन, नागरीक त्याचा वापर व्यवस्थित करीत नाहीत.आता प्रत्यक्षात पाहणी करुन त्या ठिकाणी जनावरांच्या बाबत चौकशी करुन कार्यवाही करता येईल.

**श्री.स.अली मिरा सलामी :** शहरात एखादे काम करावयाचे असल्यास आपणांकडे बजेट नाही.म्हणता आणि ज्या ठिकाणी गरज नसते. तेथे बांधकाम करुन सुविधा करतात त्याठिकाणी सध्या जनावरे बांधली जातात त्याचे काय? आपण प्रशासनामार्फत लक्ष देत नाही काय?

**मा.आयुक्त :** याबाबत खुलासा संबंधित इंजिनिअर यांनी केला आहे.दुसरा प्रश्न लांडगे यांनी टाळला आहे.जी पाईपलाईन होती ती पुन्हा टाकण्यात आली आहे.जर या ठिकाणी आरोग्य धोक्यात असेल तर आपल्याला उपाययोजना करावी लागेल. एक मुद्दा लक्षात घेण्याजोगा आहे की, पहिले जे काम झाले आहे ते व्यवस्थित पणे का झाले नाही. त्याठिकाणी दुसऱ्यांदा काम करणे भाग पडले याचे कारण म्हणजे नागरीकांचे गैरसोय होऊ नये म्हणून सुविधा पुरविणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. या कामी काही अडचणी बाबत व स. सदस्य यांनी केलेल्या सुचनाप्रमाणे चौकीशी करुन जे अधिकारी जबाबदार असतील त्याची माहिती देण्यात येईल.व स.नगरसेवक यांनी जनावराच्या बाबत जो प्रश्न उपस्थित केलेला आहे.त्याबाबत लवकराच पाहणी करुन चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.संजय जोशी :** बऱ्याच वेळेस स्थायी समिती समोर असे प्रकरणे येतात परंतु प्रत्येक वेळेस असे सांगितले जाते की, पुढच्या मिटींगला त्याचा खुलासा करु ही बाब बरोबर नसून जे अधिकारी यांच्यावर अशा ज्या काही तक्रारी येतात किंवा आल्या आहेत त्यांनी काय कार्यवाही केली त्याची माहिती पुढच्या मिटींगला दयावी असे सांगितल्या जाते ते बरोबर नाही.

**मा.सभापती :** ठिक आहे. आता विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**विषय क्र.२४६/१:**

दि. १७-९-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.गौतम लांडगे :** पृष्ठ क्र.२२ वर विषय क्र.२२४/२३ मधील विषयास अनुसरुन ठराव या सभागृहात मांडलेला नाही.तो संपर्णतः चुकीचा आहे.विषयामध्ये रक्कम रु.९,७४,८३६/-अशी दाखवली व ठरावात मात्र १५,७३,०००/- अशी दाखविण्यात आली आहेत.ती चुकीची आहे.याबाबत सचिवांना माहिती विचारावी.

**मा.सचिव :** सभागृहात मी सांगू इच्छितो की, विषय क्र.२२४/२३ चिकलठाणा औरंगाबाद येथील त्याचा जो ठराव लिहिलेला आहेत तो सभा कक्ष विभागामार्फत लिहिलेला नाही व दुसऱ्यांनी कुणी लिहून मुळ ठरावात बदल केलेला आहे तो चुकीचा आहे.

**श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद,श्री.संजय जोशी :** प्रस्तावामध्ये ३० टक्के, २६ टक्के असा विषय नसतांना ठरावात त्याचा उल्लेख केलेला असून त्यानुसार रक्कम रु.१५,७३,०००/-अशी हस्ताक्षरांत लिहिण्यात आली आहे. ही चुकीची बाब आहे व कुणी लिहिला त्याबाबत कार्यवाही व्हावी.

**श्री.कचरु नवपुते :** हा प्रस्ताव आपण मागेच मांडलेला होता त्याचा ठराव पास झालेला आहेत.चिकलठाणा येथील या जमीनीची रजिस्ट्री सुध्दा झालेली आहे.त्याची किंमत १५,७३,०००/- रु.केलेली आहे. जी तीन एकर जमिन घेतलेली आहेत. त्याप्रमाणे संचिकेत तसे नमुद केलेले आहे.

**श्री.गौतम लांडगे, श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद, श्री.स.अली मिरा सलामी :** सदरील प्रस्तावात खुप तफावत दिसून येते.संबंधित व्यक्तीने मा.आयुक्तांकडे या विषयावर वाटाघाटी करण्यास चर्चा पण झालेली आहेत. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संबंधित व्यक्ती रक्कम रु. ९,७४,८३६/- मध्ये जमीन देण्यास तयार झाला होते परंतु या ठिकाणी प्रस्ताव दर्शविलेली व ठरावात दर्शविलेली ठरावच वेगळया प्रकारचे दिसुन येत आहे.हा बदल कुणी केला. मुळ प्रस्तावात बदल करुन ठरावच वेगळा लिहिण्याचे कारण काय? रु.६.०० लाखाचा घोळ करण्याचा अर्थ काय?

**श्री.कचरु नवपुते** :मी आयुक्तांकडे जेव्हा संबंधित व्यक्तींने या विषयावर चर्चा केली तेव्हा तो ती रक्कम घेण्यास तयार झाला.परंतु सदरील व्यक्तीच्या लक्षात आल्याने त्यांनी आताच्या बाजार भावाने रक्कम देण्यात यावी अशी विनंती पत्र दिले. तसेच झोन नं.(चेंज) बदल्यामुळे ९,७४,८३६/- रु.रक्कमेचे व्हॅल्यूशन वाढवलेले आहेत.त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**श्री.अली मिरा सलामी** :सभागृहात असे गैरप्रकार आढळून येतात त्या कारणाने आपल्या शासनाचे सचिव श्री.नंदलाल यांचे पत्र पण आले होते. आपण याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा व सर्व स.सदस्यांना सांगावे.

**मा.सभापती :** सदरील प्रस्ताव रद्द करुन जमीन भुसंपादन विभागाकडे तपासणीसाठी पाठवून त्यानुसार प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

**श्री.विकास जैन :** दुभाजकावर जे ग्रिल बसविण्यात येतील व त्या ठिकाणी ग्रिलचे काम चांगल्या पध्दतीने पुर्ण करण्यात यावे.

**श्री.संजय जोशी :** दुभाजकावर ग्रिल बसवितांना त्याची उंची कमी असावी. मागे महानगरपालिकेने बाबुराव काळे चौकात जे ग्रिल बसविले आहेत. त्याची उंची कमी करावी.

**श्री.कचरु नवपुते :** जे ६ पेंटर दैनिक वेतनावर घेतलेले होते त्याचे काय झाले याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता :** रोजंदारीवर ६ पेंटर कामासाठी मजुर म्हणून घेण्यात आले होते. त्यांना बंद करण्यात आले आहेत.

**मा.सभापती :** यापुढे घ्यावयाचे झाल्यास न्यायालयाच्या जेष्ठता यादीनुसार प्रशासनाने घ्यावे.

**सहा.संचालक :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.२१ मधील विषय क्र.२२३/२२ मंजुर करण्यात यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.गौतम लांडगे :** पुणे येथील मशाल या संस्थेला काम का दयावे म्हणून प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला होता.

**मा.आयुक्त :** बीपीएमसी ॲक्टप्रमाणे वर्षाच्या ३१ जुलैच्या आत प्रदुषण अहवाल तयार करुन पाठवायचा होता.आणि याबाबत शासनाने आल्याला कळविले की,अद्यापही अहवाल का पाठविलेला नाही.त्यासाठी सदरचा प्रस्ताव सर्व बाबी समाविष्ट आहे.यामध्ये कत्तलखान्याबाबतच्या सर्व बाबी समाविष्ट आहेत.याच संदर्भात सहा.संचालक नगररचना यांना पुणे येथे पाहणी करण्याासाठी व विचारा विनिमय करण्यासाठी पाठविण्यात आले होते."मशाल" ही संस्था महाराष्ट्रातील अग्रणी व एक्सपर्ट असुन त्यांचे कडुन काम करवुन घेणे आवश्यक आहे.या संस्थेची संपुर्ण महाराष्ट्रात व शासनानेही त्यांची स्तूती केली आहे व शासन अंगिकृत संस्था असुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.आपणांस निविदा मागवुन काढावयाचे असल्यास करुन शकता यांस आमची काहीही हरकत नाही.

**श्री.अली मिरा सलामी :** अशा प्रकरच्या संस्था औरंगाबाद येथे नाहीत काय? निविदा मागवून प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** सदरील प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

१) इतिवृत्तातील दिनांक १७-९-९७ च्या सभेतील विषय क्र.२२४/२३ पृष्ठ क्र.२२ व २३ मधील ठरावच चुकीचा लिहिल्या गेल्याने व मुळ प्रस्तावातील रक्कमेत बदल केलेला असल्याने प्रस्ताव रद्द करुन भुसंपादन कार्यालयाकडे तपासणीसाठी पाठविण्यांत यावे.

२) विषय क्र.२४२/४१ पृष्ठ क्र.४३ मधील विषय स्थगित ठेवण्यांत आलेला होता.त्यांस मंजुरी देण्यात येते.

३) त्याचप्रमाणे दिनांक १६-८-९७ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१९ मध्ये विषय क्र.१६१/२० या प्रस्तावाबाबत रिकॉल करण्याचे सांगितले होते.प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

४) तसेच दि. १६-८-९७ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१९ व २० मधील विषय क्र.१६२/२१ हा प्रस्ताव रिकॉल करण्याचे ठरविले होते.परंतु सदरील प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. या व इतर दुरुस्तीसह दिनांक १७-९-९७ च्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

५) विषय क्र.२२३/२२ पृष्ठ क्र.२१ व २२ हा विषय स्थगित ठेवण्यात आला होता.सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४७/२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र.७ मधील महेबुबनगर व वानखेडेनगर या भागातील अंतर्गत रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३,००,४६०/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च भांडवली रस्ते (नविन खडीकरण) या लेखा शिर्षाखाली सन ९७-९८या तरतुदीमधुन करण्यात येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७ मधील महेबुबनगर व वानखेडेनगर या भागातील अंतर्गत रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,००,४६०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली रस्ते (नविन खडीकरण) या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४८/३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वरद गणेश मंदिर (हॉटेल कार्तिकी) ते समर्थनगर या रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणेच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.८,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च शासनाकडून प्राप्त सन ९६-९७ वर्षासाठी प्राप्त रक्कम रु. ४.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल.

तरी रक्कम रु.८,९०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वरद गणेश मंदिर (हॉटेल कार्तिकी) ते समर्थनगर या रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.८,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच खर्च शासकीय अनुदान रुपये चार कोटीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४९/४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बडातकीया या भागांमध्ये खांडकीची दुरुस्ती करणे व नविन शहाबाद फरशी बसविण्याच्या कामाकरीता सन ९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु.३,६१,४८६/- खर्च सन ९७-९८ च्या नविन खांडकी रस्ते या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या रक्कम रु.५० लक्षच्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी रक्कम रु.३,६१,४८६/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बडातकीया या भागांमध्ये खांडकीची दुरुस्ती करणे व नविन शहाबाद फरशी बसविण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,६१,४८६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च नविन खांडकी रस्ते या लेखाशिर्षकाखाली उपलब्ध रु.५० लक्षच्या तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५०/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, चंपा मस्जिद ते एस.टी.कॉलनी या रस्त्यावरील रस्ता दुभाजकाची उंची वाढवुन त्यावर लोखंडी ग्रील बसविण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,५९,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च शासनाकडून प्राप्त रक्कम रु.४ कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल.

तरी रक्कम रु.६,५९,८००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,चंपा मस्जिद ते एस.टी.कॉलनी या रस्त्यावरील रस्ता दुभाजकाची उंची वाढवुन त्यावर लोखंडी ग्रील बसविण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.६,५९,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च शासकीय अनुदान रुपये चार कोटीमधुन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५१/६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,विद्यापीठ कॅन्टीन ते बौध्द लेणी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९५-९६ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.१,६१,३००/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च भांडवली रस्ते सन ९७-९८ नविन डांबरीकरण या लेखा शिर्षकातून करण्यात येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, `विद्यापीठ कॅन्टीन ते बौध्द लेणी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,६१,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च भांडवली रस्ते नविन डंबरीकरण या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५२/७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,बुढढीलेन कबाडीपुरा येथे सांस्कृतिक हॉल बांधावयाचा आहे.या कामासाठी रक्कम रु.६,२०,५१२/-चे अंदाजपत्रक तयार करुन सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार ठराव क्र.१५४/४ दि.२०-११-९६ अन्वये मंजुरी देण्यात आली.सदर कामासाठी निविदा सुचना क्र.जा.क्र.मनपा/लेखा/नि/४९/९७ दि.२९-७-९७ अन्वये बी-१ नमुन्यात मागविण्यात आल्या होत्या.निविदा विक्रीच्या अंतिम तारखपर्यंत एकूण (२) निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकूण (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्याखालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) बसरा कन्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| २) कल्याणी कन्स्ट्रक्शन | ८%जास्त दराने |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया कमी दर म्हणजे अंदाजपत्रकास दराने असा दर बसरा कन्स्ट्रक्शन यांचा आहे.तथापी सदरील दोन निविदा धारकांपैकी कल्याणी कन्स्ट्रक्शन यांनी निविदे सोबत इसारा रक्कमेचा भरणा केलेला नाही.त्यामुळे त्याची निविदा विचारात घेण्यात आलेली नाही.करीता बसरा कन्स्ट्रक्शन यांचा अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यता घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बुढढ़ीलेन कबाडीपुरा येथे सांस्कृतिक हॉल बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे.बसरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५३/८:**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मिलिंदनगर मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करावयाचे आहे.सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची दरासुची सन ९६-९७ नुसार रक्कम रु.५,००,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर कामासाठी खर्च शासकीय अनुदान सन ९६-९७ मधुन करण्यांत येणार आहे.तरी रक्कम रु.५,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलिंदनगर मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च शासकीय अनुदान सन ९६-९७ मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५४/९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन,वेदांतनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करण्याबाबतचे अंदाजपत्रकास स्थायी समितीने विषय क्र.४ दि. २८-५-९७ अन्वये मंजुरी दिली आहे.कार्यालयाची निविदा सुचना क्र.४३/९७ दि.२५-६-९७ जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या.कोरी निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१६) सोळा निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण सिलबंद पाकिटात (२) निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे.

१) बसरा कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दराचे दर

२) आर.एस.भाटीया ५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे दर.

वरीप्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा बसरा कन्स्ट्रक्शन यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराचे दर आहे.त्यास मा.आयुक्त यांनी दि.१३-८-९७ रोजी मान्यता दिली आहे.तरी बसरा कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन,वेदांतनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराची मे.बसरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मुंजुरी देण्यात येते

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५५/१०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.नारेगांव प्रा.शाळेच्या चारही बाजूने कुंपन भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. २८,०८,८९०/-चे अंदाजपत्रकास सर्व साधारण सभा ठराव क्र.२१५/८ दिनांक १०-३-९७ अन्वये सर्व साधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली आहे.सदर काम हाती घेण्यासाठी बी-१ नमुन्यात कार्यालयीन निविदा सुचना क्र.जा.क्र.मनपा/लेखा/नि/४३/९७ दि.२२-७-९७ अन्वये निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (२१) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (५) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दि.२२-७-९७ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खलील प्रमाणे आहे

| | | |
|---|---|---|
| १) मे.एम.एन.कन्स्ट्रक्शन | २७.९९% | कमी दराने |
| २) मे.एलोरा कन्स्ट्रक्शन | २१.००% | --//-- |
| ३) मे.खर्डीकर कन्स्ट्रक्शन | ५% | --//- |
| ४) मे.शिवा कन्स्ट्रक्शन | २९.००% | --//-- |
| ५) शेख शरीफ | १०.७६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.००% कमी दराची निविदा मे.शिव कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.परंतु संबंधित गुत्तेदाराने १% इसारा रक्कम निविदे सोबत न भरल्यामुळे त्याची निविदा रद्द करुन दुय्यम कमी दराची मे.एम.एन.कन्स्ट्रक्शन यांना प्रथम कमी निविदा दराच्या म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.००% कमी दराने काम करण्यास तयार आहात काय? याबाबत कार्यालयीन पत्र क्र. ७५८/५७ दि.१३-८-९७ अन्वये विचारणा करण्यात आली असता संबंधित गुत्तेदाराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.००% कमी दराचे काम करण्यास तयार असल्याबाबत लेखी संमती दिलेली आहे.त्यास मा.आयुक्तांनी देखील दि. १४-९-९७ रोजी मान्यता दिली आहे.

सबब सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.०० दराची मे.एम.एन.कन्स्ट्रक्शन यांची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,नारेगांव प्रा.शाळेच्या चारही बाजूने कुंपन भिंत बांधण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराच्या निविदा धारकांच्या दराने म्हणजेच अं.प.दरापेक्षा २९% कमी दराने काम करण्यास तयार असलेले मे.एम.एन.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५६/११:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,नारेगांव ते ट्रेचिंग ग्राउंड येथे १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु.९,८६,०००/- चे अंदापजत्रक तयार करण्यांत आले आले असून सदरील खर्च पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखाशिर्षका खाली सन ९७-९८ च्या तरतुदीतुन प्रस्तावित आहे.करीता अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,नारेगांव ते ट्रेचिंग ग्राउंड येथे १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.९,८६,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखाशिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५७/१२:**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,ज्योतीनगर येथे बॅडमिंटन हॉल बांधण्याचे कामासाठी दि.२९-४-९७ रोजी स्थायी समिती ठराव क्र. अन्वये रक्कम रु.५.०० लक्ष चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे.तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी श्री.एम.एन.पठाण यांचे ८.००१% कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने यांचे निविदा दरास मंजुर प्राप्त झाली आहे.कार्यालयीन आदेश क्र.१०६६ दि. १५-५-९७ अन्वये गुत्तेदारास कार्यदेश दिला असून सदरील काम प्रगतीपथावर आहे.मुळ अंदाजपत्रकात बॅडमिंटन हॉलची उंची ५.१० मी.घेण्यात आली.प्रत्यक्षात बॅडमिंटन हॉलची उंची ९.०० असावी लागते.सध्याचे काम ५.१० मी.उंचीचे झाले आहे.डी.पी.डी.सी.फंडाची मुदत रु.५.०० लक्ष आहे.पुढील वाढीव कामासाठी रु.२,६१,९२५/- खर्च येणार आहे.त्यामुळे सदरील खर्च मनपा फंडातील इमारती व इतर वाचनालये या तरतुदीतून करण्यात येईल.मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी ८.००१% कमी निविदेतील प्राप्त दरानुसार काम चालु असलेल्या मक्तेदारा मार्फत करुन घेण्याचा प्रस्ताव विभागाने सादर केला आहे.

सबब सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.७,६१,९२५/- अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम मुळ काम करणारी एजन्सी श्री. एम.एम.पठाण यांचे कडुन मुळबंदाजपत्रकीय रक्कमेच्या ८.००१% कमी दराने निविदेतील मंजुर दराप्रमाणे व बाकी रक्कमेचे काम सन ९६-९७ च्या दरसुची नुसार करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :**सदरील प्रस्ताव माझ्या वार्डातील असुन सदरील प्रस्तावानुसार काही दुरुस्त्या असुन सविस्तर माहितीसह पुढील बैठकीपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावे.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की,सदरील प्रस्ताव पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात यावा.पुढील सभेत सविस्तर माहितीसह ठेवावे.

**विषय क्र.२५८/१३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.मसनतपुर भागात डांबरी रस्ते तयार करणे कामाकरीता रक्कम रु. ४,२०,३५३/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दर सुची ९६-९७ अनुसार तयार करण्यांत आल्या असून मा.आयुक्तांनी दि.३०-८-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.सदर १८ खेडी विकास योजना ९७-९८ या शिर्षाअंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.करीता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.मसनतपुर भागात डांबरी रस्ते तयार करणे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,२०,३५३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च १८ खेडी विकास योजना ९७-९८ या शिर्षा अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५९/१४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.आंबेडकरनगर येथे खांडकी रस्ते दुरुस्ती व नविन शहबादी फरशी बसविणे कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रु.३,१२,५००/- चे सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांची दरसुची ९६-९७ अनुसार तयार करण्यांत आला असून मा.आयुक्तांनी दि. २९-८-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम महानगरपालिका गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत खांडकी/फरशी हया शिर्ष ९६-९७ खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.करीता मान्यतेसह विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.आंबेडकरनगर येथे खांडकी रस्ते दुरुस्ती व नविन शहबादी फरशी बसविणे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,१२,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च गलिच्छ वस्ती सुधारण अंतर्गत खांडकी/फरशी हया शिर्षकांतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६०/१५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.चिकलठाणा येथे आठवडी बाजाराच्या ओटयावर शेड बांधावयाचे आहे.सदर कामासाठी रक्कम रु.९,४३,६७०/- चे अंदाजत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.१४ / ११ दि.३१-५-९७ अन्वये सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी बी-१ लेखा / नि/५५ दि. २७-८-९७ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखपर्यंत एकूण (२५) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. १२-९-९७ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.कुलवंतसिंग | २.१% | जास्त दराने |
| २) श्री.शेख शरीफ | ५% | --//-- |
| ३) मे.यांत्रिक कन्स्ट्रक्शन | ४% | --//-- |

४) श्री.सलीम पटेल अंदाजपत्रकीय दराने.

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकय दराची निविदा श्री.सलीम पटेल यांची आहे.त्यास मा.आयुक्तांनी दि. २१-९-९७ रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दराची श्री.सलीम पटेल यांची निविद विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.चिकलठाणा येथे आठवडी बाजाराच्या ओटयावर शेड बांधण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६१/१६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.भावसिंगपुरा येथील मनपा शाळा इमारतीच्या परिसरास संरक्षित भिंत बांधावयाची आहे.सदर कामासाठी सर्वसाधारण बैठक दि. १०-३-९७ ठराव क्र.१९४/११ अन्वये रक्कम रु.१०,४०,४३०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निवदा जा.क्र.मनपा / लेखा /नि /४९ / ९७ दि. २९-७-९७ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण एकूण (१५) निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा प्राप्त झाल्या त्या दिनांक २७-८-९७ रोजी उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) फाईव्हस्टार कन्स्ट्रक्शन | ४.९९% | जास्त दराने |
| २) एस.एम.मंडोरे | १०.००% | --//-- |
| ३) एलोरा कन्स्ट्रक्शन | ८.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९ जास्त दराची फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.परंतु सदरील निविदा दर हा प्रशासनास जास्त वाटल्याने संबंधित गुत्तेदाराला वाटाघाटीस बोलाविण्यात आले.वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ % जास्त दराने अशी मंजुरी मा.आयुक्तातर्फे दि. २२-९-९७ रोजी देण्यांत आलेली आहे.

सबब फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन यांची सदर कामासाठी २% जास्त दराची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.भावसिंगपुरा येथील मनपा शाळा इमारतीच्या परिसरास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार अं.प.दरापेक्षा २ % जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६२/१७:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सुंदरनगर,नागेश्वरवाडी येथे १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची

सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ३,९९,३३०/- एवढयाचे तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदी मधुन करण्यांत येणार आहे.तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागेश्वरवाडी येथे १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,९९,३३०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६३/१८:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल येथील जलकुंभ भरण्यासाठी २५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ या दरसुचीनुसार रक्कम रु.१,२१,२००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल येथील जलकुंभ भरण्यासाठी २५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,२१,२००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६४/१९:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिवाण देवडी येथील अतुल बेकरीच्या गल्लीत १०० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी सन ९६-९७ च्या परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरसुची नुसार रक्कम रु.१,०२,४४०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.त्याचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,दिवाण देवडी येथील अतुल बेकरीच्या गल्लीत १०० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,०२,४४०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६५/२०:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, म्हाडा कॉलनी शहानुरवाडी येथे पाणी पुरवठयाचा दाब वाढविण्यासाठी १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,२९,०३४/-एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

तर अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, म्हाडा कॉलनी शहानुरवाडी येथे पाणी पुरवठयाचा दाब वाढविण्यासाठी १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,२९,०३४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६६/२१:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पदमपुरा येथील कमान वस्तीमध्ये १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु.१,२७,८००/- एवढया अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पदमपुरा येथील कमान वस्तीमध्ये १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,२७,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६७/२२:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,दलालवाडी भागात जुनी आर.सी.सी.३ इंची व्यासाची जी जलवाहीनी आहे.त्यामधुन नागरीकांना कमी दाबाने पाणी पुरवठा केला जात आहे.त्यामुळे सदर भागात १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,६३,०९४/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,दलालवाडी भागात १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,६३,०९४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६८/२३:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,गारखेडा येथील आधार गृ.नि.सोसायटी मध्ये १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी

परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,९७,५३७/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ,गारखेडा येथील आधार गृहनिर्माण सोसायटी मध्ये १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या १,९७,५३७/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६९/२४:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,परिमल गृहनिर्माण सोसायटीमध्ये १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दर सुचीनुसार रक्कम रु. १,३४,७३१/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे.तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,परिमल गृहनिर्माण सोसायटीमध्ये १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,३४,७३१/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७०/२५:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, तक्षशीलनगर येथे १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. २,९८,५००/- एवढयाचे तयार करण्यात आलेले आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तक्षशीलनगर येथे १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,९८,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७१/२६:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिल्कमील कॉलनी येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु. १,२२,१७०/- एवढयाचे अंदाजपत्रक

तयार करण्यात आले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सिल्कमील कॉलनी येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,२२,१७०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७२/२७:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.गारखेडा गांव ते नाल्यापर्यंत १०० विकास रस्त्याच्या बाजुने नाला बांधणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां.खात्याचे दरसुचीच्या दराने रक्कम रु. २,७७,९३७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,७७,९३७/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो.गारखेडा गांव ते नाल्यापर्यंत १०० विकास रस्त्याच्या बाजुने नाला बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,७७,९३७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७३/२८:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल येथील जलशुध्दीकरण केंद्र व जलकुंभावर तसेच जलतरण तलावास जलशुध्दीकरण करण्यासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करावयाची आहे.त्यासाठी रक्कम रु.८,४४,२००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.याचा खर्च रसायन सामुग्री खरेदी या लेखा शिर्षकामधुन करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, हर्सुल येथील जलशुध्दीकरण केंद्र व जलकुंभावर तसेच जलतरण तलावास जलशुध्दीकरण करण्यासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.८,४४,२००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "रसायन सामुग्री खरेदी" या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७४/२९:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केल आहे की,गांधीनगर येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,६१,३००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन सबब स्थायी समितीचा ठराव क्र.७७/३ दि.१८-६-९७ अन्वये मंजुरी घेण्यात आली आहे.

कार्यालयाची निविदा सुचना क्र.४७/९७ जि.की.दै.वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यात येवुन बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण आठ (८) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण तीन (३) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त निविदा खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.शेख मसुद | १.९९% | जास्त |
| २) श्री.मनजीतसिंग सहगल | ३.५% | जास्त |
| ३) श्री.मो.सोहेल सिद्दीकी | ०.२५% | कमी |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी हा श्री.मो.साहेल सिद्दीकी यांचा आहे.म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री.मो.सोहेल सिद्दीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,गांधीनगर येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराची श्री.मो.सोहेल सिद्दीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७५/३०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरु बालोद्यान येथे बांधण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या इमारतीच्या उभारणीचे काम जवळ जवळ पुर्णत्वाकडे जात आहे.

या कामासाठीच्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेने विषय क्र.२१७/१० दि.२८-५-९७ अन्वये रक्कम रु. ९२,९५,०००/- ला मंजुरी देऊन काम मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं.कडून मंजुर निविदा दरात म्हणजे ५% अधिक दराने करुन घेण्यास मंजुरी दिलेली होती.

सदरील प्रकल्पावर यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने अप्रत्यक्ष नियंत्रण आहे.व त्यांनी प्रकल्पासाठी वेळोवेळी झालेल्या त्यांच्या पाहणी दौऱ्यात ज्या तोंडी सुचना दिल्या त्यानुसार खालील कामे करावी लागली आहेत.तसेच काही कामे करावी लागणार आहेत.सदरील कामे समितीने सुचविल्यानुसारच नव्हे तर प्रकल्पाच्या परिपुर्णतेसाठी व प्रकल्प अजोड व्हावा यासाठीही आवश्यक आहेत.

प्रकल्प परिपुर्ण होण्यासाठी जी कामे करणे आवश्यक आहेत.ती कामे खालील प्रमाणे आहेत.

१) प्रकल्पाच्या पूर्व बाजूस बसलेली दक्षिणोत्तर संरक्षक भिंत जी आतील बाजूस असल्यामुळे केवळ ६' उंचीची व साध्या प्रकारची बांधण्यात आलेली होती.मात्र ती नंतर १०'उंचीची करण्यात आली.शिवाय हया भिंतीचे रुपांतर नंतर डेकोरेटिव्ह संरक्षक भिंतीत करण्यात आले तसेच उर्वरित संरक्ष क भिंतीच्या सर्व बाजूंची उंची सरसकट २' वाढविण्यात आली कारण सदरील संग्रहालयामध्चे अत्यंत मौलिक व दुर्मिळ वस्तुंचा संग्रह अपरिहार्य होते.तसेच पूर्व बाजूस असलेल्या दक्षिणोत्तर भिंतींस व उर्वरित संरक्षक भिंतीच्या वाढीव उंचीस स्टोन इफेक्ट रासायनिक रंगाच्या बाबींचे परिमाण आघानेच वाढले.

२) आतील बाजूस पेडेस्टल उभारण्यात आलेले आहेत.ते पेडेस्टल पूर्वी साधे होते.मात्र त्यास नंतर मिरची कलरचे ग्रॅनाईट लावण्याचे ठरले.तद्वतच ३०'X५०'आकाराच्या सर्व प्रदर्शनी दालनामध्येही ६'रुंदीची रेड प्रदर्शनी दालनात सदरील बॉर्डर करावयाची तरतूद नव्हती मात्र दालन अधिक आकर्षक व्हावे म्हणून ही रेड ग्रॅनाईटची बॉर्डरकरावी लागली.

३) तसेच हया प्रकल्पासाठी पुढेमागे लाईट आणि साऊंडवर आधारीत कार्यक्रम करण्याचे प्रयोजन आहे.तसेच एवढया मोठया प्रकल्पासाठी स्वतंत्र डी.पी.विद्युत व्यवस्थेसाठी घ्यावी लागणार आहे. यास्तव मीटर खोली बांधणे क्रम प्राप्त ठरले व त्यानुसार नियोजनाचा भाग म्हणून सदरील ठिकाणी मीटर रुम बांधावी लागली.सदरील मीटर रुमसाठीच्या सर्व बाबींमुळे देखील खर्चात वाढ होत आहे.मुळ आराखडयात मीटर रुमची तरतुद करण्यात आलेली नव्हती.

४) सदरील इमारतीची षटकोणी आकाराची असून या इमारतीच्या बाहेरील बाजुस प्लींथ प्रोटेक्शनसाठी दगडी सोलिंग व सिमेंट कॉक्रींट (पीसीसी) करणे आवश्यक आहे.अन्यथा पावसाच्या पाण्यामुळे इमारतीत प्लींथ मधुन पाणी झिरपुन आतील बाजूस ओलावा निर्माण होऊ शकतो.सबब हा संभाव्य ओलावा टाळण्यासाठी प्लींथ प्रोढेक्शनचे काम करणे आवश्यक आहे.

५) सदरील इमारत ज्या जागेवर बांधण्यात आली आहे.तेथील जमिनीचा पृष्ठभाग खालीवर असल्यामुळे त्याचे सपाटीकरण करुन पृष्ठभागास व्यवस्थीत उतार देऊन पावसाच्या पाण्याचा निचरा करणेस्तव खोदकामाचे परिणाम वाढत आहे व हे ववाढीव खोदकाम करणे अपरिहार्य आहे.

६) दुसरे असे की,या संग्रहालयाचे नुतन संचालक डॉ.शांतीलाल पुरवार यांनी देखिल काही सुचना मांडल्या असुन त्यानुसार संग्रहालयातील दुर्मिळ व मौल्यवान वस्तुचे चोरी पासुन संरक्षण व्हावे म्हणून दालनातील प्रत्येक दरवाजा मागे लोखंडी ग्रीलची मजबुत लोखंडी जाळी लावावी तसेच दालनाच्या बाहेरच्या बाजूस असलेल्या लोखंडी जाळीचे अतिरिक्त मजबुतीकरण (जाळीच्या सौंदर्यास बाधा येऊ न देता ) करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ.पुरवार यांनी केले आहे.हया फुटकळ कामामुळेही अंदाजपत्रकीय रक्कमेत थोडीवाढ होत आहे.

तसेच वरील सर्व प्रकारची कारणे लक्षात घेता व प्रकल्पाचे स्वरुप लक्षात घेता सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ होणे अपरिहार्य आहे.मुळ सुधारीत अंदाजपत्रक रु. ९२,९५,०००/- ला मंजुरी आहे.वरील टिप्पणीत नमुद केलेली कामे करावी लागत असल्याने निव्वळ वाढीव रक्कम रु. ७,००,०००/- ची आवश्यकता आहे.

तरी अंदाजपत्रकातील आकस्मित रक्कम सर्व बाबींच्या वाढी परिणामासह व त्यामुळे होणाऱ्या वाढीव खर्चास व सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु.९२,९५,०००/- अधिक रु. ७,००,०००/- असे एकूण ९९,९५,०००/- लाख प्रकल्प पुर्ण होणे आवश्यक असल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रकास व सदरील काम या प्रकल्पाचे मुळ ठेकेदार मे. एलोरा

कन्स्ट्रक्शन कं.यांचे कडुन त्यांच्या पुर्वीच्याच ५% अधिक दराने करण्यास मंजुरी मिळणेस्तव विनंती आहे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नेहरु बालोद्यान येथे बांधण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय या इमारतीच्या प्रकल्पावर नेमण्यात आलेल्या समितीने वेळोवेळी झालेल्या पाहणी दौऱ्यात केलेल्या सुचनांनुसार प्रस्तावात अ.क्र.१ ते ६ च्या वाढीव कामामुळे वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७,००,०००/- व एकूण अंदाजपत्रक रु. ९९,९५,०००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच सदरील काम प्रकल्पाचे मुळ ठेकेदार मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं.यांचेकडुन पुर्वीच्याच मंजुर निविदा दराने म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% अधिक दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७६/३१:**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्तांच्या मंजुरीने प्रस्ताव सादर केला की,कबाडीपुरा येथे हजरत जमाल बाबा दर्गा समोर नाल्यावर मनपा तर्फे नियोजीत (प्रस्तावीत) दुकाने बांधुन त्या भाडेतत्वावर देण्याकरीता सर्व साधारण सभेत पारीत केलेला ठराव क्र. १६३/३ दि. १६-३-९६ अन्वये दुकानाचे अनामत रक्कम रु. ४,०००/- प्रति चौरस मीटर प्रमाणे देण्यांत यावी.

परंतु सदरील दुकानाचे भाडे निश्चित करणेसाठी गठीत करण्यात आलेल्या समिती समोर प्रकरण ठेवण्यात आले असता खालील प्रमाणे भाडे निश्चित करण्यांत आले आहे.

अ) सर्वसाधारण सभेने मंजूरी दिल्याप्रमाणे रु. ४,०००/- प्रति चौरस मीटर अनामत रक्कम घ्यावी.

ब) भाडे :- २३६/- प्रति चौ.मी.प्रतिमहा निश्चित करण्यात येते.

तथापी सर्वसाधारण सभेने निश्चित केलेले अनामत रक्कम ठेवून त्या आधारे दुकानाकरीता जो जास्तीत जास्त (ऑफर) किंवा त्यापेक्षा अधिक अनामत रक्कम देईल त्याला दुकान लिलाव बोली पध्दतीने देणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , ,कबाडीपुरा येथे हजरत जमाल बाबा दर्गा समोर नाल्यावर मनपा तर्फे नियोजीत (प्रस्तावीत) दुकाने बांधुन त्या भाडेतत्वावर देण्याकरीता सर्व साधारण सभेने मंजुरी दिल्याप्रमाणे रु.४,०००/- प्रति चौ.मी.प्रतिमहा भाडे निश्चित करण्यात येते. निश्चित केलेली अनामत रक्कम ठेवून त्या आधारे दुकानाकरीता जास्तीत जास्त (ऑफर) किंवा त्यापेक्षा अधिक अनामत रक्कम देईल.त्याला दुकान लिलाव बोली पध्दतीने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७७/३२:**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्तांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की,श्री.मच्छिंद्र देवराव सोनवणे यांनी अर्ज दिला आहे की,त्यांनी (अर्जदारानी) २६ एप्रिल

१९९३ रोजी दुर्देवी विमान अपघात झाला होता.या विमान अपघातात सापडलेल्या दुर्देवी प्रवाशांना प्रथम मदत केली होती.ही विशेष बाब आहे.त्यांनी अर्जासोबत वृत्तपत्राच्या छायांकित प्रती दिल्या आहेत.म्हणून त्यांनी पैठणगेट सादिया टॉकीज मागील बाजूच्या दुकानातील दुकान क्र.१९ अ व १९ ब या दुकाना २५% रक्कम घेऊन भाडेतत्वावर द्यावी याबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

पैठणगेट सादिया टॉकिज मागील बाजूच्या दुकानासाठी अनामत रक्कम व भाडे निश्चित करण्यात आले असून त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

अनामत रक्कम : दि.१६-३-९६ ला ठराव क्र. १६३/३ सर्वसाधारण सभेने मंजुर केल्याप्रमाणे अनामत रक्कम रु. ४००० (चार हजार रु.फक्त) प्रति चौ.मी.प्रमाणे अनामत रक्कम घेण्यात यावी.

भाडे : समोरील दुकानाचे भाडे रु. ६०/- प्रति चौ.मी.प्रतिमहा व मागील दुकानाचे भाडे रु. ५०/-(पन्नास रुपये ) प्रति चौ.मी. प्रतिमहा प्रमाणे भाडे समितीने भाडे निश्चित केले आहे व त्या संदर्भात स्वतंत्र भाडे निश्चितीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

तसेच सर्वसाधारण सभेत पारीत झालेल्या ठरावात वरील अनामत घेऊन दुकाना द्याव्या व इतर अटी-शर्ती तयार करण्यात आलेल्या आहे.तसेच अर्जदाराने मागणी केलेली दुकान क्र.१९ अ व १९ ब हया निविदा नुसार अगोदर गेल्या आहेत.त्यामुळे त्यांना सदरील दुकाना देता येणार  नाहीत.कारण या दुकानधारकांनी पूर्ण अनामत रक्कमेचा भरणा केलेले आहे.

तरी ४०००/- प्रति चौ.मी.प्रमाणे अनामत रक्कम घेऊन त्यांत त्यांच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे २५% रक्कम प्रथम भरणा करुन उर्वरित रक्कम किती हप्त्यात घ्यावी किंवा कसे? याबाबत मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे २५% रक्कम भरुन भाडेतत्वावर द्यावयाच्या ऐवजी ५०% रक्कम डिपॉझिट भरावी अशी सुधारणा करावी.

**मा.सभापती :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे २५% रक्कम ऐवजी ५०% अशी सुधारणा करण्यात येऊन प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.मच्छिंद्र देवराव सोनवणे यांचा विमान अपघात झाला होता.त्यांनी विमान अपघातात सापडलेल्या दुर्देवी प्रवाशांना प्रथम मदत केली होती.ही विशेष बाब आहे.म्हणुन सादिया टॉकिज मागील बाजूच्या दुकानातील दुकान क्र.१९ अ व १९ ब या दुकानाबाबत दि.१६-३-९६ च्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १६३/३ अन्वये अनामत रक्कम रु. ४०००/- प्रति चौ.मी.प्रमाणे घेणे बाबत प्रस्ताव मंजुर झालेला आहे.त्यानुसार ४०००/- प्रति चो.मी.प्रमाणे अनामत रक्कमेत ५०% रक्कमेची सवलत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७८/३३:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव दिला आहे की, मनपाच्या आदर्श शाळा योजनेअंतर्गत डबेल-डेस्क (तीन सिटर) खरेदी करावयाचे आहे.गतवर्षी निविदा मागवुन सर्वात कमी दर मराठवाडा ट्रेडींग यांचे २०५० प्रति नगाप्रमाणे होते.तसेच लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांचे दर रु. २३७५/- प्रति नग होते. प्राप्त कमी दराच्या निविदेमध्ये आयुक्तांनी वाटाघाटी करुन

रु.१९७५/- प्रति नग या दरास मान्यता देण्यात आली होती,त्यास स्थायी समिती ठराव क्र.६५०/२५ दि. १३-२-९७ अन्वये मंजुरी मिळाली आहे.निधी अभावी सर्व शाळांसाठी डबेल-डेस्क खरेदी करता आले नाही.खरेदी करण्यात आलेल्या डबल-डेस्कच्या दर्जा शहर अभियंता यांनी प्रमाणित करुन मानका स्पेशिफिकेशन नुसार डबेल-डेस्क प्राप्त झाल्याचा अहवाल दिलेला आहे.त्या मान्यदराने मराठवाडा ट्रेडींग कंपनी सन ९७-९८ वर्षासाठी उर्वरित शाळांसाठी ५०६ नग डबेल-डेस्क पुरविण्यास तयार आहे.डबेल-डेस्क सागवानी साईज याप्रमाणे असेल.

१) लांबी ३ १/४
२) टॉप १०"
३) सीट १०"
४) बुकसेल्फ ८"
५) अँगल फ्रेम १ १/४"४ एम.एम.

याकरीता रु.१० लक्ष खर्च अपेक्षित आहे.मा.आयुक्त यांनी सदर प्रकरणी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ ठेवावा असे सुचित केले आहे.

त्यानुसार वरील प्रकरणी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आदर्श शाळा योजने अंतर्गत डबेल-डेस्क (तीन सिटर) उर्वरित शाळांसाठी खरेदी करण्याकरीता वाटाघाटीअंती ठरल्यानुसार प्रतिनग रुपये १९७५/- च्या दराने प्रस्तावात दर्शविलेल्या साईजप्रमाणे सागवानी डबेल -डेस्क एकुण ५०६ नग मे.मराठवाडा ट्रेडींग कंपनी यांचेकडून खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

<u>**ऐनवेळच्या चर्चेद्वारे आलेला प्रस्ताव**</u>

**विषय क्र.२७९/३४:**

श्री.खोब्रागडे यांचा अपील.

वार्षिक वेतनवाढ (मुळ वेतना पासुन ) पुर्ववत चालु.

**संदर्भ : १)** निलंबन काळातील केलेली शिक्षा.

**२)** श्री.खोब्रागडे पी.के.यांचे दि.२४-६-९६, २७-९-९६ व त्यानंतरही अनेक वेळा निवंती अर्ज (अपील) सादर केले.

कार्यालयीन आदेशान्वये दि. १६-४-९६ अन्वये जी शिक्षा मला करण्यात आली आहे त्यास अजापावेतो दोन वर्षाचा कालावधी झालेला आहे.आदेशामध्ये वेतनवाढ रोखण्याबाबत नेमका काळ दर्शविलेला नाही. इतर कुणालाही वेतनवाढी रोखणे बाबत काही कर्मचाऱ्यांना जी शिक्षा झालेली आहे.ती एक वर्षाच्या पर्यंत सिमित ठेवलेली आहे व त्यानंतर प्रशासनाने त्यांचे वेतनवाढ पुर्ववत चालु केलेली आहे.

मला मात्र प्रशासनाने निलंबनही केले व माझी मुळ वेतनवाढ रोखली अशा दोन प्रकारच्या शिक्षा केलेल्या आहेत.हा माझ्यावर अन्याय झालेला आहे.निलंबन काळ मी चार महिने भोगलेला आहे. नियमाप्रमाणे ती शिक्षा झालेली आहे. तेव्हा कृपया माझी जी मुळ वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे,ती पुर्ववत चालु करुन थकीत पैसे मिळणे बाबत मला योग्य तो न्याय द्यावा.ही विनंती.

**संवाद :**

**श्री.गौतम लांडगे :** श्री.खोब्रागडे पी.के.यांनी स्थायी समितीकडे अपील केलेले आहे.

**श्री. अ. रशिदखाँन :** त्यांनी वेळोवेळी अपील अर्जाद्वारे विनंती करुन त्यांना दिलेल्या शिक्षेबाबत विचार करण्यासाठी या बैठकीत निर्णय व्हावा व त्यांना एकाच वेळेस दोन शिक्षा प्रस्तावित केल्या त्या रद्द करुन त्यांची वेतनवाढ पुर्ववत चालु करुन थकीत रक्कम अदा करावी.

**मा.सभापती :** ठिक आहे.श्री.खोब्रागडे पी.के.यांच्या अर्जावर विचार करुन असा निर्णय देण्यात येतो की,श्री.खोब्रागडे पी.के.यांना देण्यात आलेली शिक्षा रद्द करुन त्यांची मुळ वेतनवाढ पुर्ववत चालु करुन,सेवाकाळ धरावा व उर्वरित थकीत रक्कम अदा करण्यास प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.खोब्रागडे पी.के.यांनी स्थायी समितीकडे वेळोवेळी दिलेल्या अपील अर्जावर विचार करुन श्री. खोब्रागडे यांना दि.१६-४-९६ अन्वये जी शिक्षा करण्यात आलेली होती.त्या एकाच वेळेस दोन शिक्षा करण्यात आलेल्या होत्या.त्यांची वेतनवाढ मुळ वेतनावर आणून ठेवलेली होती व त्याबाबतचा कालावधी ठरविण्यात आलेला नव्हता.त्यामुळे दोन वर्षाचा कालावधी होऊनही त्यांचे बाबतीत निर्णय झालेला नाही व त्यांचेवर अन्याय झालेला असल्याने त्यांना मुळ वेतनावर आणलेली शिक्षा रद्द करुन त्याचा सेवाकाळ धरण्यात यावा व त्यांची वेतनवाढ पुर्ववत चालू करुन थकीत रक्कम अदा करणेस प्रशासनाने कार्यवाही करावी.यास स्थायी समिती सभेत स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८०/३५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.आंबेडकर नगर येथील महात्मा फुले यांचे पुतळया शेजारी बालवाडीसाठी इमारत बांधावयाची आहे त्यासाठी सा.बां.विभागाचे सन ९६-९७ चे दरसुचीनुसार रक्कम रु.२,३२,७६०/- चे अंदाजपत्रक तयार केले आहे.त्यास मा.आयुक्तांनी दि.३०-९-९७ अन्वये मंजुरी दिली आहे.

सदर कामाचा खर्च हा ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षक मधुन करण्यात येणार आहे.तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आंबेडकर येथील महात्मा फुले यांचे पुतळया शेजारी बालवाडीसाठी इमारत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,३२,७६०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च ५% कमकुवत घटकांसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| मा.नगरसचिव | मा.सभापती |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | स्थायी समिती, |
| | महानगरपालिका,औरंगाबाद. |